प्रस्तुत शोध में वृद्धाश्रमो मे रहने वाले वृद्धों मे से ७९.५० प्रतिशत वृद्धों ने हमारा मृत्यू वृद्धाश्रम मे होना चाहिए ऐसा जवाब दिया है, यह प्रमाण हमारा मृत्यू हमारे घर मे होना चाहिए ऐसा कहने वाले २०.०० प्रतिशत और मृत्यू के बारे मे जवाब नही देने वाले ०१.०० प्रतिशत उत्तरदाताओसे अधिक है, यह प्रमाण अधिक होणे का कारण वृद्धाश्रम मे रहने वाले वृद्ध पारिवारीक विवादोसे परेशान हुए हैं।

प्रस्तुत शोध में वृद्धाश्रमो मे रहने वाले वृद्धों मे से ८९.५० प्रतिशत वृद्धों को मृत्यू से डर नही लगता है, यह प्रमाण हमे मृत्यू से डर लगता है ऐैसा जवाब देने वाले १०.५० प्रतिशत वृद्धो की तुलना में अधिक हैं।

प्रस्तुत शोध में वृद्धाश्रमो मे रहने वाले वृद्धों मे से ८०.५० प्रतिशत वृद्धों को आत्महत्या का खयाल नही आता है, यह प्रमाण हमे आत्महत्या का खयाल आता है ऐसा जबाब देने वाले १९.५० प्रतिशत वृद्धो की तुलना में अधिक हैं।

प्रस्तुत शोध में वृद्धाश्रमो मे रहने वाले वृद्धों को वृद्धाश्रम मे मानसिक संतुश्टि नही मिलती है, ऐसा जवाब देने वाले ६४.५० प्रतिशत वृद्ध है, यह प्रमाण हमे वृद्धाश्रम मे मानसिक संतुश्टि मिलती है, ऐसा जवाब देने वाले ३५.५० प्रतिशत वृद्धो के मुकाबले अधिक हैं। इससे ऐसा कह सकते है की, वृद्धाश्रमो मे रहने वाले वृद्धों कोमानसिक संतुश्टि नही मिलती हैं।

प्रस्तुत शोध में वृद्धाश्रमो मे रहने वाले वृद्धों में से ३२.५० प्रतिशत वृद्ध याददाष्त कम होणे की समस्यासे परेषान है, और ३२.०० प्रतिशत मानसिक स्थिती गिरने से परेषान है, तो २८.५० प्रतिशत विस्मृति मे वृद्धि के कारण परेषान है तो १४.५० प्रतिशत जीवन मे अवसाद (नैराष्य) के कारण परेषान है, इससे हम यह कह सकते है कि वृद्धाश्रमो मे रहने वाले वृद्ध कोई ना कोई मानसिक समस्या से परेशान हैं।

प्रस्तुत शोध में वृद्धाश्रमो मे रहने वाले वृद्धों में से ०१.५० प्रतिशत वृद्धों को अल्झायमर यह मानसिक बिमारी है, तो ००.५० प्रतिशत वृद्धों को डिमेन्षिया यह मानसिक बिमारी है तो ९८.०० प्रतिशत वृद्धों ने हमे एक भी मानसिक बिमारी नही हैं।

प्रस्तुत शोध में वृद्धाश्रमो मे रहने वाले वृद्धों में से ३८.५० प्रतिशत वृद्ध मानसिक तणाव दुर करणा और उचित मानसिक संतुलन के लिए ध्यान करते है, तो ३१.५० प्रतिशत वृद्ध योगा करते है, तो ०३.०० प्रतिशत वृद्ध विपष्चना करते है, तो ००.५० प्रतिशत वृद्ध मानसिक तणाव दुर करणा और उचित मानसिक संतुलन के लिए भगवान के नाम का स्मरण करते है, तो २६.५० प्रतिशत वृद्ध मानसिक तणाव दुर करणा और उचित मानसिक संतुलन के लिए कुछ भी नही करते हैं।

प्रस्तुत शोध में वृद्धाश्रमो मे रहने वाले वृद्धों में से ७७.०० प्रतिशत वृद्धों को वित्तीय समस्याओं के कारण मानसिक तणाव आता है, यह प्रमाण वित्तीय समस्याओं के कारण हमे मानसिक तणाव नही आता है ऐसा जवाब देने वाले २३.०० प्रतिशत वृद्धो के मुकाबले अधिक है, इस से हम यह कह सकते है की वृद्धों को वित्तीय समस्याओं के कारण मानसिक तणाव आता हैं।

प्रस्तुत शोध में वृद्धाश्रमों में रहने वाले वृद्धों में से हमारी स्मरणशक्ती/यादाष्त 'कुछ हद तक अच्छी है' ऐसा जवाब देने वाले ३५.०० प्रतिशत वृद्ध है, यह प्रमाण हमारी स्मरणशक्ती/यादाष्त 'बहुत अच्छी है' १०.०० प्रतिशत, 'अच्छी है' १७.०० प्रतिशत, 'मध्यम' १४.५० प्रतिशत और हमें 'कुछ भी याद नहीं रहता' ऐसा जवाब देने वाले २३.५० प्रतिशत वृद्धों के प्रमाण से अधिक है।

प्रस्तुत शोध में वृद्धाश्रमों में हमारी सेहत की देखभाल कोई भी नही रखता ऐसा जवाब देने वाले ४८.५० प्रतिशत वृद्ध है, यह प्रमाण वृद्धाश्रमों में हमारी सेहत की देखभाल हमारा साथी करता है, ऐसा जवाब देने वाले ९.५० प्रतिशत, हमारी सेहत की देखभाल वृद्धाश्रम के कर्मचारी रखते है ऐसा जवाब देने वाले १०.०० प्रतिशत, वृद्ध है, हमारी सेहत की देखभाल वृद्धाश्रम में के दोस्त रखते है ऐसा जवाब देने वाले ३१.५० प्रतिशत वृद्धों कें प्रमाण से अधिक है।

प्रस्तुत शोध में वृद्ध जिस वृद्धाश्रम में रहते हैं वहाँ कोई भी स्वास्थ्य सुविधा उपलब्ध नहीं है ऐसा जवाब देने वाले ९९.०० प्रतिशत वृद्ध है, यह प्रमाण हम रहते है इस वृद्धाश्रम में स्वास्थ्य सुविधा उपलब्ध है ऐसा जवाब देने वाले ०१.०० प्रतिशत वृद्धों के प्रमाण से अधिक है। इससे हम यह कह सकते है, की वृद्धाश्रमो में वृद्धों के लीए स्वास्थ्य सुविधाओं की कमी दिखाई देती है।

प्रस्तुत शोध में वृद्धाश्रम में दिए जाने वाले भोजन से संतुष्ट नहीं हैं ऐसा जवाब देने वाले अधिक याने ९०.०० प्रतिशत वृद्ध है और केवल १०.०० प्रतिशत वृद्धों ने हम भोजन से संतुश्ट है ऐसा जवाब दिया है, इसिलिए अधिक वृद्धों ने हम भोजन से असंतुष्ट हैं ऐसा जवाब दिया है। साथ ही, हमारे स्वास्थ्य को स्वस्थ रखने के लिए हमारे वृद्धाश्रममें उचित देखभाल नहीं करते हैं ऐसा उत्तर देने वाले ८०.०० प्रतिशत वृद्ध है, यह प्रमाण हमारे स्वास्थ्य को स्वस्थ रखने के लिए हमारे वृद्धाश्रममें उचित देखभाल करते हैं ऐसा उत्तर देने वाले २०.०० प्रतिशत वृद्धों से अधिक है, इससे हम यह कह सकते है की वृद्धाश्रमों में वृद्धों के स्वास्थ्य की उचित देखभाल नहीं करते हैं। साथ हि, वृद्धाश्रम के कर्मचारियों द्वारा वृद्धाश्रम का परिसर साफ नहीं रखा जाता है ऐसा उत्तर देने वाले ८३.५० प्रतिशत वृद्ध है, यह प्रमाण परिसर साफ रखा जाता है ऐसा उत्तर देने वाले १६.५० प्रतिशत उत्तरदाताओं के प्रमाण से अधिक है।

**निष्कर्ष** – १) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में ७० से ७९ वर्ष इस मध्यम वृद्ध आयु समूह के उत्तरदाते सबसे ज्यादा अर्थात् ३९.५० प्रतिशत हैं। २) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में महिला वृद्ध उत्तरदाताओं का प्रमाण सबसे ज्यादा अर्थात् ५५.५० प्रतिशत इतना हैं। ३) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में अशिक्षित वृद्धों का प्रमाण सबसे ज्यादा हैं। ४) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में 'विवाहित वृद्ध' ९६.०० प्रतिशत है, इन में विधवाओं का प्रमाण (४७.०० प्रतिशत) सबसे ज्यादा हैं। ५) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में हिंदु धर्मियों और खुले वर्ग के उत्तरदाताओं की संख्या अधिक है। ६) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में वर्तमान स्थिति में हमारे स्वास्थ्य की स्थिती बुरी है ऐसा उत्तर देने वाले अधिक ७३.५० प्रतिशत वृद्ध है। ७) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में से हम वृद्ध हो गये है ऐसा हमे लगता यह जवाब देने वाले ७३.०० प्रतिशत वृद्ध हैं। ८) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में से अधिक याने ७८.५० प्रतिशत वृद्धों कोवृद्धाश्रम मे अकेला लगता हैं। ९) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में से अधिक याने ८५.५० प्रतिशत वृद्धों का जीवन गमो से भरा हुआ हैं। १०) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में से अधिक याने ७०.५० प्रतिशत वृद्धों की भविष्य के बारे मे निराषावादी राय हैं। ११) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में से अधिक याने ७९.५० प्रतिशत वृद्धों को हमारी मृत्यू वृद्धाश्रम में ही होनी चाहिए ऐसा लगता हैं। १२) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में से अधिक याने ८९.५० प्रतिशत वृद्धों को मृत्यू से डर नही लगता हैं। १३) वृद्धाश्रम में रहने वाले ८०.५० प्रतिशत वृद्धों को आत्महत्या का खयाल आता हैं। १४) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में से अधिक याने ६४.५० प्रतिशत वृद्धों को वृद्धाश्रम में मानसिक संतुष्टी नही मिलती। १५) वृद्धाश्रम में रहने वाले सब वृद्ध कोई ना कोई मानसिक समस्या से परेशान हैं। १६) वृद्धाश्रम मेंरहने वाले केवळ ०२.०० प्रतिशत वृद्धों को डिमेन्षिया और अल्झायमर जैसी मानसिक बिमारी हैं। १७) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में से सर्वाधिक वृद्ध मानसिक तणाव दुर करना और उचित मानसिक संतुलन के लिए ध्यान करते हैं। १८) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में से अधिक याने ७७.०० प्रतिशत वृद्धों को वित्तीय समस्याओं के कारण मानसिक तणाव आता हैं। १९) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में हमारी स्मरणशक्ती/यादाष्त 'कुछ हद तक अच्छी है' ऐसा उत्तर देने वाले वृद्धों का प्रमाण अधिक है। २०) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में से हम रहते है इस वृद्धाश्रम में कोई भी स्वास्थ्य सुविधा उपलब्ध नहीं है ऐसा जवाब देने वाले वृद्धों का प्रमाण अधिक है। २१) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में से हम वृद्धाश्रम में दिए जाने वाले भोजन से संतुष्ट नहीं हैं ऐसा उत्तर देने वाले वृद्धों का प्रमाण (९०.०० प्रतिशत) अधिक है। २२) वृद्धाश्रम में रहने वाले वृद्धों में से हमारे स्वास्थ्य को स्वस्थ रखने के लिए हमारे वृद्धाश्रममें उचित देखभाल नहीं करते हैं ऐसा उत्तर देने वाले वृद्धों का प्रमाण (८०.०० प्रतिशत) अधिक है। २३) वृद्धाश्रम के कर्मचारियों द्वारा वृद्धाश्रम का परिसर साफ नहीं रखा जाता है ऐसा उत्तर देनेवाले अधिक ८३.५० प्रतिशत वृद्ध है। इस तरह, प्रस्तुत शोध पत्र से वृद्धाश्रमों में रहने वाले वृद्धो की स्वास्थ्य स्थिति का पता लगाने का प्रयास किया है।

**संदर्भ ग्रंथ सूची –**


१. गोखले शरच्चंद्र, २०१२, वार्धक्य, जराविज्ञान और जीवन षैली, पुणे, उत्कर्श प्रकाशन, पृ. सं. ४५.
२. खडसे भा. कि., २००४, भारतीय समाज और सामाजिक समस्याऐं, मुंबई, हिमालया पब्लिषिंग हाउस, पृ. सं. १४६.
३. लिमकर सुधाकर, २००४, स्वास्थ्य संवाद, औरंगाबाद, संवाद प्र.पृ.सं. ६१.
४. महाराष्ट्र टाइम्स, औरंगाबाद, सोमवार, दिनांक, १३/०७/२०१५, पृ.सं. ५.
५. लिमकर सुधाकर, २००४, स्वास्थ्य संवाद, औरंगाबाद, संवाद प्र. पृ.सं.६१.
६. गोखले शरच्चंद्र, २०१२, संतोषजनक वार्धक्य, पुणे, उत्कर्ष प्र. पृ. सं. ५.
७. गोखले शरच्चंद्र, २०१२, वार्धक्य, जराविज्ञान और जीवन शैली, पुणे, उत्कर्ष प्र., पृ. सं. ४–५.
८. गंदेवार एस. एन., २००३, भारतीय समाजः विवादास्पद विशय और समस्याएं, लातूर, विद्याभारती प्रकाशन, पृ. १३३.
९. खडसे भा. कि., २००४, भारतीय समाज और सामाजिक समस्याऐं, मुंबई, हिमालया पब्लिशिंग हाउस, पृ. सं. १४४.
१०. संगोलकर दत्ता, २०१४, मानवाधिकार, पुणे, जिज्ञासा प्रकाशन, पृ. १५७.
११. http://hi.vikaspedia.in/health
१२. Elderly in India 2016, Central Statistics office, Govt. of India.

# मनोवैज्ञानिक कठोरता और मनोवैज्ञानिक कल्याण में सहसंबंध का अभ्यास

**डॉ. दीपा बलखंडे**, सहयोगी प्राध्यापक, मनोविज्ञान विभाग, श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, महाल, नागपूर.

**सारांश** :– मनोवैज्ञानिक कठोरता और मनोवैज्ञानिक कल्याण में सहसंबंध का अभ्यास करना यह इस संसोधन का उद्देश है। इसके लिए इस संशोधन के लिए कुल १०० लोगो का चुनाव किया गया। जिनकी आयु १८ से २५ तक थी। जिनमे ५० महिला व ५० पुरुषो का समावेश किया गया। संशोधन के लिए मनोवैज्ञानिक कठोरता और मनोवैज्ञानिक कल्याण परिक्षण का उपयोग किया गया। सहसंबंध पद्धतीसे सहसंबंध ली गणना की गई। तब उनमे –०.४१ का सहसंबंध दिखाई दिया। निष्कर्ष यह दिखाई दिया की जिन व्यक्तियों में मनोवैज्ञानिक कठोरता अधिक पाई जाती है उन व्यक्तियों में मनोवैज्ञानिक कल्याण की भावना में कमी दिखाई देती है।

Key Words – मनोवैज्ञानिक कल्याण, मनोवैज्ञानिक कठोरता।

**मनोवैज्ञानिक कल्याण** :– सामान्य जीवन में गुणवत्ता, संतुष्टि स्तर, उपलब्धि की भावना इत्यादि के साथ सकारात्मक सहसंबंध याने कल्याण है। मनोवैज्ञानिक कल्याण के अनेक घटक है। सामाजिक कल्याण, भावनात्मक कल्याण, आध्यात्मिक कल्याण, पर्यावरण कल्याण, व्यावसायिक कल्याण, बौद्धिक कल्याण, शारीरिक कल्याण. भलाई सबसे महत्त्वपूर्ण लक्ष्यों में से एक है जो व्यक्तियों के साथ साथ समाज भी उसके लिए प्रयास करते है। यह शब्द दर्शाता है की कुछ अच्छी स्थिति में है। मनोवैज्ञानिक कल्याण यह संतोष की व्यक्तिगत भावना है। जीवन के अनुभव के साथ की संतुष्टि और भूमिका, उपलब्धि की भावना, उपयोगिता, अपनापन, कोई संकट नहीं है इत्यादी सभी बातो को दर्शाता है। यह प्रतिकूल परिस्थिति में अच्छी तरह से हमें बनाए रखता है। यह शारीरिक स्थितियों पर निर्भर है। इस प्रकार मनोवैज्ञानिक भलाई यह सामान्य जीवन की गुणवत्ता, संतुष्टि स्तर, उपलब्धि की भावना आदि के साथ सकारात्मक सहसंबंध के कुल अंश दिखाई देते है। मनोवैज्ञानिक भलाई शब्द का अर्थ व्यापक रूप से हो सकता है जो आमतौर पर कल्याण से जुडा होता है। मनोवैज्ञानिक भलाई यह दैनिक लक्षो की अनुपस्थिति, आत्मसम्मान, सकारात्मक प्रभाव, दैनिक गतिविधिया, संतुष्टि, आत्मघाती विचारो की अनुपस्थिति, व्यक्तिगत नियंत्रण, सामाजिक समर्थन, तनाव की अनुपस्थिति और सामान्य दक्षता इत्यादी लक्षण भलाई से संबंधित है।

**मनोवैज्ञानिक कठोरता**:– कुछ लोग ऐसे होते है जो वास्तव में तनाव को कम होने देने के बजाय उन्हें तनाव में घिरते हुए देखते है। ऐसे व्यक्ति का व्यक्तिमत्व मुश्किल प्रकार का होता है। यह शब्द पहले 'सुजन कोबासा' इन्होने उपयोग में लाया। कठोरता एक व्यक्तिमत्त्व शैली है जो प्रतिबद्धता की भावना को बताती है और नियंत्रण और समस्याओं की धारणा को चुनौतिया देती है।

वास्तव में मनोवैज्ञानिक कठोरता इन महत्त्वपूर्ण विशेषताओं से बनी है:– **प्रतिबद्धता**:– लोगो में अपने मूल्यों, विश्वासों, पहचान की भावना, काम और पारिवारिक जीवन के प्रति प्रतिबद्धता की भावना है। **नियंत्रण**:– एक भावना जो किसी के घटनाओ के कारण बनती है और जो किसी के पर्यावरण को प्रभावित कर सकती है। **चुनौती**:– बदलाव की शुरूवात और नियंत्रण के लिए तत्पर रहना है और विकास के अवसरों का प्रतिनिधित्व करती है।

कठोरता यह अच्छे शारीरिक और अच्छे मानसिक स्वास्थ्य दोनों से संबंधित है। स्वास्थ्य मनोवैज्ञानिको द्वारा बताई गई व्यवस्था यह है की प्रतिबद्धता, नियंत्रण और चुनौती के भावना के परिणाम स्वरुप व्यक्ति व्यवहार करता है।

मनोवैज्ञानिक कठोरता को कई स्तरों पर भावनाओं और आत्म–जागरूक उत्तेजनाओं पर एक प्रभावी घटक माना जाता है। मनोवैज्ञानिक कठोरता स्वयं और आसपास की दुनिया के लिए एक सामान्य अभिविन्यास है और इसमें प्रतिबद्धता, नियंत्रण और टकराव के तीन घटक शामिल हैं. कोबासा के दृष्टिकोण से, एक व्यक्ति की तीन सार्वजनिक विशेषताएं है– १. एक विश्वास है कि वह घटनाओं को नियंत्रित करने या नियंत्रित करने में सक्षम है। २. गहरी चौराहे या गतिविधियों के प्रति प्रतिबद्धता महसूस करने की क्षमता जो वह (प्रतिबद्धता) करता है। ३. उम्मीद है कि परिवर्तन आगे की वृद्धि के लिए एक रोमांचक लड़ाई है और इसे जीवन के सामान्य पहलू (टकराव) के रूप में जानता है।

कठोरता को प्रतिबद्धता, नियंत्रण, चुनौती और मुकाबला कौशल की भावनाओं के माध्यम मनोवैज्ञानिक कल्याण के स्तर को बढ़ाने के लिए माना जाता है।

मनोवैज्ञानिक रूप से, कोबासा (१९७९) ने पाया कि कठोरता तनाव और बीमारी के बीच संबंध का एक बफर है। आमतौर पर, कठोरता मौजूदा परिस्थितियों को अधिकतम करने और कठिनाइयों को कम करने के लिए मजबूर करती है। यह स्पष्ट है कि कठोरता मनोवैज्ञानिक, सामाजिक और शारीरिक कल्याण से जुड़ी है। हार्डी लोग, सामान्य रूप से, परिवर्तनकारी अनुभवों (वांस, स्ट्रूजिक, और मस्टेन २००८) में तनावपूर्ण स्थितियों को संशोधित करने के लिए समस्या–केंद्रित रणनीतियों पर निर्भर करते हैं।

मनोवैज्ञानिक कल्याण सिद्धांत के अनुसार, किसी व्यक्ति का मनोवैज्ञानिक स्वास्थ्य उसके जीवन के कुछ पहलुओं में सकारात्मक कार्यशीलता पर निर्भर करता है। व्यक्ति को दूसरों के साथ सकारात्मक संबंध रखना चाहिए, पर्यावरण पर हावी होना चाहिए, अपने आप को और अपने अतीत को स्वीकार करना चाहिए, अपने जीवन में एक लक्ष्य और अर्थ होना चाहिए, व्यक्तिगत विकास और अपने स्वयं के निर्णय लेने की क्षमता. सैद्धांतिक और व्यावहारिक रूप से मनोवैज्ञानिक कल्याण व्यक्तित्व और विकास के सिद्धांतों में एक महत्त्वपूर्ण हिस्सा लेता है।

**उपकल्पना** (Hypothesis):– मनोवैज्ञानिक कठोरता और मनोवैज्ञानिक कल्याण इनमे ऋणात्मक सम्बन्ध होता है।

**परिवर्त्य** (Variables): – १. **स्वतंत्र परिवर्त्य** :– मनोवैज्ञानिक कठोरता। २. **आश्रित परिवर्त्य** :– मनोवैज्ञानिक कल्याण। ३. **स्वतंत्र परिवर्त्य**:– १. सामाजिक–आर्थिक दर्जा २. महिला – ५०, पुरुष – ५०. ३. आयु सीमा – १८ से २५.

**संशोधन रचना** (Research Design) :– सहसंबंधात्मक रचना

**संशोधन पद्धती** (Methodology):– १. Sample:- कुल व्यक्तियोंकी संख्या १०० थी। जिनमे से महिला–५० और पुरुष–५० की संख्या थी। उनकी आयु सीमा–१८ से २५ की थी और जिनका सामाजिक आर्थिक दर्जा मध्यम था। २. Tools:- Psychological Hardiness Scale by Arun Kumar Singh: – इस परिक्षण में कुल ३० कथन दिए गए है। इसमे कुछ धनात्मक कथन है तो कुछ

ऋणात्मक कथन है। धनात्मक कथन का गुणांकन ५,४,३,२,१ इस प्रकार से करना है तो ऋणात्मक कथन का गुणांकन १,२,३,४,५ इस प्रकार से करना है। इसमे कठोरता के तिन घटकों का मापन होता है प्रतिबन्धता, नियंत्रण, चुनौती।

Well & Being Scale by Dr- Devendrasing Sisodiya and Pooja Choudhary:– इस परिक्षण में कुल ५० कथन दिए गए है। इस परिक्षण में गुणांकन सूचि उपलब्ध है। इसमे उत्तरों के पाच पर्याय दिए गई है। पूर्णता सहमत के लिए ५ गुण, सहमत के लिए ४ गुण, अनिश्चित के लिए ३ गुण, असहमत के लिए २ गुण, पूर्णता असहमत के लिए १ गुण देना है। इस परिक्षण में कुल पाच क्षेत्र दिए गए है। संतोष्टि, सामर्थ्य, सामाजिकता, मानसिक स्वास्थ्य, आंतरव्यक्तिगत सम्बन्ध. इन सभी क्षेत्रो के १०–१० कथन दिए है।

Procedure of data collection:– इस संशोधन के लिए मध्य नागपूर के कुल १०० लोगो का चुनाव यादृच्छिक पद्धति से किया गया। जिनकी आयु १८ से २५ तक थी और जिनका सामाजिक आर्थिक दर्जा मध्यम स्तरीय था। जिनमे ५० महिला व ५० पुरुषो का समावेश किया गया। प्रत्यक्ष में उनसे मुलाकात करके उनसे उपरोक्त परिक्षण सुलझा लिए गए.

**सांख्यकीय विश्लेषण** )Statistical treatment(:-

| Variables | Mean | SD | Co-Rel. | N |
|---|---|---|---|---|
| Psychological Hardiness | 97.6471 | 44.7224 | r = -0.41 | Male=50 |
| Psychological Well- being | 178.2941 | | | Female=50 |

**विवेचन** (Result and Discussion):- PRoduct moment correlation के माध्यम से मनोवैज्ञानिक कठोरता और मनोवैज्ञानिक कल्याण की गणना की तब उनमे –०.४१ का सहसंबंध दिखाई दिया। इससे यह दिखाई देता है की जिन व्यक्तियों में मनोवैज्ञानिक कठोरता अधिक पाई जाती है उन व्यक्तियों में मनोवैज्ञानिक कल्याण की भावना में कमी दिखाई देती है। इसके विपरीत जिन व्यक्तियों में मनोवैज्ञानिक कठोरता कम पाई जाती है उन व्यक्तियों में मनोवैज्ञानिक कल्याण की भावना में अधिक दिखाई देती है। कारण मनोवैज्ञानिक कठोरता यह मनोवैज्ञानिक, सामाजिक और शारीरिक कल्याण से जुड़ी होती है। कठोरता एक व्यक्तिमत्त्व शैली है जो प्रतिबद्धता की भावना को बताती है और नियंत्रण और समस्याओं की धारणाओ को चुनौतिया देती है। मनोवैज्ञानिक कल्याण यह संतोष की व्यक्तिगत भावना है। जो हमारे जीवन के अनुभव के साथ समाधान, भूमिका, उपलब्धि, उपयोगिता अपनेपन, संकट नहीं होना, इत्यादी सभी बातो को दर्शाती है। यह हमें प्रतिकूल परिस्थिति में अच्छी तरह से हमें बनाए रखता है।

**निष्कर्ष** (Conclusion):– मनोवैज्ञानिक कठोरता और मनोवैज्ञानिक कल्याण इनमे ऋणात्मक मध्यम स्तरीय सहसंबंध दिखाई देता है।

**इस अध्ययन की सीमाएं**: – वर्तमान अध्ययन की अपनी सीमाएं थीं। जैसे कि – १) ज्ञान उपलब्ध वैज्ञानिक संसाधनों की कमी २) बहुत प्रयास के बावजूद शोधकर्ता एक शोध को खोजने में विफल रहा ३) कम नमूना आकार बड़े समुदाय के लिए परिणामों के सामान्यीकरण को रोकता है।

संदर्भ ग्रंथ:–

1. Article (PDF Available) in Journal of Teaching in Physical Education 1(6):2165-6266101 • December 2012 with 4,050 Reads. The relationship of personal growth initiative, psychological well-being, and psychological distress among adolescents.
2. Orme GJ1, Kehoe EJ2014 .2 Apr;.12-404:(4)179doi: /10.7205MILMED-D-.00390-13 Hardiness as a predictor of mental health and well-being of Australian army reservists on and after stability operations.
3. Manual of Psychological Hardiness Scale by Arun Kumar Singh.
4. Manual of Psychological Well-Being Scale by Dr. Devendrasing Sisodiya and Pooja Choudhary.

# फुले, शाहू, आंबेडकरांचा समताधिष्ठित विचार : अपेक्षा आणि फलश्रुती

**डॉ. नारायण तु. कांबळे**, प्राध्यापक, पदव्युतर समाजशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरुर ताजबंद ता अहमदपूर जि लातूर

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत आणि समाजप्रबोधनाच्या व सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत फुले, शाहू, आंबेडकर या समाज क्रांतीकारकांना केंद्रस्थानी ठेवावे लागते. तब्बल दोन शतकाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या समाजधुरीणांनी महाराष्ट्रात समग्र सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली. समाज परिवर्तन आणि सामाजिक न्यायावर आधारित समाजाची पुनर्रचना या दोन घटकांना केंद्रस्थानी ठेवून फुले, शाहू, आंबेडकरांच्या समताधिष्ठित दृष्टिकोनाची चर्चा करावी लागते. प्रस्तुत लेखात हेच सूत्र पकडून त्यांच्या समताधिष्ठित व्यापक दृष्टिकोनाची मांडणी करण्याबरोबर समकालीन वास्तवता शोधण्याची प्रस्तुतता अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतातील समताधिष्ठित दृष्टिकोनाची इतिहासात जाउन मीमांसा करण्यासाठी १९ व्या व २० व्या अशा दोन शतकांत उदयास आलेल्या काही प्रवाहांची चर्चा करावी लागते. 'भारतीय समाज व्यवस्थेची विषम रचना' या आधारभूत तत्वावर हे प्रवाह शोधावे लागतात व मांडवे लागतात. भारतीय समाजव्यवस्थेचा पाया हा जात्वियवस्था, वर्ण व वर्गव्यवस्था व पुरुषप्रधान संस्कृती हा आहे. पर्यायाने आपल्या समाजात जातिव्यवस्थेने निर्माण केलेली व्यवसायबंदी, शूद्र अतिशूद्रांना लादलेल्या ज्ञानबंधीतून निर्माण झालेली सामाजिक आणि शैक्षणिक विषमता, भांडवलशाही अर्थव्यवस्थेने निर्माण केलेली प्रचंड आर्थिक विषमता आणि पुरुषप्रधान संस्कृतीचा अपरिहार्य परिणाम म्हणून अस्तित्व आलेली व टिकून ठेवलेली स्त्रीपुरुष विषमता या आधारावर या प्रवाहांची पुनर्मांडणी करावी लागते.

प्रामुख्याने पहिला हिंदू पुनर्जीवनवादी, दुसरा ब्राम्हणेतर सत्यशोधक चळवळीतून आलेला बहुजन विचार प्रवाह, तर तिसरा आर्थिक आणि राजकीय समतेची तरफदारी करणारा समाजवादी, उदारमत्वादी विचार प्रवाह, हा समतेच्या दृष्टीने १९ व्या शतकात झालेली वाटचाल आहे. राजा राममोहन रॉय, विवेकानंद यांसारख्या समता व सामाजिक परिवर्तनाचा विचार मांडणाऱ्या तत्वचिंतकाने हिंदू धर्मातील सुधारणा वादावर आधारित परिवर्तनवादी विचार मांडले. मात्र त्यातील परिवर्तनवादी हा आशय नष्ट होवून केवळ सांस्कृतिक राष्ट्रवादाची उभारणी करण्यातच समाज व्यवस्थेने धन्यता मानलेली पहावयास मिळते.

एकोणिसाव्या शतकात ब्राम्हणेतर चळवळीच्या माध्यमातून समताधिष्ठित समाज व्यवस्थेकडे, रचनेकडे जाणारा बहुजनवादी विचार प्रस्थापित करण्यात आला. फुले, शाहू या प्रभृतानी सत्याशोधकीय चळवळीच्या माध्यमातून समतेवर आधारित समाजाची धारणा झाली पाहिजे हे प्रबळपणे मांडले. नव्हे तर शोषित घटकांसाठी समता व सामाजिक न्यायावर आधारित मूलगामी समाज परिवर्तनाचा सिद्धांत मांडला. 'अस्पृश्यता निवारण', 'जातिअंताची चळवळ', 'बहुजन समाजाला शिक्षण', 'स्त्री दास्य विमोचन' आणि 'शेतकऱ्यांचे कल्याण' या मुद्यांवर आधारित सामाजिक समतेची चळवळ उभी केली. महात्मा फुलेंनी समतेसाठी मांडलेला समग्रक्रांतीचा विचार हे १९ व्या शतकातील समाजप्रबोधन चळवळीचे खास वैशिष्ट मानावे लागेल. धर्म, शिक्षण, स्त्रीदास्य, अस्पृश्यता, शेतीप्रश्न आणि इतिहास व संस्कृती या क्षेत्रातून ब्राम्हणी वर्चस्व नाकारुन क्रांतिकारी परिवर्तन झाले पाहिजे, या सूत्रावर समताधिष्ठित वैचारिक स्वरुपाचा प्रवाह निर्माण केला. महात्मा फुल्यांनी 'जातीव्यवस्था', 'वर्गव्यवस्था' आणि 'पुरुषप्रधान संस्कृती' यावर कठोर हल्ला चढवून सामाजिक समता निर्माण होण्यासाठी 'धर्मातील कर्मकांड', 'ब्राम्हणवाद', 'पोथीनिष्ठता' यावर कडाडून हल्ला केला. या देशातील सर्वांगीण विषमतेचे मूळ धर्म आहे. हिंदू धर्माने अगदी जाणिवपूर्वक बहुजन समाजावर धार्मिक व मानसिक गुलामगिरी लादून, सामाजिक समतेचा प्रवाह रोखून धरला आहे. तेव्हा या ब्राम्हणी धर्माची कठोर चिकित्सा केल्याशिवाय समताधिष्ठित समाजाची निर्मिती होवू शकत नाही, असे परखडपणे प्रतिपादन केले. महात्मा फुलेंच्या समताधिष्ठित विचारांचे वैशिष्टय म्हणजे विषमतेचे व शोषणाचे मूळ प्रखरपणे सांगितले व त्याला पर्यायही दिला. सार्वजनिक सत्यधर्माची स्थापना करुन पर्यायाने वर्ण, जाती, विषमतावादीचा पुरस्कार करणाऱ्या धर्माला नकार देवून समतेवर आधारित धर्माची संकल्पना मांडली.

महात्मा फुल्यांनी समताधिष्ठित दृष्टिकोन मानवतावादी तत्वज्ञानावर उभा करण्यासाठी प्रामुख्याने 'अस्पृश्यता निवारण', 'स्त्रीस्वातंत्र्य', 'स्त्रीशिक्षण' आणि 'जातीव्यवस्थेचे उच्चाटन' या त्रिसूत्रीवर आधारित विचार व कृती कार्यक्रम दिला. स्त्रियांचे शोषण करणाऱ्या संस्थांच्या विरोधात प्रचंड आवाज उठविला. दैववाद, शब्दप्रामाण्यवाद, अवतारवादाचा पगडा स्त्रीयांवर लादण्यासाठी धर्मग्रंथ पुराणे व त्यातून अनेक कपोलकल्पित भाकड कथा रचण्यात आल्या. परिणामी त्यातून निर्माण झालेल्या अंधश्रद्धाळू वृत्तीमुळे स्त्री आणि बहुजन समाजात विज्ञाननिष्ठा निर्माण झाली नाही. याला छेद देण्यासाठी आणि समाजाच्या सर्वच अंगाने स्त्री पुरुष समता प्रस्थापित व्हावी यासाठी सर्वप्रथम महात्मा फुल्यांनी कृती कार्यक्रम हाती घेतला. 'पुरुषांनी स्त्रियांवर लादलेली गुलामगिरी नष्ट करणे' हे त्यांच्या समताधिष्ठित विचारांचे प्रमुख मूल्य होते. वास्तविक पाहता स्त्रियांचे सामाजिक स्थान, त्यांचा दर्जा व प्रतिष्ठा व तिला मिळणारे स्वातंत्र्य हे सामाजिक परिवर्तनाचे प्रगतीचे निकष असले पाहिजे. हे गृहितकृत्य स्वीकारुन महात्मा फुले यांनी हिंदू धर्मग्रंथांनी निर्माण केलेली पुरुषप्रधान संस्कृती व जातीव्यवस्था स्त्रियांचे शोषण कसे करते याची परखड चिकित्सा केली. एवढेच नव्हे तर पुरुषप्रधान कुटुंबाची पुनर्रचना करण्याचाही आग्रह धरला. धार्मिक जातीव्यवस्थेचे अधिष्ठान असलेला हिंदू धर्म स्त्रियांचे कसे मानसिक शोषण करतो यावर प्रखरपणे हल्ला चढविला. सामाजिक न्यायावर आधारित स्त्रीस्वातंत्र्याचा प्रबळपणे पुरस्कार करताना महात्मा फुल्यांनी काही क्रांतिकारी उपक्रम राबविले. जसे की, उदा. अस्पृश्यांच्या मुलींसाठी शाळा सुरु केली, केशवपन, बालविवाह या अनिष्ट प्रथांना कडाडून विरोध केला. एवढेच नाही तर विधवांना आपले जीवन सुखरुपपणे जगता यावे यासाठी आपल्या स्वत:च्या घरात प्रसुतीगृह सुरु केले.

महात्मा फुलेंच्या या समताधिष्ठित दृष्टिकोनाचे विश्लेषण करताना आणखी एक मुद्दा समोर येतो तो असा की, शिक्षणापासून वंचित असलेल्या बहुजनांना शिक्षण देण्याची योजना ही आहे. १८८२ मध्ये ब्रिटिशांनी नियुक्त केलेल्या हंटर कमिशन समोर साक्ष देताना महात्मा फुल्यांनी प्रचलित असलेल्या झिरपण्याच्या सिद्धांतांना विरोध करुन 'शिक्षणाच्या बहुजनीकरणाचा आग्रह धरला' महात्मा फुले म्हणतात, 'या ब्राम्हणी समाज व्यवस्थेने अगदी जाणिवपूर्वक शुद्र अतिशूद्रांना बहुजन समाजांना शहाणे करुन सोडल्याशिवाय ही

विषमता कमी होणार नाही' म्हणजे पर्यायाने शिक्षणाच्या प्रकर्षाने पुरस्कार केलेला आहे.

शिक्षणाबरोबरच शेतकरी व शेती प्रश्न यांची सांगड देखील फुल्यांनी सामाजिक समतेशी घातली. ब्राम्हणी धर्माने ज्याप्रमाणे वर्ण व्यवस्थेच्या आडून स्त्री व शूद्र यांच्यावर मानसिक गुलामगिरी लादली. त्याप्रमाणे ब्रिटिशांचे चुकीचे धोरण, ब्राम्हणी कावा व सावकारी पाश यामुळे शेतकरी वर्ग टोकाचा रसातळाला गेला व प्रचंड प्रमाणात आर्थिक विषमता निर्माण झाली. फुल्यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड' हा ग्रंथ लिहून अगदी अर्थशास्त्रीय पद्धतीने या विषयाची मीमांसा केली. महात्मा फुल्यांनी सामाजिक न्यायासाठी आग्रह धरला. मागास जातीजमातीमध्ये 'विशेष' सोयी सवलती व राखीव जागा सामाजिक न्यायाच्या तत्वावर देण्याचे आपण आज मान्य केले आहे. या तत्त्वाचे बीज महात्मा फुल्यांच्या विचारात आपल्याला आढळते.

समाजात समानता प्रस्थापित करावयाची असेल तर विषमतेत भरडलेल्या लोकांना 'विशेष संधी' देणे भाग आहे. जातीभेदांमुळे वरिष्ठ वर्गीयांना शतकानुशतके एका अर्थाने 'विशेष' संधी मिळालेली आहे. तिचा त्यांनी भरपूर फायदा घेतला. त्यामुळे कनिष्ठ जातीजमातीतील लोकांना 'समान' संधी मिळू शकली नाही. म्हणून ते खूप मागे पडले. तेव्हा मागे पडलेल्या लोकांना 'विशेष' संधी देवून पुढे आणले पाहिजे. त्याशिवाय त्यांच्या पदरात सामाजिक न्याय पडणार नाही.

कनिष्ठ जातीच्या पदरात सामाजिक न्याय टाकणे हा जातिनिर्मूलनाच्या मार्गावरचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. या मार्गावरचा अंतिम टप्पा हा जात आणि जातिसंस्था निर्मूलनाचा असला पाहिजे आणि म्हणूनच महात्मा फुल्यांनी बेटींबदीवरही हल्ला चढविला. परंतु याबाबतीत आजही फारसा प्रयत्न झालेला नाही. जातिभेद आजही तग धरुन आहे. उलट त्याला आज राजकीय आयाम प्राप्त झालेला आहे. हितसंबंधावर जातिभेद पोसला गेला. आजही जातीचा वापर हितसंबंधासाठीच होतो आहे. हितसंबंधाची समीकरणे आज बदलत आहेत, पण जातिभेद मात्र कायम आहे. आणि म्हणून हितसंबंधाच्या या समीकरणावरच घाव घातले पाहिजे. एकीकडे जातीसंबंधीची मानसिकता बदलावी लागेल, आणि दुसरीकडे आंतरजातीय, आंतरप्रांतीय, आंतरभाषिक व आंतरधर्मीय विवाहांना क्रमशः प्रोत्साहन द्यावे लागेल.

सारांश रुपाने, जातीचे निर्मूलन करायचे कसे, जातीभेद संपवायचा कसा, जातिव्यवस्थेमुळे निर्माण झालेल्या दुष्परिणामांचे व अनर्थाचे निर्मूलन करायचे कसे. महात्मा फुल्यांनी रोटीबंदी, बेटीबंदी, व्यवसायबंदी, आणि विधवाबंदी अशा सर्व बंदीच्या साखळदडांची जखडलेल्या जातिव्यवस्थेवर कठोर हल्ले चढविले. अशा सर्वच निर्बंधापासून हिंदू समाजाला मुक्त करायचा त्यांनी कसून प्रयत्न केला. खरे तर त्यांनी हिंदू समाजाच्या एकंदर पुनर्रचनेचाच पाया घातला. स्वातंत्र्य, समता, न्याय व बंधुभाव या चार मुलभूत तत्वांवर हिंदूसमाजाची पुनर्रचना झाली पाहिजे असा त्यांचा आग्रह होता. केवळ विचार मांडून ते थांबले नाहीत तर त्यांनी या कामासाठी संपूर्ण आयुष्य वाहिले. ज्ञानाची महत्ता त्यांनी गायिली. बहुजन समाजाला शिक्षणाचे महत्त्व त्यांनी पटवून दिले आणि त्याच बरोबर शिक्षणप्रसाराच्या कार्याला त्यांनी हात घातला. कारण शुद्रातिशुद्र आणि स्त्रियांच्या अवनतीचे मूळ कारण अविद्या हेच आहे असे त्यांचे ठाम मत होते. अज्ञान, अंधश्रद्धा, दारिद्रय आणि जातिभेद यांच्या सापळयात अडकलेल्या दलित पददलितांना विद्येची कास धरल्याशिवाय गत्यंतर नाही हे त्यांनी सातत्याने सांगितले, पण ते एवढयावरच थांबले नाहीत. शुद्रातिशुद्रांतील मुलांना नोकऱ्यातही वाटा द्या अशी त्यांची इंग्रज सरकारला मागणी होती. समताधिष्ठित समाज निर्मितीसाठी जातीनिर्मूलन हा महत्त्वाचा भाग आहे. त्यासाठी त्यांनी कसोशीने प्रयत्न केले. परंतु जातिभेद आजही तग धरुन आहे. उलट त्याला आज राजकीय आयाम प्राप्त झालेला आहे. आजही जातीचा वापर हितसंबंधासाठीच होतो आहे. हितसंबंधाची समीकरणे आज बदलत आहेत, पण जातीभेद मात्र कायम आहे आणि म्हणून हितसंबंधीच्या या समीकरणावरच घाव घातले पाहिजेत. त्याशिवाय ज्याला म. फुले 'एकमथता' म्हणतात ती भारतीय समाजात निर्णय करता येणार नाही.

महात्मा फुल्यांचा हा समताधिष्ठित विचारप्रवाह व आजची वस्तुस्थिती पर्यायाने अपेक्षा आणि फुलश्रुती याची तुलना केली तर त्यात प्रचंड दरी आहे. वस्तुतः 'प्रत्यक्ष परिणाम हीच समतेची कसोटी असली तरी हा महात्मा फुलेंचा समताधिष्ठित आशय आज लुप्त झाला आहे.' अस्पृश्यता वरकरणी पाहता नष्ट झाली असली तरीही जाती अंताच्या लढ्यात आजही प्रचंड गतिरोध निर्माण झाला आहे. महिलांचे सबलीकरण, सक्षमीकरण या घोषणा होत असल्यातरी महात्मा फुलेंना अभिप्रेत असलेली स्त्री पुरुष समानता एकविसाव्या शतकात देखील प्रत्यक्षात आली नाही. भारताने स्वीकारलेल्या खाजगीकरणाच्या धोरणामुळे बहुजनांचे शिक्षण, छोट्या शेतकऱ्यांचे आर्थिक प्रश्न यावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. शेती आणि शेतकरी याबाबत महात्मा फुलेंचे चिंतन त्यांनी शेतीव्यवसायासाठी सुचविलेले पर्याय स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सात दशकानंतरही प्रत्यक्षात येवू शकले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

महात्मा फुलेंचा वारसा १९ व्या शतकाच्या शेवटी व २० व्या शतकाची पहिली दोन दशके अशा जेमतेम तीन दशकांच्या कालखंडात प्रचंड समाजपरिवर्तनाची उर्मी घेवून बहुजन दीनदलित समाजाच्या उद्धारासाठी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या आयुष्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत कार्य केले. ज्या राज्याचे वर्णन त्यांचे चरित्रकार धनंजय कीर यांनी 'नवीन युगाच्या आगमनाची घोषणा करणारा अग्रदूत' असे केलेले आहे, जे सार्थ असेच आहे. ज्या कालखंडात राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानाची सत्तासूत्रे आपल्या हाती घेतली तो महाराष्ट्राच्या सामाजिक–राजकीय इतिहासात ब्राम्हण वर्गाचे वर्चस्व असणारा व बहुजन समाजाचे अस्तित्व नाकारणारा कालखंड होता. एका बाजूने ब्रिटिश साम्राज्यशाही तर दुसया बाजूने ब्राम्हणशाहीची मिरासदारी असे ते राजकीय चित्र होते.

या पार्श्वभूमीवर १८९४ मध्ये म्हणजे वयाच्या केवळ २० व्या वर्षी राजर्षी शाहू महाराज गादीवर आले व पुढे तीन दशके त्यांनी कोल्हापूर संस्थानाचा राज्यकारभार ज्या पद्धतीने चालविला त्याला आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात तोड नाही. कोल्हापूर संस्थानाची सत्तासूत्रे हाती घेताच या सत्तेचा वापर सामाजिक न्यायावर आधारित राजकीय व्यवस्था कशी राबवता येईल यासाठीच त्यांनी कसोशीने प्रयत्न केले व अंमलात आणण्याचा प्रयत्नही केल्याचा दिसून येतो. जसे की, मागासवर्गीय बहुजन समाजाचा विकास, त्यासाठी त्यांना शिक्षण, शिक्षणासाठी काही सवलती व शिक्षण पूर्ण झाल्यानंतर शासकीय सेवेत समावेशन या त्रिसूत्रीवर आधारित सामाजिक परिवर्तनाची पायाभरणी महाराजांनी केली. त्यासाठी काही हुकूमनामे–जाहीरनामे काढले आणि राजेशाहीतसुद्धा 'सामाजिक

लोकशाही' प्रस्थापित करता येते असा एक नवा आदर्श विसाव्या शतकाच्या सुरुवातीला महाराष्ट्रासमोर उभा केला. राजर्षी शाहूची सामाजिक न्यायाची संकल्पना ही समतेवर आधारित होती.

सर्वांना सक्तीचे व मोफत शिक्षण मिळाले पाहिजे. मागासवर्गीय तसेच बहूजन समाजाला शासकीय सेवेत आरक्षण असले पाहिले, गरीब विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारे शिक्षण घेता येण्यासाठी शिष्यवृत्या दिल्या पाहिजेत, स्त्रीयांना स्वतंत्रपणे जीवन जगता आले पाहिले हा स्वातंत्र्योतर संविधानात प्रतिबिंबित झालेला व राज्यकर्त्यांनी अंमलात आणलेला विचार राजर्षी शाहू महाराजांनी अर्धशतकापूर्वी आपल्या संस्थानात रुजविला व अंमलबजावणीत आणला. यावरुन भविष्याचा वेध घेवून राज्यकारभार करण्याचे त्यांचे सामर्थ्य किती अफाट होते हे लक्षात येते. शिक्षण, आरक्षण व मागासवर्गीयांचे शिक्षण हे राजर्षी शाहू महाराजांचे जीवित कार्य होते.

प्रशासनात, शिक्षणात व खाजगी सेवेत ब्राम्हणांची अक्षरश: मक्तेदारी प्रस्थापित झाली होती. परिणामी ब्राम्हणेतर समाज व प्रामुख्याने मागासवर्गीय व मराठा बहुजन समाज प्रवाहाच्या बाहेर फेकला गेला होता. अशा विचित्र परिस्थितीत शाहू महाराज अधिकाररुढ झाले होते. ब्राम्हण वर्गाची ही मक्तेदारी कशी मोडून काढता येईल आणि प्रशासनात व राजकीय प्रक्रियेत मागासवर्गीय तसेच बहुजन समाज कसा केंद्रस्थानी येईल हेच प्रधान उदिष्ट उराशी बाळगून राजर्षी शाहू महाराजांनी राज्यकारभार सुरु केला. विशेषत: शिक्षण व प्रशासकीय सेवेत त्यांचे आरक्षण यावर लक्ष केंद्रीत करुन ब्राम्हण वर्गाची सर्व क्षेत्रांतील मिरासदारी त्यांनी मोडून काढली. मानवाची बुद्धिमत्ता आणि मानसिक सामर्थ्य यांचा त्यांच्या जातीशी, वंशाशी आणि धर्माशी काही संबंध नसतो हे वैज्ञानिक सत्य राजर्षी शाहूनी केव्हाच आणले होते. म्हणूनच त्यांनी उच्चवर्णीयांच्या बरोबर बहुजनांनाही प्रतिष्ठेचे व्यवसाय करण्याची संधी उपलब्ध करुन दिली. त्याच न्यायाने त्यांनी वकिलीच्या सनदा सर्व जातीजमातीतील व्यक्तींना सन्मानपूर्वक बहाल केला.

या पार्श्वभूमीवर राजर्षी शाहू महाराजांनी जे काही निर्णय घेतले त्यातून ब्राम्हणशाहीच्या प्रशासकीय वर्चस्वाला फार मोठा हादरा बसला. सर्वप्रथम राजर्षी शाहू महाराजांनी कुलकर्णी वतने नष्ट केली व त्याच्या जागी खेडयाचा कारभार पाहण्यासाठी तलाठी या पदाची निर्मिती केली. या तलाठी वर्गात देखील अस्पृश्य व मागासवर्गाला संधी मिळण्यासाठी तलाठी वर्गातील अस्पृश्य विद्यार्थ्यासाठी दरमहा ८ रुपये अशी विशेष शिष्यवृती जाहीर केली. त्याचबरोबर अस्पृश्य जातीतील गुणवंत लोकांना मोठमोठी पदे व अधिकाऱ्यांच्या जागा बहाल केल्या. त्यासाठी १० ऑगस्ट १९१८ रोजी महाराजांनी एक आदेश काढला तो पुढीलप्रमाणे होता, 'हल्ली तलाठ्याच्या नेमणूका केल्या जात आहेत. त्यात अस्पृश्य जातीतील लोकांना प्रतिनिधीत्व देण्यात यावे. तसेच या जातीतील लोकांना योग्य ती पात्रता असल्यास दरबारातील कोणत्याही योग्य त्या जागेवर नियुक्ती द्यावी आणि विशेष म्हणजे त्यांची अस्पृश्यत्वाची सबब शासकीय नोकरीच्या बाबतीत घेतली जाणार नाही.'

तात्पर्य, केवळ जन्माने उच्च वा श्रेष्ठ गणल्या जाणाऱ्या समाजातील विशिष्ट लोकांना जे सुखाचे व समृद्धीचे आयुष्य जगता येते तशाच प्रकारचे सुख, समृद्धी व प्रतिष्ठेचे जीवन बहूजन व मागासवर्गीयांच्या वाट्याला आले पाहिजे यासाठी आपल्या संस्थानात ५० टक्के जागा राखीव करणारे हिंदूस्थानातील अनेक संस्थानापैकी राजर्षी शाहू महाराज एकमेव संस्थानिक होते. या संदर्भात महर्षि वि. रा. शिंदे म्हणतात, 'दुर्बल जाती, आर्थिक, सामाजिक व राजकीय दृष्ट्या जोपर्यंत शक्तीसंपन्न होत नाहीत, तोपर्यंत जातीसंस्थांचे समूळ उच्चाटन होणार नाही.' हे सूत्र राजर्षी शाहूनी चांगलेच ओळखले होते. यासाठी राजर्षी शाहूनी छत्रपतींचे जाती संस्था नष्ट करण्यातील संघर्षाचे हे एक प्रमुख सूत्र होते, यासाठीच त्यांनी विद्यार्थ्यांच्या जातवार वसतिगृहाची चळवळ सुरु केली, इतकेच नव्हे तर, आपल्या जातीचे नेतृत्व दुसऱ्या जातीच्या पुढाऱ्याच्या हाती जाणार नाही, याची दक्षता प्रत्येक जातीने घ्यावी, असा प्रगल्भ विचार मांडला. राजर्षी शाहूनी आपल्या संस्थानात सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी वेगवेगळे प्रयोग केले जे की सामाजिक कल्याण साधले पाहिजे. सर्वसामान्याचा विकास झाला पाहिजे. त्यांची ही धारणा होती. सामाजिक न्याय व समता प्रस्थापित करण्यासाठी कसोशीने प्रयत्न करुन त्या धोरणाची कडक अंमलबजावणी केली. राजर्षी शाहूंना अभिप्रेत असणारा सामाजिक न्याय मानवी विकासासाठी व कल्याणाशी संबंधित होता. गावकुसाबाहेर व माणुसकीच्या धाग्याने जोडण्याचा त्यांचा प्रयत्न होता. एका अर्थाने सामाजिक समता प्रस्थापित करणे हा त्यांचा मुख्य भाग होता.

'समाजक्रांतिकारक राजा' हे त्यांचे खास स्वभावगुण वैशिष्ट्य असल्यामुळे त्यांचे विचार व कार्य काळाच्या कसोटीला उतरले आहे. त्यांच्या हयातीत त्यांचा विचार व कार्याची उच्चवर्णीय ब्राम्हण वर्गाने हेटाळणी केली, तत्कालीन विचारवंतांनी, सुधारकांनी उपेक्षा केली. सामाजिक स्वातंत्र्याचा व सामाजिक लोकशाहीचा प्रभावीपणे विचार मांडणाऱ्या या प्रबळ लोकशाहीवादी राजावर स्वजनद्रोहाचा व स्वराज्यद्रोहाचा आरोप लावण्यासही काही मंडळींनी मागेपुढे पाहिले नाही. आज स्वातंत्र्यप्राप्ती होवून उणेपूरे सात दशकांचा कालावधी होत असला तरी शाहू महाराजांचा विचार व कार्याची प्रभावीपणे व यशस्वीपणे अंमलबजावणी होवू शकली नाही ही वस्तूस्थिती आहे. राजर्षी शाहू महाराजांच्या काळात सामाजिक न्यायाचे, सामाजिक स्वातंत्र्याचे जे प्रश्न होते ते आजही पूर्णार्थाने सुटले आहेत असे म्हणणे धारिष्टयाचे ठरेल असे वाटत नाही. ग्रामीण भागातील शेतकरी, स्त्रीया, भूमीहीन शेतमजूर आणि दलित समाज यांच्या प्रश्नांकडे पाहिल्यास राजर्षी शाहू महाराजांच्या विचारांची व कार्याची लढाई आणखी लढावी लागेल, असे वाटू लागले आहे व तोपर्यंत राजर्षी शाहू महाराजांचे विचार आणि कार्य सतत प्रेरणादायी ठरेल.

महात्मा फुले व राजर्षी शाहू महाराज यांची समताधिष्ठित सामाजिक चळवळ २० व्या शतकात समर्थपणे चालविण्याचे श्रेय पुढे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे जाते. बाबासाहेबांनी सामाजिक न्यायावर आधारित सर्वांगीण सामाजिक परिवर्तनाचा सिद्धांत मांडला. त्यांचे सूत्र देखील विषम समाजरचना आणि विषम समाजरचनेची तरफदारी करणाऱ्या हिंदू धर्माची कठोर चिकित्सा हेच होते. बाबासाहेब आंबेडकरांनी जातीअंताची चळवळ, स्त्रीमुक्ती आणि समतेच्या निकषावर हिंदू धर्म व धर्मग्रंथाची कठोर व तर्कसंगत चिकित्सा केली. 'जाती व्यवस्थेची विषम उतरंड या देशात समतेच्या मार्गातील प्रचंड गतिरोध आहे.' या गृहितकृत्यावर बाबासाहेबांचे समताधिष्ठित विचार अभ्यासावे लागतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'या देशातील जातीव्यवस्था ही सर्व प्रकारच्या विषमतेचे मूळ आहे. एवढेच नाही तर जातीव्यवस्थेचा अंत ही राष्ट्रनिर्मितीची, पर्यायाने समतेवर आधारित समाज निर्मितीपूर्व अट आहे.' जाती व्यवस्था कशी विषमतामूलक आहे व समताधिष्ठित मार्गावरील फार मोठा अडथळा कसा आहे याची चिकित्सा करताना ते म्हणतात, 'या देशातील जातीव्यवस्था

जन्मानुसार व्यवसाय विभाजन करते, वर्णव्यवस्थेचा अपरिहार्य पर्याय म्हणून प्रचंड स्वरुपाची सामाजिक विषमता व अन्यायावर आधारित विषमता इथे निर्माण झाली आहे. तिला छेद देवून इथे नवी पर्यायी व्यवस्था उभी करावी लागेल.'

सामाजिक स्वातंत्र्याचा लढा हा जातीच्या व जातिसंस्थेच्या उच्चाटनाशिवाय यशस्वी होणार नाही. सामाजिक स्वातंत्र्याशिवाय ब्राम्हणशाहीचा आणि आर्थिक स्वातंत्र्याशिवाय भांडवलशाहीचा पराभव करता येणार नाही. दलित आणि पददलितांचे सामाजिक तसेच आर्थिक शोषणाचे मूल कारण जातिव्यवस्थेतच आहे अशी त्यांची धारणा होती. Annihilation of caste या पुस्तकात त्यांनी हा मुद्दा अतिशय प्रभावीपणे मांडला आहे. समताधिष्ठित गतिमान समाजाच्या जाहीरनामाच जणू या पुस्तकात त्यांनी मांडलेला आहे. जातिव्यवस्थेवर कठोर प्रहार केल्याशिवाय व तिचे पूर्णत: निर्मूलन केल्याशिवाय समताधिष्ठित समाजाची निर्मिती करता येणार नाही. समाजाची रचनाच अशी असावी, की त्यातील प्रत्येक व्यक्तीला आणि समाज घटकाला आपल्या उन्नतीसाठी पुरेसा वाव मिळावा आणि तो उपलब्ध करुन द्यायचा असेल तर सामाजिक वास्तुशास्त्रात स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व या तीन मूल्यांचा समावेश पायाभूत सिद्धांत म्हणून केला जाणे आवश्यक ठरते, जिथे ही तीन मूल्ये किंवा तत्वे एकत्रित येतात, तिथे 'न्याय' प्रस्थापित होतो. सामाजिक न्यायाचा अभाव असेल तर सामाजिक व्यवस्थेमध्ये विसंगती वा विरोधाभास निर्माण होतो. सामाजिक जीवनात विषमता असेल तर समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीचे स्वप्न हे स्वप्नच ठरते. ही वस्तुस्थिती लक्षात घेवून डॉ. आंबेडकरांनी अनुसूचित जाती जमातींना व इतर मागासवर्गीयांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी अथक प्रयत्न केलेत. सामाजिक न्यायाच्या प्रक्रियेतूनच समतेची प्रतिष्ठापना होत असते, अशी त्यांची धारणा होती.

विषमताधिष्ठित समाजात जर शिक्षण व्यवस्था महत्त्वाची असेल तर विषमतेविरोधी चळवळ उभी करताना शिक्षणाची देखील पुनर्रचना करावी लागेल, या भूमिकेतून फुले–आंबेडकरांनी शिक्षणाविषयी नवचिंतन सादर केले. वर्णजात्यधिष्ठित शिक्षण व्यवस्थेच्या मर्यादासोबतच ब्रिटिशांनी रुजविलेल्या वासाहतिक शिक्षण व्यवस्थेच्या मर्यादादेखील म. फुल्यांनी दाखविल्या. वासाहतिक शिक्षण धोरणाचा लाभ वरच्या जातींनी अधिक घेवून नव्या परिस्थीतीतही आपले सांस्कृतिक वर्चस्व प्रस्थापित केले होते. सामंतशाहीच्या विरोधात प्रबोधन करण्यासाठीची सुप्तशक्ती आधुनिक शिक्षणाच्या ठायी आहे, या फुल्यांच्या धारणेला फुल्यांचे वारस असलेल्या राजर्षी शाहूंनी योग्यपणे ताडले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म. फुल्यांप्रमाणे शिक्षण हक्कासाठी एका बाजूला संघर्षाची, तर दुसऱ्या बाजूला शैक्षणिक संस्था उभारण्याचीही भूमिका घेतली. 'ज्ञान' ही अप्राप्त व अनालकनीय बाब नसून ती एक प्रकारची भौतिक शक्ती आहे. या जाणिवेतून त्यांनी ज्ञानप्राप्तीची लढाई ही दडपलेल्या जातिजमातीच्या भौतिक मुक्तीची लढाई बनविली.

या व्यवस्थेच्या मुळाशी हिंदू धर्म व धर्मग्रंथातील विषमतामूलक प्रवृत्ती आहे. तेव्हा जोपर्यंत धर्माची व धर्मग्रंथाची चिकित्सा होत नाही आणि बुद्धिप्रामाण्यवादाच्या कसोटीवर ही धर्मतत्वे उतरत नाहीत, तोपर्यंत या देशात समतेचा प्रवाह निर्माणच होवू शकत नाही. मनुस्मृतीला विरोध व तिचे दहन करण्यामागे बाबासाहेबांचा हाच दृष्टिकोन होता. बाबासाहेबांनी २७ सप्टेंबर १९२९ रोजी आपल्या 'बहिष्कृत भारत' या वृतपत्रात हिंदू धर्माचे जे वर्णन केले त्याचे सूक्ष्म अध्ययन केल्यानंतर त्यांचा हिंदू धर्माबाबतचा दृष्टिकोन किती परिपक्व व तात्विक अधिष्ठानावर विराजमान झालेला होता, हे लक्षात येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'हिंदू समाज पंख असणाऱ्या परंतु उडू न शकणाऱ्या पक्षासारखा झाला आहे. हिंदू समाज एकाक्ष आहे. त्याचा एक डोळा फुटका आहे. रुढींनी तो फोडून टाकला आहे व तोच विषमतेकडे वळविला आहे. त्यामुळे हिंदू धर्माला विषमता दिसत नाही. सामाजिक व धार्मिक गुलामगिरी फुटक्या डोळयाच्या वाटयाला आली आहे. दुसऱ्या चांगल्या डोळयाला धर्मशास्त्रातील स्वच्छतेचा उपदेश दिसतो.'

जाती व्यवस्था, समतेचे विषम वाटपकर्ते देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समताधिष्ठित विचारातील प्रमुख असे गृहित कृत्य होते. याला अनुसरुन एके ठिकाणी ते लिहितात, 'राजकीय स्वातंत्र्याबरोबर सामाजिक समतेचा उदय होणार नसेल, तर ते स्वातंत्र्य केवळ उच्च जातीपुरतेच मर्यादित ठरेल. तेव्हा जातीअंताची चळवळ जोपर्यंत यशस्वी होत नाही, तोपर्यंत कोणत्याही प्रकारची समता या समाजव्यवस्थेत अस्तित्वात येवू शकत नाही.' बाबासाहेबांनी अस्पृश्यतेविरुद्ध जी चळवळ उभी केली ती जातीअंताच्या लढयातील एक भाग समजला पाहिजे. केवळ अस्पृश्यता निर्मूलन झाल्यामुळे समता प्रस्थापित होवू शकेल, ही अपेक्षा त्यांना नव्हती. कारण, अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे ते केवळ धार्मिक भावनेतून पाहत नव्हते तर, 'अस्पृश्यता ही आर्थिक शोषणाची व्यवस्था आहे' यामुळे जोपर्यंत ही अस्पृश्यता मूळापासून नष्ट होत नाही, तोपर्यंत सामाजिक न्यायावर आधारीत आर्थिक समता निर्माण होवू शकत नाही, हे त्यांनी ओळखले होते. भारतीय संविधानात ज्या काही वरील तरतूदी केलेल्या दिसतात त्याची पायाभरणी सत्तर वर्षापूर्वीच बाबासाहेबांनी केली होती. हे लक्षात घेतले पाहिजे.

जातीअंताच्या चळवळीबाबतचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे हे प्रतिपादन अभ्यासल्यानंतर हे स्पष्ट होते की, त्यांच्या सामाजिक परिवर्तनाला फार मूलगामी आशय होता. केवळ कायदे करुन समताधिष्ठित समाजाची निर्मिती होवू शकत नाही हेही त्यांना माहीत होते. त्यामुळे एक व्यक्ती एक मत हे तत्व स्वीकारताच त्यांनी एक व्यक्ती एक मूल्य असा विचार मांडला. संविधान सभेत चर्चा करतानाही त्यांनी समतेची आणि राजकीय लोकशाहीची सांगड कशी घालता येवू शकेल याबाबत त्यांनी मूलगामी चिंतन केले होते. वंचितांना सत्ता प्राप्त झाली पाहिजे, हा राजकीय समतेचा विचार व्यावहारिक पातळीवर कसा साकार होईल, याला पर्याय देताना त्यांनी समतेवर आधारित सामाजिक लोकशाहीचे समर्थन केले. मात्र आर्थिक व सामाजिक विषमता लोकशाही निर्माण होवू देत नाही. यासाठी सामाजिक न्यायावर आधारित उत्पादन व वितरणाची व्यवस्था मांडली.

वरीलप्रमाणे महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समताधिष्ठित विचारांची चर्चा केल्यानंतर गेल्या सहा–सात शतकातील वस्तुस्थिती व फलश्रुती यावर भाष्य करणे अगत्याचे ठरते. समतेवर व सामाजिक न्यायावर आधारित संविधानाची निर्मिती होवूनही समताधिष्ठित समाजनिर्मितीसाठी आवश्यक असलेल्या धोरणात्मक उपाययोजनांची फलश्रुती समाधानकारक नाही. आजही नोकरी, व्यवसाय, उद्योग इत्यादी क्षेत्रांत वरिष्ठ जातीची व उच्च वर्णीयांचीच मक्तेदारी प्रस्थापित झालेली आहे. स्वातंत्र्योतर कालखंडात प्रगतीचा आणि विकासाचा चढता आलेख दिसत असला तरी प्रचंड स्वरुपाची आर्थिक विषमता व सामाजिक विषमता ग्रामीण भागात आजही पहावयास मिळते. हरितक्रांतीचे लाभधारक घटक

कोणते असावेत, व कोणते आहेत. हे अजूनही निश्चित झाले नाही. शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही त्यांची परिणीती आहे. स्वातंत्र्योतर कालखंडात आपल्या देशात जमिनीचे पुनर्वाटप झाले नाही. त्याचा दृश्य परिणाम असा झाला की, जमिनदाऱ्या कायम राहिल्या. हरितक्रांती झाली असली तरी तिचे लाभ नवश्रीमंत अशा बागायतदारांना मिळाले. परिणामी बहुजन, माळी, साळी, धनगर असे छोटे शेतकरी हरितक्रांतीच्या लाभापासून वंचित राहिले. उलट शेतीमालाला रास्त भाव मिळावा म्हणून आज शहरी, व्यापारी, भांडवलदारांशी संघर्ष करावा लागत आहे. शेतीव्यवसाय प्रचंड तोटयात गेल्यामूळे छोटया शेतकऱ्यांचे शेतमजूरात रुपांतर होत आहे. आज महाराष्ट्रात जवळजवळ एक कोटी शेतमजूर आहेत.

समाजातील पुरुषप्रधान संस्कृतीला नकार देवून फुले, शाहू, आंबेडकरांनी स्त्री पुरुष समानतेचा आग्रह धरला, त्याबाबतही प्रत्यक्ष परिणामाच्या दृष्टीने फारसे काही साध्य झाल्याचे दिसत नाही. स्त्रीयांचे हक्क व त्यांचे स्वातंत्र्य व पुरुषांच्या बरोबरीने त्यांचे अधिकार केवळ आज औपचारिक स्वरुपातच चर्चिल्या जातात. व्यवहारात मात्र फारशा आलेल्या दिसून येत नाहीत.

शिक्षणाचे सार्वत्रीकरण व बहुजनीकरण व्हावे हा फुले, शाहू, आंबेडकराचा आग्रह आजही आपल्या शासनकर्त्यांना प्रत्यक्ष कृतीत आणता आला नाही. शिक्षणाची समान संधी, सक्तीचे मोफत शिक्षण या मार्गदर्शक तत्वांच्या तरतूदीचा कधीच बोजबारा उडाला आहे. इ. स.२००० साली झालेल्या सर्वेक्षणानुसार जगातील एकूण निरक्षर लोकांपैकी २४ टक्के निरक्षर भारतात आहेत आणि हे निरक्षर देखील मुख्यत: दलित, आदिवासी, इतर मागासवर्गीय आणि शेतकरी समाजातील आहेत. पर्यायाने व्यक्तीची प्रतिष्ठा, स्वातंत्र्य, समानता व सामाजिक न्याय हे शब्द आज ग्रामीण जनतेसाठी केवळ पोकळच ठरले आहेत. सामाजिक न्याय हा समान संधी शिवाय प्रस्थापित होवू शकत नाही. समाजातील विविध घटक समपातळीवर आणण्यासाठी समान संधी खऱ्या अर्थाने सर्वांना प्राप्त होणे आवश्यक आहे. समान संधी आणि सामाजिक न्यायाचे समीकरण स्वीकारल्याशिवाय विकासाचे गणित आपल्याला मांडता येणार नाही. समान संधी आणि सामाजिक न्याय या दोन पायावर प्रगतीच्या किंवा विकासाच्या दिशेने आपण चालू शकू. ज्या सामाजिक तत्वज्ञानाला हे दोन पाय लागलेले नसतात. ते लुळे आणि लंगडेच असणार यात शंका नाही. समताधिष्ठित समाजव्यवस्था हे कुठल्याही सामाजिक तत्वज्ञानाचे उदिष्ट असले पाहिजे.

१९९० नंतर शासनाने स्वीकारलेल्या, जागतिकीकरणाचे, खाजगीकरणाचे धोरण सामाजिक व आर्थिक समतेला पूर्णपणे सोडचिठ्ठी देणार आहे. समतेचा समुदायवादी विचार मागे पडून व्यक्तिवादी विचार प्रबळ झाला आहे. वितरणात्मक न्यायाला प्रचंड विरोध व आर्थिक विषमतेचे समर्थन या भावविश्वात शोषीत, वंचित घटकांबाबत कमालीची अनास्था व उदासीन वृत्ती दिवसेंदिवस वाढत आहे. विषमताग्रस्त समाजातील विषमता मोठया प्रमाणात घालविण्याशिवाय त्याला गतिमान करता येणार नाही.

घटनेतील मुलभूत अधिकार हे व्यक्तिस्वातंत्र्यावर भर देतात, तर मार्गदर्शक तत्वे मागास, वंचित आणि दुर्बल समाज घटकांच्या सामाजिक न्यायावर, मूलभूत अधिकार हे गुणवत्ता तत्वावर आधारलेले आहेत, तर मार्गदर्शक तत्वे विशेष न्यायावर. एकीकडे व्यक्तीला आणि दुसरीकडे मागास व दुर्बल जाती जमातींना 'समानसंधी' कशी मिळेल याची दक्षता आपल्या घटनेने घेतला आहे. त्यासाठी ठोस तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. मागास व दुर्बल जाती जमाती पुढे आल्याशिवाय त्या जाती जमातीतील व्यक्तीही पुढे येवू शकत नाहीत. कारण त्या व्यक्तीचे भवित्वय त्यांच्या जाती–जमातीशी बांधले गेलेले आहे. आणि म्हणून अनुसूचित जाती–जमातींना विशेष सोयी सवलती देणे आवश्यक होते आणि आहे. निरनिराळे समाजघटक समपातळीवर आल्यानंतर गुणात्मक स्पर्धेला अर्थ प्राप्त होतो. विषमताग्रस्त समाजात दुर्बलांना 'विशेष' संधी दिल्याशिवाय हे गुणवत्तेच्या स्पर्धेत भाग घेवू शकत नाहीत. समान संधी म्हणजे संधीचे समानीकरण. मागास जाती जमातींना 'विशेष' सोयी सवलती दिल्याशिवाय संधीचे व परिस्थितीचे समानीकरण करता येत नाही आणि म्हणून आपल्या घटनेने मागास व दुर्बल जाती जमातीच्या संदर्भात 'संरक्षक भेदभावाची' (Protective discrimination) भूमिका घेतली आहे. सामाजिक पुनर्रचनेसाठी आवश्यक असणारी ती भूमिका आहे. जातीभेदाचा परिणाम कमी करण्यासाठी या 'संरक्षक भेदभावा'ची आवश्यकता आहे. निरनिराळया जाती जमातीमध्ये व रोजगाराची समान संधी आणि आरोग्याच्या समान सोयी सर्वांना उपलब्ध असल्याशिवाय समताधिष्ठित समाज अस्तित्वात येणे शक्य नाही.

तेव्हा या सर्व पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष जगण्याच्या प्रश्नांची उत्तरे शोधून फुले, शाहू, आंबेडकरांच्या समताधिष्ठित समाजनिर्मितीच्या विचारप्रवाहाची पुनर्मांडणी करावी लागेल.

**संदर्भग्रंथ :**


१. एरंडे, व्ही.एल. २०१६. राज्यशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर. औरंगाबाद : नॉलेज मिशन प्रकाशन.
२. जोरगुलवार, भूषण. २०१६. राष्ट्रभक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर. औरंगाबाद, नॉलेज मिशन प्रकाशन.
३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे लेखन आणि भाषणे, भाग. ३ १९४६ ते १९५६. खंड.१८. महाराष्ट्र शासनाचे प्रकाशन २००२.
४. कीर, धनंजय. २००६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर. मुंबई : पॉप्युलर प्रकाशन.
५. पवार, दया. संपा. २००६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ. मुंबई : महाराष्ट्र राज्य साहित्य व संशोधन मंडळ
६. कुबेर, बा.ना. १९९७. डॉ. आंबेडकर विचार मंथन. पुणे : सुजाता प्रकाशन.
७. कुंभार, नागोराव. संपा. १९९१. विचारशलाका डॉ. आंबेडकर विशेषांक. लातूर : 'आई' शिवनगर,सूतमिल मार्ग.
८. कसबे, रावसाहेब. २००६. डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना. पुणे : सुजाता प्रकाशन.
९. लुलेकर, प्रल्हाद. २०११. अनंत पैलूंचा सामाजिक योद्धा. पुणे : सायन पब्लिकेशन्स.
१०. कसबे, रावसाहेब. २००६. आंबेडकर आणि मार्क्स. पुणे : सुगावा प्रकाशन.
११. भोळे, भा.ल. १९९०. बाबासाहेब आंबेडकरांचा वैचारिक वारसा. नागपूर : विद्या प्रकाशन.

# कोरोना (कोविड–१९) चा भारतीय समाजवरील परिणाम

**डॉ. दीपक कृष्णराव पवार**, सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र–विभाग प्रमुख, विमेन्स कॉलेज ऑफ आर्ट अॅन्ड कॉमर्स, नंदनवन, नागपूर.

**संक्षेप**:– भारतीय समाजशास्त्राने भारतीय समाजाबाबत ज्या वेगवेगळ्या अंगाचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातुन शास्त्रीय पद्धतीने अध्ययन करुन भारतीय समाजातील वास्तव, परिवर्तन, समस्या, परिवर्तनातील अडथळे इत्यादी अनेक बाबी समाजासमोर आनण्याचे काम केलेले आहे. समाजशास्त्राच्या उगम फ्रान्स मध्ये होऊन अमेरिका व इंग्लंड आणि अनेक पाश्चिमात्य देशातुन भारतासह संपूर्ण जगात प्रसार झाला. भारतात समाजशास्त्र या विषयाला २० व्या शतकाच्या सुरुवातीला मान्यता मिळून अनेक विषयाच्या विशेष रुपाने अभ्यास करुन समाजशास्त्राच्या अनेक शाखा विकसीत झाल्या. भारतीय समाजशास्त्रज्ञांनी लोकसंख्येचा काही प्रमाणात अभ्यास केला, परंतु विकसनशील परंतु भरमसाठ लोकसंख्या वाढीतुन अपर्याप्त साधन असलेल्या या देशाच्या जनतेच्या आरोग्याचा मात्र अभ्यास समाजशास्त्रात विशेष करण्यात आलेला नाही. भारतीयांच्या आरोग्याच्या प्रश्नाकडे तितकेसं लक्ष भारतीय समाजशास्त्रज्ञांनी दिलेले नाही. त्यामुळे आज भारतात कायद्याचे समाजशास्त्र, चित्रपटाचे व संगीत व नृत्यांचेही समाजशास्त्र विकसीत झाले, त्यावर संशोधने झालीत परंतू महत्त्वपुर्ण अशा आरोग्याच्या समाजशास्त्राकडे मात्र दुर्लक्ष झाले आहे. आज जवळ जवळ संपूर्ण जगात कोरोना व्हायरस (कोविड–१९) या आजाराने थैमान घातले आहे. चीन पासुन सुरुवात होऊन जगातल्या काही अपवाद सोडून सर्वच देशात हा आजार पसरलेला असुन जगातील बलाढय सर्वसंपन्न अशी अमेरिका व युरोप खंडातील देश या साथरोगाने हतबल झालेले आहे. भारतातही आजाराचा शिरकाव होऊन आजच्या आधुनिक व विज्ञान युगातील पण विकसनशिल असलेल्या भारतीय समाजावर कोणता परिणाम होईल व नविन कोणती आव्हाने उभी राहतील याचा अभ्यास प्रस्तुत शोध निबंधात करण्यात आला आहे.

**कोरोना व्हायरस (कोव्हीड–१९)** :– डिसेंबर २०१९ मध्ये कोरोना व्हायरचा एक नविन प्रकार चीन मधील वुहान शहरात निदर्शनास आला, त्याला कोव्हीड–१९ असे नाव देण्यात आले. सुरुवातील वुहान व आसपासच्या प्रदेशात पसरलेला हा विषाणू त्याच्या इतर उपप्रकारांपेक्षा अधिक तिव्रतेचा असून याने संसर्ग झालेल्या रुग्णांच्या मरण्याचे प्रमाण फार मोठे आहे. ०१ मे २०२० ला जगात ३२,१८,१८४ जणांना या आजाराची लागण झाली असुन जवळपास २,२८,००० लोकांचा मृत्यु झाला आहे तर १०,००,०३३ रूग्ण या आजारातुन पुर्णता बरे झाले आहे आणि ५९,८११ रूग्ण अस्वस्थ आहे. सर्वाधिक बळी अमेरीकेत ६२,४१८ बळी गेले असुन त्यानंतर इटली मध्ये या आजारामुळे बळी गेलेले आहे. दुर्बे प्रांतातील वुहान शहरातुन या विषाणुची लागण सुरु झाली. या आजारामुळे चीन या देशात १ मे २०२० पर्यंत ८२,८६२ जणांना लागण झाली होती व ४,६३३ लोकांचा मृत्यु झाला होता. पण या आजाराने चीन पेक्षाही अमेरिका, स्पेन, इटली, फ्रान्स, जर्मनी, इंग्लंड, रशिया, थायलंड, युएई, टर्की, स्विटझरलँड, या देशांना मोठा फटका दिला आहे, आणि अधिक जण बळी गेलेले आहेत.

भारतात ३० जानेवारी २०२० ला पहिला पॉझिटीव्ह रुग्ण केरळ मध्ये आढळला. हा तरुण रुग्ण चीन मधील वुहान विद्यापीठात शिक्षण घेत होता. त्यांनतर महाराष्ट्रात मुंबई, पुणे, पिंपरी चिंचवड आणि नागपूर येथे कोरोना व्हायरसची लागण झालेले रुग्ण आढळले. तर कोरोना व्हायरसचा पहिला बळी कर्नाटकाच्या कलबुर्गीमध्ये ७६ वर्षीय वृद्धाचा झाला. आज ०१ मे २०२० ला भारतात ३४,८६२ बाधित असुन त्यातील ११५४ लोकांचा मृत्यु झाला आहे. सर्वाधिक रुग्ण महाराष्ट्रात असुन जम्मु काश्मीर पासुन तर अंदमान निकोबार पर्यंत सर्वत्र कमी जास्त कोरोना व्हायरस बाधित रुग्ण प्रत्येक राज्यात आहेत. कोरोना व्हायरसमुळे संपुर्ण भारतात कोलाहल माजला आहे. सर्वप्रथम महाराष्ट्र सरकारने १५ मार्चला शाळा कॉलेज बंद करण्याचा निर्णय घेतला. सरकारकडून कडक उपाय योजना म्हणजे राज्य बंदी आदेश लागू करुन ग्रुप सहली, पर्यटन दौरे रद्द केले, सिनेमा, नाट्यगृहे व मॉल्स बंद, सर्वत्र गर्दी करण्यावर बंदी आणली गेली. १६ मार्चला विद्यापीठाच्या परीक्षा आणि स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायती राज आणि सहकारी संस्थाच्या निवडणुका पुढे ढकलल्या तसेच ग्रामिण भागातील शाळाही बंद करण्याचा निर्णय घेतला व कोरोनाची लक्षणे असणाऱ्यांना क्वारंटाईन करणाऱ्याच्या हातावर शिक्का मारण्याचा निर्णय झाला. १७ मार्चला सरकारी कार्यालयाची गर्दी कमी करुन व रेल्वे गाड्या रद्द करुन प्लॅटफार्मची गर्दी कमी करण्याचा उपाय करण्यात आला. दिनांक १८ मार्च २०२० ला कार्यालय, बस, रेल्वे इत्यादी मध्ये ५० टक्के कर्मचारी व प्रवासी करण्याचा निर्णय झाला. जसजशी कोरोना रुग्णाची संख्या वाढत होती त्याप्रमाणे महाराष्ट्र सरकार असे निर्णय घेत होती. दिनांक १९ मार्च २०२० ला महाराष्ट्रात कोरोनाचे ४८ रुग्ण तर देशभरात एकूण रुग्ण १९७ झाले होते. भारतात विदेशांतून मुळ भारतीयांचे स्थलांतरण वाढले म्हणजे भारताबाहेर गेलेले मोठया संख्येने भारतात परत येत होते. जगात कोरोनाने भीषण रुप धारण केले, तेव्हा १९ मार्चच्या रात्री ८.०० वाजता भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवार दिनांक २२ मार्चला 'जनता कर्फ्यू' पाळण्याचे जाहीर करून संध्याकाळी ५.०० वाजता टाळी व थाळी वाजवण्याचे आव्हान केले.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व आरोग्य मंत्र्यांनी या साथरोगाची भीषणता व प्रसार लक्षात घेऊन नागपूर, मुंबई, ठाणे, नवी मुंबई, रायगड, मिरा–भाईदर, कल्याण–डोंबिवली, उल्हासनगर, अंबरनाथ, बदलापुर, पुणे–पिंपरी चिंचवड या सर्व शहरात ३० मार्च २०२० पर्यंत जीवनावश्यक सेवा व वस्तु वगळुन लॉकडाऊन केले. त्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २४ मार्चच्या रात्रीला, १४ एप्रिल २०२० पर्यंत तीन आठवड्याकरीता संपुर्ण भारतात लॉकडाऊन जाहीर केला. त्यानंतरही लोकांना स्वयंशिस्तिने लॉकडाऊन चे आदेश न पाळल्याने २३ मार्च पहाटेपासून मुंबई पोलिसांनी आपले अधिकार वापरुन संचारबंदिचे आदेश जारी केले. त्यानंतरही परिस्थिती नियंत्रणात न आल्याने संपूर्ण महाराष्ट्रात महाराष्ट्र सरकारने त्यानंतर संपूर्ण भारतात भारत सरकारला जमावबंदीचा आदेश लागू करावा लागला.

२४ मार्चला लॉकडाऊनची घोषणा केली गेली पण त्याबाबत काहीही उपाययोजना केली नाही आणि त्यामुळे समाजाच्या सर्व स्तरातील सर्व प्रकारचे उद्योग, व्यापार, दुकानदारए कामगार म्हणजेच श्रीमंत, मध्यमवर्ग, गरीब यांच्यावर तसेच ग्रामीण व शहरी समाजावर मोठा आघात झाला. पण श्रीमंत व मध्यमवर्ग जो सर्व दृष्टीने सक्षम आहे तो सैरभैर झाला नाही तर गरीब व निम्न स्तरातील कामगार, फेरीवाला, किरकोळ वस्तुची विक्री करणारा, वस्तु व श्रमाची घरपोच सेवा देणाऱ्या इत्यादी निम्न स्तरातील वर्गावर अचानक व मोठा आघात झाला, हा वर्ग सैरभैर झाला. त्याच्या समोर अनेक अडचणी

व प्रश्न निर्माण झालेत. स्वतःच्या जीवीताच्या रक्षणाबरोबर कुटुंब व मुलांच्या रक्षणाचे काय? कोरोना या संक्रमित रोगामुळे जीवन मरण्याच्या, अस्तित्वाच्या, आलेल्या संकटाचा भारतीय समाजावर, समाजातील विविध घटक व क्षेत्र यावर काय परिणाम झाला? याचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातुन अध्ययन करण्यात आले आहे.

**अभ्यासाचे महत्त्व** :– कोरोना (कोव्हीड–१९) या अतिशिघ्र जीवघेण्या संक्रमित आजार व अचानक झालेल्या देशव्यापी लॉकडाऊनचा समाजावरील परिणाम लक्षात येण्याकरीता हा संशोधनात्मक अभ्यास महत्त्वाचा आहे.

**अध्ययनाची उद्दिष्टये** :– प्रस्तुत अध्ययनाकरिता संशोधकाने पुढील उद्दिष्टये लक्षात घेऊन अभ्यास केला आहे. १. श्रीमंत, मध्यम व गरीब वर्ग यांच्यावरील पडलेल्या आर्थिक–सामाजिक आव्हानाला अभ्यासणे. २. निम्न वर्ग किंवा गरीब यांच्यावरील सामाजिक, मानसिक परिणाम अभ्यासणे. ३. देशी,–विदेशी व ग्रामिण–नागरी स्थलांतरनाचा परिणाम अभ्यासणे.

**अभ्यास विषयक गृहीतके** – गृहितके अभ्यासाला दिशा देतात, त्यामुळे संशोधकाने पुढील गृहितकांचा आधार घेऊन प्रस्तुत अभ्यास केला आहे.

१. तीव्र रुपाने संक्रमित होणाऱ्या कोरोना या रोगाचे संक्रमण रोकण्याकरिता नियोजनपुर्वक लॉकडाऊन न केल्यामुळे निम्न स्तरातील लोक किंवा गरीब यांच्या सामाजिक–मानसिक–आर्थिक आघात होऊन अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

२. भारतातुन विदेशात आणि ग्रामीण भागातुन शहरात होणारे स्थलांतरणाचे प्रमाणात घट होईल.

३. सामाजिक संबंधात दुरावा निर्माण झाला असुन कौटुंबिक संबधात जवळीक वाढली आहे.

**संशोधन पद्धती** – या अध्ययनाचे तथ्य संकलन करण्याकरीता द्वितीयक स्त्रोतातील सार्वजनिक प्रलेखा मधील प्रकाशीत स्त्रोताचा वापर करण्यात आला. यामध्ये वर्तमानपत्रे, साप्ताहिके, विविध टी. व्ही. चॅनलवरील माहिती–मुलाखती, समाज माध्यमावरील माहिती, मते–मतांतरे, ब्लॉक्स च्या माध्यमातुन माहिती संकलीत करण्यात आली आहे, ही सर्व माहिती वर्णनात्मक रुपात विश्लेषित करुन मांडली आहे.

**अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा** – प्रस्तुत अभ्यास हा कोरोना (कोव्हीड–१९) च्या भारतातील संक्रमणाच्या लॉकडाऊनच्या काळात करण्यात आला असुन वर्तमानपत्रे, दुरदर्शन बातम्या व सामाजिक माध्यमातुन मिळालेल्या माहितीवर आधारीत आहे.

**संकलित माहितीचे विश्लेषण** – गेल्या काही वर्षापासुन सरकारचे पायाभुत सुविधांकडे दुर्लक्ष झाले व त्याचा फटका कोरोनाच्या साथीच्या वेळी जाणवला. भारतात विषाणू प्रयोगशाळा निर्माण करण्यात आल्या नाहीत. त्यामुळे कोरोनाची लागण झाली की नाही हे शोधून काढणे फार कठीण झालेले आहे. अनेक कोरोनाग्रस्त निदानाच्या अभावी समाजात राहिले, इतरांच्या संपर्कात आले व त्यामुळे कोरोनाचा आजार जदल गतीने पसरला. अजूनही तपासणी अभावी निश्चित व परीपुर्ण आकडेवारी उपलब्ध नाही.

आर्थिक परिणाम – कोरोना विषाणूला प्रतिबंद हा मानवी संपर्क कमी करुनच करता येतो व त्याकरीता राज्याने व नंतर केंद्राने लॉकडाऊन केले व कलम १४४ अन्वये जमावबंदी लागू करण्यात आली आहे. दुकाने, व्यापारी आस्थापने, कारखाने, प्रवासी सेवा देणारी साधने इत्यादीना तात्काळ बंद करण्यात आले. त्याचा आर्थिक परिणाम व्यक्ती–समाज–देश या तीन स्तरावर पडला आहे. लॉकडाऊन आल्याबरोबर मोठ्या उद्योगपती पासुन तर फुटपाथवर विक्री करणाऱ्या विक्रेत्यापर्यंत सर्वच उत्पादन, व्यापार, व्यवहार ठप्प झाला. झालेले उत्पादन किंवा असलेला माल तसाच पडून आहे. तो ग्राहकापर्यंत पोहचू शकत नाही, कच्चा माल तसाच पडून आहे तो जर टिकावू नसेल तर खराब होईल. यंत्र, सामग्री या सर्व गोष्टी न वापरता पडून आहेत. त्यामुळे वापरात नसल्याने त्या खराब होत आहे. त्याचबरोबर या यंत्रसामग्री व इत्यादीवरील उत्पादन खर्च उत्पादन न होता होत आहे. जसे भांडवलावरील व्याज, यंत्राचा घसारा, कामगारांचे वेतन, कार्यालयाचा खर्च इत्यादी अनेक बाबी आहेत. त्यामुळे मोठ्या उद्योगपती पासुन तर छोट्यात छोट्या उत्पादकापर्यंत आर्थिक हानी सहन करावी लागत आहे.

थोक व्यापारी ते फेरीवाला या सर्वांना खुप मोठा फटका पडतो आहे. औषध व जीवनावश्यक गोष्टींचा व्यापारी सोडून प्रत्येकाची उलाढाल थांबली परंतु टिकावू असणाऱ्या व्यापारातील वस्तु, टिकावू असेल तरीही गुंतविलेल्या भांडवलाचे व्याज, यंत्राचा घसारा, नोकरांचे खर्च सुरु राहुन आवक पुर्णतः बंद झाली त्यामुळे हा वर्ग सुद्धा प्रचंड तोट्यात गेला आहे. शेतकरी, दुध उत्पादक, ग्रामीण व्यवस्थेतला कारागीर व कामगार हा पुर्वीच डबघायीला आलेला होता, आता लॉकडाऊनमुळे तर तो पुर्णतः उन्मळून पडला आहे. शेतकऱ्यांचा माल शेतातच आहे तो बाजारापर्यंत जाऊ शकत नाही व त्यावर आधारीत ग्रामिण अर्थव्यवस्थेतील कारागीर, कामगार, वाहतुकदार इत्यादींची पण वाताहात झालेली आहे. ग्रामिण–शहरी समाज, त्यातला उद्योजक, कारागीर, मोठा व्यापारी, फेरीवाला, शेतकरी, सामान्य नागरीक जो या साखळीने प्रत्यक्ष अप्रत्यक्ष जोडला आहे, तो कोरोनाच्या संसर्गाला टाळण्याकरीता केलेल्या लॉकडाऊनच्या उपाययोजनामुळे अस्ताव्यस्त झाला, उन्मळून पडला आहे. जीवो–जीवोश्य–जीवनम् या प्रमाणे मोठ्या पासुन छोट्यापर्यंत समाजतील सर्व माणसे एकमेकांवर निर्भर असुन जीवन जगण्याची साखळी आहे. ती साखळी लॉकडाऊनमुळे खंडीत झाली असुन समाजातला आर्थिक व्यवहार ठप्प झाला आहे. समाजातील उच्च वर्ग, मध्यम वर्ग आर्थिकदृष्टया थांबला आहे, पण त्याच्याकडे असलेल्या पुंजी व संसाधनामुळे त्याच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न नाही. पण समाजातला कनिष्ट स्तर, गरीब व बेघर, भटकणारे यांचा वर्ग भारतात खुप मोठा आहे. जो दैनंदीन उत्पन्नावर उपजिवीका करतो म्हणजे हातावर आणतो व पानावर खातो त्याच्या समोर उपजिवीकेचा मोठा प्रश्न आहे.

नोटाबंदी, जी.एस.टी., विविध बँकाचे निघालेले दिवाळे, नकारात्मक आर्थिक धोरणे इत्यादीमुळे देशाचा या पाच–सहा वर्षात जी.डी.पी. प्रचंड खाली आला आहे. रुपयाचे अवमुल्यन आणि वाढत्या महागाई आणि सर्वच क्षेत्रात प्रचंड मंदी आल्याने जागतीक व देशांतर्गत आर्थिक आघाडीवर देश प्रचंड मागे आलेला होताच पण कोरोनाच्या संसर्गजन्य आजाराच्या फैलावामुळे माणसाच्या जीवनाची चाके थांबली तेथे अर्थव्यवस्था तर रुळावरुन साफ घरलेली आहे. सर्वच विचारधारेचे अर्थतज्ञ, अर्थव्यवस्था उध्वस्त होणार व २०२०–२१ चा विकास दर (जी.डी.पी.) २ टक्के पेक्षाही खालचा स्तर गाठू शकतो हे ठोसपणे सांगत आहे आणि तसे चित्र तसेच आहे. या सर्वांचा परिणाम भुकबळी, बेरोजगारी, गुन्हेगारी वाढण्यात होणार आहे. त्याचबरोबर देश आर्थिक दृष्ट्या किमान ३० वर्षे मागे जाईल असे चित्र रेटिंग्जने वर्तविले आहे.

**सामाजिक परिणाम** – भारतात लोकसंख्या वाढीचा प्रचंड वेग, संसाधनाची कमी, निरक्षरता, अर्ध साक्षरता यामुळे देशात अनेक

समस्या निर्माण आहेत. त्याच बरोबर या कारणामुळे आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास जेवढा साधायला पाहिजे होता तेवढा साधता आला नाही. कोरोना या संक्रमण आजाराला लॉकडाऊन करावे लागले त्यामुळे या प्रश्नांमध्ये आणखी भर पडणार आहे. मोठ्या उद्योगांपासुन तर छोट्या कारागिरांपर्यंतचे सर्वांचेच काम बंद आहे. त्यामुळे समाजात प्रचंड बेरोजगारी वाढणार आहे. पोटात भुख, हाताला काम नाही. तेव्हा भुकबळी आणि मानसिक आरोग्याची समस्या दारीद्रय रेषेखालील, फुटपाथवर वास्तव्य करणारे, वेश्या, हातमजुर, छोट्या मोठ्या वस्तु विकून दैनंदिन गरज भागविणारे यांच्यात भूकबळीची समस्या निर्माण झाली आहे. कोरोनामुळे जितकी माणसे मरत नाहीत त्यापेक्षा अधिक माणसे भुकबळी व मानसिक तणावामुळे जाईल याचे मोजमाप होणार नाही. सध्यातरी लॉकडाऊन आहे. त्यामुळे व कोरोनाच्या भितीने गुन्हेगारी कमी आहे पण प्रचंड बेरोजगारी, कुटुंबाचे हाल, जीवनावश्यक गरजा पुर्ण न होणे आणि भुकेचा उफाळलेला डोंब यामुळे गुन्हेगारीमध्ये फार मोठ्या प्रमाणात वाढ होईल यात शंका नाही.

**मानसिक परिणाम** :— कोरोनामुळे लॉकडाऊन झाले व या लॉकडाऊनमुळे सर्व व्यवहार आणि जनजीवन तात्काळ ठप्प झाले. नुसतेच ठप्प झाले नाही तर जमावबंदी, संचारबंदी लावल्या गेली (आवश्यक होती). रेल्वे, बस व खाजगी वाहनांचे आवागमन तात्काळ बंद झाले, काय करावे? काय नाही? कुठे जावे, दहा बाय दहाच्या झोपडीत कसे राहावे, गावाकडे परत जावे तर सर्वच बंद वरुन पोलिसांचा दंडुका. घरात खायला नाही, मुले आजारी, करावे काय? असे अनेक प्रश्न आणि प्रश्नच. क्षणात होत्याचे नव्हते. ऐकले होते चीन मध्ये माणसे कशानेतरी मरतायेत मग तो चीन मधुन आमच्या पर्यंत कसा आला कोणी आणला. घरात पाच माणसे एक कुठल्यातरी कारणाने बाहेरगावी गेला त्याला परतीला मार्ग नाही कुटुंबियांचा जीव कासावीस झालेला, इत्यादी. किती? मानसीक ताण. मोठ्यां लोकांची समस्या, राजकारणी—अधिकारी—प्रशासन ऐकते मदत करते. पण गरीबाच कोण ऐकतो त्याला कोण वाली. आणि एखादा जाणता राजकारणी, अधिकारी ऐकतोही पण त्यांच्यापर्यंत पोहचण्याचे मार्ग व पर्याय माहित नाही. कल्पनेच्याही पलिकडील असाहृयता व त्याचा मानसिक ताण. सोशल डिस्टंट ठेवा. कसे ठेवणार? धड घरात पाय लांब करुन झोपू शकत नाही. तिथे माणसे मिटरभर अंतर कसे राखणार ? किती भयाणक व या तणावाची भयानकता कल्पनेच्या पलिकडची, ती समजायला माणूस प्रत्यक्ष त्या स्थितीत असावा अथवा सामाजिक जाण व भान असणारा असावा.

**विदेशातुन भारतात, शहरातुन ग्रामिण भागात स्थलांतरण आणि त्यातुन निर्माण झालेले प्रश्न**:— करोनाच्या विषाणुची लागण चीनमध्ये झाली आणि चिनमधुन कोरोना इटली, इराण, स्पेन, इंग्लंड, अमेरिका, सौदी अरेबिया, जर्मनी, फ्रांस इत्यादी अनेक देशात वेगवेगळ्या कारणाने फैलावत गेला. त्यामुळे जगभरातील विविध देशातील भारतीयांनी भारताकडे धाव घेतली, त्यामध्ये काही संक्रमित झालेले होते त्यांनी स्वउच्चशिक्षीत असुनही तपासणी न करता व विलग न राहता समाजात मिसळले त्यातुन हा आजार भारतात पसरला. त्यामुळे विदेशी भारतीयांबाबत भारतात आल्यानंतर येथील समाजाचा कुटुंबाचा, मित्राचा, नातेवाईकांचा दृष्टीकोन बदलून त्यांचा स्विकार करुन मदत व प्रेम देण्यापेक्षा एकप्रकारचा दुरावा, भिती आणि साशंकता निर्माण झाली. कालपर्यंत ही हवीशी वाटणारी माणसे स्वत:च्या देशात, घरात नकोशी झाली, पोरकी झाली.

दुसऱ्या बाजूला ग्रामिण भागातील माणसे उदरनिर्वाह करायला शहरात स्थलांतरीत झाली होती. कारखान्यापासुन तर घरगड्यापर्यंत मिळेल ती कामे करुन आपला, आपल्या कुटुंबाचे भरणपोषन करुन गावातील आप्तांना जमेल तशी मदत करायची. पण कोरोनाच्या संक्रमणाच्या भितीने लॉकडाऊन झाल्याने ती सैरभैर झाली. मिळेल त्या साधनाने, नाहीतर शेकडो किलोमिटर पायी चालून ती गावाकडे अनेक हालअपेष्टा सहन करीत पोहचली. पण गाव त्यांना घ्यायला तयार नाहीत, घेतले तर गावातले कुटुंब व आप्त मुळ घरात राहु देत नाही. सारेच संशयाने बघतात, दुसरीकडे हाताला काम व हातात पैसा नाही. कालपर्यंत मदत घेत असलेले व प्रेम दाखवित असणारे कुटुंब जणू शत्रु बनली आहे.

विदेशातुन—देशात, शहरातुन—गावात अशा परत झालेल्या स्थलांतरीतांचे अनेक प्रश्न किंवा आव्हाने निर्माण झाली आहेत. पण विदेशातून—देशात परत आलेले, आर्थिक दृष्टीने सक्षम, उच्च शिक्षित असल्याने त्यांचे प्रश्न ते सोडवू शकतील पण शहरातून—ग्रामिण भागात परत स्थलांतरीत झालेल्यांच्या समोरील आव्हाने अत्यंत कठीण आहे.

**नविन सामाजिक संबंध** :— कोरोना या संक्रमित विषाणुने श्रीमंत—गरीब, शिक्षित—निरक्षर, मोठा—लहान, वरच्या जातीचा — खालच्या जातीचा, धर्माचा किंवा पंथाचा भेद केला नाही. याचे संक्रमण सर्वच स्तरात होत असुन त्याचा उपचार फक्त सरकारी दवाखान्यातच होत आहे. पंचतारांकीत दवाखाने स्वत:ला बंद करुन बसली व त्यांच्याकडे कोरोना विषाणुवर मात करणारी यंत्रणा सुद्धा नाही. त्यामुळे सर्वांना सरकारी दवाखान्याच्या पातळीवर आणले आहे. लॉकडाऊन मुळे सर्वच क्षेत्रावर बंदी आणली त्यामुळे सर्वांचेच व्यवसाय ठप्प झाले आणि प्रत्येकाच्या क्षमतेनुसार आर्थिक नुकसान झाले आहे. त्याचप्रमाणे कोरोनाचे संक्रमण होऊ नये याकरीता संक्रमित व्यक्तीपासुन दुर रहाणे व सामाजिक अंतर पाळण्याचे कडक बंधन आहे. आज समाजातील प्रत्येक व्यक्ती ओळखीची असो की अनोळखी एकमेकांकडे संशयाने बघत असुन दुर राहण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहे. सामाजिक संबंध हे व्यक्तीच्या पारस्पारीक आंतक्रियेमधून निर्माण होतात व सामाजिक जीवन विविध सामाजिक संबंधानी बनते. पण कोरोनाच्या प्रभावाने ही सामाजिक संबंधाच्या साखळीत खंडीतता व दुरावा निर्माण झाला असुन नविन सामाजिक संबंधाच्या कसोटया निर्माण होत आहे.

**निष्कर्ष** :— अशाप्रकारे तीव्ररुपाने संक्रमित होणाऱ्या कोरोन व्हायरस या साथरोगाच्या प्रसाराला थांबविण्याकरीता नियोजनपुर्वक लॉकडाऊन न केल्यामुळे समाजाच्या सर्व वर्गावर आघात झाला आहे, पण यात निम्न किंवा गरीब वर्गावर सामाजिक—आर्थिक व मानसिक आघात अधिक होऊन तो पुरता खचला आहे. हा वर्ग सैरभैर झाला आहे. यातील बऱ्याच लोकांनी आपल्या मुळ गावाचा आधार घेण्याचा प्रयत्न केला पण तिथेही कालचे स्वकीय आज परकीय होऊन स्विकार करत नाही. भारतात सुशिक्षित व मध्यम आणि उच्च स्तरातील लोकांना विदेशात जाऊन नोकरी व व्यवसाय करणे, स्थलांतरीत होणे फार प्रतिष्ठेचे वाटायचे. हा वर्ग भारताला व भारतीयांना तुच्छ समजायला कमी करीत नव्हता परंतु तिथे (विदेशात) कोरोनाचे संकट आल्यावर कोरोना घेऊन हा भारतात पळुन आला. पण हा वर्ग त्रास द्यायला आलेला वर्ग बनला आहे. काल ज्यांना तुच्छ समजले त्यांचाच आधार घ्यावा लागतो आहे. त्यामुळे मुळ भारतीय व भिऊन परत आलेले असा दुरावा निर्माण झाला आहे. ग्रामिण भागात असाच सामाजिक संबंधातील दुरावा

वाढला आहे. ग्रामिण–शहरी, भारतीय–विदेशी स्थलांतरण खुप वाढले होते ते याच्या परिणामस्वरूप काही वर्षे नक्की कमी होईल. या लॉकडाऊनमुळे कधी नव्हे ते आई, वडील, आजी, आजोबा, काका, काकू व मुलं एकत्र इतका काळ राहतील, त्यामुळे भावनीक आणि मानसिक आदान प्रदान होऊन कौटुंबिक संबंधात जवळीकता वाढेल.

**उपाय** :– १) भारतातील उच्च शिक्षित वर्ग भारतात शिक्षण घेतो व विदेशात जावून काम करतो, मजेत जीवन जगतो. तो भारतीयांच्या करांमधून शिक्षण घेतो व त्यामध्ये जी प्रतिभा निर्माण होते ती तो विदेशात जावून वापरतो व तेथील देशाचा विकास होतो. तेंव्हा अशा प्रतिभावंत व्यक्तींनी भारतातच राहून आपल्या प्रतिभेचा वापर करावा, ज्यामुळे भारताला विकास साधता येईल व त्याचा फायदा भारतीय जनतेला होइल आणि संकटाचे वेळी, परत येऊन नामुष्कीची वेळ येणार नाही. २) मा. गांधी नेहमी जनतेला उपदेश करायचे 'गावाकडे चला, गावे स्वतंत्र व स्वयंभू करा'. पण सर्व याऊलट होत गेले. तेव्हा गावांना स्वतंत्र व सर्व दृष्टीने स्वंयभू बणवून ग्रामिण–शहरी स्थलांतरण थांबवणे आवश्यक आहे. त्यामुळे भारतासमोरील अनेक प्रश्न कमी होतील. ३) भारताची मोठी कमजोरी म्हणजे प्रचंड वाढणारी लोकसंख्या तेव्हा चीनप्रमाणे कडक धोरण आखुन लोकसंख्या नियंत्रण केले पाहिजे. ४) गेल्या काही वर्षात सरकार निव्वळ रस्ते निर्मितीवर भर देत आहे, ही बाब पुरेशी नसुन मोठमोठ्या आरोग्य, शिक्षण आणि तंत्रज्ञानाच्या संशोधन संस्था निर्माण करुन मोठ्या प्रमाणात संशोधन होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर सार्वजनिक आरोग्य व शिक्षणावर तसेच शेती संबंधीत गरजावर मोठ्या प्रमाणात लक्ष देऊन गुंतवणुक व भरीव काम सरकारच्या माध्यमातुन होणे गरजेचे आहे. ५) सार्वजनिक व्यवस्थेचे खाजगीकरण पुर्णत: थांबले पाहिजे. संकटाचे वेळ खाजगी संस्था, दवाखाने, कर्मचारी, संसाधने कामात येत नाही याचा अनुभव कोरोनाने दिला आहे. यावेळी सरकारी किंवा सार्वजनिक व्यवस्थाच साथ देते. सरकारने सार्वजनिक क्षेत्रात गुंतवणुक करावी. जगाची महासत्ता होतांना याबाबत चीनचे उदाहरण महत्त्वपुर्ण आहे.

**संदर्भ** :

१. दैनिक लोकसत्ता, नागपूर, दिनांक १६ मार्च ते ०१ मे २०२०, दरम्यानचे विविध लेख, वाचकांची मते, संपादकीय, बातम्या, पुरवणी इत्यादी.
२. दैनिक लोकमत, नागपूर, दिनांक १६ मार्च ते ०१ मे २०२०, दरम्यानचे विविध लेख, वाचकांची मते, संपादकीय, बातम्या, पुरवणी इत्यादी.
३. दैनिक महाराष्ट्र टाईम्स (ई–पेपर) दि. ३० मार्च २०२०.
४. आगलावे प्रदीप (२०११) – मुलभूत समाजशास्त्रीय संकल्पना, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
५. https://mr.vikaspedia.in>HlthOth_Info
६. shodhganga.in inflibnet.ac.in>jspui (आरोग्य संकल्पणा).
७. राजेंद्र काकोडकर – 'कोरोना'नंतरचा भारत कसा असेल – दृष्टीकोण, दैनिक लोकमत, नागपूर, दि. १५ एपिल २०२०.

# अभ्यासक्रम व शिक्षणपद्धतीतील बदलांची गरज

**प्रा. डॉ. अंजली जोशी** –टेंभुर्णीकर, प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, दयानंद कला महाविद्यालय, लातूर. मो. ७३५०३२७१६६

आजच्या प्राथमिक व माध्यमिक शिक्षणात मराठीपणा जाऊन आता इंग्रजाळलेले विद्यार्थी बाहेर पडू लागले आहेत. शिक्षक वर्गात मुलांना जे शिकवतात ते समजून घेण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची आहे असे मानले जाऊ लागले आहे. शाळेची अपेक्षा असते की, A आणि A+ दर्जा असणारे गुणवान (?) विद्यार्थी आपल्याकडे यावेत. त्यामुळे 'C' दर्जा दिलेल्या विद्यार्थ्यांनी कुठे जायचे आणि त्यांच्या भवितव्याचे काय? हा प्रश्न उपस्थित होतो. शाळांनी 'C' दर्जा दिलेले विद्यार्थी काहीच कामाचे नाहीत असा शिक्का त्यांच्यावर बसतो. येत्या काळात सर्व शाळा सीबीएससी पॅटर्नचा अवलंब करतील हे शासनाने स्पष्ट करून टाकले होते. पण ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा प्रवाह बोलीभाषा ते प्रमाणभाषा ते इंग्रजी असा खडतर आहे. यावर दरवेळी फाटलेल्या ठिकाणी ठिगळ जोडण्याच्या वृत्तीप्रमाणे, शासनास प्रश्न निर्माण झाला की तो तात्पूरता निकालात काढते आणि त्यामुळे दरवर्षी विद्यार्थी नवीन शैक्षणिक संकटांना तोंड देत रहातात. ज्या समाजात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची स्थिती अशी ठिगळ जोडलेली आहे तेथे गुणवत्ता निर्माण होण्याची अपेक्षा कशी करणार? दरवर्षी नवीन निर्णय, नवीन धोरण यामुळे विद्यार्थी व पालक संभ्रमावस्थेत राहतात. त्यामुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढण्याऐवजी नुकसानच जास्त होते.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने 'बेस्ट फाईव्ह' नुसार दहावीचा निकाल प्रथम जाहीर केला. तेंव्हा विद्यार्थ्यांना घसघशीत गुण मिळाल्याने विद्यार्थ्यांमध्ये आनंदी वातावरण होते. परंतु न्यायालयाच्या निकालाने यावर गंडांतर आणल्यानंतर पुन्हा हे चित्र बदलले. त्यामुळे विद्यार्थ्यांना हा आनंद सेलिब्रेट तर करता आला नाहीच; परंतु ११ वी प्रवेशाची टांगती तलवार डोक्यावर असल्याने विद्यार्थी व पालक चिंतेत पडले. प्रवेशाचे सोपस्कार संपल्यावरही विद्यार्थ्यांची काळजी मिटणार आहे का? दरवर्षी निकाल व प्रवेश यांचे काय नवीन त्रांगडे मंडळ आणि शासन निर्माण करेल हे सांगता येत नाही. दरवर्षीच्या ह्या निर्णयबदलामुळे विद्यार्थ्यांचे काय नुकसान होत आहे याची काळजी न मंडळाला आहे न शासनाला, लाखो विद्यार्थ्यांचे भवितव्य आपल्या हातात ठेवून निष्काळजीपणे निर्णय घेणाऱ्या या संस्थांना जाब विचारणार तरी कोण? याचे उदाहरण द्यायचे झाले तर २०२०–२१ या शैक्षणिक वर्षासाठी १२ वी चा नविन अभ्यासक्रम येणार आहे. आता एप्रिल महिना संपत येत असताना बोर्डाने १२ वी ची पुस्तके पी.डी.एफ. स्वरूपात उपलब्ध करून दिली आहेत. १२ वी वर्गाला शिकवणा–या शिक्षकांनी बदललेला अभ्यासक्रम वाचायचा कधी आणि त्यावर अभ्यास करून शिकवायचे कधी हे बोर्डालाच विचारलेले बरे. किमान वर्षभर आधी अभ्यासक्रमाचा आराखडा शिक्षकांपर्यंत पोहोंचणे अपेक्षित आहे. अभ्यासक्रम चांगल्या पद्धतीने शिकवला गेला तरच गुणवत्ता वाढीची अपेक्षा करता येईल.

'नेमेची येतो पावसाळा' त्याप्रमाणे नेहमीच उडतो बोजवारा अशी स्थिती दहावी व बारावी बोर्डाची आहे. बोर्ड कधी म्हणते रँकींग नको, कधी म्हणते गुणवत्ता यादी नको. कधी म्हणते, नापास करू नका, कधी म्हणते परिक्षाच घेऊ नका. विद्यापीठीय शिक्षणाचीही तीच स्थिती आहे. तेथेही उच्च शिक्षणाचा बोजवारा उडविण्याचीच स्पर्धा लागलेली आहे. कधी सत्र पद्धती बंद करतात, पुन्हा मध्येच चालू करतात. प्रकल्प कार्याचीही तीच तऱ्हा, अंतर्गत परिक्षाही कधी बंद, कधी चालू. सातत्याने दरवर्षी परीक्षा लांबतात, निकाल लांबतात, पुन्हा प्रवेशावर परिणाम ठरलेला आहेच. कधी गुणपत्रिकेवर गुण चुकीचे छापले जातात, कधी अनुपस्थिताला उपस्थित दाखवले जाते तर कधी नापासाचा पास होतो. एकूण काय तर घोळ घालणे आणि ते निस्तरत राहणे ही परंपरा कायम जपली जात आहे. आय.सी.एस.ई.सी., बी.एस.सी. आणि एस.एस.सी. बोर्ड यांच्यामध्ये सध्या सुरू असलेली लढाई ही केवळ अकरावी प्रवेशासाठी सुरू आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीचा विचार ह्यात किती केला जात आहे याबाबत शंका आहे.

आय.सी.एस.ई.सी.च्या गुणदान पद्धतीवर यापूर्वीच आक्षेप घ्यायला हवा होता. कारण त्यांनी गणित आणि विज्ञान या दोन डोकेदुखी ठरणाऱ्या विषयांना पर्याय उपलब्ध करून दिले आहेत. टेक्नीकल ड्राईंग, पर्यावरण विज्ञान असे १० विषय या दोन विषयांना पर्याय दिले आहेत. या विषयांना ५० टक्के गूण हे अंतर्गत मुल्यमापनात दिले जातात. म्हणजेच ७०० गुणांची परीक्षा देणाऱ्या आय.सी.एस.ई. बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत ५०० गुणांची परीक्षा देणाऱ्या एस.एस.सी. बोर्डाच्या विद्यार्थ्यांची मेहनत निश्चितच अधिक आहे. विज्ञान व गणित या विषयात अंतर्गत गूण २० टक्के आहेत आणि त्यांना गणित, विज्ञान हे विषय सक्तीचे आहेत. आय.सी.एस.ई. बोर्डाचे इतर पर्यायी विषय हे शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी किती उपयुक्त आहेत हे तपासणे गरजेचे आहे. हे बोर्ड जे काही करेल ते उच्च दर्जाचेच असेल या आजवरच्या समजापायी कुणीही या पद्धतीचा सखोल अभ्यास केला नाही. स्कोअरिंग विषयांचे पर्याय उपलब्ध करून देऊन, त्यांची टक्केवारी वाढवून त्यांचा अकरावीचा प्रवेश सूलभ केला जात आहे. तुलनेने एस.एस.सी. बोर्डाच्या विद्यार्थ्यांना हा प्रवेश कठीण होत चालला आहे.

बेस्ट ऑफ फाईव्हमुळे गुणांचा जो फुगवटा गुण पत्रिकेवर दिसतो आहे त्याचा पुढच्या आयुष्यात फारसा उपयोग होणार नाही हे निश्चित! आज शिक्षणात पासक्लासचे प्रमाण घटले आणि प्रथम श्रेणी व डिस्टिंक्शनवाल्यांची संख्या वाढली आहे. हा फुगवटा होण्याची कारणे शिक्षणाचा दर्जा, बुद्धीमत्तेतील वाढ, अभ्यासक्रमातील सुधारणा यापैकी नेमकी कोणती आहेत? का या बेस्ट ऑफ फाईव्हच्या कुबड्या आहेत ज्या पुढच्या उच्च शिक्षणात गळून पडतील, मग या विद्यार्थ्यांचे काय होईल? ४ जून २००७ च्या राज्य सरकारच्या आदेशानुसार राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना १० वी व १२ वीच्या परीक्षेत १५ गूण जादा देण्यात येत आहेत. सरकारने त्यासाठी ४२ खेळ निश्चित केले आहेत. या अध्यादेशामुळे सर्वत्र याच ४२ खेळांच्या संघटना व प्रशिक्षक जन्माला आले आहेत. आणि खेळ न खेळताही विद्यार्थ्यांना १५ गूण मिळवून देण्याची व्यवस्था होत आहे. हीच संधी संगीत, चित्रकला या विषयांसाठीही आहे. यासाठी कमीतकमी ५००० रू. विद्यार्थ्याला मोजावे लागतात. आज बुद्धी + पैसा + वेळ + मेहनत = अकरावी प्रवेश हे समिकरण निश्चित झाले आहे. अकरावी प्रवेशासाठी वाट्टेल ते करण्याची तयारी विद्यार्थी व पालकांनी ठेवली आहे. यात डोनेशनच्या नावाखाली हव्या त्या महाविद्यालयात प्रवेश मिळाल्यानंतर त्यातील किती जण यशस्वी होतात? कितीजण निराश होतात? किती जणांना आत्महत्या कराव्या लागतात? याचा आढावा कोणीच घेत नाही.

'दर्जेदार प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण' हे प्रगत राष्ट्रासाठी आवश्यक तत्त्व लक्षात घेऊन प्राथमिक शिक्षणाचा मूलभूत अधिकार 'मोफत' करण्यात आला आहे. इतर फुकट मिळणाऱ्या वस्तुंसारखीच अवस्था शिक्षणाचीही झाली आहे. माणूस घडवणारे, उत्तम नागरिक निर्माण करणारे समायोजनाचे धडे देणारे, स्वावलंबी बनवणारे 'शिक्षण' कसे असायला हवे यावर सखोल चिंतन होण्याची गरज आहे. प्राथमिक शिक्षणाच्या पहिल्या पायरीपासून ते उच्च शिक्षणापर्यंत दूरदृष्टीने व व्यापक तसेच एकाचवेळी सर्व पातळीवर बदल करण्याची वेळ आता आली आहे. या संपूर्ण शिक्षण प्रक्रीयेत एकवाक्यता, समन्वय आणि समानसूत्र असायला हवे. आज शिक्षणापेक्षा पोपटपंचीवर जास्त भर दिला जात आहे. हे पालक व विद्यार्थ्यांच्या शाळाप्रवेशासाठी होणाऱ्या मुलाखतीतून दिसते आहे. शासनाच्या अध्यादेशानुसार शालेय प्रवेशाच्या वेळी पालकांच्या मुलाखती घेता येणार नाहीत. गुणवत्तेचे निकष न लावता प्रवेश देणे बंधनकारक आहे. असे न केल्यास शाळांना २५ ते ५० हजारांपर्यंत दंड आकारला जाणार आहे. बांधकाम नीधी या नावाखाली पालकांकडून उकळल्या जाणाऱ्या अनुदानाची रक्कमही दरवर्षी वाढतेच आहे. हे अध्यादेश अनेक संस्थांनी बासनात गुंडाळून ठेवले आहेत. आपल्या आदेशांची पूर्तता कोणत्या संस्था करतात किंवा करत नाहीत याची वेळोवेळी माहिती शासनाने घेतली पाहिजे.

१ एप्रिल २०१० पासून बालकांसाठी मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार शासनाने लागू केला आहे. २००९–१० या शौक्षणिक वर्षापासून जे विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले, त्यांना पुढील वर्गात प्रवेश मिळणार आहे. एकीकडे परिक्षेपुरता अभ्यास आणि प्रवेशासाठी गुण मिळवण्याच्या स्पर्धा तर दूसरीकडे नापासांनाही पुढच्या वर्गात सहज प्रवेश. असे असेल तर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी असणारी निकोप स्पर्धाही आपण खुडून टाकत आहोत. खालच्या वर्गात स्पर्धा बंद आणि दहावीत एकदम मोठी स्पर्धा अशी विसंगती निर्माण होईल. विद्यार्थ्यांच्या मानसिकतेचा तर विचार कुठेच होत नाही. पुढच्या काळात कदाचित शिक्षकांचेच जबाबदाऱ्यांमधून लक्ष उडण्याची शक्यता आहे. वर्गाचा निकाल हा शिक्षकाच्या कुशलतेवर शिक्कामोर्तब करतो. पण आता विद्यार्थी नापासच होणार नसतील तर शिक्षकांना गांभियनि शिकवण्याची गरज उरणार नाही. नापासा इतके गूण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी काय प्रयत्न होणार आहेत ह्यावर अजूनही विचार झालेला नाही. अशा विचार करण्यायोग्य, बदल घडवण्यायोग्य असंख्य बाबी 'शिक्षण' व्यवस्थेमध्ये आहेत. या सर्वांचा मागोवा घेऊन नवीन शौक्षणिक आराखडा तयार करावा लागेल.

आज शिक्षणाच्या प्रक्रियेतून शिक्षणाचे उद्दिष्टच हरवले आहे. कारण शिक्षण कशासाठी? याचे मुळच आपण आज विसरून चाललो आहोत. शिक्षणामुळे किती जणांना आपले ध्येय गाठता येते? किती जणांना आपले स्वप्न पूर्ण झाल्याचा आनंद मिळतो? शिक्षण मुलांना आनंददायी वाटले पाहिजे. पण तेच आज निरस व बीनकामाचे वाटते आहे. म्हणूनच शिक्षणाचे मूळ ध्येय साध्य होण्यासाठी विचारपूर्वक कृती करण्याची निकडीची वेळ आज झाली आहे.

## भारतातील महिलांवरील अत्याचार व उपाय

**डॉ. अन्सारी एस.जी.,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय,उदगीर जि.लातूर

जगातील एकूण लोकसंख्येच्या अर्धी लोकसंख्या स्त्रियांची आहे. या स्त्रियांच्या अनेक समस्या आहेत. परंतु या समस्यांकडे म्हणावे तसे लक्ष दिले गेले नाही. किंबहुना या समस्या सोडविण्याचा प्रयत्न कुठेतरी अपुरे पडत आहेत म्हणूनच आज स्त्रियांच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. मानव जातीच्या इतिहासाएवढाच स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचा इतिहास प्राचीन आहे. प्रत्येक काळात वेगवेगळ्या स्वरूपात स्त्रियांवर अत्याचार झाले आहेत किंबहुना अत्याचार होत आहेत. हुंडाबळी, सतीप्रथा, बालविवाह, केशवपन अशा कितीतरी स्त्रियांच्या समस्या आहेत. या सर्वांबाबत स्त्री संघटना कार्य करतात तरीसुद्धा स्त्रियांच्या अधिकाराचे हनन मोठ्या प्रमाणात होत आहे. समाजव्यवस्थेत स्त्री उपेक्षितच आहे. ज्यात स्त्री जीवन एक विसंगती व विडंबना आहे. आज स्त्रियांच्या समस्यांच्या संदर्भात सेमिनार, चर्चासत्रे, सभात बौद्धीक सहानुभूती व्यक्त केली जाते. परंतु तिच्या सामाजिक स्थितीला सुधारण्याचा प्रयत्न खूप कमी प्रमाणात केला जातो.

भारतात स्त्री जीवन असुरक्षित, अपमानित आहे. राष्ट्रीय अपराध ब्युरोच्या रिपोर्टनुसार स्पष्ट होते की, भारतात स्त्रियांसोबत प्रत्येक सहा मिनिटाला एक अपराध होतो. प्रत्येक ५४ मिनिटाला बलात्कार, प्रत्येक २६ मिनिटाला छेडछाड, प्रत्येक ४३ मिनिटाला अपहरण, प्रत्येक ९६ मिनिटाला हुंडाबळी इ. एकविसाव्या शतकात होतांना दिसून येतात. असं म्हटलं जातं की कुठलाही व्यक्ती व समाज किती सुसंस्कृत आहे हे त्या समाजात स्त्रियांसोबत केला जाणारा व्यवहार, तिला दिली जाणारी वागणूक यावरुन ठरवले जाते. प्रस्तुत शोधनिबंधात भारतात स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे अध्ययन केले जाणार आहे.

**अध्ययनाचे उद्देश: –**

१. भारतातील महिलांची सामाजिक स्थिती तपासणे.

२. भारतात महिलांवर होणाऱ्या अत्याचाराची सद्य:स्थिती तपासणे.

**संशोधन पद्धती: –** प्रस्तुत संशोधन दुय्यम तथ्य संकलनाच्या आधारे करण्यात आलेले आहे.

भारतात पूर्वी मातृसत्ताक व्यवस्था होती. त्यात स्त्रियांचे स्थान पुरुषांपेक्षा श्रेष्ठ होते असे वि. का. राजवाडे यांनी 'भारतीय विवाहसंस्थेचा उदय' या ग्रंथात स्पष्ट केले आहे. परंतु नंतर हळूहळू निसर्गाने तिच्याकडे दिलेली मातृत्वाची जबाबदारी, आक्रमण, नैसर्गिक आपत्ती, असुरक्षितता आणि लैंगिक हिंसाचार यामुळे स्त्रीला पुरुषाच्या मदतीची गरज भासू लागली आणि सुरक्षिततेच्या भावनेने ती गुलाम झाली. पुढे स्त्रीच्या मातृत्वाला महत्त्व प्राप्त झाले. विवाहसंस्था स्थिर झाली व पुरुषांचे कुटुंबातील वर्चस्व वाढले व स्त्रियांचे स्थान दुय्यम ठरले व पुढे तिच्यावर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाणही वाढले. आज स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारामुळे आमच्या संस्कृतीचा वारसा कलंकीत होत आहे. स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सन १९९२ मध्ये स्त्रियांवरील अत्याचाराची संख्या ८२,१८२ इतकी होती. सन १९९३ मध्ये त्यात वाढ होवून ती ८४,००० झाली. १९९४ मध्ये यात आणखीन वाढ झाली आणि ती संख्या ९८००० झाली. राष्ट्रीय अपराध ब्युरोच्या रिपोर्टनुसार या

अत्याचारात ५० टक्के मुली या दहा वर्षांपेक्षा कमी वयाच्या असतात. मध्यप्रदेशात स्त्री अपराधाचे प्रमाण सर्वात जास्त आहे. उत्तर प्रदेशात हुंडाबळी स्त्रियांचे प्रमाण जास्त आहे. प्रत्येक वर्षी ५०० स्त्रियांचा हुंड्यामुळे बळी जातो. ज्या पुरुषाला स्त्री नऊ महिने आपल्या गर्भात ठेवते व जग दाखवते तोच पुरुष राक्षस बनून स्त्रीला कलंकित करतो. १ जानेवारी २०१४ ते ३१ डिसेंबर २०१९ पर्यंत महिलांवरील अत्याचाराची आकडेवारी 'दैनिक लोकमत'च्या हाती आली. ही आकडेवारी गुन्हा दाखल झालेल्यांची आहे. अशा अनेक घटना आहेत ज्याची नोंदच होत नाही.

**तक्ता क्र.०१**

**भारतातील महिलांवरील अत्याचाराची आकडेवारी (२०१४ ते २०१९)**

| वर्षे | बलात्कार | विनयभंग | छेडछाड | हुंडाबळी |
|---|---|---|---|---|
| २०१४ | ३४३८ | १०००१ | १५७५ | २७९ |
| २०१५ | ४१४४ | ११७१३ | १११९ | २६८ |
| २०१६ | ४१८९ | ११३९६ | ९२४ | २४८ |
| २०१७ | ४३५६ | १२२३८ | ८६४ | २३४ |
| २०१८ | ४९७३ | १४०६६ | ९६० | २१४ |
| २०१९ | ५४१२ | १३६१७ | १०३३ | १८७ |
| **एकूण** | **२६५१२** | **७३,०३१** | **६,४७५** | **१,४३०** |

स्रोत : दै.लोकमत, दि.१० फेब्रुवारी २०२०

वरील तक्ता क्र. ०१ मधील आकडेवारीवरुन असे स्पष्ट होते की, दिवसेंदिवस स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढतच आहे. प्रगती विकासासोबत देशात अमानुषता, पशुताही वाढत आहे. काय आमची शासन व्यवस्था व कायदेव्यवस्था कमजोर आहे. स्त्रियांवर होणारे अत्याचार ती रोखू शकत नाही. या प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे. कशामुळे स्त्रियांवर अत्याचार वाढत आहेत.

**१. समाजातील उपभोक्तावादी संस्कृती** : भारतीय समाजात उपभोक्तावादी संस्कृती वाढत आहे. पाश्चात्य संस्कृतीचा स्वीकार केल्यामुळे स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत आहे. आज स्त्रियांकडे उपभोगी वस्तू म्हणून पाहण्याची प्रवृत्ती वाढत आहे. ज्यामुळे स्त्रियांची पवित्र प्रतिमा धोक्यात आली आहे.

**२. स्त्रियांचे परावलंबन** : भारतीय स्त्री लहानपणापासून वृद्धावस्थेपर्यंत परावलंबी जीवन जगते. अनेक भय, अत्याचार, शोषण या स्थितीत ती राहते. तिच्या आत्मरक्षण व स्वावलंबन यांचा विकास समाज व परिवाराकडून होत नाही. त्यामुळे होणाऱ्या अत्याचाराला सहन करण्यासाठी ती विवश आहे.

**३. मिडीयाद्वारा स्त्री विकृत चित्रण** : स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे मुख्य कारण दूरदर्शन, चित्रपट, विविध चॅनल यात स्त्रीची दाखवली जाणारी प्रतिकृती, तिचे देह प्रदर्शन होय. मिडियामध्ये स्त्री देहाला वस्तू रुपात प्रस्तुत केले जाते. स्त्रियांचे पुरुषासोबत असणारे संबंध, दारु, सिगारेट पिणे इत्यादीमुळे भारतीय संस्कृती कलंकीत होत आहे. स्त्रियांच्या या विकृत प्रस्तुतीकरणामुळे समाजात स्त्रीच्या देहासंबंधी वासना, आकर्षण वाढत आहे. यामुळे सुद्धा स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे.

**४. स्त्रियासंबंधी कायदे व अज्ञान** : स्त्रियांच्या स्थितीत सुधारणा करण्यासाठी त्यांच्यावर होणारे अत्याचार थांबविण्यासाठी संविधान व शासनाद्वारा अनेक कायदे करण्यात आले. सतीप्रथा, बालविवाह, देवदासी, हुंडा प्रथा, बलात्कार, छेडछाड, विनयभंग इत्यादीसंबंधी अनेक कायदे करण्यात आले. महिला आयोगाची स्थापना याच उद्देशासाठी करण्यात आली. परंतु या कायद्याची अंमलबजावणी योग्य पद्धतीने झाली नाही. भारतात न्याय प्रक्रिया अत्यंत मंद असल्याने न्याय लवकर मिळत नाही. भारतात स्त्री निरक्षरता प्रमाण जास्त असल्यामुळे अनेक स्त्रियांना या कायद्यासंबंधी माहिती नाही. ज्या मूठभर स्त्रियांना याची माहिती आहे त्या याचा उपयोग करू इच्छितात त्यांच्या मार्गात भ्रष्टाचार, नोकरशाही, अधिकारशाही अडसर ठरत आहेत.

**५. स्त्री शिक्षण** : भारतात गरीब, निरक्षर स्त्रियांवरच अत्याचार होतात असे नाही तर सुशिक्षित, स्वावलंबी, आत्मनिर्भर स्त्रियांवरही बलात्कार, छेडछाड, अपहरणासारखे अपराध घडतात. उदाहरणार्थ हैद्राबाद येथील डॉ. प्रियंका रेड्डी बलात्कार प्रकरण, हिंगणघाट येथे एका प्राध्यापिकेला एकतर्फी प्रेमातून जाळून मारण्याचे प्रकरण ही याची साक्ष देतात की, स्वावलंबी, आत्मनिर्भर स्त्रियांवरही अत्याचार होतात. वास्तविकता आमच्या शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप अत्यंत अव्यवहारिक आहे. स्त्रीच्या आवश्यकता व समस्यांना केंद्रात ठेवून तसे शिक्षण दिले जात नाही. आमची शिक्षण व्यवस्था स्त्रियांच्यामध्ये आत्मविश्वास, आत्मनिर्भरता, आत्मरक्षा व आत्मसन्मानाचा भाव जागृत करण्यास असमर्थ आहे.

**६. स्त्री संघटन, आंदोलन निरर्थक** : भारतात अनेक स्त्री मुक्ती चळवळी झाल्या. अनेक संघटना अस्तित्वात आल्या परंतु सर्व आंदोलने तथा संस्था, भाषणे, निरर्थक ठरले. या मुक्ती आंदोलनाचे नेतृत्त्व ज्या स्त्रियांच्या हातात आहे त्यांनी मध्यमवर्गीय व सर्वसामान्य स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचारास प्रतिबंध करण्यासाठी कोणतीच भूमिका निभावलेली नाही.

स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराला समाजातील अनेक रुढी, प्रथा, परंपरा तसेच पुरुषी वर्चस्व जबाबदार आहे. तसेच सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात स्त्रियांच्या नेतृत्त्वाचा अभाव इत्यादी कारणांमुळे स्त्रियांवरील अत्याचार वाढत आहेत.

प्रस्तुत अभ्यासातून असे निदर्शनास येते की, भारतात स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. सर्वच स्तरातील स्त्रियांवर अत्याचार होतात. या अत्याचाराला जबाबदार पुरुषी मानसिकता, मिडिया, समाजाचा स्त्रीविषयक दृष्टिकोन, स्त्रियांचे परावलंबन, स्त्री संघटनेचे नेतृत्त्व, स्त्रीसंबंधी कायद्याची अंमलबजावणी व त्यासंबंधीचे अज्ञान, स्त्री शिक्षण हे घटक स्त्री अत्याचारास जबाबदार आहेत.

**उपाय:** – १) समाजाच्या स्त्रीविषक दृष्टिकोनात बदल करणे. २) पुरुषी मानसिकता बदलणे. ३) आत्मरक्षा करण्यासाठी स्त्रियांना कराटे प्रशिक्षण देणे. ४) महिला ठाणे, कौटुंबिक न्यायालयाची जास्तीत जास्त स्थापना करणे. ५) पिडीत स्त्रीला लवकर न्याय मिळवून देणे. ६) बलात्कार करणाऱ्याला कठोर शिक्षा करणे.

**संदर्भ :–**

१ .शर्मा, रमा, एम.के. मिश्रा. २००९. महिला विश्वकोश. दिल्ली : अर्जुन पब्लिशिंग हाऊस
२ .पाटील, लीला. १९९०. भारतीय स्त्री जीवन. पुणे : मेहता प्रकाशन.
३ .दधीच, प्रमिला. २००९. आधुनिक समाज में कार्यशील महिलाएँ. जयपूर : माक्र पब्लिकेशन.
४ .लोकराज्य, मार्च २०१८
५. Domestic Violence Act 2005

# संगीत: मानवी जीवनावस्थेला नवी दिशा देणारा वर्तमानातील एक बहुआयामी विषय

**मुरलीधर हरिश्चंद्र तरारे**, संशोधक विद्यार्थी, ललित कला विभाग, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**सारांश:–** 'संगीत, मानवी जीवनावस्थेच्या प्रत्येक टप्प्यात, माणसाच्या विद्यार्थी जीवनात, व्यावसायिक जीवनात व सेवानिवृत्तीनंतरच्या काळात किती व कसा महत्त्वपूर्ण आहे?' याचा अभ्यास करणे हा प्रस्तुत शोध पत्राचा उद्देश आहे. परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे व बदलत्या काळानुसार व परिस्थितीनुसार स्वत:मध्ये परिवर्तन घडवुन आणणे हे माणसाचे प्रमुख लक्षण. त्यामुळेच काही काळापूर्वी आदिमानवाचे जीवन जगत असलेला माणुस आज एक प्रगत, बुद्धिमान व सर्वात शक्तिशाली जीव म्हणून ओळखल्या जातो. माणसाला जन्मापासुन ते मृत्युपर्यंत जीवनाच्या विविध अवस्थांमधुन जावे लागते ते म्हणजे बालपण, तरूणपण, प्रौढावस्था व वृद्धावस्था. या जीवनावस्थेची कार्यानुसार वर्गवारी केल्यास माणसाचे विद्यार्थी जीवन, व्यावसायिक जीवन व सेवानिवृततीनंतरचे जीवन असे तिन प्रमुख टप्पे पडतात. या प्रत्येक टप्प्यामध्ये ठरवून दिलेले विशिष्ट कर्म करून माणसाला स्व:विकासाकडे वाटचाल करावी लागते. विद्यार्थी जीवनात विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जन करावे व विविध कौशल्ये आत्मसात करावी हे मुख्य उद्देश असते तर व्यावसायिक जीवनात त्याला धनार्जन करून आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करावे लागते. आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात तो निवृत्तीचे जीवन जगत असतो. परंतु या प्रत्येक टप्प्यामध्ये कार्य करत असतांना माणसाला विविध आव्हानांना सामोरे जावे लागते. आज विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात होत असलेल्या प्रगतीमुळे व बदलांमुळे माणसासमोरची ही आव्हाने अधिकच बिकट होत चाललेली आहेत. अशावेळी माणसाने बदलत्या काळानुरूप स्वत:मध्ये परिवर्तन करण्याची आवश्यकता आहे. आपल्या जीवनाला एक नवी दिशा देण्याची आवश्यकता आहे. संगीत कलेचा मानवी जीवनाशी घनिष्ठ संबंध आहे. संगीत एक बहुआयामी विषय आहे ज्यामध्ये मानवी जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची शक्ती आहे. त्यामुळे संगीत हा मानवी जीवनावस्थेला नवी दिशा देणारा वर्तमानातील एक बहुआयामी विषय ठरू शकतो.

**प्रस्तावना:–** मानव पृथ्वीतलावरील सर्वात बुद्धिमान व शक्तिशाली प्राणी. विलक्षण मेंदू व विचार करण्याच्या प्रगाढ क्षमतेच्या जोरावर मानवाने आज जवळजवळ सर्वच क्षेत्रात देदिप्यमान प्रगती केलेली आहे. ॲरिस्टॉटलच्या मते, 'माणसाला सत्य जाणून घेण्याची आणि समजून घेण्याची, नैतिक श्रेष्ठता प्राप्त करण्याची आणि कृतीतून त्यांचे आदर्श जगात प्रस्थापित करण्याची नैसर्गिक इच्छा आणि क्षमता असते'. त्यामुळे सतत नवनवीन शोध लावणे, प्रयोग करणे व शिकत राहणे माणसाला आवडते. याचीच फलश्रुती म्हणजे, आज माणसाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात अविश्वसनीय अशी प्रगती केलेली आहे व तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे इतर सर्वच क्षेत्रांना गतिमानता आलेली आहे व त्यांच्यात आमुलाग्र बदल घडून येत आहेत. परंतु या बदलाला अनुसरून माणसाने स्वत:मध्ये परिवर्तन करत राहण्याची व आवश्यक ती गतिमानता अवलंबण्याची गरज आहे. कारण जेवढ्या झपाट्याने आज जगाचा विकास होत आहे, तेवढेच नवनवीन आव्हानेही मनुष्यासमोर येत आहेत. त्यामुळे मानव विकासाची कास धरतांना, सोबतच, अचानक समोर आलेल्या आव्हानांना धैर्याने व संयमाने तोंड देणारा विद्यार्थी घडविणे, ही आजच्या काळाची खरी गरज आहे. त्यासाठी आवश्यता आहे, विद्यार्थ्यांना केवळ माहिती पुरविणारे ज्ञान न देता, समाजोपयोगी शिक्षण देण्याची व वास्तविक जगाशी प्रत्येक विषय कसा संबंधित आहे हे पटवुन देण्याची. कारण आज प्रत्येक विषय हा केवळ त्याच विषयापुरता मर्यादित राहिला नसून, इतर आंतरविद्याशाखांशीही त्याचा संबंध दिसून येतो.

**१. मानवी जीवनावस्था:–** मानव जीवन पद्धती एका सुरचित व्यवस्थेमध्ये बांधली गेली आहे. बालपण, तरूणपण, प्रौढावस्था व वृद्धावस्था या अवस्थांमधून हळूहळू माणसाची वाढ होत असते व या प्रत्येक अवस्थेमध्ये ठरवून दिलेले विशिष्ट कर्म क्रमाक्रमाने करून माणसाला स्व:विकासाकडे वाटचाल करावी लागते. प्राचीन काळात ही व्यवस्था ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम या चार आश्रमव्यवस्थांमध्ये विभागलेली होती. मनुष्याचा बौद्धिक, शारीरिक, सामाजिक, आत्मिक असा सर्वांगीण विकास होईल हे ध्यानात ठेऊन ही आश्रमव्यवस्था तयार करण्यात आली होती. या आश्रमव्यवस्थेमध्ये व आधुनिक काळातील जीवन व्यवस्थेमध्ये फारसा फरक आढळून येत नाही. आधुनिक मानवी जीवनावस्था ही प्रामुख्याने तिन टप्प्यांमध्ये विभागलेली आहे.

**१.१ विद्यार्थी जीवन –** प्राचीन काळातील ब्रह्मचर्याश्रमाप्रमाणे आजसुद्धा मनुष्याच्या जन्मापासून ते वयाच्या २५ व्या वर्षापर्यंतचा काळ हा 'विद्यार्थी जीवन' म्हणून ओळखल्या जातो. या काळात विद्यार्थ्यांनी ज्ञानार्जन करावे व विविध कौशल्ये आत्मसात करावी हे मुख्य उद्देश असते.

**१.२ व्यावसायिक जीवन –** विद्यार्थी जीवनात मिळविलेल्या ज्ञानाच्या व कौशल्यांच्या जोरावर आपले व्यवसाय उभे करून स्वावलंबी बनने हे या काळातील मानवाचे मुख्य उद्देश असते. सामान्यत: वयाच्या २५ व्या वर्षापासून ६० ते ६५ वर्षापर्यंतचा हा कालावधी असतो. या काळात मनुष्य पूर्णपणे परिपक्व होतो व त्याला आपल्या कुटुंबाच्या, समाजाच्या व देशाच्या जबाबदारींचे व कर्तव्यांचे पालन करावे लागते.

**१.३ सेवानिवृत्तीनंतरचे जीवन –** मानवी जीवन व्यवस्थेतील अंतिम टप्पा म्हणजे वयाच्या ६५ वर्षानंतरचा काळ होय. या काळात मनुष्य ज्येष्ठ नागरीक म्हणून ओळखला जातो व आपल्या व्यावयायिक जीवनातून व अधिकारांतून तो निवृत्ती घेत असतो.

**२. संगीत व संगीताची वैशिष्ट्ये:–** प्राधान्याने, ध्वनिमाध्यमातून इष्ट परिणाम वा कल्पनाबंध साधण्यासाठी स्वर व लय या अंगांनी ध्वनींची हेतुपूर्वक रचना करण्याची कला म्हणजे 'संगीत' होय. संगीताचा संबंध ध्वनीशी आहे व ध्वनी ही एक भौतिक क्रिया असल्यामुळे त्याचा मेंदू, हृदय, व एकंदरीतच संपूर्ण शरीरावर परिणाम दिसून येतो. मानवी संस्कृतीचा अभ्यास करतांना असे लक्षात येते की, जवळजवळ प्रत्येक मानवी संस्कृतीचा विकास हा संगीताच्या विकासासोबतच झालेला आहे. सुमधुर स्वर अथवा नाद जेव्हा कानावर पडतो तेव्हा केवळ मानवच नाही तर पशु पक्षीही याद्वारे मंत्रमुग्ध होत असतात. 'संगीत' ही निसर्गातील सर्वांगसुंदर रचना आहे. ते मनुष्याच्या जन्मापासून ते मृत्येपर्यंत त्याच्या जीवनाशी जोडले गेले आहे. प्रसंग दु:खाचा असो वा आनंदाचा, मनुष्याच्या प्रत्येक क्रियाकलापात संगीताचे अविभाज्य असे स्थान असते. आज आधुनिक तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे संगीत मनुष्याच्या

अगदीच जवळ आलेले आहे आणि संगीताचे क्षेत्र देखील अधिक व्यापक झालेले आहे.

**३. संगीत एक बहुआयामी विषय:—** साधारणत: मनोरंजनाचे खूप मोठे साधन म्हणून संगीताकडे बघितले जाते. परंतु संगीत हे केवळ मानवाच्या मनोरंजनाचे साधन म्हणूनच मर्यादित नसून हा एक बहुआयामी विषय आहे. मानवाच्या कला जीवनाशी संगीताचा दृढ संबंध आहे. भावनांच्या प्रकटीकरणासाठी जिथे शब्द अपूरे पडतात तिथे संगीतच उपयोगी पडते. नाटक, नृत्य, चित्रकला, चित्रपट, कथा, पथनाट्य अशा असंख्य कला, संगीताच्या सहाय्याने सादर केल्या जातात. किंबहुना संगीताशिवाय यांचे प्रभावी सादरीकरणच होऊ शकत नाही. याशिवाय समाजातील अनेक छोट्या—मोठ्या कार्यक्रमांमध्ये (उदा. शालेय सम्मेलनं, राष्ट्रीय कार्यक्रम, लग्नसमारंभ, धार्मिक कार्यक्रम, संगीत जलसे यामध्ये) संगीत प्रामुख्याने असते. पक्षांचा आवाज, वाहता वारा, नदीच्या पाण्याचा खळखळाट, पावसांच्या सरी, मेघांची गर्जना, समुद्राच्या लाटांचा आवाज अशा निसर्गाच्या प्रत्येक गोष्टींमधून क्षणोक्षणी संगीताची अनुभूती होत असते. संपूर्ण सृष्टीतच जणू संगीत दडलेले आहे. संगीत एक कृतिशील व शास्त्रयुक्त असा विषय आहे. त्याचा तत्वज्ञानाशी फार मोठा संबंध आहे. भाषा, विज्ञान, तंत्रज्ञान, भौगोलिक परिस्थिती, संप्रेषण, सौंदर्यशास्त्र, मानसशास्त्र, समाजशास्त्र अशा अनेक विषयांशी संगीताचा सहसंबंध आहे. संगीत या विषयामध्ये बौद्धिक, नैतिक, सौंदर्य, सांस्कृतिक, उपयोजन, वैज्ञानिक, व्यावसायिक अशा विविध मुल्यांचा समावेश होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये सौंदर्यदृष्टि निर्माण करणे, त्यांना सौंदर्यानुभूती देणे व त्यांचा व्यक्तिमत्व विकास घडविण्याच्या दृष्टिने संगीत फार महत्त्वपूर्ण आहे. संगीत स्वत: एक मोठे व्यवयाय क्षेत्र आहे व सोबतच विविध व्यवसायांच्या विकासासाठी व प्रचार प्रसारासाठीही संगीताचा मोठ्या प्रमाणात उपयोग होतो.

**४. मानवी जीवनावस्थेत बहुआयामी संगीताचे महत्त्व:—** बदलत्या काळानुसार व परिस्थितीनुसार स्वत:मध्ये परिवर्तन घडवुन आणणे हे मानवाचे प्रमुख लक्षण आहे. किंबहुना आजच्या स्पर्धात्मक युगात स्वत:चे अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी त्याला स्वत:मध्ये परिवर्तन करणे गरजेचे आहे. त्यासाठी नवनवीन ज्ञानशाखांचा अभ्यास करून मानवी जीवन विकासासाठी त्यांचा वापर करण्याची आवश्यकता आहे. संगीत एक सर्वसमावेशक कला आहे. ते मानवी जीवनाशी तर निगडीत आहेच परंतु विविध विद्याशाखांशीही संबंधित आहे. त्यामुळे संगीताचा अभ्यास हा केवळ मनोरंजनापुरता न करता मानवी जीवनाच्या उत्थानाकरिताही करता येऊ शकतो. मानवी जीवनावस्थेत विद्यार्थी जीवन, व्यावसायिक जीवन व सेवानिवृत्तीनंतरचे जीवन असे तीन टप्पे येतात व या प्रत्येक टप्प्यात संगीतचा वापर करून माणूस आपल्या जीवनाला नवी दिशा प्रदान करू शकतो.

**४.१ विद्यार्थी जीवनात संगीताचे महत्त्व:—** जन्माला येण्याआधीच मनुष्याची शिकण्याची, ज्ञान ग्रहण करण्याची क्रिया सुरू झालेली असते व ती मरेपर्यंत अविरत सुरूच असते. परंतु मनुष्य 'आजन्म' जरी विद्यार्थी असला तरी, शालेय व महाविद्यालयीन जीवन हा मानवी जीवनाचा सुवर्णकाळ असतो. आयुष्याच्या या टप्प्यात तो जे काही शिकतो, समजतो किंवा नैतिक गुण आत्मसात करतो, तेच त्याच्या व्यक्तिमत्व व चारित्र्य निर्मितीमध्ये मुख्य भूमिका निभावतात. विद्यार्थी जीवन हा मानवी जीवनाचा खरा पाया असतो. याच काळात विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, बौधिक, नैतिक असा सर्वांगीण विकास होतो. परंतु विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हा केवळ शैक्षणिक ज्ञानार्जनावरच अवलंबून नसतो तर त्यासाठी संप्रेषण, बुद्धिमत्तेचा सर्जनशील वापर, कल्पनाशक्ती, नेतृत्वगुण, आत्मविश्वास, इ. कौशल्येही आत्मसात करावी लागतात. आजची पिढी संगणक, मोबाईल व इंटरनेट या आधुनिक यंत्रांच्या वापरामुळे सक्रिय जरी दिसत असली तरी, ती संस्कारशुन्य व भावनाशुन्य होत चाललेली आहे, जे समाजाला खालच्या दिशेने घेऊन जात आहे. अशावेळी गरज आहे ती बुद्धिमान, संस्कारी व आदर्श व्यक्तिमत्व असलेला विद्यार्थी घडवण्याची व हे सामर्थ्य संगीत कलेत आहे. आजची पिढी सर्जनशील व जबाबदार झालेली पाहायची असल्यास तिच्यावर संगीताचे संस्कार विद्यार्थी जीवनापासून करणे आवश्यक आहे.

**संगीतामुळे विद्यार्थ्यांच्या श्रवण व भाषा कौशल्यांचा विकास —** शिक्षण प्रक्रियेत श्रवणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे, कारण बहुतांश विषय हे श्रवणाद्वारेच शिकल्या जातात. मुले बोलणे, वाचणे किंवा लिहायला सुरुवात करण्यापूर्वीच आवाज व शब्द ओळखू लागतात. संगीत ही स्वर व लययुक्त अशी श्रावणिक कला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना लहानपणापासून संगीताचे शिक्षण दिल्यास त्यांच्या श्रवण कौशल्याचा विकास करता येतो. संगीत ही वैश्विक भाषा आहे. संगीतातील स्वरांच्या अभ्यासाने भाषा कौशल्याचा विकास करता येतो. संगीतबद्ध गाणी आणि कवितांद्वारे विद्यार्थी सहजपणे व स्पष्ट भाषा बोलण्यास शिकू शकतात.

**संगीतामुळे विद्यार्थ्यांचा बौद्धिक, शारीरिक, मानसिक व भावनिक विकास —** संगीत एक सक्रिय कला आहे ज्यामध्ये गाणी ऐकणे व गाणे, वाद्य वादन करणे, नृत्य करणे यांचा प्रत्यक्ष माणसाच्या बुद्धिशी, शरीराशी, मनाशी व भावनांशी संबंध येतो. जेव्हा व्यक्ती संगीत ऐकतो तेव्हा तो त्यास आपले शरीर हलवून किंवा पायाने ताल धरून त्याला प्रतिसाद देतो व आपल्या भावना व्यक्त करतो. संगीत विद्यार्थ्यांच्या बुद्धीची प्रगल्भता वाढवते. तसेच बौद्धिक दृष्ट्या प्रामाणिक बनवते. संगीतामुळे सूक्ष्म निरीक्षण करण्याची सवय लागते. संगीताच्या अध्ययनातून सृजनशीलता व प्रकटीकरण यांना वाव मिळून विद्यार्थ्यांचा बौद्धिक, शारीरिक, मानसिक व भावनिक विकास होतो.

**संगीतामुळे विद्यार्थ्यांच्या मनाच्या एकाग्रतेत व शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा —** अनेक संगीतज्ञांनी व मानसशास्त्रज्ञांनी संशोधनाअंती असे सिद्ध केले आहे की अभ्यासादरम्यान संगीत ऐकणे किंवा गायन, वादन करणे हे विद्यार्थ्यांच्या एकाग्रतेवर सकारात्मक परिणाम करते व त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेत सुधारणा होते. शाळा महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांचे यश हे त्यांच्या विविध विषयांमधील शैक्षणिक कामगिरीद्वारे मोजले जाते. संगीत विषय हा विज्ञान, गणित, भाषा, सामाजिक विज्ञान इत्यादी बऱ्याच विषयांशी निगडित आहे. हे विषय विद्यार्थ्यांना गायनाच्या रूपात शिकविल्यास विद्यार्थ्यांची या विषयांमध्ये रूची वाढून आपोआपच या विषयांच्या गुणवत्तेतही सुधारणा होईल.

**सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय भावनांचा विकास —** जे विद्यार्थी संगीत शिकतात ते विविध सण, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम व स्पर्धांमध्ये भाग घेतात. त्यामुळे विद्यार्थांना स्वत:च्या सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय भावनांचा विकासा करण्यास मदत होते. संगीताच्या कार्यक्रमात भाग घेतल्याने विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो. आत्मविश्वास वाढवणे ही यशाची किंवा एकंदर व्यक्तिमत्व विकसित करण्याची पहिली पायरी आहे.

**मानसिक तणाव कमी करण्यास मदत –** शालेय परीक्षा, विविध स्पर्धांमध्ये टिकून राहण्याचा दबाव, रोजगार व शिक्षक, पालकांच्या अवांछित अपेक्षांमुळे आज विद्यार्थी तणावाचे जीवन जगत आहेत. त्यामुळे त्यांची मानसिक सहनशक्ती खालावत आहे. संगीताचा अभ्यास विद्यार्थ्यांना विश्रांती आणि तणाव व्यवस्थापनात मदत करू शकते कारण संगीतामध्ये मनावर नियंत्रण ठेवण्याची शक्ती असते.

**४.२ व्यावसायिक जीवनात संगीताचे महत्त्व:–** 'व्यावसायिक जीवन' हा मानवी जीवनावस्थेतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. या टप्प्यात प्रत्येक व्यक्तीला स्वत:चे व स्वत:च्या कुटुंबाचे पालन–पोषण करण्यासाठी कोणताना कोणता व्यवसाय, धंदा किंवा नोकरी करावी लागते. यासाठी त्याला विद्यार्थी जीवनात मिळविलेल्या शिक्षणाची व अनुभवांची मदत होते. परंतु स्वत:च्या पायावर ऊभे होण्यासाठी व स्वावलंबी बनण्यासाठी त्याला शारीरिक, मानसिक व बौद्धिक रित्या सक्षम असावे लागते. निदान आजच्या काळात तरी याची नितांत आवश्यकता आहे. कारण १९ व्या आणि २० व्या शतकात झालेला लोकसंख्येचा विस्फोट व औद्योगिक क्रांतीमुळे अनेक व्यवसायांमध्ये जीवघेणी स्पर्धा सुरू झालेली आहे. आज प्रत्येक क्षेत्रात बरेच पात्र लोक असूनसुद्धा नोकरी मिळवणे किंवा नवीन व्यवसाय ऊभारणे खूप अवघड झाले आहे. परिणामी, दिवसेंदिवस बेरोजगारी वाढत आहे आणि तरूण निराशावादी बनत आहेत. अशावेळी नवीन व्यवसाय शोधण्यापेक्षा आहे त्याच व्यवसायांना नवे रूप देण्याची गरज आहे. संगीत ही एक अशी कला आहे जी सर्व क्षेत्रांशी संबंधित आहे. संगीताचा वापर विविध व्यवसायांमध्ये करुन, एखादा माणूस त्याच्या व्यवसायाला एक नवीन दिशा देऊ शकतो व यशस्वी होऊ शकतो. नवीन व्यावसायिक संधी निर्माण करण्यासाठी संगीताची मदत होऊ शकते.

**संगीत वैज्ञानिकांसाठी –** शास्त्रज्ञांच्या मते विज्ञान आणि संगीताचे घनिष्ठ संबंध आहे. असे बरेच वैज्ञानिक आहेत जे प्रसिद्ध संगीतकारही आहेत. अल्बर्ट आइन्स्टाईन, जे एक प्रसिद्ध भौतिक शास्त्रज्ञ आहेत ते म्हणतात की, 'जर ते एक वैज्ञानिक नसते तर ते एक संगीतकार असते.' कारण ते एक उत्तम पियानो व व्हायोलिन वादक होते. विविध वैज्ञानिक सिद्धांतांची उकल करण्यासाठी त्यांना संगीताची मदत व्हायची. नोबल पुरस्कार विजेता सी.व्ही. रमन हे भारतीय शास्त्रज्ञ 'रमन परिणाम' (प्रकाशाचे मॉलिक्युलर स्कॅचरिंग) या संशोधनासाठी प्रसिद्ध आहेत. ध्वनी उत्पत्तीचे रहस्य जाणून घेण्यासाठी त्यांनी बराच काळ मृदंगम् आणि तबला या वाद्यांचा अभ्यास केला. याचाच उपयोग नंतर त्यांना 'रमन परिणाम' च्या शोधासाठी झाला. संपूर्ण ब्रह्मांड सुक्ष्म अशा ध्वनीने व्याप्त असून रहस्यमय आहे व हे रहस्य उलगडण्याचे काम एक संगीताची जाण असलेला शास्त्रज्ञ उत्तमरित्या करू शकतो. याशिवाय शास्त्रज्ञ बराच काळ प्रयोगशाळेत बंदिस्त राहून विविध संशोधनं करित असतात व त्यामुळे त्यांना मानसिक व शारीरिक थकवा येतो. अशावेळी बरेच शास्त्रज्ञ संगीत ऐकण्यावर भर देतात. कारण यापासून त्यांच्यामध्ये पुन्हा उत्साह येतो, नवचैतन्य निर्माण होते व परत ते जोमाने आपल्या संशोधनाला लागतात. यावरून असे म्हणता येईल की, संगीताचे ज्ञान असलेल्या विद्यार्थ्यांना विज्ञान क्षेत्रात संशोधन करण्यासाठी व आपले करिअर घडवण्यासाठी बराच वाव आहे. .

**संगीत डॉक्टरांसाठी –** 'आरोग्य' हा आपल्या प्रत्येकाच्या जवळचा विषय. त्यामुळे नवनवीन करिअरच्या संधी उपलब्ध असतानाही वैद्यकीय क्षेत्राकडे वळणाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. परंतु आज एक यशस्वी डॉक्टर होऊन समाजात व्यवसाय स्थापन करणे अत्यंत कठिण आहे. याचे कारण असंख्य डॉक्टर अजूनही त्याच पारंपारिक उपचार पद्धतींचा अवलंब करतांना दिसतात. आज मनुष्य जीवन अधिकच धावपळीचे झालेले आहे व त्यामुळे समाजात अनेक नवनवीन आजार पसरत आहेत. लोकांचे केवळ शारीरिकच नाही तर मानसिक आरोग्यही खूप खालावत आहे. अशावेळी केवळ ॲलोपॅथिक आणि आयुर्वेदिक उपचार पुरेसे नाहीत, परंतु त्यांसह उपचारांच्या नवीन पद्धतींचा वापर करणे आवश्यक आहे. संगीत एक उत्तम औषध व चिकित्सा पद्धती आहे, हे शास्त्रज्ञांनी सिद्ध केलेले आहे. तणाव, रक्तदाब, हृदय समस्या, मानसिक विकार व इतर अनेक आजारांच्या निराकरणासाठी संगीत चिकित्सा उपयुक्त ठरत आहे. त्यामुळे संगीत शिक्षण वैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या जीवनात खूप महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

**संगीत शिक्षकांसाठी –** विद्यार्थ्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्व विकास घडवण्यात शिक्षक महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असतात. ते विद्यार्थ्यांना ज्ञानार्जन करण्यास व विविध कौशल्ये आत्मसात करण्यास मदत करतात. अध्यापन ही एक कौशल्यपूर्ण कला आहे. विविध विषयांचे अध्ययन हे विद्यार्थ्यांना कंटाळवाणे न होऊ देता, ते मनोरंजक पद्धतीने शिकविणे यासाठी शिक्षकांना फार परिश्रम करावे लागते. अशावेळी प्रभावशाली व आनंददायी अध्यापन करण्यासाठी शिक्षकाला संगीताच्या माध्यमाचा खूप मोठा फायदा होऊ शकतो. शिक्षकांना अध्यापन करतांना आवाजाच्या समस्या येत असतात. या समस्या संगीताच्या अभ्यासाने दूर करता येतात. याशिवाय संगीत कलेची जाण असलेल्या शिक्षकांना नोकरीच्या निवडीमध्ये सुद्धा प्रथम प्राधान्य मिळते.

**संगीत इंजिनिअरिंग क्षेत्रासाठी –** विज्ञान व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने नवनवीन यंत्र व वास्तु निर्मिती करून लोकांचे जीवन अधिक सुलभ जर कोणी करत असेल तर ते 'इंजिनिअर' आहेत. पूर्वी अभियांत्रिकी क्षेत्र फक्त स्थापत्य व यंत्र अभियांत्रिकी एवढेच मर्यादित होते. परंतु आज हे क्षेत्र खूप व्यापक झालेले आहे. ऑडिओ इंजिनिअरिंग, साऊंड इंजिनिअरिंग यासारख्या अनेक संगीताशी संबंधित विषयांच्या अभ्यासाला या क्षेत्रात खुप वाव मिळत आहे. जर इंजिनिअर हा संगीत शिकलेला असला तर त्याच्या प्रत्येक आविष्कारामध्ये तो संगीताचा उपयोग करून संपूर्ण जगाला संगीतमय करू शकतो. याचे उत्तम उदाहरण म्हणजे वोक्सवॅगनचा एक मजेदार प्रकल्प 'पियानो पायऱ्या'. 'पियानो पायऱ्या' हा एक जिना आहे, ज्यावरून चालतांना संगीत निर्मिती होते. भारतात दरवर्षी सुमारे १.५ दशलक्ष विद्यार्थी इंजिनिअरिंग पास करतात. परंतु धक्कादायक बाब म्हणजे त्यापैकी केवळ ३ टक्के विद्यार्थीच नोकरीसाठी पात्र असतात. त्यामागचे कारण म्हणजे कौशल्य आधारित शिक्षणाचा अभाव व विद्यार्थ्यांची भरमसाठ संख्या. त्यामुळे या क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांनी नाविन्यपूर्ण कौशल्यांचा व पद्धतींचा वापर करायला हवा. अशावेळी संगीताचे शिक्षण अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना आपले करिअर घडविण्यास व नाविन्यपूर्ण संशोधन करण्यास फायदेशीर ठरू शकते.

**संगीत व्यवसायांच्या जाहिरातीसाठी –** व्यवसाय छोटा असो की मोठा, त्याचे यश प्रभावी मार्केटिंग आणि विक्री तंत्रांवर अवलंबून असते. प्रत्येक क्षेत्रात आज स्पर्धा खूप वाढली आहे, त्यामुळे बाजारात टिकून राहण्यासाठी उद्योजकाला आपण इतरांपेक्षा किती चांगले आहोत हे सिद्ध करण्यासाठी उत्तमोत्तम जाहिरात करावी लागते. आजच्या डिजीटल युगात उत्पादनांच्या जाहिरातीसाठी संगीत एक प्रभावी माध्यम म्हणून वापरले जाते. संगीताच्या वापराने उत्पादनाला प्रतिबद्धता, प्रभावी किंमत व नवीन ग्राहक मिळवुन देता

येते. जर उद्योजक संगीत शिकलेला असेल तर तो याचा उपयोग आपल्या उत्पादनांच्या प्रभावी व कौशल्यपूर्ण जाहिरातीसाठी करून आपला व्यवसाय भरभराटीस आणू शकतो.

या व्यतिरिक्त बरेच असे व्यवसाय आहेत ज्यात संगीत महत्त्वाची भूमिका बजावू शकते. संगीत स्वत: एक खूप मोठा व्यवसाय आहे ज्यात एखादी व्यक्ती पैसा, आदर आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवू शकते.

**४.३ सेवानिवृत्तीनंतरच्या काळात संगीताचे महत्त्व:—** सुमारे ३० ते ३५ वर्ष नोकरी किंवा व्यवसाय करून वयाच्या ६० ते ६५ व्या वर्षी व्यक्ती निवृत्तीच्या टप्प्यावर येत असतो. परंतु सेवानिवृत्तीनंतर काय करावे आणि वेळ कसा घालवावा? हा मोठा प्रश्न बहुतेक ज्येष्ठ नागरिकांना पडत असतो. अशावेळी आपला मोकळा वेळ ते आपल्या नात्वंडांसह, कुटुंबातील सदस्यांसह किंवा दूरदर्शन पाहण्यात घालवतात. परंतु हे पुरेसे नसते. वृद्ध व्यक्तींनी सेवानिवृत्तीनंतर त्यांचा वेळ व्यतीत करण्याची योग्य योजना न केल्यास त्यांना निरूत्साही, चिंताग्रस्त व आत्मविश्वासाची कमी वाटायला लागते व त्यांच्या आरोग्याच्या अनेक समस्याही उद्‌भवतात. कारण सेवानिवृत्तीपूर्वी ते सक्रिय जीवन जगलेले असतात व अचानक सर्व काम बंद झाल्याने त्यांना असहज वाटायला लागते. अशावेळी या लोकांसाठी वेळेचा सदुपयोग करण्याच्या दृष्टिने संगीत फायदेशीर ठरू शकते.

**संगीत सेवानिवृत्तीनंतर आर्थिक स्वावलंबनासाठी —** HSBC या संस्थेने केलेल्या सेवानिवृत्त लोकांच्या सर्वेनुसार, १० पैकी ७ भारतीयांना सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या मुलांच्या पाठींब्याची अपेक्षा असते. परंतु त्यांच्या अपेक्षा बऱ्याच वेळा निरर्थक ठरतात व त्यांना पैशाच्या समस्येचा सामना करावा लागतो. अशावेळी ते संगीत शिकलेले असल्यास सांगितीक कार्यक्रम करून किंवा संगीत वर्ग घेऊन स्वावलंबी जीवन जगू शकतात व आपल्या फावल्या वेळाचा सदुपयोग करू शकतात.

**संगीत सेवानिवृत्तीनंतर चांगल्या आरोग्यासाठी —** संगीत हे आरोग्य संरक्षक आहे. सेवानिवृत्तीनंतर वृद्ध व्यक्तींमध्ये चिंता, नैराश्य, अल्झायमर, रक्तदाब, हृदयरोग इत्यादीसारख्या आरोग्याच्या अनेक समस्या उद्‌भवतात. अशावेळी संगीत ऐकणे किंवा प्रत्यक्ष गायन, वादन करणे मानसिक आनंद देते व आरोग्य चांगले ठेवण्यास मदत करते.

**संगीत समाजाशी जोडते —** सेवानिवृत्तीनंतर वृद्ध व्यक्तींना एकाकीपणाची अधिक जाणिव व्हायला लागते व त्यामुळे त्यांच्यात नैराश्य येते.जर वृद्ध व्यक्ती आधी संगीत शिकलेले असल्यास ते समाजातील विविध छोट्या—मोठ्या संगीत कार्यक्रमांमध्ये सहभाग घेऊ शकतात. यामुळे त्यांचा एकटेपणा दूर होतो व वेळेचा सदुपयोग केल्याने मानसिक आनंदही मिळतो.

**निष्कर्ष:—** थोडक्यात, संगीत हा मानवी जीवनाचा अभिन्न अंग आहे. संगीतामुळे विचारांची सकारात्मकता वाढते, बुद्धीला परिपक्वता येते व माणसाला उत्तम जीवन जगण्यास प्रोत्साहन मिळते. माणसाचे विद्यार्थी जीवन असो, व्यावसायिक जीवन असो किंवा आयुष्यातील कोणताही टप्पा असो संगीताचा उपयोग माणसाला होतच असतो. परंतु यासाठी प्रत्येकाने संगीत शिकण्याची आवश्यकता आहे. संगीत शिकायला वयाचे कोणतेही बंधन नाही. पण खरं तर शालेय जीवनातच विद्यार्थ्यांनी संगीत शिकावं असा प्रत्येकाने आग्रह धरायला हवा. जेणेकरून विद्यार्थी जीवनातच त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वाचा विकास साधता येईल व आयुष्यभर त्यांना संगीत कलेची साथ मिळेल. परंतु सद्यपरिस्थितीस संगीत शिक्षणाविषयी विद्यार्थ्यांमध्ये उदासिनता दिसून येत आहे. शाळेमध्ये सुद्धा संगीत शिक्षणाचे महत्त्व कमी व्हायला लागले आहे. याचे मुख्य कारण म्हणजे संगीत कलेविषयी व संगीताच्या मानवी जीवनातील महत्त्वाविषयी विद्यार्थी व पालक यांना पुरेशी माहिती नसणे हे आहे. 'A survey on music's impact in public spaces' या सर्वेक्षणानुसार, सरासरी, १० पैकी ७ पेक्षा जास्त लोक संगीताला केवळ करमणुकीचे साधन एवढच समजतात व त्याचा वापर करतात. म्हणजेच संगीताच्या व्यापकतेचा फारसा उपयोग कुणी करतांना दिसत नाही. त्यामुळे आता वेळ आहे संगीताबद्दलची आपली धारणा बदलण्याची व संगीताला मानवी जीवनाच्या सर्वच क्षेत्रांशी जोडण्याची. प्रत्येक व्यक्तीला संगीताच्या महत्त्वाबद्दल जागरूक करून त्यांना संगीत शिकण्यास प्रोत्साहित करण्याची. कारण संगीत कला नव्हे फक्त मनोरंजनाची, तर उत्कृष्ट जीवन जगण्याची. वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी म्हटलेच आहे, ''एक तरी अंगी असू दे कला, नाहीतर काय फुका जन्मला!''

**संदर्भ ग्रंथसूची** :


१. डॉ. सौ. अलोणी, अर्चना.(२००७) संगीत अध्यापन पद्धती, विद्या प्रकाशन
२. देशपांडे, पु.ल. संगीताचं शिक्षण, संगीत कला विहार, ( जून २००६)
३. त्विारी, किरण. संगीत एवं मनोविज्ञान, कनिष्क पब्लिशर्स
४. तडवी, उत्तरा. महाविद्यालयीन शिक्षणामध्ये संगीताची सद्य:स्थिती आणि भावी प्रगतीच्या दिशा संगीत कला विहार, ( फेब. २०१३)
५. कांगुणे, एस, व्ही. मुलांना सर्जनशील बनवा, शिक्षण संक्रमण (ऑगष्ट २०१३)
६. करंदीकर, सुरेश. (२००८) शैक्षणिक मानसशास्त्र, फडके प्रकाशन

# सांप्रदायिक हिंसाचार : एक अध्ययन

**प्रा. डॉ. जयमाला लाडे**, मिलिंद महाविद्यालय, मुळावा. jaymalalade22@gmail.com

सामाजिक विविधता हे भारतीय समाजाचे एक वैशिष्टय आहे. भारतात भिन्न–भिन्न संप्रदाय, धर्म, जाती, जमाती, व्यवसाय व भाषा बोलणारे लोक राहतात. या विविधतेतही एकता आहे असे म्हटल्याजाते. पण हयात किती सत्यता आहे व वस्तुस्थिती काय दर्शविते? हे पाहणे सुद्धा महत्त्वाचे आहे.

आज छोट्या–छोट्या क्षुल्लक कारणावरून भारताच्या कानाकोपऱ्यात जातीय उद्रेक होतांना दिसून येते तर कुठे धार्मिक भावना दुखविणाऱ्या घटना घडतात. त्यामुळे सामाजिक ताणतणाव निर्माण होतात. परिणामी सांप्रदायिक हिंसाचार होतांना दिसून येतो. या वाढत्या हिंसाचारामुळे एकुणच सामाजिक स्वास्थ्य, सामाजिक सुरक्षितता धोक्यात आलेली आहे. आता तर भारताचे चित्र असे दिसुन येते की, सांप्रदायिक हिंसाचार हा भारतीय समाजाचा अविभाज्य भाग बनला आहे. कधी सवर्ण–सवर्णेत्तर, कधी हिंदु–मुस्लिम, तर कधी हिंदु–शिख हयांच्यात संघर्षातमक आंतरक्रिया दिसुन येतात.

सध्या भारतात CAA (सिटीझनशिप अमेंन्डमेंट अॅक्ट) NRC (नॅशनल रजिष्ट्रेशन ऑफ सिटीझन) तसेच कोरोना वायरस–कोव्हिड १९ ह्या सर्व घटकांमुळे एका देशाची परिस्थिती फार चिंताजनक झालेली आहे. ह्या सर्व घटकांमुळे राष्ट्राची सामाजिक, आर्थिक, राजकीय व महत्त्वाचे म्हणजे आरोग्य व्यवस्था व व्यक्ती प्रभावित झाले आहेत. ह्या सर्व ठिकाणी प्रस्तुत करण्याचे कारण हे आहे की, वरील घटकांबरोबरच सांप्रदायिक हिंसेचे प्रमाण वाढलेले आहेत. उदा. CAA च्या विरोधात दिल्ली येथे शाहिन बाग मध्ये जवळपास ६० दिवसांपेक्षा जास्ती दिवस महिला छोट्या मुलांना घेवून तसेच पुरूष ह्याविरूद्ध आंदोलन करित होते. CAA हे पुर्णत: मुस्लिमांच्या विरोधात असा विचार करणारे तसेच CAA चा विरोध करणारे हे हिंदु राष्ट्रवादाच्या विरोधात आहे असे वातावरण निर्माण होवून हिंदु–मुस्लिमांमध्ये तणावाची स्थिती निर्माण झाली होती. त्याचप्रमाणे दिल्ली येथील तबलिगी जमात एका मरगज मध्ये अधिवेशनासाठी जमा झाले होते त्यावेळेस देशात लॉकडाऊन होते. कारोनाचा देशात संसर्ग होत असतांना ही तबलिगी जमातीचे हजारो आणि विविध देशातून लोक एकत्रित आले होते हे अधिवेशन संपल्यानंतर आपआपल्या देशात किंवा घरी पोहचले. त्याचा परिणाम असा झाला की भारतात काही लोक मुस्लिम लोकांचा व्देष करू लागले, त्यांच्याबद्दल अफवा पसरू लागल्या की भाजी व फळ विक्रेत्यांकडून काही खरेदी करू नका तसेच आधार कार्ड दाखवा, भगवे झेंडे भाजीच्या गाडीवर लावा एवढेच नाही तर एका मुस्लिम भाजी विक्रेत्यांनी आपले स्वत:चे नाव दुसरे सांगत होता. यावरून एवढे म्हणता येईल की CAA व CORONA कोव्हीड–१९ सारख्या प्रश्न असुन सुद्धा हा प्रश्न वेगळाच राहतो आणि जमात वाद निर्माण झालेला दिसुन एकीकडे ह्या परिस्थितीत संपुर्ण राष्ट्र एक होवून प्रश्न सोडवायचा आहे तर याउलट ह्या आणिबाणीत राष्ट्रीय एकात्मतेलाच तडे जात आहेत. म्हणुनच समाजशास्त्राच्या दृष्टीने सांप्रदायिक हिंसाचाराचा अभ्यास करणे गरजेचे आहे. एकुणच मानवी समाजाला विनाशाकडे नेणाऱ्या समस्येचा अभ्यास करणे आज समाजशास्त्रज्ञ, मानसशास्त्रज्ञ, राज्यकर्ते, पोलीस प्रशासन ह्यांना गरजेचे वाटते आहे.

**सांप्रदायिक हिंसाचार :–** वर्तमान पत्रातील बातम्या किंवा वृत्त्वाहिन्या वरील बातम्या पाहिल्या तर कोणत्याही दोन भिन्न जात, धर्म, पंथ ह्यांच्यात संघर्ष झाला तर हिंसाचार घडला असे आपण म्हणत असतो. वास्तविक पाहता सवर्ण–दलित ह्यांच्यात संघर्ष हा जातीय संघर्ष असतो. जेंव्हा शिया व सुन्नी हयांच्यात संघर्ष असतो तो पंथिय असतो. हिंदु–मुसलमान हयांच्यात जेंव्हा दंगली होतात तेंव्हा त्या धार्मिक दंगली असतात जेंव्हा हाच संघर्ष गोरे आणि काळे हयांच्यात असतो ते वांशिक संघर्ष असते. भारतात वांशिक संघर्ष वगळता इतर संघर्ष होतात. हया सर्व संघर्षांना मिळुन इंग्रजीमध्ये Comunial Voilence असे म्हणतात. मात्र अनेक अभ्यासकांमध्ये एकवाक्यता दिसून येत नाही. की हया संघर्षाला सामुदायिक हिंसाचार, जातीय हिंसाचार की सांप्रदायिक हिंसाचार म्हणावे? असा प्रश्न निर्माण होतो.

**जातीयवादाची संकल्पना :–** भारतीय समाजात चार हजारापेक्षा अधिक जाती आहेत. विविध धर्म, पंथ व जमातीची संख्या पण लक्षणीय आहे. हयातील प्रत्येक जात, धर्म एक समुह म्हणुन विचारात घेतला तर यातील समुहाची भाषा, पोषाख, आहार, व्यवसाय किंवा एकुणच संस्कृती भिन्न–भिन्न आहे. स्वसमुह श्रेष्ठता वादाचे अस्त्वि आहे. भारतीय समाज हा राजकीय दृष्टीने एकसंघ वाटत असला तरी येथील प्रत्येक जात, जमात, धर्म हा सर्व बाबतीत स्वतंत्र आहे. हे आपले आणि हे त्यांचे असे अनेक बाबतीत दिसुन येते. म्हणजे एक समुदाय दुसऱ्या समुदायाचा तिरस्कार, व्देष आणि त्याचवेळी आपल्या समुदायातील सदस्यांच्या हितसंबंधाचे रक्षण, संवर्धन करीत असतो. आपल्याच समुदायाच्या सदस्यांना शाळा–महाविद्यालयात प्रवेश देणे, कर्ज मंजुर करणे, रोजगाराच्या संधी देणे, कंत्राटे देणे, आर्थिक लाभाचे पद देणे, त्यांचा सत्कार समारंभ करणे हे एकीकडे असते तर दुसरीकडे दुसऱ्या सदस्यांना प्रवेश नाकारणे, कर्ज नाकारणे, भाडयाने घर न देणे, अपमानास्पद वागणुक देणे, आर्थिक नुकसान करणे म्हणुनच जातीयवादाचा अर्थ सांगतांना असे म्हणता येईल की, 'जेंव्हा एखादा समुदाय आपल्या सदस्यांच्या हितसंबंधाचे रक्षण आणि संवर्धन करतो व त्याचवेळी दुसऱ्याच्या धर्माच्या सदस्याच्या विरोधात व्देष, तिरस्कार, असहकार्याची, विरोधाची भुमिका घेतो तेंव्हा त्याला जातीयवाद' असे म्हणतात. असा जातीयवाद आपल्याला समाजात दिसुन येतो. जसे निवडणुकीच्या वेळेस जात व धर्म हयावर मत मागतांना दिसून येतो. भारतीय समाजाचे असे कोणतेही क्षेत्र नाही की जिथे जातीयवादाचे पालन केले जात नाही.

**भारतातील जातीयवाद :–** भारत हा विविधतेनी नटलेला देश आहे. भारतातील एकुण लोकसंख्येपैकी हिंदूची अधिक लोकसंख्या आहे. एकुण लोकसंख्येपैकी ८२.६३ टक्के हिंदुची लोकसंख्या आहे. तर ११.३६ टक्के मुसलमानांची आहेत्र त्याखाली ख्रिश्चन २.४ टक्के, शिख १.९६ टक्के, बौद्ध ०.७१ टक्के, जैन ०.४८ टक्के इतके आहेत. तसेच या धर्मात अनेक पंथ ही आहेत. तसेच धर्माच्या आधारावर अनेक जाती निर्माण झालेल्या आहेत. आणि हया जाती–जातीत भेदभाव दिसून येतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात जातीच दंगल घडतांना दिसून येतात. विशेषत: सवर्ण–दलितांमध्ये असे अनेक उदाहरणे सांगता येतील.

**सांप्रदायिकता :–** भारतात सांप्रदायिकतेबद्दल वाढत असलेली भावना ही धार्मिक अल्पसंख्याकांमध्ये व विविध गटात असुरक्षितेची भावना निर्माण करतांना दिसत आहे. विशेष करून ही भिती शिख व मुसलमानांमध्ये निर्माण झालेली दिसून येते. भारतीय संविधानात संपुर्ण न्याय, सहिष्णुता, समानता आणि स्वतंत्रता यासारख्या तरतुदी करून धार्मिक अल्पसंख्यांकाना संरक्षण देण्याचे काम केले आहे. परंतु आजच्या काळात धार्मिक रूढीवाद, धर्मान्धता, असहिष्णुता फार फोफावलेली आहे. जसे गैरहिंदुना असे वाटते की 'रामराज्य' म्हणजे भगवान रामाचे राज्य अर्थात हिंदु राज्य तसेच आतंकवादावर लक्ष ठेवण्यासाठी आणि धार्मिक स्थळी लपुन राहणे थांबण्यासाठी पोलीस जर एखाद्या धार्मिक स्थळी जसे गुरूव्दारा, मंदिर, मस्जिद हया ठिकाणी पाहरा करण्याकरीता असतील तर ते धार्मिक क्षेत्रात हस्तक्षेप मानला जातो. उदा. १९८५ मध्ये श्रीनगर तसेच १९९३ मध्ये श्रीनगर येथेच पोलीसांचा हस्तक्षेप धार्मिक क्षेत्रात हस्तक्षेप मानला गेला होता.

म्हणुनच राष्ट्राची शांती व एकतेची क्षति थांबविण्याकरीता सांप्रदायिकता आणि सांप्रदायिक हिंसेच्या समस्येची विश्लेषण आणि अभ्यास करणे आवश्यक आहे. सांप्रदायिकता म्हणजे काय हे पाहणे गरजेचे आहे. आणि सांप्रदायिक कोण आहे हे माहित करून घेणे गरजेचे आहे. सांप्रदायिकता एक विचारधारा आहे असे मानू शकतो आणि हि विचाराधारा हे सांगते की, समाज धार्मिक समुहात विभागलेला आहे. ज्यांचे हित परस्परविरोधी असतात. एका समुदायाचे सदस्य दुसऱ्या समुदायाच्या विचारसरणी आणि धर्माला विरोध करतात त्याला सांप्रदायिकता असे म्हणतात. हा विरोध एखाद्या समुदायावर खोटे आरोप लावणे, नुकसान करणे, जाणुनबुजुन अपमान करणे, लुटणे, असहाय आणि दुबळे व्यक्तिंच्या घराला व दुकानाला आग लावणे, स्त्रियांना अपमानित करणे तसेच स्त्री–पुरूषांना मारून टाकणे हयासारख्या विभीत्स स्वरूप सांप्रदायिकतेचे असते.

सांप्रदायिकता वेगवेगळया प्रकारची असू शकते. उदा. राजकीय सांप्रदायिकता, धार्मिक सांप्रदायिकता, आणि आर्थिक सांप्रदायिकता. डी. के. उमन हयांनी सांप्रदायिकतेचे सहा भाग सांगिते आहे. जसे आत्मसातीकरण, कल्याणकरी, पलायनवादी, प्रतिशोधवादी, (आक्रमणवादी) अलगाववादी (अलिप्ततावादी), विभक्त्वादी इत्यादी.

**भारतातील सांप्रदायिकता :–** भारत हा एक बहुवादी समाज आहे. भारतात केवळ धार्मिक समुहच नाहीत तर धर्म सुद्धा अनेक सांप्रदायात विभागले गेले आहे. हिंदु अनेक संप्रदायात विभागले आहेत. जसे आर्य, शैव, सनातनी आणि वैष्णव इत्यादी. तसेच मुसलमान शिया आणि सुन्नी तसेच मुस्लीमांमध्ये तबलिगी जमात ने १९२६ मध्ये मौलाना मुहम्मद इल्याज कांदावली हयांनी स्थापना केली. मुसलमानांमध्ये आणखी अशरफ (कुलीन), अजलफ (जुलाहे, कसाई, खाती, तेली) आणि अरजल असे छोटया–छोटया समूहात विभागणी झालेली दिसून येते. अनेक वर्षापासुन हिंदु आणि मुसलमान हयांच्यातील संबंध तणावपुर्ण आहेत. हिंदु आणि शिख हयांच्यातपण विशेषकरून १९८४ ते १९९० मध्ये तणावपुर्ण संबंध होते. तसेच दक्षिण भारतात हिंदु आणि ख्रिश्चन हयांच्यात पण संघर्षमय संबंध दिसुन येतात. हिंदु आणि मुसलमान हयांच्यातील खुप जुने राजकीय संघर्ष दिसून येतात. हे संघर्ष इंग्रजी शासनाच्या काळापासुनच दिसुन येते. परंतु आज या संघर्षामुळे सामाजिक आणि राजकीय तणाव निर्माण होतो. आता ही एक अशी समस्या आहे ज्यामुळे देशाच्या विकासाच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण होतो. परंतु आपल्या देशाचे संविधान जे धर्मनिरपेक्ष या मुल तत्वावर आधारलेला आहे त्या मुलतत्वालाच या सांप्रदायिकतेमुळे सर्वात मोठा धोका निर्माण झाला आहे. सांप्रदायिक स्वार्थ हा सांप्रदायिक व्देषाला भडकविण्याचे काम करतो. म्हणुनच सांप्रदायिकतेचा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून करणे आवश्यक आहे.

**सांप्रदायिक हिंसा :–** सांप्रदायिक हिंसाचार ही संकल्पना, दंगल, विद्यार्थ्यांचे आंदोलने, कामगारांचे आंदोलने, कामगारांचा संप, शेतकऱ्यांचे आंदोलन हयापेक्षा भिन्न आहे. सांप्रदायिक हिंसा ही आंदोलन आणि आतंकवाद यापेक्षा भिन्न आहे. सांप्रदायिक हिंसा हि आंदोलने आणि आतंकवाद यापेक्षा भिन्न आहे. सांप्रदायिक हिंसेच एक समुह दुसऱ्या समुहाच्या विरोधी एकत्रीत येतात हयामध्ये एक भावनात्मक व्देष/राग असतो त्यामुळे समाजात दंगे होऊ शकतात. सांप्रदायिक हिंसाचाराच्या मुळाशी दुसऱ्या संप्रदायातील सदस्यांचा व्देष करणे, त्यांचा सुड घेणे व त्यांना शत्रु समजुन त्यांच्याशी शत्रु सारखे वर्तन करणे हा उद्देश असतो.

सांप्रदायिक हिंसाचार स्पष्ट होण्यासाठी सांप्रदायिक पूर्वग्रह व सांप्रदायिक संघर्ष समजुन घ्यावे लागते. हयादोन्ही संकल्पना परस्परांशी निगडीत असुन एकीतुन दुसरी समस्या उद्भवते. पूर्वग्रह म्हणजे अशी अभिवृत्ती होय की जी व्यक्तीला दुसऱ्या समुहाच्या किंवा सदस्यांच्या विरोधात विचार आणि कृती करायला भाग पाडते. पूर्वग्रहाचे परिणाम व्यक्तीच्या पाच प्रकारच्या वर्तनातून स्पष्ट होतात. जसे दुसऱ्या संप्रदायाबद्ल, सदस्याबद्दल वाईट बोलणे, अपशब्द बोलणे, त्यांना टाळणे, भेदभाव करणे, शारीरिक हल्ला करणे, दुसऱ्या संप्रदायाचे उच्चाटन करणे.

त्याप्रमाणे जेंव्हा मर्यादीत उद्दिष्टाच्या प्राप्तीसाठी म्हणजेच राजकीय सत्ता मिळविणे, शासकीय नोकऱ्या, सामाजिक दर्जासाठी समुहात अतिरेकी स्पर्धा होते तेंव्हा संघर्ष निर्माण होतो. जेंव्हा परस्पर विरोधी हितसंबंध जपण्याचा प्रयत्न होतो तेंव्हा पण संघर्ष निर्माण होतो. उदा. भारतात आजच्या घडीला असे चित्र निर्माण झालेले दिसून येते. जसे लव्हजिहाद, गायीचे मांस खाल्याच्या केवळ संशयावरून मुस्लिमांची हत्या तसेच दलितांना गाय विकायला नेली म्हणुन (कत्तलखाना) म्हणुन उत्तरप्रदेश मध्ये दलिताला मारहाण झाल्याचे दिसुन येते. श्रीराम सेनेचे उद्वेगाचे उदाहरण आपल्याला हेच दाखवुन देते की, पुर्वग्रहातुन संघर्ष व त्यातुन विरोधी संप्रदायात झालेली हिंसा हिच सांप्रदायीक हिंसा होय.

सांप्रदायिक हिंसाचार हे केवळ हिंदु व मुसलमान यांच्या पुरतेच मर्यादीत नाहीत अति धार्मिक कडवेपणातुन मुसलमानात सुद्धा शिया–सुन्नी हयांमध्ये संघर्ष दिसुन येतो. तसेच ग्रामीण समाजात जातीय हिंसाचाराच्या सवर्ण–दलित मध्ये घटना घतात.

**सांप्रदायिक हिंसेची कारणे :– ऐतिहासिक कारण** :– वर्तमान सांप्रदायिक हिंसाचाराची मुळे ही खऱ्या अर्थाने मध्ययुगीन इतिहासात आहेत. इ.स. १२०६ पासुन अनेक मुस्लिम राज्यकर्त्यांनी भारतावर राज्य केले. औरंगजेबाच्या काळात अत्याचार वाढले होते. मुस्लिमांना खुष करण्यासाठी १९०५ मध्ये बंगालची फाळणी झाली. १९२५ नंतरचा इतिहास हा हिंदु मुसलमानात निर्माण झालेला संशयी संबंधाचा इतिहास आहे. भारताची फाळणी होवून पाकिस्तानची निर्मिती झाली. १९९३ मध्ये मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोट मालिका व त्यातील संशयित आरोपी मुसलमान होते. अजुनही या दोन्ही संप्रदायात परस्पराबद्दल अविश्वासाचे संशयाचे व पूर्वग्रह दुषित असे संबंध आहेत. त्याचा परिणाम म्हणजे कोणतेही निमित्त हिंसाचाराला चालना देते.

**मानसिक–सामाजिक कारणे** :– परस्पराबद्दल संशय, अविश्वास, पुर्वग्रह, साचेबंद अभिवृत्ती, दुसऱ्या संप्रदायाबद्दल मत्सर किंवा व्देष भावना, अफवा, भिती इत्यादी मानसिक घटक तसेच सत्ताहिनतेची व दौर्बल्याची जाणिव आणि मिळणारी असमानतेची वागणुक हया सारख्या सामाजिक घटकांतुन सांप्रदायिक दंगे/हिंसा होतात. जसे आता सध्या भारतात कोरोना वायरस (Covid-19) मुळे संसर्गाचा प्रभाव आहे. अशा परिस्थितीत भारत सरकारने लॉकाडऊन चा निर्णय घेतला. लॉकडाऊन म्हणजे जे जिथे आहेत ते तिथेच थांबतिल म्हणजेच कुणिही, राष्ट्राच्या, राज्याच्या, जिल्हयाच्या, गावाच्या सिमा ओलांडुन जाणार नाही. परंतु तबलिगी जमातींनी (मुस्लिम) हजारोंच्या ५ ते १० हजारावर संख्येत लोक एकत्रित आलेले होते आणि लॉकडाऊन असतांना सुद्धा देश–विदेशात विखुरले त्याचा परिणाम असा झाला की दिल्लीत व देशात कोरोना संशयितांची संख्या वाढली त्याचा राग म्हणुन भाजी–फळ विक्रेत्यांकडून हिंदु खरेदी करीत नव्हते. काही ठिकाणी असेही दिसुन आले की, मुस्लिम भाजीविक्रेत्यांनी आपले नाव संजय असे सांगितले तर काही ठिकाणी ग्राहक आधार कार्ड मागू लागलेत. एकढेच नाही तर हया लॉकडाऊनच्या काळात एका व्यक्तीने (५१ वर्षाचा) २३ एप्रील २०२० मुंबईत एका मुस्लिम तरूणाने घरपोच किराणा आणुन दिला तो त्यांनी नाकारला. त्या व्यक्तीला पोलीसांनी अटक पण केली. परंतु ही मानसिकता कोणत्या थराला पोहचविते हे त्याचे उदाहरण म्हणता येईल.

**धार्मिक कारणे** :– स्वातंत्र्यपुर्व काळातील दंगली हया धार्मिक कारणास्त्व झाालेल्या आहेत. देवी–देवतांची विटंबणा करणे, मिरवणुकीवर दगडफेक करणे इत्यादीवरून दंगली झाल्या आहेत. धर्म सांप्रदायिकता हिंसेचे एक महत्त्वपुर्ण कारण आहे.

**राजकीय कारणे** :– धार्मिक कारणामुळे जशा दंगली होतात त्याप्रमाणे राजकीय कारणामुळे हिंसाचार उसळते हे ही तेवढेच खरे आहे. अजहर अली इंजिनिअर यांच्या मते फाळणीपुर्व काळात हिंदु आणि मुस्लिम श्रेष्ठीजनात राष्ट्रीय पातळीवर राजकीय सत्ता मिळविणे तसेच आर्थिक साधन संपत्तीचे नियंत्रण यावरून झालेले कलह हे सांप्रदायिक संघर्षाचे कारण आहे.

धर्मनिष्ठीत राजकारण, धर्माच्या नावावर चालविल्या जातणाऱ्या संघटना, देवाच्या नावाने निघणाऱ्या रथयात्रा धर्म, पंथ जातीच्या नावाने निवडणुकीत मागितली जाणारी मते, संकुचित राजकीय नेतृत्व, हिंसाचाराचे समर्थन, मुसलमानांकडून केल्या जाणाऱ्या मागण्या, राखीव जागा व इतर सवलती या राष्ट्रीय एकात्मतेला बाधा आणणाऱ्या आहेत असे हिंदुना वाटते म्हणुन त्याला ते विरोध करतात.

साहिल हुसेन यांच्या मते, आपला धर्म व समुदाय यावरील पकड कायम राहावी म्हणुन काही राजकीय पक्षाचे सांप्रदायिक हिंसाचारातील हितसंबंध विकसीत झाले की काय असे वाटते. तर मोहम्मद सिद्‌दीकी म्हणतात, सांप्रदायिक हिंसाचार हे राजकारणीय करतात. हिंदु मुसलमान यांच्यात लढा नसता तर हे राजकारणी बेकार राहिले असते. उत्तर भारतातील लखनौं इदगाहाचे इमाम असे म्हणतात की, प्रत्येक राजकारणी धर्मनिरपेक्षेबद्दल बोलतो, व्यासपिठावर ते एक बोलतात व प्रत्यक्षात उलटी कृती करतात. राजकारण्यांनी काही दिलेच असेल तर ते सांप्रदायिक तणावच होय. सांप्रदायिक हिंसाचाराच्या आगित आपली राजकीय पोळी भाजुन घेण्याची राजकीय स्वार्थी वृत्ती हे एक सांप्रदायिक तणावच होय.

**आर्थिक कारणे** :– स्वातंत्र्योत्तर काळात भारतात विशेषत: अलिगढ, जमशेटपूर, अलाहाबाद, मालेगांव, भिवंडी, मिरज इत्यादी ठिकाणी झालेल्या हिंसाचाराच्या अभ्यासात आर्थिक कारणही महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट झाले आहे. तसेच खाडी आणि इतर देशातुन मुस्लिम बांधवांना पैशाचा प्रवाह येतो. तसेच भारतीय मुसलमान अधिक पैसा कमविण्यासाठी आखातात जातात. त्यापैशाचा वापर मदरसा, मस्जिद तसेच इतर संस्था चालविण्यासाठी केला जातो. हयामुळे गैरसमज निर्माण होतात. मुस्लिम हा पैसा कट्टरता वाढविण्यासाठी उपयोगात आणतात.

**आंतरराष्ट्रीय कारणे** :– पाकिस्तान आणि भारत हयांच्यामध्ये सतत तणावाचे किंवा शत्रुत्वाचे संबंध असल्याचे दिसुन येते. पाकिस्तानातील मुस्लिम शासक नेहमीच भारताला अस्थिर करणाऱ्या कारवाया करीत असतात. तसेच आतंकवादाला प्रोत्साहन देतात. त्यामुळे भारतात हिंदु–शिख, हिंदु–मुस्लिम, हयांच्यात सांप्रदायिक दंगे होतांना दिसून येतात. भारतात हिंदुंना वाटते की, मुस्लिम कट्टरतावादी आहेत. त्यामुळे एकमेकांच्या विरूद्ध धार्मिक व्देष भावना वाढते. त्याचे कारण ही असे आहे की, अयोध्यात राम–जन्मभुमी, बाबरी मस्जिद विवाद, मथुरेत कृष्ण जन्मभूमि–मस्जिद वाद, वाराणसीतील काशी विश्वनाथ मंदिर–मस्जीद विवाद हया सारख्या प्रश्नातुन सांप्रदायिकता वाढते.

प्रसारमाध्यमांमुळे सुद्धा कधी कधी सांप्रदायिक तणाव वाढले जातात. वर्तमानपत्रात सुद्धा अफवा पसरविणाऱ्या बातम्या असतात. आज तर सामाजिक माध्यमांमुळे (इंटरनेट, व्हॉट्स ॲप, फेसबुक, टि. व्ही. चॅनल्स) अफवा तर गतीने पसरतात म्हणजे अफवा आगीत तेल टाकण्याचे काम करतात. १९६९ मध्ये अहमदाबादच्या दंग्यात 'सेवक' या वृत्तपत्रात खोटी बातम्या छापल्या गेल्यामुळे हिंदु–मुस्लिमांच्या भावना दुखावल्या गेल्या होत्या.

सांप्रदायिकता निर्माण होण्यास आणखी महत्त्वाचे कारण म्हणजे मुस्लिम पर्सनल लॉ सर्वोच्च न्यायालयानी शहाबानो प्रकरणात दिलेला निकाल तसेच 'तिन तलाक' कायदा हयामुळे मुस्लिमांना असे वाटते की, वैयक्तिक कायद्यात दखलअंदाजी होत आहे. भारत सरकार आता 'समान नागरी कायदा' लागू करण्याच्या प्रयत्नात आहे. त्याचप्रमाणे मुसलमानांव्दारा कुटुंब नियोजन सारख्या उपायांचा तसेच बहुपत्नी विवाह प्रथेचा पालन केल्यामुळे हिंदुपेक्षा मुस्लिमांची भारतात अधिक लोकसंख्या वाढेल अशी भिती हिंदुमध्ये निर्माण होते. १९८२ मध्ये विश्व हिंदु परिषदेनी पुणे आणि सोलापूर याठिकाणी वरील विषयावर पत्रके वाटले. हयावरून असे दिसुन येते की, कशाप्रकारे राजकीय, आर्थिक, सामाजिक, धार्मिक आणि प्रशासकीय कारणे जबाबदार आहेत.

संप्रदायिक हिंसाचाराच्या कारणाचा विचार करतांना प्रशासकीय यंत्रणा, कायदा व पोलीस यंत्रणा, समन्वयाचा अभाव हे सुद्धा कधी–कधी अपुरे पडते. अशा या सांप्रदायिक हिंसाचाराचे समाज व्यवस्थेवर सामाजिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय, मानसशास्त्रीय परिणाम होतो तसेच पोलीस प्रशासन व न्यायपालिकेवर सुद्धा ताण वाढतो आणि सांप्रदायिकतेमुळे सर्वात जास्त नुकसान होते ते म्हणजे राष्ट्रीय एकात्मतेला अडथळा निर्माण होतो.

**भारतातील सांप्रदायिक दंगे/गुन्हे** :– भारतातील सांप्रदायिक दंगे हे धार्मिक कारणांपेक्षा राजकीय कारणांमुळे अधिक प्रेरीत होतात. भारतात १९४६–४८ हया दरम्यान सांप्रदायिक दंगे शिगेला पोहचले होते. १९५०–१९६३ या काळाला सांप्रदायिक शांतीचा काळ

म्हणतात. राजकीय स्थिरता आणि आर्थिक विकासामुळे सांप्रदायिक परिस्थिती सुधारायला मदत झाली होती.

**खालील सारणीत काही सांप्रदायिक दंगे दर्शवित आहे.**

| अ. | वर्ष | स्थळ | मृतांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | ऑगस्ट १९६७ | हटिया रॉची | १८३ |
| २ | सप्टेंबर १९६९ | अहमदाबाद | ५१२ |
| ३ | मे १९७० | जळगांव, महाराष्ट्र | १०० |
| ४ | ऑक्टोबर १९७८ | अलीगड | १२० |
| ५ | ऑगस्ट १९८० | मुरादाबाद | १५०० |
| ६ | डिसेंबर १९८२ | बडौदा | १८१९ |
| ७ | सप्टेबर १९८३ | हैद्राबाद | १४६ |
| ८ | ऑक्टोबर १९८४ | दिल्ली | २७३३ |
| ९ | एप्रैल १९८५ | अहमदाबाद | ३०० |
| १० | आक्टोबर १९८९ | भागलपूर | ११६१ |
| ११ | ऑक्टोबर १९९० | चांदनी चौक, दिल्ली | १०० |
| १२ | ऑक्टोबर १९९० | हैदराबाद | १६५ |
| १३ | डिसेंबर १९९० | हैदराबाद | २०० |
| १४ | डिसेंबर १९९० | अलीगड | १५० |
| १५ | डिसेंबर १९९२ | सुरत | १५२ |
| १६ | डिसेंबर १९९२ | कानपूर | २५४ |
| १७ | डिसेंबर १९९२ | भोपाळ | १४३ |
| १८ | डिसेंबर १९९२ ते जानेवारी १९९३ | मुंबई | ८७२ |
| १९ | फरवरी–मे २००२ | गुजरात | १२६७ |

२०१३ उत्तरप्रदेश मध्ये २४७ दंगे झाले त्यात ७७ मृत झाले तर ३६० जखमी झालेत. २०१३ मध्ये महाराष्ट्र, मध्यप्रदेश, अनुक्रमे ८८ व ८४ ठिकाणी सांप्रदायिक दंगली झाल्यात त्यात १२ व ११ व्यक्ती मृत झाल्यात तर ३५२ आणि २५६ व्यक्ती जखमी झालेत. २०१४ मध्ये बिहार, गुजरात, महाराष्ट्र, मध्यप्रदेश या राज्यात अनेक ठिकाणी दंगली होवुन २०० च्या जवळपास व्यक्ती जखमी झाल्यात. २०१५ मध्ये सुद्धा बिहार, गुजरात, महाराष्ट्र, उत्तरप्रदेश या ठिकाणी सुद्धा सांप्रदायिक दंगली झाल्यात व त्यात शेकडो व्यक्ती जखमी झालेत. २०१६ मध्ये संपुर्ण देशात ७०३ ठिकाणी सांप्रदायिक हिंसा झाल्यात. २०१७ मध्ये संपुर्ण देशात ८२३ ठिकाणी सांप्रदायिक हिंसा झाल्यात. प्रस्तुत सारणी मध्ये शेकडोच्या संख्येत जखमी किंवा मृत झाल्यात अशाच घटनांचा उल्लेख केलेला आहे.

**सांप्रदायिक हिंसाचारावरील उपाययोजना :–** भारतात सांप्रदायिक हिंसाचार ही सातत्याने घडून येणारी बाब आहे. भारत स्वातंत्र्य झाल्यापासुन तर आजपर्यंत अनेक सांप्रदायिक दंगे झालेले आहेत व होत आहेत. कदाचित होत ही राहणार! कारण आजच्या घडीला देशातील वातावरण जे दिसुन येते की प्रत्येक घटनेला जमात्वाद (सांप्रदायिकता) तुनच ही घटना घडली असे चित्र समाजात तयार होत आहेत. ई–कॉमर्स क्षेत्रातील डिलेव्हरी बॉय असलेला की गाडयावर फळ भाजी विक्रेता असेल या क्षुल्लक गोष्टीसाठी धर्म आड येतांनाचे चित्र दिसुन येते. उदा. १६ एप्रील पालघर येथे झालेली दोन साधूंची हत्या, भाजी विक्रेत्यांना नाव बदलाव्या लागणाऱ्या घटना, घरपोच सेवा देणारी व्यक्ती एका विशिष्ट धर्माशी संबंधीत असेल तर ऑर्डर न स्विकारणे, कुण्या खासदाराने (२८ एप्रील २०२०) एका विशिष्ट धर्माच्या व्यक्तीकडून काहीही खरेदी न करण्याचे व्यक्तव्य, CAA च्या संदर्भातील घटना, Covid-19 पसरविण्यात तबलिगी जमात जबाबदार असा व्देषपुर्ण आरोप, हयांसारख्या घटनातुन भविष्यात सांप्रदायिक दंगे थांबतील काय? असा ज्वलंत प्रश्न आज आपल्यासमोर उभा आहे. म्हणुनच सांप्रदायिक दंगे थांबविण्यासाठी काही प्रतिबंधात्मक उपाययोजना आहेत काय ते पाहणे गरजेचे आहे. सांप्रदायिक हिंसाचारावरील उपायोजना करतांना त्या वेगवेगळया पातळीवर म्हणजेच शासकीय, सेवाभावी संस्था, व्यक्ती, कायदा, पोलीस प्रशासन अशा विविध पातळयांवर केला जातो.

खासदार शहाबुद्दीन सैयद यांच्या मते, जोपर्यंत समाजात खंडात्मक विभाजन व दारिद्रय, सामाजिक न्यायाची प्रस्थापना होत नाही. मुसलमानांना मुसलमान म्हणुन ओळखले जाते तोपर्यंत हिंसाचाराच्या घटना होतच राहणार. त्यासाठी पुढील उपाययोजना :–

१) विशेष दंगल विरोधी दलाची निर्मिती :– शासनाने दंगल विरोधी दलाची निर्मिती करून त्यामार्फत अल्पसंख्यांकाचे निधीधैर्य उंचवावे, त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करावा. या दलात सर्वच पदांवर मुसलमानांना नेमण्यात यावे.

२) शिक्षेची तरतुद :– हयगय करणाऱ्या पोलीसांना शिक्षा करावी अशी तरतुद करावी.

३) न्यायालयीन चौकशी :– दंगलीत जेथे जिवीत हानी झाली असेल तिथे त्वरीत न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे.

४) विशेष न्यायालयाची स्थापना :– दंगलग्रस्तावरील खटले त्वरीत निकाली काढण्यासाठी खास न्यायालयाची स्थापना करण्यात यावी. दंगलीत सहभागींना लवकरात लवकर शिक्षा झाल्यास लोक दंगलीत सहभागी होणार नाही.

५) एस.के. घोष यांच्या मते :– दंगलीचा तपास करून आक्रमक समुदायावर दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे भिन्न धर्मियात अविश्वास व संशयाची मानसिकता बदलुन परस्परांमध्ये सामंजस्याचे, विश्वासाचे व आपुलकीचे संबंध निर्माण करणे हा सर्वोत्तम उपाय आहे. पोलीस अधिकारी (आय.पी.एस.) श्री. सुरेश खोपडे या अधिकाऱ्यांनी भिवंडी येथे झालेल्या जातीय हिंसाचाराच्या संदर्भात मोहल्ला समित्यांचा प्रयोग यशस्वी झाला होता. सांप्रदायिक हिंसाचारात अलिकडील काळात राजकीय कारणे जबाबदार असलेली दिसतात. त्यासाठी जातीयवाद्यांना निवडणुकीत भाग घेण्यापासुन रोखणे, धार्मिक भावना दुखविणाऱ्यांना कडक शिक्षा करणे, पोलीस खाते राजकीय नियंत्रणापासुन मुक्त ठेवणे, पोलीस दलाची पुर्नसंघटन करणे, निधर्मी विचार सरणी विकसीत करून त्यांना अत्याधुनिक प्रशिक्षण देणे इत्यादी उपाय योजले पाहिजेत.

विविध सांप्रदायिक धार्मिक दंगली उसळल्यानंतर सरकारमार्फत विविध चौकशी समित्या आयोग नेमल्या जातात. १९६७ साली बिहारमधील रांची–हतीया येथे झालेल्या दंगलीची चौकशी जस्टिस रघुबार दयाल याच्या अध्यक्षतेखाली नेमली होती. या चौकशी आयोगाने हिंसाचार थांबविण्यासाठी पुढील शिफारशी केल्या. – १. हिंदु–मुसलमानात परस्पर विश्वासाचे संबंध निर्माण व्हावेत म्हणुन सर्व धर्म संप्रदायाच्या लोकांची मिळुन एक कायमस्वरूपी अशासकीय संघटना निर्माण केली जावी. २. शाळेतील पाठ्यपुस्तके इतिहासाच्या पुस्तकाचे धर्मनिरपेक्षवादी दृष्टिकोनातुन पुनर्रचना करावी. ३. धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्यांविरूद्ध तात्काळ कठोरे कारवाई करावी. ४. पोलीस व लष्करांची गस्त आणखी परिणामकारक व्हावी.

१९६९ साली अहमदाबादमध्ये झालेल्या दंगलीची चौकशी करण्यासाठी जस्टीस पी. जगमोहन रेड्डी हयांच्या अध्यक्षतेखाली चौकशी आयोग नेमला तेव्हा या आयोगाने पुढील शिफारशी सुचविल्यात. – १. तरूणांमध्ये सहिष्णुता वाढावी यासाठी प्रयत्न करणे. त्यासाठी नैतिक व सांस्कृतिक शिक्षणावर भर द्यावा. २. परस्परांमध्ये बंधुभाव जोपासला जाईल यासाठी प्रयत्न करणे. ३.

प्रभावशाली व्यक्तींचा समावेश असलेल्या शहर व मोहल्ला समित्यांची निर्मिती करावी. ४. सांप्रदायिक हिंसाचाराबाबतच्या बातम्या प्रसिद्ध होण्यापुर्वी त्या सेन्सार कराव्यात. ५. प्रत्येक राज्यात दंगल आयुक्ताचे (Riot Commissioner) पद निर्माण करण्यात यावे. ५. विशेष शाखेचे काम कार्यक्षम आणि परिणामकारकरित्या झाले पाहिजे.

एस.के. घोष असे म्हणतात की, शासनाला जर खरोखरच मनापासुन कायद्याची सुयोग्यरित्या अंमलबजावणी करण्याची ईच्छा आणि निर्धार असेल तरच जातीय, धार्मिक व सांप्रदायिक हिंसाचार थांबु शकतो.

त्याचप्रमाणे सांप्रदायिक संघर्षावर नियंत्रण ठेवण्यासाठी जुन १९६२ मध्ये राष्ट्रीय एकता परिषद (NIC) ची स्थापना झाली होती व हया संघटनेची १९६८ मध्ये पुनरर्चना झाली व सांप्रदायिकता, क्षेत्रवाद, शिक्षण हया संबंधीच्या समस्यांसाठी समित्या स्थापन करण्यात आल्या. फेब्रुवारी १९९० मध्ये पुन्हा एकदा राष्ट्रीय एकता परिषदेनी सभा घेऊन पंजाब, काश्मिर आणि अयोध्या विवादावर चर्चा केली. १९९३ पर्यंत हया समस्येवर राष्ट्रीय एकता परिषदेनी काही उपाय शोधु शकले नाही.

राष्ट्रीय एकता परिषदेचे काळानुसार पुनर्गठन होऊ लागले. ऑक्टोबर २००८ मध्ये पंतप्रधान मनमोहनसिंग हयांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली व त्या बैठकीत सांप्रदायिक हिंसा करणाऱ्या विरोधात कठोर कारवाई केली जाईल. त्याचप्रमाणे सप्टेंबर २०११ मध्ये १५ वी बैठक आयोजीत करून मुख्यत्वः अंतर्गत सुरक्षेवर लक्ष केंद्रीत केले गेले.

अशा प्रकारे सांप्रदायिक तणावाला रोखण्यासाठी आणि सांप्रदायिक सामंजस्यासाठी अनेक उपायांची गरज आहे. आपल्याला फक्त धार्मिक सांप्रदायिकतेशीच लढायचे नाही तर राजकीय संप्रदायवादाला पण सांबविणे गरजेचे आहे. परंतु हयासोबत अल्पसंख्यांकामध्ये असलेली बेरोजगारी, निरक्षरता हयासारखे प्रश्न दुर करण्याची गरज आहे.

**निष्कर्ष** :— भारत २१ व्या शतकात क्रांतीकारी परिवर्तन करीत आहे. त्यामुळे भारताच्या वैज्ञानिक, तांत्रिक, खेळ, आरोग्य, शेती या क्षेत्रात विकास होत आहे. परंतु सामाजिक क्षेत्रात अजुनही जातीय, आर्थिक, सांप्रदायिकता अधिक फोफावत आहे ते मी हया निबंधात काही Issues सांगितले आहेत. जसे CAA (शाहीन बाग) Covid-19 (तबलिगी जमात) पालघर घटना ज्या जानेवारी ते एप्रील २०२० पालघर येथे दोन साधुची हत्या झाली. लॉकडाऊन (ताळेबंदी) च्या काळात सुरतकडे जात असतांना रात्रीच्या सुमारास हयांना चोर समजुन लोकांनी त्यांना मारहाण केली. त्यात त्यांचा मृत्यु झाला. हे तिघेही झुंडीच्या विकृतीचे (Mob Lynching) बळी ठरले पण काही जण हयाला सांप्रदायिकतेचा रंग देऊ लागले.

गेल्या ५०—५५ वर्षापासुन देशातील सांप्रदायिक हिंसाचाराकडे बघितले तर हे दंगे राजनितिनी प्रभावीत झालेले दिसुन येतात. राजकीय स्वार्था सारखे आर्थिक स्वार्थ पण सांप्रदायिक तणाव निर्माण होण्यास प्रवृत्त करतात. सांप्रदायिक हिंसा दक्षिण आणि पुर्व भारतापेक्षा उत्तर भारतात अधिक दंगे होतात. सांप्रदायिक हिंसा ही विशेष करून धार्मिक सण—उत्सव प्रसंगी प्रकर्षाने दिसून येते. सांप्रदायिक हिंसेत घातक हत्यारे (साधन) चा वापर केला जातो.

सांप्रदायिक दंगे रोखण्यासाठी राष्ट्रीय एकता परिषद १९६२ मध्ये गठीत करण्यात आली आतापर्यंत हया परिषदेनी पंतप्रधानाच्या अध्यक्षतेखाली अनेक बैठकी घेवून शांतता प्रस्थापीत करण्यासाठी म्हणजे सांप्रदायिक हिंसा रोखण्यासाठी प्रयत्नशिल राहिलेली दिसून येते. परंतु आज २०२० मध्ये ही सांप्रदायिक हिंसा होतांना दिसुन येते. साध्या घटनेला सुद्धा सांप्रदायिकतेचा रंग दिला जातो. म्हणनुच प्रस्तुत निबंधाच्या माध्यमातुन वरील प्रश्नांची गांभीर्याने चर्चा जेणेकरून समाजात शांतता प्रस्थापीत करता येईल व राष्ट्राची जी मनुष्यहानी, राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान, सांप्रदायीक दंगे रोखता येतील व सांप्रदायिक सामंजस्य निर्माण करता येईल.

**संदर्भ** :—

१. आहूजा, राम, 'सामाजिक समस्याएँ', 'रावत पब्लिकेशन,' जयपूर, २०१८.

२. किर्दक, बी.एच., खडके सुधा, पांडे दया, 'भारतीय सामाजिक समस्या' 'प्रशांत पब्लिकेशन,' जळगाव — सप्टेंबर २०१८.

३. www.data.gov.in

# महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीची सद्यस्थिती : एक दृष्टीक्षेप

**डॉ. सुनिल पांडुरंग झाडे,** उपप्राचार्य, आठवले समाजकार्य महा. चिमूर भ्रमनध्वनी क्रं. ९४२३६४२७५७

**प्रस्तावना :—** महाराष्ट्रात अनेक महत्त्वाची आंदोलने झाली. धुळे जिल्हयातील शहादा तालुक्यातील मार्क्सवादी विचारांच्या 'श्रमिक संघटनेने' चालविलेले भिल्ल आदिवासी शेतकऱ्यांचे आंदोलन हे एक आणि दुसरे ठाणे जिल्हयातील पालघर तालुक्यातील 'भुमिसेना' या डाव्या संघटनेने चालविलेले वारली आदिवासीं आंदोलन. याखेरीज भारतीय कम्युनिस्ट पक्ष (CPI) आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष (CMP) यांच्या किसनासभांनाही शेतकऱ्यांना संघटित करून काही आंदोलने चालविली. लालनिशाण पक्ष तसेच समाजवादी पक्ष आणि शेतकरी कामगार पक्ष हेही पक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर भूमिका घेऊन काही चळवळी उभारण्याचा प्रयत्न करीत होते. १९७० च्या दशकाच्या अखेरीस महाराष्ट्रात श्री. शरद जोशी यांच्या नेतृत्वाखाली मोठी चळवळ सुरू झाली व शेतकरी संघटना या संघटनेखाली उभी राहीली. ती देशाच्या इतरही भागात पसरली. महाराष्ट्रातील या सर्व चळवळींचा आपल्याला थोडया अधिक तपशीलात जाऊन विचार करावयाचा आहे. त्यासाठी आपण थोडक्यात महाराष्ट्रातील या चळवळींची आर्थिक, राजकीय आणि सामाजिक पार्श्वभुमी काय होती हे पाहू.

**महाराष्ट्रातील शेतकरी चळवळींची आर्थिक, सामाजिक व राजकीय पार्श्वभुमी:—** अगोदर पाहिल्याप्रमाणे, महाराष्ट्रात जमीन सुधारणांच्याव्दारे काही महत्त्वाचे बदल घडून आले. जागीर, इनाम व वतने नष्ट केली व 'कसेल त्याची जमीन' या तत्वाच्या आधाराने जमीन मालकी कुळांकडे गेली. अर्थात, कायद्यातील पळवाटांचा उपयोग करून अनेक जमीनमालकांनी बेनामी जमिनी करून स्वत:कडे ठेवल्या आणि अनेक ठिकाणी कायदा होण्याअगोदरच कुळांना जमिनींवरून हुसकले गेले. त्यातून भूमिहीन शेतमजूरांच्या संख्येत वाढ झाली. कमाल जमीनधारणा कायद्यानेही काही प्रमाणात शेतजमिनींच्या आकारमानांवर व जमिनीच्या केंद्रीकरणावर मर्यादा आली. पंचवार्षिक योजनांव्दारे शेतीच्या विकासासाठी मोठया प्रमाणात पाणीपुरवठयाच्या योजना सरकारने हाती घेतल्या. अनेक लहान—मोठया धरणांची कामे सुरू केली. त्याचप्रमाणे पायाभूत सोयी वाढविण्यासाठी विद्युतीकरण, रस्तेबांधणी, वाहतुकीसाठी नव्या सोयी उपलब्ध होऊ लागल्या. शेतीच्या विकासासाठी बाजारपेठांच्या सोयी आणि पतपुरवठा सरकारने उपलब्ध करून दिला. या सोयींचा फायदा एकुण शेतीला व ग्रामीण भागाला जरी झाला तरी त्यांचा अधिक फायदा मोठया व मध्यम शेतकऱ्यांना झाला. सिंचनाखालील क्षेत्रातील अशा शेतकऱ्यांनी उसासारखी खर्चीक पण नफा मिळवून देणारी पिके घ्यायला सुरूवात केली. सहकार चळवळ सुरू झाल्यावर सहकारी क्षेत्रातील साखर कारखान्यांच्या आजूबाजूचा परिसर उसाच्या लागवडीखाली मोठया प्रमाणात आला. पश्चिम महाराष्ट्रात तसेच उत्तर महाराष्ट्राच्या काही भागात सहकारी कारखान्यांचे आणि त्याच्या जोडीला सहकारी पतपेढयांचे जाळे तयार झाले. हरित क्रांतीचा सर्वाधिक फायदा पुन्हा मोठी गुंतवणुक करू शकणाऱ्या आणि कर्जे मिळवू शकणाऱ्या श्रीमंत बागाईतदार व मोठया शेतकऱ्यांनाच मिळाला. छोटे आणि अत्यल्प भूधारक शेतकरी व शेतमजूर यांची परिस्थिती मात्र आणखीनच बिकट झाली. या काळातील शेतमजुरांपुढील सर्वात मोठा प्रश्न हा मजुरीचा होता.

सहकारी चळवळीने ग्रामीण भागात जशी एका वर्गाला सुबत्ता मिळवून दिली तशीच राजकीय सत्ताही मिळवून दिली. महाराष्ट्राच्या राजकारणात सहकारी सोसायटयांच्या जाळयातून राजकीय हितसंबंधाचेही जाळे निर्माण झाले आहे. सहकारी साखर कारखाना हा अनेक ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या सभासदत्वातून उभा राहतो. अशा कारखान्यावरील पकड संचालकांना या शेतकऱ्यांच्या जीवनावरही पकड मिळवून देते. याचे कारण म्हणजे सभासद शेतकरी हे कर्जासाठी, खते इत्यादी गोष्टींसाठी कारखान्यावर अवलंबून असतात. अर्थातच अशा संबंधातून संचालक मंडळांना राजकीय सत्ता मिळते. ही सत्ता त्या त्या भागातील श्रीमंत जमीनमालकांच्या हाती जाते. याच वर्गातून महाराष्ट्रातील सत्ताधारी वर्ग निर्माण झालेला आहे. अर्थातच सत्ताधारी वर्ग आपला सत्तेचा पाया मजबूत राखण्यासाठी साखरसम्राटांचे हितसंबंधही जपत असतो.

या राजकारणात 'जात' हाही एक महत्त्वाचा घटक आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांमध्ये मराठा, कुणबी, माळी, धनगर इत्यादी जाती मुख्य आहेत. पैकी मराठा हा जातसमूह संख्येने सर्वात मोठा आहे. मराठयांमध्ये ज्याप्रमाणे श्रीमंत शेतकरी आहेत त्याचप्रमाणे मध्यम व लहान शेतकऱ्यांचा एक मोठा गट आहे. माळी हे जरी सधन बागाइतदार असले तरी ते मराठयांच्या तुलनेत संख्येने कमी आहेत. या जातींना समाजशास्त्रज्ञ मध्यम जाती किंवा शेतकरी जाती म्हणतात. जातींच्या संदर्भात बोलायचे तर महाराष्ट्राच्या राजकारणात या मध्यम जातीचे वर्चस्व आहे. महार, मांग, चांभार इत्यादी पुर्वास्पृश्य जाती या अल्पसंख्य जाती आहेत. यांचा मोठा वर्ग ग्रामीण भागात आहे. पण आर्थिकदृष्टया मागसलेल्या आणि सामाजिकदृष्टया 'दलित' व नाडलेल्या या जातींमध्ये अत्यल्प भूधारक शेतकरी आणि अधिककरून भूमिहीन शेतमजूरांचे प्रमाण मोठे आहे. महाराष्ट्रातील राजकारणात ज्याप्रमाणे मराठा—माळी श्रीमंत शेतकऱ्यांचा प्रभाव आहे त्याचप्रमाणे शहरातील प्रामुख्याने अमराठी कारखानदार, भांडवलदार व व्यापाऱ्यांचाही प्रभाव आहे. हरित क्रांतीनंतर महाराष्ट्रात ग्रामीण भागात ज्याप्रमाणे सुबतेची बेटे निर्माण झाली त्याचप्रमाणे मुंबई, पूणे, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूरसारख्या काही शहरांच्या भोवतीने औद्योगिक विकासाची बेटे तयार झाली. हरित क्रांतीचा फायदा भांडवलदार कारखानदारवर्गासही झाला. स्वस्त दरात शेतीमाल आणि मजूर मिळणे ही या वर्गाची गरज आहे. हरित क्रांतीनंतर वाढलेल्या शेती उत्पादनामुळे, वाढत्या बाजारपेठेमुळे आणि शहरांकडे स्थलांतर करणाऱ्या ग्रामीण गरिबांमुळे ती गरज पुर्ण होते. ग्रामीण गरिबांच्या वर्गात आणखी एका सामाजिक गटाची नोंद ठेवायला हवी. महाराष्ट्राच्या विविध भागांत पसरलेले आणि संख्येने कमी असलेले आदिवासी हे ब्रिटीश येईपर्यंत जंगलांवर अवलंबून होते. ब्रिटीशांच्या जंगलविषयक धोरणमुळे त्यांना शेतीकडे वळावे लागले. पण जमीनदार व सावकारांनी केलेल्या फसवणूकीमुळे व अन्यायामुळे हा वर्गही आता शेतमजुरांच्या मोठया गटात सामील झाला आहे. एकंदरीत जर ग्रामीण भागातील संपत्तीचे वाटप कसे झाले आहे याचा विचार केला तर असे दिसते की, सुमारे १० टक्के ग्रामीण सधनांच्या हातात ६२ टक्के मालमत्ता एकवटलेली आहे. वरच्या ३० टक्के ग्रामीण कुटुंबाच्या हातात ८५ टक्क्याहून अधिक मालमत्ता एकवटलेली असल्यामुळे राहिलेली ७० टक्के ग्रामीण कुटुंबे जवळ निर्धन गटात मोडतात.

**अध्ययनाची आवश्यकता आणि महत्त्व:—** अनेक संशोधकात ज्यात प्रामुख्याने जॉन दिने यांच्या मते, संशोधकाची विज्ञानबद्दलची

अभिरूची, जिज्ञासा व उत्सुकता हाच संशोधन निवडीचा पाया आहे. विद्यार्थी आणि शिक्षकी जिवनात समाजकार्य प्रात्यक्षिक अंतर्गत ग्रामीण समुदायाशी आलेला संबंध आणि त्यातून वेगवेगळया समुदायाच्या प्रामुख्याने ग्रामीण समुदायातील शेतकी व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांची स्थिती, त्यांच्या या स्थितीमध्ये बदल व्हावा, सुधारणा व्हावी, विकास व्हावा याकरीता ज्या ज्या चळवळी झाल्या त्याचा शेतकऱ्यांच्या जीवनावरती कोणता प्रभाव पडला, त्यांचा विकास झाला, तो कितपत झाला, या चळवळीत कोणकोणता शेतकरी वर्ग समाविष्ठ झाला, नव्याने आलेले कायदे, कार्यान्वित झालेल्या योजना यांचा परिणाम शेतकरी चळवळ व शेतकऱ्यांवरती झाला काय? इत्यादी बाबी विषयाच्या निवडीस कारणीभूत आहे.

शेतकी समाजाची रचना वेगवेगळया प्रदेशामध्ये वेगवेगळी असल्याचे आढळून येते. या समाजातील वर्ग व त्याचे परस्पर संबंध गुंतागुंतीचे असतात. हे वर्ग व त्याचे जमीनीशी नाते काय आहे. म्हणजे जमीन त्यांच्या मालकीची आहे किंवा नाही यावर मुख्यत: ठरत असतात. डॅनियल थॉर्नर या अभ्यासकाने भारतातील कृषी संबंधा अभ्यास करून त्याच्या वर्गवारीसाठी काही व्यापक निकष तयार केले. या निकषाच्या आधारे शेती समाजातील 'वर्ग' हे अधिक चांगल्या प्रकारे समजु शकतात. त्यी ३ प्रमुख निकष सांगितले. १. जमीनीतून कोणत्या प्रकारची मिळकत होते. २. जमीनीवरील हक्काचे स्वरूप. ३. प्रत्यक्षात शेतात किती काम करावे लागते. या निकषाचे आधारे शेतकरी समाजात ढोबळमानाने पुढील वर्ग तयार होतात. अ) मालक – १) जमीनदार २) श्रीमंत शेतमालक. ब) शेतकरी– १) छोटे शेतकरी २) संरक्षित कुळे. क) शेतमजुर– १) गरिब शेतकरी २) गरीब कुळे ३) खंडकरी. देशाचा मुख्य कणा शेती व उद्योगधंदे, यामधुन अधिकाअधिक उत्पन्न देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी देत असते परंतु आज यातील शेती व्यवसायाची काय दैनावस्था आहे, आज कोणताही वर्ग शेती करण्याकडे प्रामुख्याने मुळ शेतकरी दुर्लक्ष करतो आहे. त्याला कोणताही इतर उद्योगधंदा नसल्यामुळे शेती लाईलाजाने करावी लागते. कोरडवाहु व ओलीत ह्या शेतीच्या प्रकारामध्ये कोरडवाहु शेतीची दैनावस्था आहे. कारण ही शेती मुख्यत: निसर्गावरती अवलंबुन आहे व ही भरपाई भरून काढण्याकरीता शेतकऱ्यांकडे उपाययोजना नाही व शासनाचेही त्याकडे दुर्लक्ष आहे. त्यामुळे या कर्जाच्या ओझ्यामुळे शेतकरी नाईलाजास्त्व स्वत:चे जीवन संपवीत आहे, आत्महत्या करीत आहे. तसेच शेतीतुन मिळालेल्या उत्पादनाची किंमत ठरविण्याचा शेतकऱ्यांला अधिकारही नाही. कारण शासनाने या शेतीला व्यवसायाचा कायदेशिर दर्जा दिलेला नाही. त्यामुळे त्यांना आपल्या विकासात येणाऱ्या समस्या, त्या निराकरणार्थ उपाययोजना इत्यादी विचार करण्याच्या दृष्टीने आणि ज्ञान संपादन करण्याच्या दृष्टीने मी एक शेतकऱ्यांचा पुत्र असल्यामुळे व शेतकरी चळवळीत सहभागी कार्यकर्ता असल्यामुळे प्रस्तुत संशोधन माझ्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहे. आज शेतकऱ्यांची ही परिस्थिती का निर्माण झाली. १९८४ सालानंतर शेतकरी चळवळ, संघटनेने जातीयवादाचा चळवळीच्या कार्याला होवू लागलेला धोका जाणवून त्याविरूद्ध आघाडी का उभारावी लागली. ही परिस्थिती का उद्‌भवली आज १९७० पासूनची महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ कोणत्या स्वरूपात आहे. या चळवळीत यश प्राप्त झाले किंवा ती दाबल्या गेली असा सरळ प्रश्न संशोधकाच्या मनात निर्माण झाला व या प्रश्नाचे उत्तर शोधण्याची जिज्ञासा संशोधकाच्या मनात निर्माण झाली. या उत्सुकतेपोटी शेतकरी चळवळ व विकास यावरती संशोधन करणे ही चांगली गुंतवणुक असु शकते.

**व्यावसायीक समाजकार्याच्या दृष्टीकोनातून अध्ययनाचे महत्त्व :–** ग्रामीण समाज विकास हे एक व्यावसायीक समाजकार्याचे क्षेत्र असून शेतकरी हे लोकसंख्येच्या प्रमुख समुहाचे सदस्य असतात. हे जरी जास्त समुदायाने असले तरी यामध्ये वेगवेगळया जाती, धर्मपंथाचा समावेश असल्यामुळे पाहीजे त्या प्रमाणात समस्या निराकरणासाठी एकत्रीत येत नसल्यामुळे त्यांच्या या कमजोरपणाचा फायदा राजकीय पक्ष व समाजातील असामाजिक तत्व घेऊन ते त्याचे शोषण करतात. त्यामुळे त्यांना संरक्षण व सुरक्षेची आवश्यकता भासते. परिणाम स्वरूप त्या त्या राज्याना त्यांच्या विकासासाठी विशेष पावले उचलावी लागतात. भारत हा खेडयामध्ये वसलेला आहे व या खेडयाचा मुख्य व्यवसाय शेती आहे. म्हणून भारताची महत्त्वपूर्ण संपत्ती शेती असून ती कसणारा शेतकरी आहे. देशाचे भविष्य हे शेतीच्या विकासावर निर्भर असते. शेतीच्या विकासात केलेली गुंतवणुक ही वास्तवामध्ये राष्ट्राची गुंतवणुक आहे. आजचा सुदृढ (स्वस्थ), प्रगत शेतकरी उद्याचा क्रियाशिल व कर्तृत्वान नागरिक ठरून तो समाजाच्या प्रगतीस प्रामुख्याने देशाच्या प्रगतीस मदतगार ठरेल. त्यामुळे शेतकऱ्यांचा विकास म्हणजे शेतीचा विकास करण्याची सर्वात महत्त्वाची जबाबदारी शासनाची आहे. कारण बहुतेक शेतीसंबंधीची आंदोलने शासनाविरूद्ध करण्यात आली आणि आंदोलनाच्या शेवटी शासनाबरोबर बोलणी होऊन तडजोडीने मिरविण्यात आली. ही आंदोलने मुख्यत: ऊस, कापुस, तंबाखु, कांदा, धान यासारख्या नगदी पिकाच्या भावाच्या संदर्भात झाली व त्या पिकाशी संबंधीत असा मध्यम व मोठा शेतकरीवर्ग होता व तोच आंदोलनाचा (चळवळीचा) आधारस्तंभ होता.

म्हणून शेतकरीवर्गात या चळवळीच्या सुरवातीला उत्साह कसा होता, त्याचा मुख्य उद्देश कोणता होता, आता ती का उदासिन झाली, तिचे व्यापक स्वरूप का नाही, ती विशिष्ट भागापुरतीच का मर्यादित आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन कोणत्या योजना चालवित आहे. याविषयीची माहिती शेतकरी समुदायातील लोकांना देण्यास, शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेण्यात व समाजजागृतीसाठी व्यावसायीक समाजकार्याची मध्यस्थी या क्षेत्रात महत्त्वपूर्ण भुमिका पार पाडू शकतात. या क्षेत्रात व्यावसायीक समाजकार्यकर्ता पुढील प्रकारच्या भुमिका पार पाडू शकतो. १. प्रोत्साहकाची भुमिका. २. उपचारकाची भुमिका. ३.मध्यस्थाची भुमिका. ४. प्रेरकाची भुमिका. ५. मार्गदर्शक भुमिका. ६. समन्वयकाची भुमिका. ७. मदतकर्त्याची भुमिका. ८. योजनाकाराची भुमिका.

भारताला स्वातंत्र्य मिळून ६५ वर्षाचा काळ व महाराष्ट्र राज्य निर्माण होऊन ५२ वर्षाचा काळ होऊनही शेतकरी समाज अजूनही उपेक्षिताचे जिवन जगत आहे. या समाजाच्या समस्या काय आहेत, ते प्रगतीपासून दुर राहण्यास कोणकोणते घटक जबाबदार आहे. त्यांच्या अधिकाराबाबत त्यांच्यात जागृकता आहे का? शेतकरी विकासात चळवळीचा, शासनाचा दृष्टीकोन काय आहे ह्या बाबी अभ्यासल्या जाणार आहे. व्यावसायीक समाजकार्याच्या दृष्टीकोनातून विचार करता प्रस्तुत विषयातील अध्ययन अतिशय उपयोगी ठरेल. जे समाजकार्यकर्ते व्यावसायीक समाजकार्याचे प्रशिक्षण घेत आहेत त्यांना शेतकऱ्यांच्या चळवळी व समस्या तसेच विकास त्याकरीता असलेल्या योजना यांचे ज्ञान होईल. तसेच सामाजिक क्रिया व समुदाय संघटन या समाजकार्याच्या अभ्यास पद्धती व तंत्राचा वापर कसा करता येईल याचे मार्गदर्शन त्यांना मिळू शकेल. संशोधनाचा

विषय नविन क्षेत्र असल्यामुळे विद्यार्थ्यांना वेगवेगळया पैलुविषयी सखोल ज्ञान प्राप्त करता येईल. ज्या स्वयंसेवी व शासकीय संस्था या क्षेत्रात कार्यरत आहेत त्यांनाही या संशोधनाचा विशेष फायदा होईल. शेती व शेतकऱ्यांच्या सर्वांगिण विकासाकरीता शासनाच्या योजनाची सशक्त अंमलबजावणी करीता कसे उपयोगी ठरू शकेल यादृष्टीने अधिक सकारात्मक परिणाम घडवून आणू शकेल.

**अध्ययनाचे उद्देश:—** १. महाराष्ट्रातील वर्धा व चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकरी चळवळीतील शेतकऱ्यांच्या वैयक्तिक व कौटुंबिक परिस्थितीबाबत शेतकऱ्यांच्या मताचे अध्ययन करणे. २. महाराष्ट्रात १९७० नंतर शेतकरी चळवळ उदयास येण्यासाठी कोणती परिस्थिती जबाबदार ठरली याबाबत शेतकऱ्यांच्या मताचे अध्ययन करणे. ३. महाराष्ट्रातील १९७० नंतरच्या चळवळीच्या माध्यमातून शेतकऱ्यांमध्ये झालेल्या त्यांच्या हक्काबाबत, जाणीवजागृती तसेच शेतकऱ्यांच्या विकासाकरीता कोणकोणती तंत्रे वापरली याबद्दल शेतकऱ्यांचे अध्ययन करणे. ४. महाराष्ट्रातील शेतकरी चळवळी व शेतीची प्रगती यांचे गुणात्मक व संख्यात्मक बदलाकरीता कोणते प्रयत्न शेतकरी चळवळीच्या माध्यमातून केले गेले याबद्दल शेतकऱ्यांच्यामताचे अध्ययन करणे. ५. महाराष्ट्रातील शेतकरी १९७० नंतरच्या शेतकरी चळवळीची पुरोगामी भूमिका व त्यांच्या राजकीय परिणामाबाबत शेतकऱ्यांच्या मताचे अध्ययन करणे.

**प्रमुख निष्कर्ष:—** १) महाराष्ट्रातील वर्धा व चंद्रपूर जिल्हयातील शेतकरी चळवळीतील शेतकऱ्यांची नाजुक आर्थिक व वैयक्तीक स्थिती त्यांच्या सर्वांगीण विकासात बांधक आहे. २) महाराष्ट्रातील १९७० च्या नंतरची शेतकरी चळवळ वर्धा व चंद्रपूर जिल्हयातील शेतकऱ्यांकरीता वरदान ठरलेली आहे. ३) महाराष्ट्रातील १९७० च्या नंतरच्या शेतकरी चळवळीमुळे विदर्भात विजय जांवधीया, सराज काशीकर, वामन चटप, ॲड. मोरेश्वर टेंभुर्डे, राम नेवले इत्यादी राजकीय नेते निर्माण झाले. त्यामुळे शेतकरी चळवळीचे अस्तीत्व अजूनही विदर्भात दिसून येते. ४) महाराष्ट्रात १९७० च्या नंतर शेतकऱ्यांच्या उत्पादीत मालाला उत्पादन खर्चानुसार शासन रास्त भाव देत नाही त्यामुळे शेतकऱ्यांची लुट होते या समजूतीमुळे शेतकरी चळवळ उदयास आली. ५) महाराष्ट्रात १९७० च्या नंतर शेतकरी चळवळीने आंदोलनाकरीता नवीन नवीन तंत्रे (महात्मा गांधीचा सत्याग्रहाचा मार्ग) सतत वापरल्यामुळे त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये जाणीव जागृती झाली व चळवळ यशस्वी झाली. ६) महाराष्ट्रात १९७० नंतरच्या शेतकरी चळवळीमुळे वर्गविहीन शेतकरी समाजरचना तयार झाली. व यामुळे शेतकरी एकत्रित येवून शासनावरती दबावतंत्राचा वापर करू लागले त्यामधून त्यांच्या समस्या सुटल्या. ७) शासनाला शेतीमालाच्या उत्पादन खर्चानुसार शेतमालाचे भाव जाहीर करावयास लावणे व शेतकऱ्यांची एकत्रीत जुळवाजूळव करणे हाच गुणात्मक बदल शेतकरी चळवळीमुळे झाला. ८) महाराष्ट्रातील १९७० नंतरच्या शेतकरी चळवळीने जातीयवादी संघटना व चळवळी यांचा मुकाबला करण्यासाठी पुरोगामी भूमिका स्वीकारली. ९) महाराष्ट्रातील १९७० नंतरच्या शेतकरी चळवळीने आपले अराजकीय स्वरूप बदलले व नंतर ती पूर्णत: राजकीय झाली त्यामुळे महाराष्ट्रातील पक्षीय राजकारणावर चांगली परिणाम झाला. १०) महाराष्ट्रात निसर्गाचा असमतोल, शासनाचे शेतकऱ्यांकडे दुलर्क्ष, जमीनदाराकडून होणारी शेतकऱ्यांची पिळवणूक, पोलिसाचा अत्याचार, शासकीय अधिकाऱ्याकडून झालेला अपमान इत्यादी कारणामुळे शेतकरी चळवळ निर्माण झाली. ११) महाराष्ट्रात १९७० च्यानंतर शरद जोशी यांच्या नेतृत्वात शेतकरी संघटना अस्तित्वात आली व तीने मुक्त अर्थव्यवस्थेचा पुरस्कार, डंकेलचा उदोउदो, गॅट करारचे समर्थन केले. १२) शेतकरी चळवळीत शरद जोशी नंतर दुसऱ्या फळीतील नेते न निर्माण झाल्यामुळे तिचा पुढे पराभव झाला. १३) महाराष्ट्रात १९७० च्या नंतर उदयास आलेली शरद जोशीची शेतकरी संघटना महात्मा गांधी यांचा सत्याग्रह, महात्मा ज्योतिबा फुले यांचे विचार तसेच डॉ. आंबेडकर यांची सामाजिक चळवळ यावर आधारीत होती. १४) महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीने कांदा, उस, कापूस, तंबाखु, पिकेटींग, महिला अधिवेशन, कर्जमुक्ती इत्यादी कार्यक्रम व आंदोलने केलीत. १५) महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीला कोकणात व दक्षिण महाराष्ट्रात फारसा प्रतिसाद मिळाला नाही कारण तिथे कॉंग्रेसची नेते व सत्ता होती तसेच कोकणात कापसासारखे नगदी पिक होत नसल्यामुळे तो मिळाला नसावा. १६) महाराष्ट्रातील १९७० नंतरच्या शेतकरी चळवळीला अहमदनगर, नाशिक, वर्धा, चंद्रपूर याठिकाणी चांगला प्रतिसाद मिळाला. १७) महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीने आंदोलन यशस्वी होण्यासाठी रस्ता रोको, रेल्वे रोको, शेतमाल बाजारपेठेत न आणने, असहकार आंदोलन, व त्यातून अटक करून घेणे इत्यादी मार्गाचा अवलंब केला. १८) वर्धा व चंद्रपूर जिल्हयातील शेतकऱ्यांनी फक्त जास्त प्रमाणात कापूस व कर्जमुक्ती या आंदोलनात सहभाग घेतला.

**उपाययोजना:—** गेली ८० वर्ष समाजवादी धोरणानी शेतकऱ्यांना पिळले त्यांचे भिषण परिणाम आज दिसत आहे. १९९० साली अनिच्छेने खुली अर्थव्यवस्था शासनाने स्वीकारली. त्यानंतर शेतकऱ्यांचे बरे दिवस येतील अशी आशा वाटली. परंतु खुली करण्याच्या प्रक्रीयेतून शेतकऱ्यांना वगळण्यात आले शेती क्षेत्र पूर्वीच्याच समाजवादी पद्धतीच्या सरकारी नियंत्रणाच्या वेडयात जखडलेले राहील. खुली करण्याच्या प्रक्रियेतून शेतकऱ्यांला वगळून टाकल्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या घडत आहे. हे आज नाही तर उद्या कबूल करावेच लागेल.

शेतकऱ्यांना विकासाच्या परिघात सामील करून घ्यावे हाच एकमेव उपाय आहे. विकासाच्या परिघात शेतकऱ्यांना सामिल करून घ्यायचे म्हणजे काय करायचे ? या प्रश्नाच्या उत्तरातच शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबण्यासाठी काय करावे? यांचे उत्तर आहे. नुकसान भरपाई देवून जगात कोठेही आत्महत्या थांबण्याचे उदाहरण नाही. व्यवस्थेत दोष कायम ठेवून केलेली मलमपट्टी फारशी लागत नाही. प्लेगचे रोगी नीट करणे हे काय निकडीचे असले तरी जेथून ही साथ पसरली त्याचा बंदोबस्त करणे अधिक चांगले आहे. तत्कालीन उपासासोबत रोगाचे समुळ उच्चाटन कसे होईल याचा विचार झाला पाहीजे. त्या दृष्टिने पूढील उपायाचा विचार करावा लागेल.

**१) बाजारातील हस्तक्षेप थांबवा :—** कांद्याचे भाव वाढू लागले की, सरकार निर्यात बंदी घालते. सोयाबीनचे भाव वाढले की, पेंडीच्या निर्यातीवर निर्बंध लादले जातात. उसाची सोनबंदी, कापसाचा एकाधिकार, धान्यावरील राजबंदी ही त्यांचीच उदाहरणे होय. कृषि उत्पन्न बाजार समीतीच्या कायद्याव्दारे शेतकऱ्यांच्या अब्जावधी रूपयाच्या मालाचा व्यवहार काही मुठभर व्यापाराच्या हाती सोपविण्यात आला. लायसन परमीटमुळे शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले. या कायद्याने शेतीमालाच्या भावाची स्पर्धाच मारून टाकली. या सर्व गोष्टी थांबल्या पाहिजेत. सरकारने बाजारात कोणताही हस्तक्षेप करता कामा नये. निकोप स्पर्धा कशी

टाळील एवढेच सरकारने पाहावे. सरकार बाजूला राहीले तरी शेतीमालाच्या भावाच्या किमती नैसर्गिक पातळीवर येऊ शकतील.

**२) बाहेर पडण्याचा मार्ग उघडा :—** एखाद्या वाहनाला आग लागलेली असावी आणि संकटकाळी बाहेर पडण्याचा मार्ग बाहेरून बंद केलेला असावा. तेव्हा अशी प्रवाशाची अवस्था होईल तशी शेतकऱ्यांची आज झाली आहे. जे शेतीत आहे त्यांनी शेतीतच खपावे ही धारणा चुकीचे आहे. ती बदलावी लागेल. ज्यांना शेतीतून बाहेर पडायचे आहे. त्यांना बाहेर पडणे सुकर व्हावे. सन्मानाने बाहेर पडता यावे असे वातावरण निर्माण केले पाहिजे. अल्पभूधारकाची संख्या अफाट आहे. एका बाजूला जमीन धारणेची मर्यादा आणि दुसऱ्या बाजूला शेतीबाहेर रोजगाराचा अभाव या कात्रीत शेतकरी सापडला आहे. तो पिढी दर पिढी खंगत चालला आहे. दोन एकरच्या कोरडवाहू शेतीवर एका कुटूंबाची उपजीविका भागने केवळ अशक्यच आहे. त्या माणसाला 'तू शेती कर' असे म्हणजे त्यावर जुलूम करण्यासारखे आहे. दोन एकरमध्ये त्याने कितीही पिकविले, भरपूर उत्पादन काढले. सरकारी हस्तक्षेप नसला व बाजारात चांगली किमत मिळाली तरी तो आपल्या कुटूंबाचा चरित्रार्थ चालवू शकेल, एवढी रक्कम मिळवू शकत नाही. दोन एकराची कोरडवाहू शेती हे माणसांच्या जगण्याचे किंवा प्रगतीचे साधन बनू शकत नाही. मार्ग एकच आहे तो म्हणजे ज्याला शेती सोडायची आहे. त्याला ती सहजपणे सोडता आली पाहिजे.

शेतीच्या बाहेर पडण्याचा मार्ग सुकर करण्याचा अर्थ असा कि इतर उद्योगधंद्यातील सरकारी त्रास कमी झाला पाहिजे. तो त्रास कमी झाला तरच शेतकरी नव्या व्यवसायामध्ये उतरण्याचे धाडस करणार नाही. याबाबत खाजगी वाहतूकीच्या संदर्भात सरकारचा दृष्टिकोन चित्ताजनक आहे. शेतीतून बाहेर पडू मागणाऱ्याने खाजगी वाहतूकीचा व्यवसाय सुरू केला तर त्याला पोलिस यंत्रणा सळो की पळो करून सोडते. सरकारने कायदा आणि सुव्यवस्थेकडे अधिक लक्ष दिले पाहिजे, असे वातावरण निर्माण झाले नाही तर शेतकरी शेतीच्या बाहेर पडू शकणार नाही. व त्याला आत्महत्येशिवाय पर्याय उरणार नाही.

**कायद्याचे जंजाळ:—** स्पेशल इकॉनॉमिक झोनच्या (SEZ) निर्मिताने काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. शेतकऱ्यांच्या जमीनी अधिग्रहन करण्याच्या अधिकार सरकारला आहे. हा कायदा भारतीय राज्य घटणेच्या नवव्या सुचीत टाकल्यामुळे मागे सर्वोच्च न्यायालयाच्या निकालापूर्वीपर्यंत तो न्यायालयाच्या कक्षेत येत नव्हता (असा अधिकार सरकारला असावा यास एके काळी कम्युनिस्टासह अनेक डाव्या पक्षानी पाठिंबा दिला होता.) विशेष आर्थिक क्षेत्राकरीता जमीनी उपलब्ध करून देण्यासाठी याच कायद्याचा वापर केला जात आहे. शेतकऱ्यांच्या जमीनी त्यांच्या मर्जीविरूद्ध काढून घेणे चूक आहे. हा अधिकार जसा कोणत्याही माणसाला किंवा कंपनीला नाही. तसाच तो कोण्या सरकारला असता कामा नये. यासाठी कायदा आणि घटनादुरस्ती केली पाहिजे.

नवव्या सुचीमध्ये २८४ कायदे आहेत. एखादा अपवाद सोडला तर सगळयाच्या सगळे शेतकऱ्यांविषयचे आहेत. व ते सगळे शेतकऱ्यांविरोधी आहेत. ते बदलावे लागतील. जमीनधारणा कायद्यामुळे जमीनेचे तुकडे होत गेले आणि समाजवादी धारणेच्या लायसन्स परमीट राजामुळे शेती क्षेत्राबाहेर नवे रोजगार निर्माण होवू शकले नाहीत. परिणामी शेतीवर माणसाचा बोजा वाढत गेला. आज ८० टक्के शेतकरी अल्पभूधारक झाले आहेत या शेतकऱ्यांचे कुटूंब या शेतीवर प्रगती करणे सोडाच, त्यांना जगणेसुद्धा कठीण आहे. लॅड सिलींग ॲक्टचाही पूर्नविचार करावा लागेल.

महाराष्ट्रातील सहकारी चळवळ ही शेतकऱ्यांचे होत जपणारी नसून ती पूढाऱ्याचे हीत जोपासणारी आहे. ही बाब अनेकदा स्पष्ट झाली आहे. सहकारी बॅकाचा कायदा हादेखील शेतकऱ्यांना हवे तसे छळणारा आहे. हा कायदा बदलून रिझर्व्ह बॅकेच्या निर्देशानूसार शेती कर्जावर दामदुमटीपेक्षा जास्त व्याज आकारणी करता येणार अशी सुधारणा करायला हवी.

**३) मार्शल प्लॅन हवा :—** अवती भोवतीचे देश बिकट आर्थिक परिस्थीतीत असतील तर अमेरिकेलाही प्रगती करता येणार नाही. हे जनरल मार्शल यांनी ओळखले होते. दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक पराभूत देशाच्या अर्थव्यवस्था कोसळल्या होत्या. शेती आणि उद्योग यांच्या विनीमयात ताण निर्माण झाले होते. जनरल मार्शल यांनी हे ओळखले होते. हे संबंध सुरळीत करून आपापल्या देशाच्या अर्थव्यवस्थेची घडी नीट बसू इच्छिणाऱ्या देशाना अमेरिकेच्या आर्थिक सहकार्याच्या त्यांनी कार्यक्रम दिला. तोच मार्शल प्लॅन. युरोपातील अनेक देश त्यात सहभागी झाले. शेती आणि इतर घटक यांच्या विनिमयातील सुरळीतपणा हे अर्थव्यवस्थेची घडी नीट बसविण्याचे सुत्र या देशानी स्विकारले. लवकरच त्यांच्या देशाच्या अर्थव्यवस्थेची घडी बसली. श्री शरद जोशी यांनी इंडिया आणि भारत या परिभाषेत तेच सुत्र मांडले आहे. आज शरद जोशी हयात नाही. आज भारतातील शेतकरी पराभूत देशासारखा उद्ध्वस्त झाला आहे. शेती आणि इतर घटक यांच्या विनिमयाच्या तिढा निर्माण झाला आहे. हा तिढा सोडविण्यासाठी किरकोळ पॅकेज उपयोगाचे नाहीत. आर्थिक घडीची पुर्नरचना करणारा मार्शल प्लॅन समोर आनावा लागेल.

**४) कर्ज बेबाक करा :—** कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत असे सगळेजन मान्य करतात. व्याजाच्या आकारणीत शेतकऱ्यांची वारेमाप फसवणूक झाली आहे. शेतीवरील कर्जाचा अभ्यास करणारा एखादा आयोग नेमला तर अब्जावधी रूपयाचे घोटाळे उघडकीस येतील, परंतु शेतकऱ्यांना कर्जमुक्ती करण्यासाठी हे केवळ एकमुक्त कारण नाही. शेतीमालाचे भाव पाडणारे धोरण अंगीकारल्यामुळे शेतकऱ्यांचे फार मोठे नुकसान झालेले आहे. भाव पाडून सरकारने दुसऱ्या हाताने अगोदरच परतफेड करून घेतली आहे. शेतीवरील सर्व कर्ज अनैतीक आहे. शेतकरी संघटनेचे नेते शरद जोशी यांनी शासकीय कागदपत्राच्या आधारे आकडेवारी देवून ही बाब सिद्ध केली आहे. शेतकरी देणे लागत नसल्यामुळे शेतकऱ्यांवरील कर्ज बेबाक करण्यात यावीत ही तक्रसंगत भूमिका आहे. शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचा निर्णय अशक्य नाही. कर्नाटक, तामिळनाडू या राज्यानी तसे केले आहे, त्यांचा चांगला परिणाम दिसून आला आहे. महाराष्ट्रात कर्जमुक्तीचा मार्ग नस्विकारता पॅकेजचा मार्ग अवलंबीला गेला. त्यामुळे जखम दुरूस्त होण्याऐवजी जास्त चिघळली. भ्रष्टाचाराचा मार्ग प्रशस्त झाला. कर्जमुक्तीचे दोन लाभ आहेत. १) हा निर्णय संपूर्ण राज्यासाठी करावा लागेल. महाराष्ट्रातील एकूण एक शेतकऱ्यांचा सातबारा कोटा झाला तर ग्रामिण भागात उत्साहाचे वातावरण निर्माण होईल, जगण्याची आशा वाटायला लागेल. नव्या जोमाने नवी सुरवात करता येईल. शेतकऱ्यांला नवे कर्ज घेता येईल. किंवा ज्यांना जमिन विकायची असेल त्याचा मार्ग मोकळा होईल. २) हा निर्णय कागदोपत्री करायचा असल्यामुळे यातून भ्रष्टाचार होणार नाही.

**५) कैफीयतीचे सार्वजनिक कार्यक्रम:—** सगळे शेतकरी एकाच जहाजातील प्रवाशी आहेत. सगळेच संकटात आहेत. अशा वेळेला एकमेकाला सावरण्याची जबाबदारी शेवटी प्रत्येकाची आहे. दु:ख कोणी ऐकले तरी सांगणाऱ्याला हलके वाटते असे म्हणतात. दुसऱ्याचे दु:ख ऐकले तर ऐकनाऱ्याच्या मनाला आधार वाटतो. मनातल्या मनात आपल्या समोरील संकटाची तुलना इतराच्या संकटाशी करून पाहिली पाहिजे. त्यातून मार्ग दिसायला लागतो. गावोगाव शेतकऱ्यांच्या कैफियतीचे कार्यक्रम झाले तर कदाचीत मनोबल गमावलेली माणसे लक्षात येतील. त्यांना आधार देता येईल. शेतकऱ्यांमध्ये संकटाचा सामुहिक मुकाबला करण्याचा आत्मविश्वास जागेल.

**६) आत्मचिंतन :—** शेतकऱ्यांविषयी कणव व्यक्त करणाऱ्याना नुसत्या शब्दाच्या फुलझडया उडवून चालणार नाही. साबनाच्या आणि टूथपेस्टच्या किमतीच्या बाबतीत कोणी खळखळ करीत नाही. मात्र दुध, साखर, किंवा कांदा महागला तर आरडाओरडा केली जाते. शेतीमाल स्वस्त मिळाला पाहिजे. किंबहूना तो आपला हक्क आहे असे अनेकांना वाटते. जे लोक असे मानतात. आरडा ओरड करतात ते शेतकऱ्यांच्या आत्महत्येला हातभार लावत असतात. हे लक्षात घ्यायला हवे. या बाबीचा अंर्तमुख होवून विचार करावयास हवा. शेतकऱ्यांच्या आत्महत्याच्या संदर्भात आपण कितपत जबाबदार आहोत याचा विचार सुरू झाला तर ती या आत्महत्या रोखण्याची खरी सुरवात ठरेल शेतकऱ्यांच्या आत्महत्या कर्जबळी किंवा सरकार बळी म्हणण्याचे धाडस त्यातून मिळू शकेल. हे धाडस आले की मग आत्महत्यांचा प्रश्न शिल्लक राहत नाही.

**संदर्भ सुची**

१. आगलावे प्रदिप, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन नागपूर (२०००)
२. Bajpai S. R., Method of Social Survey and Research, Kitab Ghar, Acharyanagar, Kanpur (1996)
३. भांडारकर पु. ल., सामाजिक संशोधन पद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मीती मंडळ, नागपूर (१९९९)
४. बोबडे प्रकाश एस., कोलाज (आर्थिक व सामाजिक चळवळी), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर २००७.
५. Chaudhari D. Paul, IntRoduction to social work, Atmaram & Son's, Delhi n` 1976.
६. Desai A. R., Peasant Struggles in India after Independence, Bombay Oxford University n` 1986.
७. देसाई दत्ता, महाराष्ट्रातील दुष्काळ, मागोबा प्रकाशन, पुणे १९८७.
८. धनागरे द. ना., साप्ताहीक माणुस, मे १९८५.
९. डुकरे संतोष, दैनिक सकाळ, पूणे आवृत्ती ८ आक्टों. २०११.
१०. जोशी शरद, बळीचे राज्य येणार आहे, जनशक्ती वाचक चळवळ, शेतकरी प्रकाशन अलीबाग २०१०.
११. जोशी शरद, शेतकरी संघटना : विचार आणि कार्यपद्धती, शेतकरी प्रकाशन, अलिबाग (रायगड) १९८२.
१२. कुलकर्णी पी. के., सामान्य समाजशास्त्र, मंगेश प्रकाशन, नागपूर २०००.
१३. मेश्राम सुरेश, समाजकार्यासाठी समाजशास्त्र, यश प्रकाशन, नागपूर २००५.
१४. Mathew George, New Economic Policy Social Development and Sociaology, Socialogical Bulletiona V. 11 (1), Mar 1995.
१५. मेश्राम सुरेश, प्रात्यक्षिक सामाजीक संशोधन पद्धती, मे. कृष्णचंद एजन्सी, नागपूर २०००.
१६. नाडगोडे गुरूनाथ, सामाजिक आंदोलने, कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे १९८६.
१७. पाळेकर सुभाष, संत्रा वाचवा : विदर्भ वाचवा, स्वत:, अमरावती २००५.
१८. पाळेकर सुभाष, ज्वलंत शेतमजुर समस्या व शेती उत्पादन, स्वत:, अमरावती १९९६.
१९. पाध्ये रमेश, शेतकरी आंदोलन, एल्गार प्रकाशन, मुंबई १९८५.
२०. सिह सुरेंद्र, भारत में समाजकार्य का क्षेत्र, न्यू रायल बुक कंपनी, वर्मा आर. बि.एस., लखनऊ २००१.
२१. साळुंखे श्रीकांत, महाराष्ट्रातील शेतकरी चळवळ, बी. रघुनाथ प्रकाशन, परभणी १९९६.
२२. शेपर्ड जॉन एम., सोशिओलॉजी, वेस्ट पब्लिशिंग कं. न्युयाक्र, १९९०, (फोर्थ एडिशन)
२३. टाकसाळे प्राजक्ता, एकात्मिक समाजकार्य, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर २००६.
२४. वसिष्ठ आशिष, दैनिक लोकमत, २० डिसें. २०१२.
२५. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी, (पुस्तक क्र. ३) २००२.
२६. Websites, www.cabdirect.org
२७. websites, http://www.bookganga.com

# गुन्हा, गुन्ह्याच्या उत्पती संबंधीचे सिद्धांत आणि गुन्ह्यांना पायबंद घालण्याच्या परिणामकारक पद्धती

**प्रा. डॉ. महेंद्रकुमार आ. जाधव,** सहयोगी प्राध्यापक समाजशास्त्र विभाग प्रमुख, नाइट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, कोल्हापूर.

**प्रस्तावना:—** सर्वसाधारणपणे 'गुन्हा' हा समाजाइतकाच प्राचीन आहे. समाजात जेव्हापासून व्यक्तिगत हिताला महत्त्व आले तेव्हापासुनच समाजातील अन्य लोकांच्या हितास अवरोध निर्माण करून समाज असंगत मार्गाने स्वहिताची पूर्ती करण्याची पद्धत काही लोकांनी अनुसरली. ह्या प्रवृतीतुनच गुन्हा आणि गुन्हेगारी प्रवृती जाणवू लागली. आपल्या समाजात कायद्याविरूद्ध वागणूक म्हणजे गुन्हा असे समजण्यात येते. याचा अर्थ असा की कायदा जर अस्तित्वात नसेल तर तेच अपकृत्य समाजाला किती घातक असले तरी गुन्हा म्हणून मानण्यात येणार नाही. 'गुन्हा' या शब्दाचा अर्थ निश्चित करताना ही गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, देशादेशांत व कालानुरूप गुन्ह्याचा अर्थ व व्याप्ती बदलत जातात. एका समाजात गुन्हा ठरणारी गोष्ट दुसऱ्या समाजात गुन्हा ठरणार नाही. किंवा एकाच समाजात एखादे वेळी गुन्हा म्हणून न समजली जाणारी गोष्ट कालांतराने गुन्हा म्हणुन मानली जाण्याचा संभव आहे. एकेकाळी मुंबई राज्यात १९४६ साली द्विभार्या प्रतिबंधक कायदा अंमलात आला, त्यानुसार पहिली पत्नी ह्यात असताना दुसऱ्या स्त्रीशी विवाह करणे कायद्याविरूद्ध मानण्यात येऊ लागले. परंतु हा कायदा अस्तित्वात येण्यापूर्वी एकाच वेळी अनेक पत्नी असणे हे कृत्य गुन्हा म्हणुन दंडास पात्र नव्हते. थोडक्यात गुन्हा ही सापेक्ष संकल्पना आहे. त्यामध्ये स्थान व कालमानापरत्वे बदल दिसुन येतो. तसेच गुन्ह्याचे स्वरूप ही कालसापेक्ष असते. ज्या गोष्टी करण्यास कायद्याने मनाई केली आहे आणि ज्या केल्यास कायद्याने शिक्षेची तरतूद केली आहे त्या गोष्टींना गुन्हा असे म्हणतात.

**संशोधनाची उद्दिष्टे:—** १) गुन्हा म्हणजे काय हे समजुन घेणे. २) गुन्ह्याच्या उत्पतीसंबंधीचे सिद्धांत समजुन घेणे. ३) गुन्ह्यांना पायबंद घालण्याच्या पद्धतीचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धत:—** सदरचा संशोधन निबंध हा दुय्यम साधन सामग्रीवर आधारित आहे. ह्यामध्ये दुर्मिळ ग्रंथाचा वापर केला आहे.

**गुन्ह्याच्या उत्पतीसंबंधीचे सिद्धांत:—** गुन्ह्याची कारणे काय या संबंधीच्या आपल्या ज्या कल्पना आहेत त्यांची एकदा उजळणी व फेरतपासणी करणे हे समाजशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाचे काम आहे. गुन्हे घडण्याची प्रत्यंत जी जी कारणे आहेत ती अजून समाधानकारकरित्या निश्चित करता आलेली नाहीत. पूर्वीच्या शास्त्रज्ञांच्या मते या कारणांचा तपास करणे ही एक सोपी गोष्ट होय. आधुनिक शास्त्रज्ञांच्या मते ही एक गुंतागुंतीची समस्या आहे. परंतु गुन्ह्यांची संपूर्णरित्या कारणमीमांसा करणे अजुन शक्य झाले नाही.

**गुन्ह्याच्या उत्पतीसंबंधीची प्राचीन मते:—** मानव गुन्हेगारी करण्यास प्रवृत का होतो किंवा त्या ठायी पापप्रवृति कशामुळे निर्माण होते ह्याची जुन्या पंडितांची उत्पति अशी की, गुन्हेगार हा मूलत:च दृष्ट प्रवृतीचा, अधोगामी असतो. काही माणसांना आपल दृष्ट प्रवृतीची जाणीव असते, म्हणून ते निरनिराळया मोहावर ताबा मिळविण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांचा हातुन गुन्हा घडत नाही. दुसरी काही माणसे अशी आहेत की, त्यांना आपल दृष्ट प्रवृतीची चांगली जाणीव असते. परंतु असे असूनही ते पापमार्गाचा बुद्धी परस्पर अवलंब करतात म्हणजे गुन्हेगारांचे जीवन ते आपणहुन पसंत करतात. थोडक्यात गुन्हेगार म्हणजे पापप्रवृती नुसार समाजद्रोही किंवा बेकायदेशीररीत्या कृत्य करणारा माणूस होय. दृष्ट लोकांची संगत, दारिद्रय आणि इतर बाबतीतील अतृप्तता इत्यादी घटक हे पंडीत अमान्य करीत नाहीत. परंतु या ऐहिक संकटांना व्यक्तीने, आलेल्या परिस्थितीत राहुनच तोंड दिले पाहिजे किंवा प्रसंगी प्राणाला मुकावे लागले तरी चालेल परंतु आपल्या संस्कृतीच्या चाकोरीच्या बाहेरचे वर्तन करू नये असे जुन्या पंडितांचे मत.

एखादा मनुष्य गुन्हेगारी करू लागला म्हणजे असे समजण्यास हरकत नाही की, त्याला त्याची कर्तव्याची तरी जाणीव नाही. किंवा तशी जाणीव असुनही तो मुद्दामच अपकृत्य करीत आहे हा दृष्टीकोन जुन्या पंडीताचा आहे. असे आपणवर नमुद केले असले तरी आजही बऱ्याच विद्वानांनी या मताला दुजोरा दिला आहे. उदाहरणार्थ एखादी अडाणी भोळया किंवा अबुद्धीमान गुन्हेगाराला जी शिक्षा दिली जाते तिच्या मानाने एखाद्या सराईत व अटळ गुन्हेगाराला दिली जाणारी शिक्षा किती तरी कडक स्वरूपाची असते. बालगुन्हेगाराबद्दल ही न्यायालयांचा असा एक समज रूढ असल्याचे आढळते की एका विशिष्ट वयोमर्यादेच्या खालच्या मुलांना आपली कर्तव्ये काय आहेत याची जाणीव नसते. किंवा त्यांची मने संस्कारक्षम असल्यामुळे त्यांचावर दृष्ट व दुराचारी लोकांचा वर्तुणकीचा वा तत्वज्ञानांचा चटकन परिणाम होतो.

जुन्या पंडितांचा या मत प्रणालीचा परिणाम गुन्हा व गुन्हेगार यांचा बाबतचा उपाययोजनेवर ही झाल्याखेरीज राहिला नाही. एखाद्या गुन्हेगारीला आपल्या कर्तव्याची जाणीव नाही, किंवा जाणीव असुनही त्याने गुन्हेगारी जगात स्वेच्छेने पर्दापण केले हे तत्व मान्य केले की, त्याला आपल्या कर्तव्याची बरोबर जाणीव करून देण्याचे किंवा समाजकंटकाचे जीवन फार कठीण व असह्य असते याची जाणीव करून देण्याचे काम अर्थातच समाजावर येऊन पडते. आपणाला आज जे गुन्हे अगदी क्षुल्लक वाटतील अशा गुन्हेगारीबद्दल ही फार कडक शिक्षा देण्यात येत असत.

दंड अथवा शिक्षा देण्यामागे दोन हेतु असत. अ) गुन्हेगारांची सुधारणा करणे. ब) समाजाचे रक्षण करणे हे दोन हेतु साध्य होण्याकरीता लोकांवर वचक बसविणे आवश्यक असते, आणि गुन्हेगारांना कडक शिक्षा करून त्यायोगे सुप्त गुन्हेगार प्रवृती असलेल्या लोकांचे मनात शिक्षेविषयी भिती निर्माण करणे या एकच मार्गाचा यासाठी अवलंब करावा लागतो. याशिवाय आणखी एक अशी धार्मिक समजुत होती की गुन्हेगाराला कडक शिक्षा दिल्यामुळे तो पापमुक्त होतो. या मतानुसार गुन्हा म्हणजे एक प्रकारचे पापच समजले जाई आणि हे पाप जर नष्ट करावयाचे असेल तर पापी माणसाने भयंकर यातना व क्लेश सहन केले पाहिजेत. त्यामुळे गुन्हेगार जितकी तीव्र शिक्षा उपभोगी किंवा सहन करी, तितके त्यांचे पाप अधिक प्रमाणात नाहीसे झाले असे समजावे आणि गुन्हेगार या जगात पापमुक्त झाला की मरणोतर जीवनात त्याला साहजिकच याचा फायदा झाल्याखेरीज राहणार नाही. या सिद्धांताद्वारे शिक्षेचा कित्येक प्रकारांचे समर्थन केले जाई.

गुन्ह्याविषयी अलीकडे बघण्याच्या म्हणजे आधुनिक दृष्टिकोनावर या धार्मिक समजुतीवर आधारलेल्या सिद्धांताचा बराच परिणाम झालेला दिसतो. गुन्हेगाराची सुधारणा घडवून आणणसाठी जे सुधारक प्रयत्न करीत आहेत त्यांचे निरीक्षण असे की, शिक्षेमुळे गुन्हेगारांचा वागणुकीत मुळीच सुधारणा होत नसुन, समाजातील सुप्त गुन्हेगारावर ही तिचा परिणाम होत नाही. म्हणजे प्रस्थापित गुन्हेगारांना जबर शिक्षा दिल्यामुळे त्यांचा मनात शिक्षेविषयी जे एक भितीचे वातावरण

निर्माण व्हावयास पाहिजे तसे ते मुळीच होत नाही. अर्थातच शिक्षेऐवजी दुसरे काहीतरी खऱ्या अर्थाने कार्यक्षम व परिणामकारक अशी उपचार पद्धती शोधुन काढावी असे या सुधारकांना सुचवायाचे असते. शिक्षेने गुन्हेगार सुधारू शकत नाहीत यावर जुन्या पंडितांचा ही विश्वास आहे. तथापि गुन्हा पाप असुन गुन्हेगारांचा पापाचे पालन होण्याकरीता त्याला कडक शिक्षा करणेच योग्य वा अपरिहार्य आहे असे ते प्रतिपादन करतात.

**गुन्ह्याच्या उत्पतीसंबंधीची आधुनिक मते:—** जुन्या पंडितांचा गुन्ह्याच्या उत्पतीसंबंधीची विचारसरणी आणि आधुनिक पंडितांची त्या संबंधीची विचारसरणी यामधील भेद लक्षात घेणे अगत्याचे आहे. आधुनिक पंडितांची मते सर्वच बाबतीत तंतोतंत लागु पडतात असे म्हणणे चुकीचे असले तरी, गुन्हा उत्पतीचा समाजशास्त्राचा दृष्टिकोनातून अभ्यास करणाऱ्या बहुतेकांना त्यांची मते मान्य आहेत. गुन्ह्याच्या उत्पतीचे विश्लेषण करताना आधुनिक विचारवंताना जी गोष्ट प्रथम आढळून आली ती अशी की, इतर वर्तन प्रकार ज्या मार्गाने दृढ होतात त्याच मार्गाने गुन्हा हा वर्तन प्रकार ही दृढ होतो. व्यक्तीचे त्याच्या संस्कृतीशी आंतरिक संबंध पक्के होत जातात व या संबंधाच्या अनुषंगाने त्याचा आपल्या परिस्थितीशी प्रकिया होत असतात. यापैकी काही प्रतिक्रिया त्यांचेकडून निश्चित केल्या जातात. व त्या प्रकिया म्हणजे त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्ये होऊन बसतात, म्हणजे त्याचे विशिष्ट वर्तन प्रकार कायम स्वरूपाचे व निश्चित असे होतात. आपणाला हे वर्तन प्रकार जन्मत:च अवगत नसतात. संस्कृतीशी व परिस्थितीशी आपल्या ज्या आंतरक्रिया घडतात त्यातुन हे वर्तन प्रकार दृढ होतात. अनुभवाद्वारे ते आपण शिकतो. गुन्हा हा वर्तन प्रकार इतर वर्तन प्रकाराप्रमाणेच परिस्थितीजन्य असतो तेव्हा आपणाला असे सुचवायचे आहे की, मनुष्य गुन्हेगार प्रवृती घेऊन जन्माला येत नाही. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास 'मनुष्य जन्मत:च गुन्हेगार नसतो' त्याचे सर्व अनुभव जमा करून शेवटी तो गुन्हेगाराचे जीवन जगविण्याचे ध्येय निश्चित करतो. परंतु या विधानाचा चुकीचा अर्थ लावला जाणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. गुन्हेगार प्रवृती निर्माण होण्यास अनुकरण हा घटक प्रभावी असला तरी केवळ अनुकरणानेच मनुष्य गुन्हे करू लागतो असे म्हणता येणार नाही. व्यक्ती अभिरूची महत्त्वकांक्षा व वर्तन प्रकार यांची वाढ एका विवक्षित दिशेने होऊ लागते, आणि त्यातुनच पुढे गुन्हे करण्याची प्रवृती बनत जाते.

वृद्ध गुन्हेगाराच्या वर्तन प्रकारांचे अनुकरण केल्यामुळे नवोदित गुन्हेगार गुन्हे करतात असे म्हणणे योग्य नाही हे स्पष्ट होते. गुन्हेगार प्रत्यंत गुन्हा कसा करावा हे शिकत नाहीत, तर वर्तन प्रकार, स्थिर प्रवृती, मुल्ये ही शिकतात आणि यांचाच परिणाम गुन्हेगारी वृती हीच आदर्शभुत आहे असे मानण्यात येते. योग्य तऱ्हेने विशिष्ट समंत मार्गांनी आपली ध्येय गाठणे अथवा आपल्या दैनंदिन गरजा पुरविणे माणसाला अशक्य होते त्याचवेळी तो कुमार्गाचा अवलंब करतो. आणि त्याच तत्वानुसार गुन्हेगारांना आपले खुंटलेले व्यक्तिमत्व विकसित करण्यास वाव दिला जातो. आपल्या आशा—आंकांक्षाची व दैनंदिन गरजांची पूर्ती होवून स्वत:च्या विकासास पूर्ण संधी मिळाली की कुमार्गापासून ते साहजिकच परावृत होतात. मात्र येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे आणि ती ही की, आत्मविकास अथवा व्यक्तिविकास होण्यास त्या व्यक्तीची संस्कृती तशी संपन्न असावी लागते. नाहीतर त्या व्यक्तीच्या नैसर्गिक शक्तींना योग्य मार्गदर्शन व संधी न मिळाल्यामुळे त्याचा तो विघातक गोष्टीसाठी उपयोग करीत. वर्तनप्रकार, स्थिर प्रवृती, मुले यांचा शेवट 'गुन्हा' या सदरात मांडणाऱ्या वर्तनात होऊ लागला की, कालांतराने हाच वर्तन प्रकार दृढमुल होऊन बसतो.

गुन्हेगारांच्यांत व्यक्तिगत काही ही भेद अथवा अपवाद असले तरी, गुन्हेगारांचा एक गट या दृष्टीने विचार केल्यास असे आढळून येईल की, शारिरीक व मानसिक दृष्ट्या ते अगदी सामान्य व सर्वसाधारण असे म्हणतात. आरोग्य, शारिरीक बळ आणि मानसिक वाढ या दृष्टीने गुन्हेगारांचा विचार केल्यास ते सर्वसामान्य माणसाप्रमाणेच असतात असे आढळून येते. त्यांचे वर्तन हे मात्र सर्वसामान्य प्रकारचे नसते याबाबत शास्त्रज्ञात असे काही मतभेद आहेत. प्रो. गिलीन यांनी आपल्या ग्रंथात याचा उल्लेख केला आहे. ते म्हणतात की, एका गटाचे मते गुन्हेगारामध्ये काही मानसिक विकृती असते तर गटाचे मते गुन्हेगारांची बुद्धी इतर लोकांच्या बुद्धीपेक्षा तीव्र असते, तर काही इतर शास्त्रज्ञांचे म्हणणे असे की, गुन्हेगारांचा बुध्यांक फारच कमी असतो.

गुन्हेगारी वर्तन आणि बुध्यांक यांचा काहीसा संबंध असल्याचे प्राचीन अभ्यासकांनी मान्य केले आहे. सर्वसाधारण लोकांच्या बुध्यांकाबरोबर तुलना केली असता गुन्हेगारांचा बुध्यांक निश्चित कमी असतो हे मत अधिक लोकप्रिय झाले आहे. परंतु हे मत चुकीचे आहे आणि ही चूक घडण्याची कारणे दोन प्रकारची आहेत. पहिली चूक अशी की, हे शास्त्रज्ञ असे गृहित धरतात की, गुन्हेगार म्हणजे ज्याला शिक्षा झाली आहे तो परंतु असे कित्येक आरोपी असतात की, ज्यांनी प्रत्यक्ष गुन्हे केलेले असतात परंतु ते शाबीत होऊ शकत नाहीत व म्हणून त्यांना त्या आरोपातून मुक्त करण्यात येते. दुसरी चूक अशी की, बुद्धीमतेचे मापन निश्चितरित्या करता येते यावर या शास्त्रज्ञाचा विश्वास बसतो. बुद्धीमता ही फार गुंतागुंतीची बाब असून तिचे साध्या सोप्या पद्धतींनी मापन करता येते व ते अचूक असते असे म्हणणे गैर आहे.

त्यामुळे गुन्हेगार आणि बुध्यांक यांचा निश्चित संबंध आहे असे आपण मान्य करू शकत नाही. म्हणून गुन्ह्यावर प्रतिबंधक उपाय योजताना कमी बुद्धीचा वा विकृत मनोवृतीच्या गुन्हेगारांचे निर्मुलन करावे या कार्यपद्धती वर ही आपण विश्वास ठेवू शकत नाही.

काही शारिरीक दोषामुळे मात्र गुन्हे करण्यास प्रवृत झाल्याची उदाहरणे सांगता येतील. परंतु त्याला सुद्धा एक विशिष्ट परिस्थितीची आवश्यकता असते. उदा. एखाद्या शारिरीक व्यंगामुळे नोकरी किंवा अन्य कामधंदा मिळत नसेल, आणि त्यामुळे सभ्य न्याय मार्गांनी उपजीविका करणे अशक्य झाले असेल तर मात्र गुन्हा करण्याची वृती निर्माण होणे शक्य आहे. शारिरीक दोषामुळे मनुष्याचा जगाकडे पहाण्याचा दृष्टिकोन दूषित होण्याचा संभव असतो. जग म्हणजे आपला शत्रू आहे अशी त्याची भावना होते. स्वत:च्या असमर्थतेची ही त्याला तीव्र जाणीव होऊ लागते. यामुळेच त्यांचे भावनात्मक जीवन त्याला जगाशी तडजोड करण्यास अपात्र ठरवते. भावनेची घडी विस्कटल्यामुळे त्या व्यक्तीच्या हातुन जे विकृत वर्तन प्रकार घडतात त्यापैकीच गुन्हा हा एक वर्तन प्रकार असतो.

**गुन्ह्यांना पायबंद घालण्याच्या परिणामकारक पद्धती:—** गुन्हा घडण्यापुर्वीच काही उपायांचा अवलंब केल्यास गुन्ह्यांना प्रतिबंध केल्यासारखे होईल असे प्रतिबंधात्मक उपाय अनेक प्रकारचे आहेत. उपायांचा सरास उपयोग करता येत नाही. त्यांचा उपयोग करता येईल अशी क्षेत्रे फार कमी आहेत. गुन्हा प्रतिबंधक उपाययोजनेवर या जनमताचा प्रतिकुल परिणाम झाल्याखेरीज राहत नाही. प्रतिबंधक उपाय योजताना, ते ज्या संस्कृतीच्या लोकाकरिता उपयोगात आणावयाचे असतात त्यांची संस्कृती विचारात घ्यावी लागते.

वस्तुस्थिती या ज्ञानाचा अभाव आणि गुन्ह्यासंबंधीच्या संशोधनाविषयीची लोकांची उदासीनता या प्रतिकुल गोष्टींना तोंड द्यावे लागत असल्यामुळे गुन्हा प्रतिबंधक योजनांचे क्षेत्र फार मर्यादित कसे झाले आहे त्यांचा थोडक्यात उल्लेख पुढीलप्रमाणे आहे. १. एखाद्या व्यक्तीत गुन्हेगार प्रवृतीची वाढ करण्यास कोणते घटक अनुकूल आहेत याचा अभ्यास करून घरातील कौटुंबिक मंडळी व संभाव्य अपराधी यांचे संबंध अधिक सलोख्याचे व्हावेत म्हणून मुलांना मार्गदर्शन करणारी चिकित्सा केंद्रे उघडणे. २. उनाड मुले व संभाव्य अपराधी यांचे बाबतीत संशोधन करण्यास मदत करणाऱ्या शाळा प्रमुखांची नोंद करणे. ३. बाल गुन्हेगार व बाल अपराधीकरता स्वतंत्र न्यायालये व तज्ञ कामगार यांची योजना करणे. ४. अपराध प्रवृतीची नवीन कारणे सापडल्यास त्यांना लगेच प्रसिद्धी देणे. ५. अनाथाश्रम काढणे त्यांची संख्या वाढविणे. ६. कमी सवलती मिळणाऱ्या लोकांकरिता वसाहतीची व करमणुकीची साधने उपलब्ध करणे. ७. रेडिओ, वर्तमानपत्रे, चलचित्रपट यांच्याद्वारे अपराध प्रवृतीस उतेजन मिळू नये म्हणून त्यांच्या कार्यक्रमावर व बातम्यांवर नियंत्रण घालणे. ८. कौटुंबिक संबंध अधिक दृढ करणारे कार्यक्रम आखणे. ९. गुन्ह्याच्या समस्येवर लोकांनी ही आपले लक्ष केंद्रित करून ती समस्या सोडविण्याकरीता त्यांचे सहकार्य लाभावे म्हणून तसा प्रसार करण्याकरिता मंडळीची स्थापना करणे. १०.लोकांतील विघातक प्रवृतींना आळा घालण्याकरता मानसिक आरोग्य टिकविणाऱ्या योजना अंमलात आणणे.

**संदर्भ ग्रंथ**


१. भा. कि. खडसे: भारतीय समाज आणि सामाजिक समस्या, हिमालया पब्लिशिंग हाऊस, नागपूर.
२. पी. के. कुलकर्णी: भारतातील सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन नागपूर, १९९८.
३. Ram Ahuja: Rawat Publication, Indian Social Problem Jaipur, 2002.
४. G. R. Madan: Indian Social Problem, Allied Publications Pvt Limited, 1966.


# स्त्री आणि कौटुबिंक हिंसाचार: एक सामाजिक अध्ययन

**उर्मिला नारायण टोहने**, एम. ए. समाजशास्त्र, एम. एस. डब्ल्यु., सेट, द्वारा. बी. जामगडे, १६, हिवरीनगर, नागपूर ०८.

**प्रस्तावना:—** भारतीय समाज विविधतेनें नटलेला आहे. भारतीय समाजामध्ये स्त्रीयांच्या संदर्भातं दोन दृष्टीकोन आढळुन येतात. एक म्हणजे स्त्री आणि पुरूष यांना समान समजण्यात येते. किंबहुना काही बाबती मध्ये स्त्रीयांना पुरूषापेक्षा श्रेष्ठ समजण्यात येते. त्यांना देवतेचे प्रतीक समजुन दुर्गा, सरस्वती, लक्ष्मी इ. पुज्य मानण्यात येते. तर दुसऱ्या बाजुला हीन समजून त्यांना सर्व अधिकारां पासुन वंचित ठेवण्यात येते. दर दिवशी वर्तमानपत्रे उघडलेले की, आपल्याला स्त्रीयां वरील अत्याचारांच्या अनेक बातम्या दिसतात. कुठे हुंडाबळी, कुठे बलात्कार, तर कुठे लैगिंक छळ इ. प्रकारे स्त्रीयांवर होणारे अत्याचार पाहीले तर, स्वातंत्र्याच्या अर्ध शतकानंतरही आपण स्त्री पुरूष समानता प्रस्थापित करू शकलो नाही. स्त्रीयांना कमी लेखणे हा दृष्टीकोन पारंपारिक असला तरी तक्रशुद्धही नाही. स्वतंत्र भारतामध्ये घटनात्मक लिंगभेदाबाबत बरेच कायदे असलेतरिही मात्र सामाजिक लिंगभिन्नता सर्वत्र पाळली जाते. त्यामुळे स्त्रीयांवरील अत्याचाराची संख्या कमी होत नाही. विविध प्रकारे स्त्रियांची पिळवणुक केली जाते. स्त्रीयांचा प्रवास दिव्यातुन जातो असे दुर्देवाने म्हणावेसे वाटते. एकंदरीत महिलांबाबत सामाजिक स्थितीचा आढावा घेतांना आपनास आजही भारतीय समाजव्यवस्थेमध्ये महिलांबाबत निम्न पाखंडी मानसिकतेचे दर्शन घडुन येते व यामुळे दिवसेंनदिवस महिलांची सिथती बिघडतच जात आहे असे निदर्शनास येते.

समाजव्यवस्थेमध्ये महिलांना विविध भुमिका पार पाढतांना त्यांना विविध स्तरावर विभिन्न अन्याय व अत्याचारांना बळी पडावे लागते. महिलांवरिल अन्याय व अत्याचार कुंटूबातुन सुरू होवून सर्वच स्तरावर त्यांना निम्न व अन्याय.अपमानजनक स्थितीला समोरे जावे लागते. सामाजीक, आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य किवा राजकिय संदर्भ किंवा व्यवहाराबाबत नेहमी महिलांची अवमानान व निम्न स्थान देण्याच्या भारती जनमानसिकतेमुळे त्यांची भावना, क्षमता, ज्ञाण, कौषल्य याचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष दमन होत असल्याचे दिसुन येते. स्त्री ही कोणत्याही वयातील, वर्गातील, जाती, धर्मातील किंवा कोनत्याही आथिक स्तारातील असली तरीही, तिला अन्यायजनक स्थितीला समोरे जावे लागते व बहुतेकदा या अन्यायजनक स्थितीला विरोध करतांना किंवा सहन करताना बहुतेकदा तीचाबाबतीत शारीरीक, मानसिक, भावनिक, सामाजिक, आर्थिक छळ आणि हिंसाचार होतांना दिसुन येते. प्रत्येक राष्ट्राने महिलांकरिता संरक्षनात्मक अनेक कायदे केलेले आहेत परंतु जागतिक पुरूषप्रधान संस्कृतीच्या प्रभावाने महिलांना मात्र आजही निम्न व दुयम स्थान समजण्याची पुरूषप्रधान मानसिकता कमी झालेली दिसत नाही.

स्वतंत्र भारतामध्ये महिलांच्या संरक्षनात्मक भारतीय घटनेव्दारे अनेक कायदे व तरतुदी केलेल्या आहेत ज्यामध्ये विवाहसंदर्भात कायदेशिर विवाह, शुन्य विवाह, हुंडाविन्मुलन, घरघुती हिंसाचार, कायदेशिर घटस्फोट, पाटगी, १८ वर्षाखालिल मुलांच्या ताबा व संगोपन व त्याचा खर्चप्राप्तीचा हक्क, पती व पालकांच्या संपत्तीमध्ये समान हिस्सा. कामगार महिलांबाबत महिलांचे कामाचे तास व कार्यस्थिती, महिलांच्या मातृत्व रजा व रजेतंर्गत वेतन, कार्यस्थळी लिंगभेद व लैंगिक अत्याचार संरक्षण अधिकार, आरोग्य विमा व सामाजिक संरक्षण हक्क. मागासवर्गिय व अपंग महिलांसाठी कायदा करून स्त्रियांना न्याय, समता व भेदभाव दुर करणारे कायदे अस्तित्वात आहेत. कौटुंबिक हिंसाचार कायदा २००५ ला पारीत केला असुन २६ ऑक्टोंबर २००६ पासुन याची अंमलबजावनी सुरू झालेली आहे तरी सुद्धा स्त्रियांवरील कुटुंबामध्ये कुटुंबाबाहेर हिंसाचार वाढत असल्याचे विदारक चित्र आज आपनास दिसुन येते.

**महिलाबाबत सामाजिक धारणेची ऐतिहासीक पार्श्वभूमी:—** इतिहास पुर्व संस्कृति मध्ये स्त्रियांच्या उत्पादनातील आणि पुनरूत्पादनातील योगदान अत्यंत मोलाचे होते. कृषीप्रधान समाजाला स्त्रियांची सफलता पवित्र मानली गेली होती.स्त्रियांना स्व: चा जोडीदार स्वयंवराद्वारे निवडीचे स्वतंत्र असलेल्या काळातही, एका परीटाच्या सांगण्यावरून सीतेचा त्याग करणारा राम, भर राज्य सभेत द्रौपदीला विवस्त्र करणारा दुर्योधन, कर्ज फेडण्या साठी तारामतीला विकणारा हरीशचंद्र इत्यादी अनेक उदाहरणे दिसुन येतात. वैदिक

कालखंडात पितृसत्ताक व्यवस्था असली तरिही स्त्रियांचा दर्जा होता व त्यांचे जिवन हे सुखी, समाधानी होते परंतु याचकाळात वैदिक संहिता, उपनिषिदे, स्त्रियांची कार्यक्षेत्र मर्यादीत करून त्यांना शिक्षण आणि राजकारणापासुन अलिप्त ठेवण्यात आले.

मध्ययुगिन कालखंडात सुलतानशाही ने स्त्रियांवर अनेक बंधने घातली.लढाईत पराभुत झालेल्या हिंदु स्त्रियांवर अन्याय व अत्याचार केले. याच काळात, बालविवाह, सतीप्रथा, विधवा महिलांची समस्या इ. अनेक समस्या निर्माण झाल्या. ब्रिटीश राजवटीत स्त्रियांच्या संदर्भात विविध कायदे करून न्याय देण्याचे कार्य केले आहे.तसेच हिंदु कोडबिल मध्ये स्त्रियांना एक प्रकारचा दर्जा, अत्याचार कमी व्हावा या करीता कायदे केले आहे. परंतु पुरूष प्रधान संस्कृतिला मान्य नसल्याने या हिंदूकोड बिलाचा उपयोग झाला नाही. सर्व नागरीकांना सामाजिक, राजकीय व आर्थिक न्याय , विचार, अभिव्यक्ती, समानता, बंधुभाव व स्वतंत्रता जोपासली जावी अशी भारतीय राज्यघटना आहे. घटनेतील कलम १४ नुसार स्त्री पुरूष समानता, १५ व्या कलमात नौकरी व इतर हक्क देतांना भेदभाव करण्यास प्रतिबंध. तसेच हिंदूच्या सामाजिक रूढीतील व कायद्यातील दोष टाळण्यासाठी अनैतिक व्यापाराला आळा घालणारा कायदा, हुंडाबळी कायदा, पुनर्विवाह कायदे तयार करून प्राचीन काळापासुन चालु असलेली जाचक चालीरीती बंद केल्या. त्याच बरोबर महिला व बालविकास मंत्रालय स्थापन करून दर्जा उंचावण्याचे प्रयत्न करत आहेत. स्त्रीयांचे क्षेत्र फक्त “चुल आणि मुल” इतकेच मर्यादीत करण्यात आले आहे. तीने घर सांभाळले म्हणजे झाले ती घराची शोभा आहे अश्या प्रकारचा विचार आजपर्यंत ग्रामिण व शहरी भागात कमी अधिक प्रमाणत आहे. स्त्री ने पर पुरषाशी बोलणे पाप समजले जायचे असा स्त्रीयांकडे समाजाचा बघण्याचा दृष्टीकोन वाईट प्रकारचा होता. आजसुद्धा समाजामध्ये या प्रवृत्तीमध्ये फारसा बदल झाला नाही. अश्या प्रकारची विकृत मानसिकता समाजामध्ये होती. आणि आजपर्यंत सुरू आहे.

**अध्ययनाचे उद्देश:–** १. महिलांबाबत सामाजिक दृष्टीकोण व भुमिका तसेच महिला संरक्षनात्मक कायदे व तरतुदींचा समाजावरिल प्रभावाचे अध्ययन करने. २. कौंटुबिक हिंसाचाराचे स्वरूप, कारणे व समाज विशेषत्वाने महिलांवरिल परिणामाचे अध्ययन करणे.

**गृहीतकृत्ये:–** एतिहासीक काळापासुन पुरूषप्रधान संस्कृतीच्या पारंपारीक प्रभाने ग्रसित समाजाच्या महिलांबाबत दृष्टीकोण व भुमिका नेहमी गौण व दुयम दर्जाची राहिलेली असुन महिलांवरिल अत्याचार व छळ हे सदर दृष्टीकोण व भुमिकेंचा परिणाम आहे.

**अध्ययनाची योजना व पद्धती:–** प्रस्तुत अध्ययनाकरिता परिचयात्मक व विश्लशनात्मक आराखडयाचा उपयोग केलेला असुन आज भारतीय समाजव्यवस्थेमध्ये महिलाची स्थिती व समस्यांचा परिचय व विश्लेषन सदर आराखडा अंतर्गत केलेले आहे. सदर अध्ययनाकरीता प्राथमिक तथ्य स्त्रोतांतर्गत शास्त्रिय निरिक्षण व असंरचित मुलाखतींचा उपयोग करण्यात आलेला असुन टिपनवही व मुलाखत मार्गदर्शिकाव्दारे प्राथमिक तथ्यांचे संकलन करण्यात आले. द्वितीयात्मक तथ्य स्त्रोतांतर्गत संदर्भग्रंथ, मासिके, साप्ताहिके, नियतकालीके व इंटरनेटवरील माहीती संकलीत करण्यात आली असुन गुणात्मक पद्धतीने तथ्यांचे विश्लेषण करण्यात आले.

**परिचर्चा व तथ्यात्मक विश्लेषण:–** स्त्री आणि पुरूष हे दोघेही नैसर्गिक दृष्टया समान आहेत. परंतु मानवनिर्मित समाजव्यवस्थेने लिंग भेदाच्या आधारावर पुरूषाला श्रेष्ठ व स्त्री ला गौण स्थान दिले. हे आपल्याला उत्तर वैदिककाळ, स्मृतीकाळ, धर्मशास्त्र काळ, मध्ययुगीन काळ, स्वातंत्र्यपुर्वीचा काळ, स्वातंत्र्य नंतरचा च्या काळातील स्त्रीविषयी ईतिहासाचा अभ्यास केल्यानंतर असे निर्देशनास येते. भारतात पुरूष प्रधान संस्कृतिचा पगडा होता. आणि आजही आहे. महिलांवरील अत्याचार हे प्राचीन काळापासुन सुरू असुन महाभारतातील युधिष्ठीराने आपल्या पत्नीस जुगारावर लावले होते तसेच रामायणातील रावनाने सितेला पळवुन नेले होते असे उदाहरणे आपल्या भारतीय संस्कृतीमध्ये आहेत. एकंदरीत स्त्रीयांवर होणारे अत्याचार प्राचीन काळापासुन आजपर्यंत आहे. आज पुरूषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात स्त्रीया कामकरीत असुन स्त्री पुरूष समानता सर्वत्र दिसते असे नाही. बदलत्या सामाजिक परिस्थितीत स्त्रीयांनी आपली प्रगती करून घेतली असली तरी देखील अनेक ठिकाणी स्त्रीयांची फसवणुक केली जाते. स्त्रीयांची फसवणुक करून त्यांना वेश्या व्यवसायासाठी विकणारे प्रवृत्त करणारे देखील या देशात आहेत. उच्चपदस्थ लोक विविध कारणांसाठी व फायदयासाठी स्त्रीयांचा वापर करतात.दिवसेनदिवस लोकांमध्ये वाढत जाणाऱ्या अलिप्तता ही देखील आज स्त्रियांना घातक ठरत आहे.

**कौटुंबिक हिंसाचार:–** घरगुती हिंसाचाराची समस्या अधिक गंभीर होत चालेली आहे. स्त्रीयांच्या आयुष्यात अनेक वाईट प्रसंग निर्माण होतात. कौटुंबिक आनंद हा स्त्रीयांसाठी क्षणभगुंर असतो. पती, सासु, सासरा, दीर, नणंद, इ. व्यक्ती कडून कौटुंबिक त्रास सुरू होतो. घरातील लक्ष्मीला बाटीक (नोकर) म्हणुन वावरावे लागते. थोडक्यात घर हे मंदीर असते व त्या मंदीर मधील स्त्री ही देवता असते. “परंतु ना घर, ना देवत्व” अशी स्त्री ची अवस्था झाली आहे. म्हणुन कौटुंबिक हिंसाचार एक सामाजिक प्रश्न निर्माण होतो. विवाहीत स्त्री ने तीचा पतीचा व नातेवाईकांचा होणारा त्रास सहन करीतच जीवन जगावे. असा नियम स्त्रियांसाठी आहे असे वाटते. “तोंड दाबुन बुक्यांचा मार” या म्हणी प्रमाणे सासरच्या लोकांचा अन्याय सहन करीत जीवन जगावे नाही तर जिवन संपावे एवढेच. या सर्वांचा हेतु एकच कौटुंबिक छळ आहे.

भारतीय समाजामध्ये हुंडापद्धतीने तर स्त्रीचे संपुर्ण जीवन होरपळुन टाकलेले आहे. अतिशय उग्र स्वरूप धारण केलेले आहे. नववधुला जाळणे, मारणे, उपाशी ठेवणे, टोचुन बोलणे इ. प्रकार सर्रासपणे आढळतो. तसेच बलात्कार, विनयभंग, पळुन नेणे, भृणहत्या, ठार मारणे, इ. प्रकार मोठया प्रमाणात आढळुन येते. अगदी घरात देखील मुलगामुलगी हा भेदभाव केला जातो. स्त्री पुरूष समानतेचे शिक्षण शाळेत मिळावे असे शासकीय धोरण असले तरी देखील लिंगभिन्नता सर्वत्र पाळली जाते. त्यामुळे स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचारीची संख्या कमी होत नाही. विविध प्रकारे स्त्रियांची पिळवणुका केली जाते. ज्या ठिकाणी स्त्रीया काम करतात त्या ठिकाणी पुरूष मंडळी स्त्रियांना कमी लेखतात त्यांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रित्या त्रास दिला जातो. लैगिक छळाची अनेक प्रकरणे दरदिवशी आपल्या वाचनात येतात.

**कौटुंबिक हिंसाचाराचे स्वरूप व कायदा:– कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा २००५ व नियम २००६** – एखादी कृती महिलेच्या मानसिक किंवा शारीरीक आरोग्य सुरक्षितेस, जिवितास, अवयवास, जिवितास, कल्याणास धोकादायक, अपायकारक, उपद्रवी असेल किंवा तसे करण्याकडे कल असेल आणि ज्यामध्ये महिलेचे शारीरीक, लैगिंक, भावनिक, तोंडी किंवा आर्थिक दुरूपयोग होत असेल अश्याप्रकारचे मानभंग, मानहानी करणारे किंवा महिलेच्या प्रतिष्ठेवर इतर मार्गांनी अतिक्रमण करणारे कृत्य अपमानकारक, उपहासात्मक विशेष करून मुल नसल्यामुळे

किंवा महिलेला आर्थिक प्राप्ती मिळत असेल किंवा त्यास प्राप्त असेल त्यास हानी पोहचेल अश्या गोष्टींचा कौटुंबिक हिंसाचारात समावेश होतो. एकाच कुटूंबात राहणारे पुरूष पक्षाचे नातेवाईक स्त्रीला मारहाण शिविगाळ करीत असतील, तिला हुंडयाची मागणी करून धमकावीत असतील, घरातुन काढत असणार, तिला दररोज लागणाऱ्या गरजांपासुन वंचित  करत असतील, कौटुंबिक हिंसाचारात शारीरीक, मानसिक, लैंगिक, भावनीक, आर्थिक किंवा हुंडा घेण्यासाठी स्त्रीला शिविगाळ करणे, टोचुन बोलणे अपमानित करणे, विशेष:त अपत्य नसल्यामुळे तिला हिनवणे, किंवा धमकावणे, त्रास देणे, दुखापत करणे, जखमी करणे, किंवा पिडीत महिलेचा जीवास धोका होणार असे कृत्य करणे किंवा तिच्या कोणत्याही नातेवाईकांकडे हुंडयाची मागणी करणे. या सर्व गोष्टींचा परिणाम स्त्रीला किंवा तिच्या नातेवाईकांना होणे. स्त्रीचे स्वत:चे पैसे, मालमत्ता स्त्रीधन किंवा इतर आर्थिक व्यवहार किंवा तिच्या हक्काच्या कोणत्याही मालमत्तेपासुन तिला वंचित करणे. घराबाहेर काढणे, इ. सर्व बाबींचा समावेश कौटुंबिक हिंसाचार मध्ये होतो.

स्त्रियांवर होणारे अत्याचार महाराष्ट्रात सर्वात आघाडी वर आहे. दुसऱ्या शब्दात स्त्रियांवर अत्याचाराचे वर्णन करावयाचे झाल्यास मिनिटाच्या हिशोबाने स्त्रीवर होणाऱ्या अत्याचाराचे स्वरूप पुढील प्रमाणे आहे. दर ५४ मिनिटाला १ बलात्कार. दर २ तासाला १ हुंडाबळी. दर ४३ मिनिटांत १ अपहरण. दर २६ मिनिटाला १ विनयभंग. दर ३३ मिनिटाला एका स्त्रीशी क्रुर वर्तन घडणे.

घरगुती हिंसाचार समस्या अधिक गंभीर धारण करीत आहे. बहुतांश घरगुती हिसांचाराचे प्रकरण पोलीस विभागात केले जात नाही .केन्द्र शासनाने कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ व नियम २००६ संपुर्ण भारतात २६ ऑक्टोंबर २००६ पासुन लागु केला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने स्त्रीला कोणत्याही प्रकारची शारीरीक, मानसिक हानी किंवा त्या व्यक्तीस संकटात टाकणारी कोणतीही कृती तसे कोणत्याही लाभासाठी तिच्यावर अन्याय अत्याचाराचा समावेश घरगुती हिंसाचारा मध्ये केला जातो. भारतात प्रामुख्याने पत्नीला मारणे, वाईट वागणुक देणे, उपासमार, लैगिंक दुर्व्यवहार करणे, पत्नीस मानसिक छळ करणे, जाळणे, बलात्कार करणे इ. प्रकरणे घरगुती हिंसाचाराचे प्रकार सांगता येईल.

**तक्ता क्र. १: स्त्रीयांसंबधी प्रमुख फौजदारी कायद्याविषयक माहिती दर्शक तक्ता.**

| क्लम | गुन्हयाचे स्वरूप | शिक्षा | दखलपात्र/ अदखलपात्र | जामीनपात्र अजामीनपात्र |
|---|---|---|---|---|
| ३६६ भा.दं.वि. | एखाद्या स्त्रीला पळवून तिला विवाह करण्यास भागपाडणे. | १० वर्ष कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३६६ (अ) भा.दं.वि. | अल्प वयीन मुलीला अनैतिक कृत्यासाठी पळुन नेणे. | १० वर्षकारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३६६(ब) भा.दं.वि. | परकीय देशातुन मुलीची आयात करणे. | १० वर्ष कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३५४ भा.दं.वि. | स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिच्यावर हमला करणे. | १ वर्षापर्यंतची परंतु ५ वर्ष असु शकेल अशी कारावास शिक्षा किंवा दंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ५०९ भा.दं.वि. | स्त्रीच्या प्रतिष्ठेला धक्का पोहचेल असे हावभाव करणे, शब्द वापरणे. | १ वर्ष तुंरूगवास किंवा दंड किंवा दोन्ही. | दखलपात्र | जामीनपात्र |
| ३६३ भा.दं.वि. | पळुन नेणे | ७ वर्ष तुरूगंवास व दंड | दखलपात्र | जामीनपात्र |
| ३६३ (अ) भा.दं.वि. | पळुन नेवून अल्पवयीन मुलीला भिक्षेसाठी वापरणे. | १० वर्ष कारावास व दंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३६४ भा.दं.वि. | खुनाच्या हेतुने पळविणे. | १० वर्ष किंवा जन्मठेप सक्तमजुरी व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३७६ भा.दं.वि. | बलात्कार | १० वर्षापेक्षा कमी नसेल आजन्म कारावास | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३०४(ब) भा.दं.वि. | हुंडाबळी | ७ वर्षापेक्षा कमी नसेल आजन्म कारावास | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ४९८ (अ) भा.दं.वि. | विवाहीत पत्नीस क्रुरपणे वागणुक देणे. | ३ वर्ष कारावास व द्रव्यदंड. | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३७२ भा.दं.वि. | वेश्या व्यवसाय इ. प्रयोजनार्थ विक्री करणे किंवा भाडयाने देणे. | १० वर्षकारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३२६ (अ) भा.दं.वि. | ॲसिड इ. चा वापरकरून गंभीर दुखापत करणे. | १० वर्षापेक्षा कमी नसेल आजन्म कारावास | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३१३ भा.दं.वि. | स्त्रीच्या संमती शिवाय गर्भपात घडून आणणे. | १० वर्षापेक्षा कमी नसेल आजन्म कारावास | दखलपात्र | अजामीनपात्र |
| ३१६ भा.दं.वि. | स्त्रीचा खुन करण्याचे उद्देशाने गर्भाचा मृत्यु घडून येणे. | १० वर्ष कारावास व द्रव्यदंड | दखलपात्र | अजामीनपात्र |

**स्त्रीयांवरील अत्याचाराचे प्रकार:–** अत्याचार प्रक्रियेत प्रामुख्याने दोन पक्ष असतात, एक अत्याचार करणारा आणि दुसरा अत्याचार सहन करणारा स्त्रीयांवर होणाऱ्या अत्याचारास त्रास देणारा घटक हा प्रामुख्याने पुरूष असतो व हळुहळु पुरूषांकडील नातेवाईकांचा समावेश होतो. कौटुंबिक आनंद हा स्त्री करीता क्षणभंगुर असतो. प्रत्येक कुटूंबात स्त्रीवर कमी अधिक प्रमाणात अत्याचार सुरू आहे. मुलीच्या लग्नात हुंडा दिला नसेल तसेच तिला मुलगा झाला नाहीतर तिचा अमानुष छळ होतो काही स्त्रीया तर या छळाला कंटाळून आत्महत्या सुद्धा करतात.संसारात प्रत्येकाशी तडजोड करत तिचे जिवन कंटाळवाने झालेले असते. विधवा स्त्रियांची अवेहलना केली जाते. नुकतेच घडलले ज्वलंत उदाहरण म्हणजे, वर्धा जिल्हयात घडलेले एकतर्फी प्रेमप्रकरण, भरदिवसा प्राध्यापक मुलीचा अंगावर रॉकेल ओतुन पेटून दिले. अशाप्रकारे घडणाऱ्या सर्व गोष्टींचा विचार करणे काळाची गरज आहे.

**तक्ता क्र. २ : स्त्रियांवरील अत्याचाराचे प्रकार दर्शक तक्ता.**

| गुन्हेगारी स्वरूपाचे अत्याचार | घरगुती स्वरूपाचे अत्याचार | सामाजिक स्वरूपाचे अत्याचार |
|---|---|---|
| बलात्कार. | हुंडाबळी | पत्नी, मुलीस स्त्रीलिंग गर्भपात करण्यास सक्ती करणे. |
| पळुन नेणे. | पत्नीला मारणे. | सामाजिक बहिष्कार करणे |
| खुन करणे. | लैंगिक दुरूपयोग. | मुलींना त्रास देणे |
| विनयभंग करणे. | विधवा, वृद्ध स्त्रीयांना वाईट वागणुक देणे | स्त्रीया, विधवांना त्यांच्या मालमत्तेपासुन वंचित करणे. |

**कौटुंबिक हिंसाचाराची कारणे व परिणाम:—** भारतातील पुरूष प्रधान संस्कृतिंने स्त्रीयांना पुर्वी पासुन हिन लेखलेले आहे. स्वतंत्रता प्राप्तीनंतरही फारसा काही बदल न होता. आजपावेतो पुरूष प्रधान संस्कृती मध्ये स्त्रीयां विषयी हिनतेची भावना पावलो पावली दिसत आहे. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर कायदे मंडळाने स्त्रिविषयक विविध आयोग नेमले कायदे तयार केले. तरी देखील परिस्थिती मध्ये फारसा बदल दिसत नाही. त्याचा शोध घेणे आवश्यक आहे. त्यात स्त्री भ्रुण हत्या रोखण्या साठी गर्भपात कायदा १९७२ पारीत केला. परंतु स्त्री भ्रुण हत्ये चे प्रमाण कमी होतांना दिसत नाही. गर्भपात करण्या करीता स्त्रीयांना धमकाविणे, मारणे, मानसिक त्रास देणे. टोचून बोलणे, इ. प्रकार दिसतात त्याचे नेमके कारण कोणत याचे शोध घेणे गरजेचे आहे. अनैतिक व्यवहार प्रतिबंध कायदा केला परंतु आजही स्त्रियांवर बलात्कार, अश्लील साहीत्य वाचायला लावणे, लैगिंक अत्याचार, अनैसर्गिक संभोग, विनयभंग, फुसलावून पळुननेणे इ. समस्येला समोर जावे लागते त्या समस्येचा शोध घेणे गरजेचे आहे. तसेच हिंदूविवाह कायाद्याने स्त्रियांना संरक्षण मिळणार ही अपेक्षा होती पण मानसिक, शारीरीक छळ, चारीत्रयां वर संशय, शिव्यादेणे, टोचून बोलणे, घटस्फोट देण्यास भाग पाडणे अशा प्रकारची हिंसा होतांना दिसुन येते.

स्त्रियांना कामा बद्दल समान वेतनाचा अधिकार मिळावा याकरीता या करीता समान वेतन कायदा १९७६ पारीत करून हक्क दिला असला तरी खाजगी क्षेत्रातमध्ये खुप असमतोल दिसुन येतो. या खाजगीकरणाचा काळात जवळजवळ ९८ टक्केनौकरीही खाजगी क्षेत्रामध्ये असुन स्त्रीयांना पुरूषांपेक्षा कमी मोबदला दिल्याचा दिसुन येतो. या गोष्टी चा विचार करणे काळाची गरज आहे. तसेच हुंडा प्रथेला आळा घालण्या करीता हुंडा प्रतिबंधक अधिनिय १९६१ पारीत केला. परंतु हुंडाच्या नावा खाली महिलेला जाळणे, मारणे, तिची पिळवणूक करणे, शारीरीक छळ, टोचून बोलणे, इ. प्रकारच्या हिंसा होतांना दिसुन येतात. त्याचे नेमके कारण शोधणे गरजेचे आहे. तसेच स्त्रियांना मालमत्तेचा अधिकार असला तरी स्त्रिया विविध मालमत्तेच्या हक्का वरून वंचित राहावे लागते. आर्थिक स्वरूपाचा हिंसे मुळे संबधीत महिलेचा आणि तिच्या मुलांचा पालन पोषनासाठी पैसे न देणे इ. प्रकारच्या समस्या निर्माण होतात. तसेच स्त्री नौकरीस असेल तर जबर दस्तीने तिचा पगार हिसकावून घेतला जातो. त्यामुळे स्त्री कमावती असुनही आर्थिक बाबीत तिला दुसऱ्यावर अवलंबुन राहावे लागते. अशा आर्थिक समस्यांना ती कशी समोर जाते याचा शोध घेणे गरजेचे आहे.

आधुनिक युगात विविध कायद्यांमुळे महिलांवर होणारे अत्याचार कमी होणार असे वाटत होते. परंतु स्त्रीयांवर होणारे अत्याचारांची संख्या वाढतांना दिसत आहे. तरी विविध कायदे करून ही त्याची योग्य ती अमंलबजावणी होतांना दिसत नाही. कायदा करून ही स्त्रीयांना अत्याचारास बळी पडावे लागते. या बाबींचा अभ्यास करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**अध्ययनाचे निष्कर्ष:—** भारतात कौंटुबिक हिंसाचाराचे प्रमाण गंभीर असुन त्यास भारतिय सामाजिक, सांस्कृतीक व धार्मीक परंपरा व रितीरिवाजाचे समर्थन असलेले आढळते. कौंटुबिक हिंसाचाराची सुरूवात कुंटूबातुन झालेली असुन त्यात पती व कुटूंबातील सदस्याचा समावेश असतो. कौंटुबिक हिंसेचे प्रकारात शारीरीक, मानसिक छळाचा समावेश असुन शासकीय उपक्रम व योजनेला काही प्रमाणात सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. कौटुबीक हिंसाचाराला कायद्या मुळे पूर्ण प्रतिबंध होत नाही. कौंटुबिक हिंसाचार झालेल्या महिलांची आर्थिक, सामाजिक स्थिती कमकुवत असते. स्त्रियाना कायद्या बाबत पूरेसे ज्ञान नसल्याने व त्यांचे शिक्षणाचे प्रमाण कमी असल्याने त्यांच्यावर कौटुंबिक हिंसाचार होतांना दिसुन येतो. कौटुबीक हिंसाचार कायद्याची अमंलबजावणी व्हायची असेल तर, स्त्री पुरूष दोघांचे समुपदेशन करणे आवश्यक आहे.

भारतामध्ये कौटुंबिक हिंसाचाराचे निर्मुलन करण्याकरिता स्त्री—पुरूष समानतेसाठी सामाजिक मानसिकता निर्माण करणे, शिक्षणाचा प्रचार—प्रसार करणे आवश्यक आहे तसेच शासननिर्णय व फौजदारी कायदे यांची काटेकोरपणे अमंलबजावणीची आवश्यकता आहे. पिडीत स्त्रीयांना आर्थिक व शैक्षणिक दृष्टया सक्षम करणे गरजेचे असुन फौजदारी कायद्यावर प्रभावीपणे अमंलबजावणी होण्यासाठी स्त्रीयांनी स्वत: पुढाकार घेतला पाहीजे. स्त्रीयांवर हिंसाचार का होतो, याचे मुळ कारणे शोधणे काळाची गरज असुन बदलत्या समाजव्यवस्थेत महिलांमध्ये शैक्षणिक व आरोग्य विषयक जागृकता तसेच त्यांचा बरोबरीचा सहभाग असायला पाहीजेण स्त्रीयांच्या विकासासाठी कार्यरत असलेल्या कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी करून त्यांचे स्व सामर्थयाची जाणीव करून देणारे वातावरण निर्माण करणे तसेच सामाजिक, आर्थिक सांस्कृतिक क्षेत्रातील विकास प्रक्रियेत त्यांना विशेषत्वाने सहभागी करणे आवश्यक आहे.

**संदर्भसुची**


१. चांदे ॲड. प. रा.: प्रमुख फौजदारी कायदे, मकन्द प्रकाशन, आर्शिवाद अपार्टमेंटस्, लोहार ओळी, चेंदणी, ठाणे. —४००६०१

२. डॉ. प्रदीपकुमार: सामाजकार्य संशोधन, श्रीमती साधना वाघाडे ,यश पब्लीशर्स, महाल, नागपूर—३२

३. जाधव डॉ. प्रकाश: जगतिकीकरण: वंचित घटकातील महिला समोरील आव्हाने, अरूणा प्रकाशन, १०३, ओमकार कॉम्प्लेक्स — अ, खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातुर.

४. पाटील डॉ. अरूंधती: स्त्री: आत्मभान ते सक्षमीकरण — एक प्रवास, अरूणा प्रकाशन, लातुर.

५. तोटरे प्रा. मनोहर: सेट/नेट समाजशास्त्र, विद्याभारती प्रकाशन, गुजराती शाळे समोर, मेन रोड, लातुर.

# स्त्रिवादी दृष्टिकोणातून जळीत महिला अत्याचाराचा अभ्यास

**डॉ. प्रमिला भुजाडे (गणवीर),** विभाग प्रमुख, समाजशास्त्र विभाग, वसंतराव नाईक शासकीय कला व समाजविज्ञान संस्था, नागपुर.

**प्रस्तावना:—** आज महाराष्ट्र पुरोगामी राज्य म्हणून ओळखला जातो. महिला अत्याचाराच्या संदर्भात महाराष्ट्र मागे नाही. वर्तमानपत्रात नित्याने महिला अत्याचाराच्या वेगवेगळ्या स्वरूपाच्या घटना घटित होत आहे. महाराष्ट्रातील विधि प्राधिकरण, पोलिस यंत्रणा, न्यायव्यवस्था वाखाणण्यायोग्य असतांना समाजात सर्रास महिला अत्याचाराचे प्रमाण वाढतांना समाजमन हरविले की काय? असे दृष्य दिसत आहे. समाजव्यवस्था, सामाजिक संरचना, स्त्रिवादी दृष्टीकोण, संविधानाने दिलेले व समाजव्यवस्था यातील मिळणारी वागणूक यामुळे उत्तरोत्तर स्त्री अत्याचाराचे प्रमाण कमी होण्यापेक्षा वाढतांना दिसत आहे. स्त्रिलासुद्धा मानवीय दृष्टिकोणातून बघण्यात याव, याकरीता प्रस्तुत विषय 'स्त्रिवादी दृष्टिकोणातून जळित महिला अत्याचाराचा अभ्यास' हा विषय महत्त्वपूर्ण वाटतो. तसेच भविष्यात्मक उपाययोजनात्मक भाकित केल्यास या समस्येची तीव्रता कमी करण्यास मदत होईल. असा आशावाद केवळ प्रस्तुत संशोधनपर लेख लिहिण्यात आला आहे.

**उद्देश्य:—** १. स्त्री अत्याचाराच्या कारणांचा शोध घेणे. २. स्त्रियांच्या अत्याचारा संबंधित उपाय योजनात्मक माहिती घेणे. ३. स्त्रिवादी दृष्टिकोणातून महिला अत्याचारांची मीमांसा करणे.

**गृहितके:—** १. समाजात महिला अत्याचारांचे प्रमाण वाढत आहे. २. अत्याचारावरील प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक उपाययोजना सक्षमत: राबविणे. ३. स्त्रिला स्त्रिवादी दृष्टीकोनातून, मानवीय दृष्टीकोनातून बघण्याची प्रक्रिया सक्रिय करणे.

**तथ्य संकलन :—** प्रस्तुत संशोधनाकरीता दुय्यम स्त्रोत म्हणून प्रकाशित पुस्तके, वर्तमानपत्र, इंटरनेट, दृक्माध्यमांचा वापर केला.

**तथ्य विश्लेषण :—** प्रस्तुत संशोधनाकरीता उपरोक्त माध्यमातून तथ्य संकलन करून स्त्रिवादी दृष्टिकोणातून निर्वचन करण्यात आले आहे. आज स्त्रिवादी दृष्टिकोण संरचनात्मक दृष्टिने मानवीय दृष्टिकोण ठेवत स्त्रिला मानव म्हणून समाजात भूमिका रूजवू पाहतो.

राज्यात महिलांवरील अत्याचाराचा आलेख सातत्याने वाढत असून गेल्या १० वर्षात १ लाख ७ हजार ४४८ गंभीर गुन्हे दाखल आहेत. राज्यात १ जानेवारी २०१४ ते ३१ डिसेंबर, २०१९ या काळात विनयभंगाचे ७३ हजार ३१ गुन्हे दाखल आहे. याच काळात २६५१२ बलात्काराचे गुन्हे दाखल होते. छेडछाड व हुंडाबळीचे अनुक्रम ६,४७५ व १,४३० प्रकार घडले असून त्यातील निम्याहून अधिक प्रकरणांचा तपास सुरू आहे. बलात्कार, विनयभुग, हुंडाबळी व लैंगिक छळा संबंधी दाखल गुन्हांची ही संख्या दीडपट असण्याची शक्यता आहे.

| तक्ता क्रमांक ०१ | | |
|---|---|---|
| राज्यात सहा वर्षातील महिलांसंबंधी गुन्हे | | |
| अ.क्र. | वर्ष | महिलांसंबंधी गुन्हे |
| १. | २०१४ | १५२९९ |
| २. | २०१५ | १७२४४ |
| ३. | २०१६ | १६७५७ |
| ४. | २०१७ | १७६९२ |
| ५. | २०१८ | २०२१३ |
| ६. | २०१९ | २०२४९ |
| | एकूण | १,०७,४५४ |
| स्त्रोत :— लोकमत वर्तमानपत्र दिनांक ०६.०२.२०२० | | |

सुरक्षित व प्रगतीशील राज्य समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्राची ओळख आता महिलांवरील वाढत्या अत्याचारामुळे पुसली जाण्याची भीती निर्माण झाली आहे. राज्यात प्रत्येक दोन तासात एक बलात्कार होतो, तर रोज ३४ अबलांचा विनयभंग केला जात असल्याचे विदारक सत्य समोर आले आहे. २०१९ मध्ये महिला अत्याचाराच्या तब्बल २० हजार २४९ घटना पोलिसांच्या डायरीत दाखल आहे. त्यात सर्वाधिक १३ हजार ६१७ विनयभंगाचे ५ हजार ४१२ बलात्काराचे गुन्हे घडले आहेत. छेडछाड व हुंडाबळीच्या अनु. १ हजार ४३३ व १८७ घटना घडल्या आहेत. २०१७ व २०१८ मध्ये बलात्काराच्या अनु. ४,३५१ व ४,९७३ गुन्हे दाखल झाले आहेत. तर या वर्षामध्ये विनयभंगाचे १२ हजार २३८ व १४ हजार ६६ गुन्हे जानेवारी २०१४ ते ३१ डिसेंबर २०१९ पर्यंतची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| तक्ता क्र. ०१ | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सहा वर्षातील महिलांवरील अत्याचाराचे गुन्हे | | | | | |
| अनु. क्र. | वर्ष | बलात्कार | विनयभंग | छेडछाड | हुंडाबळी |
| १. | २०१४ | ३४३८ | १०००१ | १५७५ | २७९ |
| २. | २०१५ | ४१४४ | ११७१३ | ११११९ | २६८ |
| ३. | २०१६ | ४१८९ | ११३९६ | ९२४ | २४८ |
| ४. | २०१७ | ४३५६ | १२२३८ | ८६४ | २३४ |
| ५. | २०१८ | ४९७३ | १४०६६ | ९६० | २१४ |
| ६. | २०१९ | ५४१२ | १३६१७ | १०३३ | १८७ |
| | एकूण | २६,५१२ | ७३,०३१ | ६,४७५ | १,४३० |

स्त्रोत : लोकमत वर्तमान पत्र दि. ०८.०२.२०२०

२०१६ ते २०१९ या कालावधीत १०० पेक्षा जास्त कि. मी. वरून आलेले १७०, ५०—१०० कि.मी. मध्ये ४८ रूग्णांच्या वर १०—५० कि.मी. मध्ये ३९ रूग्णांचा मृत्यु झाला आहे. आगीच्या सर्वाधिक घटना उन्हाळयात होतात. शहरीकरण, औद्योगिकरणामुळे या घटनेत वाढ झाली आहे. ३० ते ६० वयोगटात ११९ मृत्यु झाले. ६ ते १२ वयोगटातील १५३ रूग्ण बरे झाले. ३१ रूग्णांचा मृत्यु. १२ ते ३० वयोगटातील ११९ रूग्ण बरे झाले. १०३ रूग्णांचा मृत्यु. ३० ते ६० वयोगटातील २०५ रूग्ण बरे झाले. ११९ रूग्णांचा मृत्यु. ६० वयोगटातील ४४ रूग्ण बरे झाले. ६९ रूग्णांचा मृत्यु.

| तक्ता क्रमांक ०३ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वयोगट | बरे झाले रूग्ण | मृत्यु |
| १. | १२ वर्षापर्यंत | १५३ | ३१ |
| २. | १२ ते ३० वर्ष | १९९ | १०९ |
| ३. | ३० ते ६० वर्ष | २०५ | ११९ |
| ४. | ६० व त्यावरील | ४४ | ६९ |

| तक्ता क्रमांक ०४ | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | अंतर | किलोमीटर | मृत्यु |
| १. | १० कि.मी. | २६३ | ६५ |
| २. | १०—५० कि.मी. | १४३ | ३९ |
| ३. | ५०—१०० कि.मी. | १४५ | ४८ |
| ४. | १०० कि.मी. वरील | ३५९ | १७० |

स्त्रोत :— लोकमत वर्तमानपत्र १० फेब्रुवारी २०२०.

जळीतांमध्ये बालके व पुरूषाच्या तुलनेत महिलांचे प्रमाण सर्वाधिक आहे. शिवाय मृत्युमध्ये महिलांचे प्रमाण मोठे आहे. लांब अंतरामुळे उपचारात उशीर तर होतोच पण शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होते. एकीकडे सर्वच श्रेत्रात पुरूषांच्या बरोबरीने

कामगिरी महिलांकडून होत असताना राज्यात महिलांवर अत्याचार सुरूच आहेत. बहुतांश पीडितांना त्यांच्या माहितीतील व्यक्तीकडून अत्याचाराला सामोरे जावे लागत आहे. बलात्काराच्या गुन्हयांच्या तीन वर्षात १४ हजार ७७ जणांना अटक झाली आहे. विशेष म्हणजे ९५ टक्के अधिक १३,७३२ आरोपी परिचितांपैकीच आहे.

| तक्ता क्रमांक ०५ | | | |
|---|---|---|---|
| बलात्काराच्या गुन्हयातील अटक आरोपी | | | |
| अ.क्र. | वर्ष | परिचित आरोपी | अज्ञात आरोपी |
| १. | २०१६ | ४,६२७ | १९२ |
| २. | २०१७ | ४,७८५ | ९४ |
| ३. | २०१८ | ४,३२० | ५९ |
| | एकूण | १३,७३२ | ३४५ |

स्त्रोत :— लोकमत वर्तमानपत्र पेज ४, ११ फेब्रुवारी २०२०.

**जळीत महिला अत्याचारावरील उपाय योजना:—** देशभरातील महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली. अशा अस्वस्थ वर्तमानात गुन्हेगारांना कायद्यानुसार कठोर शिक्षा झाली पाहिजे मात्र, समाजातील प्रत्येक जबाबदार घटकाने गुन्हेगारीचे गौरवीकरण करू नये. जात व धर्मविरहीत मानसिकतेला बळी न पडता स्त्री, पुरूष समतेचे मूल्य समाजमनात रूजविले पाहिजे. अशा प्रकारची समता व लोकशाही मूल्यनिष्ठा समाजरचनाच या देशातील, महाराष्ट्रातील महिलांना तारक ठरणार आहे. महिलांवरील अत्याचाराच्या घटनांचे वार्तांकन करतांना माध्यमांनी अधिक जागृत असले पाहिजे. भारतातील विषमतावादी जात व धर्मवादी व्यवस्थेचीही परखड चिकित्सा व्हावी. कुटूंबपद्धती व पालकांची जबाबदारी महत्त्वपूर्ण आहे. समाजमाध्यमे व पालकांचे जबाबदारी महत्त्वपूर्ण आहे. समाज माध्यमे विशुद्ध एकारलेपण सृजनाचे नवे दालन तयार व्हावे व समताधिष्ठित समाजरचना निर्माण व्हावी.

**समाजपण जपणे:—** १) स्त्रीच कर्तव्य आणि तिची अब्रु हया गोष्टी एकमेकांशी संबंधित नाहीत हे समजून घेणे २) स्त्रीच लैंगिक आयुष्य ही तिची अत्यंत खाजगी बाब असते. त्यात इतर कोणालाही मत असायचं काही कारण नाही. ३) सोशल मिडीया वापरणारे लोक आपल्याच समाजातले असतात. त्यामुळे तिथे जे चालते ते आपल्याच समाजाचा आरसा आहे. आपण समाज म्हणून स्त्रीकडे समानतेने बघत नाही तोवर सोशल मिडियातली परिस्थिती बदलू शकत नाही.

माध्यमांमुळे घटित घटनांना वाचा फुटत असून लोकप्रतिनिधी, द्वारा पुढाकार घेणे आवश्यक आहे. पीडीताच्या पाठीशी समाज ही उभा राहणे आवश्यक आहे. मागील काही काळात स्त्रियांना विचारस्वातंत्र्य आल्यामुळे आता त्या स्वतंत्र व्यक्ति म्हणून ठामपणे भूमिका घेत आहे. विचार मांडत आहे. कोणत्याही विषयावर बोलायचे धारिष्ट दाखवत आहे. अत्याचाराविरूद्ध न्याय देणे ही केवळ शासनाची जबाबदारी नाही घरापासून जबाबदारीने शिक्षण द्यायला हवे. महिलांना भोगवस्तू म्हणून पाहणे थांबविणे आवश्यक आहे. आपण २१ व्या शतकात जगत आहोत. मुक्तपणे समाजात वावरतो आहे, मात्र हे अत्यंत खेदजनक बाब आहे कि, पाठलाग करणे, अश्लील बोलण, नकार आला की त्रास देणं आणि भररस्त्यात जाळणे हा ही प्रकार अवघड होत चालला आहे. आज मुलांना नकार पचविणे शिकविणे गरजेचे झाले आहे. सिनेमा, मालिकामध्ये स्त्रीदेहंच होणार उदात्तीकरण आणि भोगवस्तु म्हणून पाहणे हे पुरूषी मानसिकतेतून मुलींना बाहेर काढणे गरजेचे आहे. माध्यमांनी संवेदनशीलता जपावी आज समाजाची मानसिकता बदलण्याची गरज आहे आपल्या आजुबाजूला महिला, वृद्ध स्त्रियां यांच्याबद्दल आध्यात्मिक पद्धतीने म्हणजेच सारासार विचार करण्याची आवश्यकता आहे. समाज माध्यमांनी कार्यतत्परते सह संवेदनशीलता जपली पाहिजे. पुरोगामी महाराष्ट्रात एकापांठोपाठ एक अमानवी घटना घडत आहेत हे रोखण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढे यायला पाहिजे. केवळ पोलिसांद्वारेच या घटना थांबवल्या जातील, असे नाही. आरोपिंना ३० दिवसांच्या आत कठोसत कठोर शिक्षा झाली पाहिजे. न्यायालयात पुरावे, सुनावणीत वेळ जातो हा वेळ कमी करण्यासाठी सर्व पातळीवर प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्याशिवाय नराधामांना जरब बसणार नाही. युवकांचे समुपदेशन केले पाहिजे. महिलांच्या सुरक्षेसाठी एक चळवळ उभी राहिली पाहिजे तरच अत्याचार थांबतील. पिडितांचे मनोबल कायम राखण्यासाठी प्रयत्न आवश्यक आहे. एकंदरच समाजात हिंसक भावना वाढीस लागल्याचे दिसू लागले आहे. विशेषत: उन्नाव येथील बलात्कार प्रकरणात पिडितेला मारून टाकण्यात आले. महिला अत्याचाराच्या घटनांमध्ये माध्यमांची तसेच स्त्रियांच्या समस्यांसाठी झटणारे कार्यकर्ते, संस्थेची जबाबदारी मोठी आहे. त्यांच्या मनातील उरली सुरली आशा कायम राहील या दृष्टीने काम होण्याची आवश्यकता आहे. शिवाय अशा प्रकरणांमध्ये सत्र न्यायालयात न्याय लागला तरी वरच्या न्यायालयाची प्रक्रिया शिल्लक असते. सत्र न्यायालय ते सर्वोच्च न्यायालयापर्यंतची न्यायाची प्रक्रिया जलद आणि सुलभ होण्याची आवश्यकता आहे हे आव्हान संबंधित सर्व घटनांनी एकत्रितपणे पेलण्याची आवश्यकता आहे. भारतीय स्त्री ही पुरूषाच्या तुलनेत कुठेच कमी नाही परंतु भारतीय संस्कृती ही पुरूषप्रधान असल्याने स्त्रियांना कमी लेखले जाते. अगदी स्त्रीची प्रगती असो वा स्तुती पुरूषांच्या डोळयात खुपते. ती जीव घेईल पण आपले शील देणार नाही, ''मातृदेवोभव'' ची शिकवण देणाऱ्या आणि स्त्रियांबद्दल अपार आदर असलेल्या आदर्श समाजसुधारकांना राज्यात पिढी घडविली. याला आजचे सामाजिक वातावरण जबाबदार असले तरी मुलांवर बालपणापासून चांगले संस्कार झाले तर तो वाईट गोष्टीच्या नादाला लागणार नाही. घरातूनच स्त्रीबद्दल आदर करण्याचा आदर्श निर्माण केला पाहिजे.

पुरातन काळापासून आपल्या समाजात स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यात आले आहे. धर्म, संस्कृती आणि परंपराच्या नावावर स्त्रीया कायम चौकटीत बांधण्याचा व नावे ठेवण्याचा प्रयत्न सातत्याने केला जात आहे आणि आजही होताना दिसतो कारण माणूस म्हणून तिची समानता मान्यच केली जात नाही. स्त्री ही केवळ उपभोगाची वस्तू आहे तिने बाहेर पडू नये घरी राहून पुरूषांची सेवाच करावी आणि तोंडातून शब्द काढू नये ही पुरूषसत्ताक मानसिकता ठासुन भरली आहे. त्यामुळे पुरूषी अहंकाराची मानसिकता बदलण्याची गरज आहे. यासाठी वेगवेगळया स्तरावर प्रयत्न करणे गरजेचे आहे. जो पर्यंत स्त्री पुरूष समानतेची भावना निर्माण होत नाही तोपर्यंत महिलांना भयमुक्त ठेवणारा आदर्श समाज निर्माण होणार नाही.

यंत्रणा सक्षम होण्याची गरज आहे. याविषयी महिला, मुली भुमिका घेत आहेत. जनमानस आपल्या सोबत आहे या भावनेने हे अत्याचार समोर येण्याचे प्रमाण वाढले आहे. आता यंत्रणांनी हे सर्व गुन्हें घटनांना समोर जाण्यासाठी अधिक सक्षमपणे वागले पाहिजे जेणेकरून जनसामान्यांची यंत्रणे विषयी विश्वासार्हता वाढेल. आपल्या घरातील स्त्रियांना केवळ सुरक्षेचे कवच आणि इतर महिलांना अनादाराच्या भावनेतून वागविणे ही अत्यंत चुकीची बाब आहे. समाजाने स्त्रियांच्या बाबतीत जबाबदारी घ्यायला हवी. या घटकाला सुरक्षित वातावरण देणे ही समाजाची जबाबदारी आहे. ज्या

समाजात स्त्री सुरक्षित नाही, तो समाज सक्षम नाही. हे समीकरण आहे. कायदा तातडीने कडक करणे. आपला देश २१ व्या शतकाकडे वाटचाल करत असतांना देशात अनेक जटील प्रश्न सोडविले जात आहेत. ३७० वे कलम रद्द करून कित्येक वर्षाचा काश्मीर प्रश्न सोडवला जातो. तलाकचा कायदा बदलला जातो. पण महिलांवरील अत्याचार कमी करण्यासाठी कायद्यात आवश्यक बदल केले जात नाहीत. कायद्याचा धाक उरला नाही. न्यायालीयीन लढाई ही जलदगतीने होत नाही त्यामुळे आरोपींचे धाडस वाढते त्यासाठी कायदे कठोर असावे.

स्त्रियांनी दिलेला नकार देण्याचे अधिकार एका स्त्रीलाही असावे. मात्र तिचा नकार पचविण्याचे किंवा स्विकारण्याचे भान किंवा ताकद पुरूषांमध्ये दिसून येत नाही कारण माणूस म्हणून तिचा आदर करण्याचे मानसिक भान पुरूषी वृत्तीमध्ये नसल्याचे जाणवते. स्त्रीने प्रेम व्यक्त केले तर चारित्र्यहीन आणि नकार दिला तरीही तीच वाईट या प्रवृत्तीत छेद देणे आवश्यक आहे. संविधानाने मानव म्हणून स्त्री आणि पुरूषांना समान अधिकार अधिकार दिले आहेत पण तिचे अधिकार नाकारण्याचे काम समाजात होतानां दिसते त्यामुळे स्त्रियांची सुरक्षा, सक्षमीकरण, सबलीकरण आणि फास्ट ट्रॅक कोर्टात प्रकरणाची सुनावणी करून आरोपींना शिक्षा करण्यासोबत किंवा त्याहीपेक्षा पुरूषांच्या मानिसक सक्षमीकरणाची खरी गरज निर्माण करण्याचे मुल्य शालेय स्तरापासून मुलांमध्ये रूजविणे गरजेचे आहे. महिलांकडून झालेल्या लहान लहान तक्रारींकडेही पोलिसांनी गंभीरतेने पाहिले पाहिजे. पीडित मुलीच्या शारीरिक आणि मानसिक सक्षमतेसाठी उपाय योजने गरजेचे आहे. घरातच मुलाच्या तुलनेत मुलीला दुय्यम वागणूक मिळणे. सोबतच मुलगा लाडात वाढल्याने जसा मोठा होईल तसा तो मोठयांचा अनादर करीत स्वत:च्या मनाप्रमाणे वागायला लागतो. त्यातूनच तो मग तो काहीही करायला मागेपुढे पाहात नाही.

इंटरनेटच्या माध्यमातून नको ते मुलांच्या हातात पडले आहे. त्यामुळे भावनेवर ताबा ठेवणे मुलाना शक्य होत नाही. त्याकरीता आई–वडिलांनी मुला–मुलींमध्ये भेदभाव करू नये तसेच बालपनापासून चांगले संस्कार करावेत. महिला अत्याचारातील घटनेत वडीलांनीही केवळ पैश्यासाठी काम करू नये. गुन्हेगारांना शासन होईल हेच पाहावे. सोशल मिडियाचा वाढता नकारात्मक गैरवापर, त्यामुळे मनोवृत्ती व विचार कुपोषित होऊन नराधमांकडून अत्याचार घडत आहेत. शाळा, महाविद्यालय, नौकरी व सार्वजनिक ठिकाणी महिलांवर अत्याचाराच्या घटना वाढत आहेत. देशातील स्त्री–पुरूष समानता हे मुल्यच लुप्त पावले आहे. पोलिस कायदे, पालान जुमानता नराधामांच्या विकृत मनोवृत्तीच्या स्वैराचारामुळे महिलांमध्ये दहशत बसली आहे. आंध्र प्रदेशातील दिशा कायद्याची धर्मोतर राज्यातही अंमलबजावणी करायला हवी. टि.व्ही., चित्रपटातील अपवर्तन जबाबदार कायद्याची अमंलबलजावणी न होणे दिरंगाई, अडवणूक व पक्षपाती अंमलबजावणी यामुळे समाजात असंतोष वाढत आहे. यामुळे कोणालाही कायद्याचा धाक राहिला नाही. यातुनच केवळ महिला नव्हे तर सर्व क्षेत्रात अत्याचार वाढत आहेत. आणखी असे की, सध्याच्या मालिका व चित्रपट यामधून अपवर्तनाचे सविस्तर चित्रिकरण करून दाखविले जाते. याचा परिणाम अपवर्तन करू इच्छिणाऱ्या व्यक्तिच्या मेंदूवर होतो. यातुनच अशा वाईट घटना बिनचूक करण्याचे धाडस वाढते. समाजात अल्प शिक्षित मुलं दिशाहीन भटकत आहेत. चकचकीत जग ज्याला खुणावते पण हाताला काम मिळत नसल्याने त्यांचा स्वप्नभंग होतो. त्यात व्यसनाधिनता, नैराश्य वाढते. शाळेत लैंगिक शिक्षण प्रभावीपणे दिले जात नाही. समज यायच्या आधीच त्यांच्या हातात मोबाईल येतो.

**एक मानवीय दृष्टिकोण** : शिफारस – १. महिलांच्या प्रति परंपरागत दुष्टिकोण बदलून पुरूषांमध्ये जागरूकता निर्माण करणे. २. महिला स्वैच्छिक संगठना मजबूत करणे. ३. महिलांकरीता प्रशिक्षण आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित करणे. ४. महिलांकरीता हॉस्टेल, बस, सार्वजनिक ठिकाणी वावरण्याकरीता संरक्षण प्रदान करणे. ५. अपराधिक न्याय व्यवस्था बदलणे. ६. शोषित स्त्रियांचे समाजासोबत पुर्नसमायोजन प्रक्रिया प्रभावी करणे.

**स्त्रियांकरीता मनोधैर्य योजना** : मनोधैर्य योजना २०१८ मध्ये सुरू झाली. तेव्हापासून आतापर्यत सातारा जिल्हयात ७० पिडित महिलांनी या योजनेचा लाभ घेतलाय. यांतील काहींना ३० हजारांची रक्कम ही देण्यात आली आहे. म्हणजे २१ लाख रूपये केवळ सातारा जिल्हयात पिडीत महिलांना नुकसान भरपाई म्हणून देण्यात आली आहे. खरं तर पिडित महिलांना आधि तिच्या कुटुंबाला अशा घटनांमधुन सावरण्यासाठी मानसिक आणि आर्थिक बळाचीही गरज असते. ही मदत वेळीच मिळाली नाही तर पिडित महिलेबरोबरच तिचे कुटुंब ही होत्याचे नव्हते होते काही पिडिता बदनामीच्या भीतीने, तर काही आर्थिक परिस्थितीच्या धास्तीने आपल्या जीवनाचा शेवट करत असतात हे कुठे तरी थांबायला हवे या योजनेचे जिल्हातील प्रत्येक विधीसेवा प्राधिकरणात कामकाज चालू आहे. लैंगिक शोषनामध्ये बळी पडलेल्या व्यक्ति आणि महिलांनी या योजनेचा लाभ घेतला पाहिजे. पोलिस ठाण्यात चौकशी करावी तसेच, विधिसेवा प्राधिकरणाशी संपर्क साधावा एफ.आय.आर दाखल केल्यानंतर याची प्रत पोलिसांकडून विधिसेवा प्राधिकरणाला तात्काळ पाठविली जाते. यानंतर संबंधित पिडित महिलेला काही दिवसांतच आर्थिक सहाय्य मिळत असते. पोलिसांकडून चालढकल झाली तर विधिसेवा प्राधिकरण स्वत:हुन पोलीसांकडून पिडीतेचा एफ.आय.आर मागवून घेते. त्यामुळे पिडित महिलांनी ओढवलेल्या प्रसंगाला धीटाईने सामोरे जावुन मनोधैर्याच्या माध्यमातून लढा देणे आवश्यक आहे. आर्थिक सहाय्य कसे मिळते जिवितहानी, सामूहिक अत्याचार ५ ते १० लाख, अत्याचार, अनैसर्गिक लैंगिक अत्याचार ४ ते ७ लाख, ॲसिड हल्ला ७ ते ८ लाख, ५० टक्के अधिक इजा पोहचल्यास ५ ते ८ लाख, २० टक्के कमी प्रमाणात इजा पोहोचल्यास ३ ते ५ लाख पिडीत महिलेला मिळू शकतात. अत्याचारातून गर्भधारणा होणाऱ्या स्थितीमध्ये ३ ते ५ लाख , भाजल्यामुळे चेहरा विदृप झाल्यास ७ ते ८ लाख शरीरास अथवा इतर भागात हानी पोहचविल्यामुळे ८० टक्के विकलांगता २ ते ५ लाख या सह तातडीचीही नुकसान भरपाई दिली जाते. अशा प्रकारे विधीसेवा प्राधिकरण महिलांमध्ये जनजागृती ही करीत आहे.

### संदर्भ


१. विवेचनात्मक अपराध, राम आहूजा, रावत पब्लिकेशन्स, जयपूर.,
२. समाजशास्त्र विषय आणि दृष्टिकोण, प्रदीप आगलावे, साईनाथ प्र. नागपूर
३. नारीवाद – राम आहुजा – बैंगलोर प्रकाशन
४. लोकमत वर्तमान पत्र – ०९ फ्रेबु. व २० फ्रेबु. २०२०, पान क्र. ६
५. http://www.southenpress.org
६. Feminist Theory: From Margin to center second edition n` bell books, South end press, Cambridge, M.A.
७. Feminism is for everybody- Passionate politics-bell hooks, south end press Cambridge, M.A.

# सायबर गुन्हा

**प्रा. डॉ. राजेंद्र जनार्दन कांबळे**, कार्यकारी प्राचार्य, इंदिरा गांधी कला वाणिज्य महाविद्यालय, कळमेश्वर, जि. नागपूर.

गुन्हेगारांनी २१ व्या शतकात सायबर गुन्हे हे गुन्हयाचे एक नवीन दालन किंवा विश्व निर्माण केले आहे. नावीन्यपूर्ण गुन्हयांमध्ये बेकायदेशीरपणे प्रवेश करून संगणक प्रणाली निकामी करणे, तिचे नुकसान करणे, महत्त्वाची माहिती चोरणे, संगणक जंतू वा विषाणू (व्हायरस) सोडून संगणकामध्ये साठविलेली माहिती नष्ट करणे, संगणकावरून अश्लील फोटो व माहिती प्रस्तुत करणे इत्यादी गोष्टींचा समावेश होतो. सायबर गुन्हयांची विभागणी दोन प्रमुख भागात पुढीलप्रमाणे केली जाते. १) जेथे संगणक हेच गुन्हयाचे मुख्य लक्ष्य असते उदा. हॅकिंग व क्रॅकिंग हा दुसऱ्याच्या संगणकामध्ये प्रवेश करण्याचा एक प्रकार आहे. २) जेथे संगणाकाचा उपयोग करून गुन्हा केला जातो. उदा. क्रेडिट कार्डसंबंधातील अफरातफरीचे गुन्हे, बॅकांचे एटीएम कार्ड व खात्याचा फसवणुकीकरिता उपयोग करणे, संगणकात साठविलेल्या माहितीचे अपहरण करणे इत्यादी.

२१ व्या शतकात भारतात एकीकडे इंटरनेटचा झपाटयाने प्रसार होत आहे तर दुसरीकडे सायबर गुन्हयांमध्ये झपाटयाने वाढ होत आहे. हे गुन्हे करणाऱ्यांना पकडून त्यांच्यावर खटले चालविण्यासाठी सुयोग्य असा कायदाच भारतात नव्हता, त्यामुळे सायबर गुन्हेगार पकडला जात नव्हता. त्यांना शिक्षा होत नव्हती केंद्र सरकारने इसवी सन २००० मध्ये अधिनियम मंजूर करून माहीती व तंत्रज्ञान विभाग सुरू केला. सायबर गुन्हेगाराला शिक्षा करण्यासाठी माहिती तंत्रज्ञान कायदा २००० मध्ये विशेष तरतुदी इ.स.२००२ मध्ये करण्यांत आल्या या कायद्यामुळे आता सायबर गुन्हेगाराविरूद्ध कठोर कार्यवाही करणे सरकारला शक्य झाले आहे. (रा.ज.लोटे पृ.२४०). नोकरीवरून काढले म्हणून फेसबुकवर बनावट प्रोफाईलद्वारे त्रास देणे, एकतर्फी प्रेमात नकार दिल्याने तरूणीचे आक्षेपार्ह फोटो सोशल मिडियावर टाकून बदनामी करणे, फेसबुक प्रोफाईल 'हॅक' करून खंडणी मागणे अशा घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. सोशल मिडीयाच्या वाढत्या वापरासोबतच त्याद्वारे होणाऱ्या गुन्हयांचे प्रमाण ही वाढत आहे. गेल्या दीड वर्षात सोशल मीडीयावरून झालेल्या गुन्हयांच्या अकराशे तक्रारी पूणे शहर पोलीसांच्या सायबर सेलकडे आल्या आहेत. प्रत्येक व्यक्तीच्या हातात स्मार्टफोन आणि त्यामध्ये इंटरनेट असणे ही बाब आता आवश्यक झाली आहे. त्यामुळे सोशल मिडीयाच्या वापरकर्त्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. अनेकांनी सोशल मिडीयाच्या वापराचे धोकेही पूर्णत: माहीत नाही. त्यामुळे सोशल मीडियावर वैयक्तीक माहिती प्रसिद्ध करून त्रास ओढवून घेतल्याच्या घटनांही वाढत आहेत. अनेक तरूण तरूणी कमी वय असूनही खोटी माहिती देऊन सोशल मिडीयावर प्रोफाईल उघडत आहेत. त्यामुळे ते अगदी सहज सायबर गुन्हेगारांच्या जाळयात सापडत आहेत. सायबर सेलकडे येणाऱ्या तक्रारीमध्ये प्रामुख्याने फेसबुकवर बनावट आकाऊंट तयार करणे, फेसबुक, व्हॉटअॅपवरून अश्लिल संदेश पाठविणे, मुलींच्या फोटोंचा गैरवापर करणे, समाजात तेढ निर्माण होईल असा मजकूर टाकणे, बदनामीकारक मजकूर किंवा फोटो पोष्ट करणे, फेसबुकचे अकाउंट हॅक करून खंडणी उकडणे यांची संख्या जास्त आहे. २०१८ मध्ये सोशल मीडीयावरून होणाऱ्या गुन्हयांच्या ८२४ तक्रारी आल्या आहेत. त्यापैकी २६३ फेसबूक संदर्भात आहेत. त्यामुळे फेसबुकचा वापर करतांना अधीक काळजी घेण्याची गरज आहे असे पूणे सायबर सेलचे अधिकाऱ्यांनी सांगीतले. अॅपवरील डीपी अनोळखी व्यक्तीला दिसू नयेत, यासाठी विशिष्ट सेटिंग असते मात्र याची माहिती अनेकांना नाही. अनेकदा आरोपी मुलींच्या नावे बनावट अकाऊंट तयार करून इतर मुलींशी संपर्क साधतात. त्यामुळे तरूणींनी सोशल मीडियावर त्यांचे फोटो, वैयक्तिक माहिती शेअर करू नये. सोशल मीडियाचा वापर करण्यांत १५ ते २० वर्ष वयाची मुले आघाडीवर आहेत. त्यामुळे पालकांनी मुले जास्त वेळ कशावर घालवतात, यावर लक्ष ठेवण्याची गरज आहे.

सोशल मीडीयावर अश्लिल फोटो व मजकूर टाकून बदनामी केल्याच्या तक्रारी सायबर सेलकडे येतात, बऱ्याचदा त्रास देणारी व्यक्ती ही ओळखीतील, नातेवाईक, वर्गमित्र असते, त्यामुळे नागरिक तक्रार देण्यास टाळाटाळ करतात. तरूणी घाबरून तक्रार दाखल करत नाहीत. बदनामी करणारी व्यक्ती पोलिसांना सहज सापडू शकते. परंतु त्यासाठी तक्रार दाखल करणे गरजेचे असते. अलिकडे लोक याबाबत सजग होत असून ते तक्रार दाखल करत आहेत.

भारतात सायबर क्राईमच्या घटनेचा आकडा कसा दिवसेंदिवस वाढत आहे हे पूढील आकडेवारीवरून लक्षांत येते.

| अ. क्र. | वर्ष | सायबर गुन्हयाची संख्या |
|---|---|---|
| १. | २०१८ | २७,२४८ |
| २. | २०१७ | २१,७९६ |
| ३. | २०१६ | १२,३१७ |
| ४. | २०१५ | ११,५९२ |
| ५. | २०१४ | ९,६२२ |
| ६. | २०१३ | ५,६९३ |
| ७. | २०१२ | ३,४७७ |
| (स्त्रोत – www.statista.com) | | |

अलीकडे सायबर गुन्हे अनेक पुढे येत आहेत, मुंबईत अभियांत्रिकी महाविद्यालयांत शिकणाऱ्या दोन विद्यार्थ्यांनी एका हॉटेलमधल्या वेटरशी संगनमत केले. वेटर गिऱ्हाईकाचे क्रेडिट कार्ड किंवा डेबिट कार्ड यंत्रामध्ये फक्त दोन वेळा स्वाईप करीत असे. त्यानंतर विद्यार्थी कार्डधारकांच्या खात्यातून अत्यंत सराईतपणे पैसे काढीत असत, ए.टी.एम.मधून पैसे काढण्याच्याही घटना घडल्या आहेत. (लोटे पृ. २४०). अजनी (नागपूर) पोलीस ठाण्याच्या हद्यीत राहणाऱ्या एका महिलेला सायबर गुन्हेगाराने पेटीएम अकाऊंट केवायसी करायचे आहे, अशी थाप मारून एक लिंक पाठविली ती लिंक डाऊनलोड करताच आरोपीने महिलेच्या बॅक खात्यातून ९९ हजार रूपये लंपास केले. १६ फेब्रुवारी २०२० ला ही घटना घडली. त्याची चौकशी केल्यानंतर याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यांत आला. अर्चना श्रीराम शर्मा यांच्या मोबाईलवर १६ फेब्रुवारीला सायंकाळी ५.०० वाजता एक फोन आला आरोपीने शर्मा यांच्याशी बोलतांना त्यांना तुमचे पेटीएम अकाऊंट केवायसी करायचे आहे. त्यासाठी एक लिंक पाठवली असे म्हणून गंडविले. (लोकमत १५ मार्च २०२०).

कुक्कुट उत्पादनामुळे कुक्कुट खाद्यनिर्मिती व कुक्कुट उत्पादनामुळे कोरोना विषाणू मानवी आरोग्यास धोका पोहचवू शकतो हा बनावट व्हिडीओ बनवून तो यूटयूबवर व्हायरल झाल्याने पोल्टी व्यावसायीकांना करोडाचा फटका बसला आहे. अफवा

पसरविणाऱ्या या व्हिडीओजबद्दल राज्य पशुसंवर्धन आयुक्तालयाने सायबर पोलीसाकडे तक्रार अर्ज दाखल केला होता, त्याचा न्यायालयाच्या परवानगीने पूणे सायबर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जयराम पाचगुडे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने तपास केल्यानंतर उत्तर प्रदेशातील एक १६ वर्षाच्या मुलगा आणी काकिनाडा येथील ४२ वर्षाचा व्यक्तींना पोलीसांनी ताब्यात घेतले (लोकमत १७ मार्च २०२०).

कोपरखैरणे सेक्टर नवीमुंबई येथे राहणाऱ्या ३० वर्षीय तरूणीसोबत हा प्रकार घडला आहे. तिची बेन्सन मार्गन नावाच्या व्यक्तीसोबत फेसबूकवर ओळख झाली होती. त्याने तो लंडनचा रहिवासी असल्याचे सांगून तिच्याशी मैत्री केली होती. त्यांच्यातली जवळीक वाढल्यानंतर त्याने भेटीसाठी भारतात येत असल्याचे सांगितले, त्यांनी बेन्सन यांच्याकडे ५० हजार पाऊंड आढळल्याने त्याला ताब्यात घेतले असून दंडाची रक्कम भरल्यानंतर त्याला सोडले जाईल, असेही सांगीतले या वेळी व्यक्तीने बेन्सन यांच्यासोबतही तिचे बोलणे करून दिले. या वेळी बेन्सन याने आपल्याला डांबून ठेवले असून, विमानतळावरून सुटल्यानंतर तिला दंडाची भरलेली रक्कम परत देतो असे सांगितले, त्यांच्यावर विश्वास ठेवून तरूणीने सुरूवातीला ६५ हजार रूपये भरले. परंतू त्यानंतर वेगवेगळया कारणांसाठी तिच्याकडे पैशाची मागणी करण्यांत आली. तर सदर तरूणीही फोनवरील व्यक्ती सांगेल त्याप्रमाणे संबंधित बॅक खात्यात पैसे पाठवत होती, तिने ९ लाख ७७ हजार रूपये भरले. परंतू संपूणर्ष प्रकरणावर संशय आल्याने तिने पैसे पाठविणे बंद केले शनिवारी बेन्सन याने तिला फोन करून लंडनला जात असल्याचे तिने सांगीतल्याने तिने कोपरखैरणे पोलीसाकडे तक्रार केली आहे. त्यानूसार गुन्हा दाखल करण्यांत आला. (लोकमत कॉम. १७/३/२०२०)

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विविध ठिकाणांहून मदतीचा हात पूढे येत असतांना काही ठग मंडळी याच मदतीआड फसवणूक करतांना दिसून आले. गरजू व्यक्तीला घरपोच जेवण पोहोच विण्याची फेसबुक पोष्ट वाचून मलबार हिलमधील (मुंबई) ५४ वर्षीय महिलेने मदत मागितली. मात्र या मोफत जेवणासाठी त्यांना तब्बल ७५ हजार रूपये गमविण्याची वेळ ओढावली आहे. ३० मार्च २०२० ला या महिलेच्या मुलीने फेसबुकवर ज्यांना जेवणाची आवश्यकता आहे त्यांनी संबंधित मोबाईल – ८३८९९९२९९५ या क्रमांवार संपर्क करण्याबाबतची पोष्ट पाहिली व त्यानूसार दुपारी दीडच्या सुमारास कॉल करून त्यांना मदत मागितली, तेंव्हा राहूल नावाच्या व्यक्तीने कॉल घेत एक लिंक पाठवून त्यात माहिती भरून पाठविण्यांस सांगीतले. त्यावरून त्यांनी वर नमूद क्रमांकावरून टेक्स्ट मॅसेजद्वारे पाठवलेली लिंक ओपन करून त्यामध्ये नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक, डेबिट कार्ड क्रमांक, सीव्हीव्ही क्रमांक ही माहिती भरून दिली. त्यानंतर त्याने आणखी एक लिंक पाठवून एक ॲप व इन्स्टॉल करण्यांस सांगितला. फोनवरून बोलने सूरू असतांनाच तक्रारदार यांच्या मोबाईलवर एकामागे एक संदेश येत असल्याचे लक्षात आले. त्यांनी संदेश पाहताच बॅकेतून पैसे वजा होत असल्याचे पाहुन त्यांना धक्का बसला. (लोकमत दि. २/४/२०२०).

कोरोना (कोवीड–१९) या साथीचा मुकाबला करण्यासाठी पंतप्रधान मदत निधी करिता PMCARE@SBI ही ID तयार करण्यांत आली. मात्र ठगदारांनी याची मिळती जुळती ID तयार करून जनतेची फसवणूक केल्याचा प्रकार पुढे आला.

**सायबर गुन्हे रोखण्यासाठी नागरीकांनी घ्यावयाची दक्षता :**

१) बॅकेकडून ए.टी.एम. कार्ड संबंधी कुठलीही माहीती मोबाईल किंवा फोन द्वारे विचारली जात नाही. ही गोष्ट नेहमी लक्षांत असू द्या फसव्या कॉल्सपासून सावध रहा. २) आपल्या ए.टी.एम. कार्ड चे १६ अंकी नंबर व पिन/पासवर्ड कोणालाही सांगू नका तसेच कुठेही लिहुन ठेवू नका. ३) तुम्ही न केलेल्या बॅक व्यवहारा संबंधी मोबाईलवर मॅसेज येताच त्वरीत बॅकेशी संपर्क करा. ४) सोशल मिडिया तसेच ई–मेल वर येणारे अनोळखी / अनावश्यक/ असंबंधित लिंकवर क्लिक करू नका. ५) सोशल मिडियावर तसेच ई–मेल द्वारे येणाऱ्या प्रलोभनास बळी पडू नका. ६) इंटरनेटचा वापर करतांना आपली व्यक्तीगत माहिती सुरक्षीत राहील याची दक्षता घ्या, वैयक्तीक माहिती सोशल नेटवर्कींग साईटवर टाकू नका. ७)

संगणक, मोबाईलवर विविध साईटस व ॲप्लिकेशनचा वापर केल्यानंतर आठवणीने लॉग आऊट करा. ८) ऑनलाईन शॉपिंग करतांना सुरक्षित संकेत स्थळाचाच वापर करा. ९) आपल्याला विदेशात नौकरी मिळणार आहे, आपली संपूर्ण माहिती ई–मेल करा, आपल्याला गृहकर्ज/वैयक्तीक कर्ज कमी व्याजदरात मिळणार, अभिनंदन ! आपल्याला मोबाईल कंपनी कडून लॉटरी लागली आहे, आपण लॉटरी जिंकला आहात, आपले नाव, पत्ता, खात क्र. माहिती ई–मेल मध्ये पाठवा, अशा फोन कॉल/एस.एम. एस/ई–मेल पासून सावध रहा. १०) अल्प कालावधीत जास्त व्याजाचे प्रलोभन देणाऱ्या विविध वित्तीय कंपन्यापासून सावधान. ११) कंपनी/सोसायटीच्या प्रबंधनाबाबत/रजीस्ट्रेशन बाबत आवश्यक माहिती घ्यावी. १२) कंपनीने भाग भांडवलदार, गुंतवणुकदार, सदस्य यांचे रक्कमेच्या सुरक्षेकरता सुरक्षा ठेव जमा केल्याची खात्री करावी. १३) कंपनी/सोसायटी गुंतवणुक केलेल्या रकमेवर कोणत्या माध्यमातून स्त्रोतातून (उत्पन्नाचे साधन) रक्कम त्यांच नियमानुसार रक्कम परत करणार आहे, याबाबत माहिती घ्यावी. मनी सक्युलेशन बॅकींग ॲक्ट प्रमाणे कामकाज करीत असल्याची खात्री करावी. १४) बोगस अभिकर्त्यां (एजन्ट) पासून सावधगिरी बाळगावी. १५) कंपनी/सोसायटीने गुंतवणुकदाराची मॅच्युरिटी रक्कम दिली नसल्यास सबंधितांनी कागदोपत्री पुराव्यासह नजीकच्या पोलीस स्टेशनला रितसरपणे संबंधीताविरूद्ध तक्रार नोंदवावी. १६) इसिस सोशल नेटवर्किंगच्या माध्यमातून जगभरातील तरूणांना दहशतवादी कारवायासाठी जाळयात ओढत आहे. फेसबूक, व्टिटरचा वापर करून तरूणांना प्रलोभन देवून लढण्याकरिता बोलाविण्यांत येत आहे. यासंबंधी कुठलीही पोष्ट, माहिती तुम्हाला आढळल्यास त्वरीत जवळच्या पोलीस स्टेशनला कळवा.

**संदर्भ ग्रंथ**

१. लोटे रा.ज., भारतीय समाज आव्हाने आणि समस्या, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर, जून २०११.
२. लोकमत वृत्तपत्र दि. १५ मार्च २०२०.
३. सायबर सेल, नागपूर ग्रामीण नागपूर
४. Maharashtratimes com. 12th June 2019.
५. लोकमत कॉम, १७ मार्च २०२०.

# पोषणासाठी आहारात रानभाज्यांचा व फळांचा उपयोग – एक अध्ययन

**डॉ. सौ. सोनाली राजेश बन्सोड,** गृहअर्थशास्त्र विभाग, लोक महाविद्यालय, वर्धा. ४४२००१. मो. क्र. ८२०८२२८३९६

**प्रस्तावना:–** प्रत्येक व्यक्तीचे आरोग्य योग्य राहणे, त्याचे योग्य प्रकारे पोषण होणे, ही मानवी जीवनाची प्राथमीक आवश्यकता आहे कारण पोषण व आरोग्याचा जवळचा संबंध आहे 'आरोग्य ही संपत्ती' आहे. आपण जे अन्न ग्रहण करतो त्या अन्नातून शरीराला पोषक तत्वे प्राप्त होतात. आहारातून प्रथीने, कार्बोदके, स्निग्ध पदार्थ, जिवनस्त्वे व खनिज पदार्थ व पाणि असे सहा पोषक घटक प्राप्त होतात. शरीरात प्रत्येक पोषक घटकाचे विशीष्ट कार्य असते. पोषक घटकांचे प्रमाण कमी किंवा जास्त झाले असता त्याचा हानीकारक प्रभाव शरीरावर पडतो स्वामीनाथनच्या मते, 'मानवाच्या पोषणाचा दर्जा वाढविण्यासाठी आर्थिक साधन अत्यंत आवश्यक आहे परंतू शरीरासाठी आवश्यक आणि स्वस्त पोषक खाद्यपदार्था संबधीचे अज्ञान हे शरीराचा पोषणस्तर खालावण्याचे कारण ठरते' त्यासाठी आहारासंबधीचे ज्ञान समाजातील सर्व घटकांना असणे अत्यंत गरजेचे आहे. अज्ञानामूळे कुपोषणाच समस्या वाढते. उपलब्ध अन्नपदार्थात कमीतकमी खर्चात अधिक उपयुक्त पोषण प्राप्त करण्याचे ज्ञान सामान्य जनतेस असावयास हवे. त्यासाठी ग्रामीण भागातील लोकांना त्यांच्या परसबागेत सहज उगवणाऱ्या व पिकवता येणाऱ्या रानभांज्याविषयी माहीती असणे अत्यंत गरजेचे आहे अश्या रानभाज्यांचा व फळांचा आहारात समावेश केल्यास त्यातून सर्व प्रकारची आवश्यक जिवनसत्वे तर प्राप्त होतीलच त्याच बरोबर त्यापासून कॅल्शीयम, फॉस्फोरस, लोह, पोटॅशियम, जस्त, ताबे यासारखे महत्त्वाचे खनिजद्रव्येदेखील प्राप्त होतात. रानभाज्यामध्ये क्लोरोफील नावाचे घटक द्रव्य असते. हा घटक पचनसंस्थेसह शरीरातील रोगप्रतीकारक शक्ती ही वाढवते.

**अध्ययनाची उद्दीष्टये :–** १) समाजातील सर्व स्तरातील लोकांना रानभाज्या व फळांविषयी माहीती देणे २) लोकांमध्ये रानभाज्या मधील पोषक घटकांसंबधी जागरुकता विकसीत करणे. ३) पोषणाविषयी योग्य घटकासंबंधी शास्त्रीय दृष्टीकोन निर्माण करणे. ४) आपण राहात असलेल्या ठिकाणी पिकणाऱ्या भाज्या व फळांविषयी माहीती देऊन त्यातील पोषक घटकांचे ज्ञान करुन देणे. ५) रानभाज्यांचे आरोग्यासाठी फायदे काय, त्यांचे औषधी गुणधर्म कोणते यांची माहीती देणे.

**रानभाज्या व फळांचे महत्त्व :–** रानभाज्यांचे आहारातील महत्त्व खूप जास्त आहे. या रानभाज्या पावसाळा या ऋतुमध्ये आपल्यासाठी सहज उपलब्ध असतात. रानभाज्यामधून आपल्याला अनेक पौष्टीक घटक मिळतात रानभाज्यामध्ये पोषक घटका सोबतच तंतमुय पदार्थ हा महत्त्वाचा घटक देखील प्राप्त होतो. कुपोषण मुक्ती मध्ये वरील सर्व घटकांचा आवर्जून विचार केला गेला पाहिजे पण बरेचदा रानभांज्याबद्दल पुरेशी माहीती नसल्यामूळे इच्छा असतांना देखील अनेक लोकांकडून त्या खरेदी करण्याचे प्रमाण मात्र कमी आढळते. सर्व रानभाज्यांमध्ये तंतूमय पदार्थ भरपूर प्रमाणात असतात. त्यामध्ये काटमाळ, तांदुळजा, घोळ, चिवड, राजगिरा, शेवगा, हातगा, आंबाडी, गोफन, चंदनबटवा, आंबटचुका, मोरंगी, दवणा, मोहरीची पाने या सर्व रानभाज्या नैसर्गीक रुपात उगवतात या भाज्यांमध्ये पानांचं समावेश असतो अश्या भाज्या विकत घेतल्यानंतर त्या गरम पाण्यात उकळून केल्यानंतर देखील त्यातील आवश्यक घटक निघून जात नाहीत. तसेच उकळलेल्या भाज्यांमध्ये शक्यतो कमी मसाले व तेलाचा वापर केल्यामूळे त्या आरोग्यासाठी पोषक ठरतात.

**ओळख रानभाज्यांची :–** आपल्या अवतीभोवती असलेल्या काही रानभाज्यांची माहिती खालीलप्रमाणे देता येईल.

१) **दुडीची फुले:–** हा वेल शेतात व इतर नैसर्गिकरीत्या उगवतो. या वेलाच्या फुलांची भाजी करतात. ही पोटाच्या विकारावर गुनकारी आहे. २) **तांदुळजा:–** पावसाळयात सर्वत्र उगवतो व त्याचा भाजी म्हणून वापर होतो. ३) **माठला:–** ही एक पालेभाजी रानात उगवते व तोदुळजाप्रमाणेच तिचा वापर आहे. ४) **कुर्डु:–** याच्यात केनी कुर्डु व दुसरा वाटोळया पानाचा कुर्डु असे दोन प्रकार आहेत श्रावणात वाचल्या जाणाऱ्या कहाणी संग्रहात या केनी कुर्डुचा उल्लेख सापडतो. ५) **घोळ (चिवई):–** ही भाजी आंबट असून त्याची पाने जाड असून त्यात पाण्याचा अंश असतो घोळचे पीठले प्रसिद्ध आहे. ६) **तरोटा:–** तरोटयाची पाने मेथीप्रमाणे असतात हे झाड उगवल्यावर त्याची कोवळी पाने तोडून भाजी बनवतात. ही भाजी किंचीत कडू लागते, पण सांधेदुखी साठी उत्तम आहे. ७) **रानतोंडली:–** खानदेशातील जंगलात याचे वेल आढळतात. ही तोंडली नेहमी पेक्षा आकाराने मोठी असतात. चवीस किंचीत कडु असतात. ८) **भुई पालक:–** ही भाजी जमिनीला अगदी चिकटून येते. त्याची पाने पालकासारखी लांबोळी असून त्यास काठावर कंगोरे असतात चव पालकासारखी पण किंचीत कडसर असते. ९) **रानशेपू:–** हा जंगलात आपोआप उगवतो. उग्र वासाचा असून याची भाजी प्रकृतीस उत्तम असते. १०) **कुलुची भाजी:–** पावसाळयाच्या अगदी पहिल्या सरीनंतर कुलुची भाजी रानोमाळ दिसू लागते. अगदी काही दिवसातच ही भाजी तयार होत असल्याने बाजारात सर्वत आधी मीळते. ११) **कुरडू:–** हे एक प्रकारचं तण असतं पावसाळयाच्या सूरवातीलाच रानोमाळ करडू पालेभाजीच्या कोवळया पानांची भाजी केली जाते. १२) **टाकळा:–** टाकळयाची भाजी दिसायला मेथीच्या भाजीसारखीच दिसते. १३) **दिंडा:–** दिंडा भाजी पावसाळा संपला की मृत अवस्थेत जाते आणी पावसाळयाच्या पहिल्या सरीबरोबर त्याला नवे कोंब खुडले जातात. १४) **भारंग:–** ही भाजी उगवल्यानंतर कोवळी असतांनाच तोडली जाते भारंगच्या पानांच्या कडा करवतीसारखा दातांसारख्या असतात भारंगाची सुकी भाजी विशेष लोकप्रिय आहे. १५) **गुळवेल:–** गुळवेलीच्या खोडास लांब धाग्यांसारखी हिरवी मुळे फुटुन ती खाली लोंबत असतात. खोड बोटांएवढे जाड असून त्यावरील साल पातळ त्वचेसारखी असते नंतर तिचे पापुद्रे निघतात. खोडांवर लहान लहान छिद्रे असतात. १६) **बांबू:–** बांबू ही वनस्पती गवत कुळातील असून तिचे आयुष्य १०० वर्षे आहे. बांबूही वनस्पती तिच्या जिवनक्रमात शंभर वर्षानंतर एकदाच फुले–फळे देते व नंतर बांबू पूर्णवणे वाळून जातो. १७) **कमळकाकडी:–** बिया असणाऱ्या फुलांच्या फुगीर भागास मराठीत कमळकाकडी म्हणतात. कमळाच्या कंदास कमळकंद म्हणतात, तर संस्कृत मध्ये कंदास शालूक म्हणतात. १८) **वसू:–** वसू ही रोपवर्गीय वर्षायू जमिनीवर पसरत वाढणारी वनस्पती आहे. ही हुबेहुब घोळ तसेच पूर्नर्नवा या वनस्पती सारखी दिसते.

**आरोग्यदायी रानभाज्या :–** शेती किंवा निगा न करता निसर्गत:च उगवलेल्या भाज्यांना रानभाज्या म्हणतात. शेतांच्या बांधावर, माळरानात या उगवतात. रानभाज्यांमध्ये क्लोरोफील नावाचा घटक असतो तो पचन संस्थेसह शरीरातील रोगप्रतीकारक शक्तीही वाढविते. काही भाज्या थंड तर काही उष्ण धर्मीय असतात.

खोकला, सर्दी, ताप, दम्यावर उपचार म्हणून रानभाज्या आवर्जून खाल्या जातात. कुडा हा रानपाला पोटदुखीसाठी रामबाण उपाय मानला जातो, तर रानकेळयांमध्ये खोकला बरा करणयाची क्षमता असते. टाकळयाची भाजी दिसायला मेथीसारखी मात्र अधिक कडवट तुरट चवीची असते. कोब आलेली भारंगी, शेकटयांच्या भाजीमध्ये प्रोटीन्स भरपूर प्रमाणाम असतात. कुळू व कुवाळुचची भाजी ही गवतासारखी असते त्यामूळे यात अनेकदा विषारी गवतही वाढते. कुवाळुचा मुळाकडचा भाग हा पांढराशुभ्र असतो. गवत हिरव्या गडद रंगाचे असते. विषारी गवताची पाती चपटी असतात. हा फरक सरावाने ओळखता येतो. शेवळ म्हणजे पांढऱ्या मशरुम्सचाच एक महत्त्वाचा प्रकार यात सेक्रोमायसिस इस्ट अधिक असते. सेक्रोमायसिसच्या अतिरीक्त थरामुळे घशात खवखव होणे, खाज आल्यासारखे वाटते. त्यामुळे या भाजीसोबत विक्रीला ठेवली जाणारी फळेही विकत घ्यायला हवीत त्यामूळे खवखवी सारखी लक्षणे नष्ट होतात. या भाज्यांमध्ये लोह खनिज यांचा भरपूर साठा असल्याने त्यांचा आस्वाद पावसाळयाच्या दिवसात शाकाहारी व मासाहारी अशा कोणत्याही जेवणासोबत घ्यायला हवा.

असं म्हणतात आपल्या मातीत जे जे पिकतं ते आपण खावं ऋतूमानातल्या बदलामूळे रोगराई पसरते हे जरी खरं असलं तरी निसर्ग मात्र त्यावरील औषध सूद्धा आपणास देत असतो. पावसाळी हवामानात वाढणाऱ्या निरनिराळया पालेभाज्या व रानभाज्यांमध्ये अनेक औषधी गुणधर्म आहेत गरज आहे की त्या योग्य प्रकारे आहारात समाविष्ट करून घेण्याची. बहूतांशी डोंगराळ भागात राहणारे आदिवासी या भाज्या गोळा करतात व जवळपासच्या गावात तसेच शहरात जाऊन विकतात.

**डॉ. अनुजा पटेल, (आहारतज्ञ) यांनी दिलेल्या माहीतीनूसार :–**

**मायाळू** : मायाळूचा वेल बागेत अंगणात अगदी कुंडीत सुद्धा लावता येतो. अतिशय औषधी गुणधर्म असलेली ही वेल कोकणात सर्वत्र आढळते. 'थंड' गुणधर्माची ही भाजी पित्तशामक आहे. पचनास अतिशय हल्की असल्यामूळे पावसाळी वातावरणासाठी अतिशय उपयुक्त आहे. सांधेदुखीसाठी सुद्धा ही भाजी गुणकारी आहे. पित्त उठले तर मायाळूचा रस अंगावर चोळतात. **शेवळा** : शेवळा ही कंदवर्गीय वनस्पती आहे. याला जंगली सुरण असेही म्हणतात. शेवळा ही प्रथिने व कॅल्शियम युक्त भाजी आहे. शेवळाचा कंद व कोवळया पानाची भाजी करतात. कंदाची पाने दुध व साखर घालून शिजवून खातात. शेवळा खाजरा असतो म्हणून त्यासोबत काकड या वनस्पतीची आंबट फळे घालून भाजी करतात. शेवळाचा कंद अनेक औषधांमध्ये वापरला जातो. **टाकळा** : पावसाळयात रसत्याच्या कडेला व उघडया माळरानावर सहज उगवणारी ही भाजी. उग्र वास असलेली ही भाजी 'अ' जिवनसत्वानी परिपूर्ण आहे. दिसायला साधारण मेथीसारखी असणारी ही पालेभाजी खुपच गुणकारी आहे. थोडीशी कडू असणारी ही भाजी पचनास हलकी असते. टाकळयाच्या पानांचा लेप विविध त्वचाविकारांवर लावतात. या भाजीला 'तखटा' असेही म्हणतात. फरोत आघाडाच्या पत्रीला विशेष महत्त्व आहे. **करटोली** :– करटोली किंवा कंटोळा ही भाजी डोंगराळ भागात आढळते कारल्यासारखी दिसणारी छोटी छोटी फळ अतिशय औषधी गुणाची आहेत. क्रोनीक हेडेक दुर करण्यासाठी ही भाजी उपयूक्त आहे. रक्तशक्रा नियंत्रीत करण्यासाठी करटोळी गूणकारी आहेत. या फळ भाजीमध्ये खूप बिया असतात. ही भाजी फायबरीच आहे. **वाफळी** :– हे बी असते आणी कुळीथासारखे चपटे असते. ही भाजी चिरुन उकडुन त्यात हरभऱ्याची दाळ घालून बनवली जाते या भाजीच्या फळांचे तेलही काढतात. पोटदुखी जंत होणे यासारख्या त्रासामध्ये या भाजीचे सेवन करतात. **हेळू** :– ही रानभाजी औषधी असते, त्याची पाने कुडाच्या पानापेक्षा लहान असतात. या भाजीला पेरुच्या आकाराची फळेही येतात. या फळांची भाजी केळयाच्या चवीची लागते. **कडमडवेली** :– पांढऱ्या रंगाच्या या वेलीला कोवळे अंकुर येतात. याची पाने जाड असतात. ही भाजी चिंचे पेक्षाही आंबट असते अधिक प्रमाणात लसुण वापरुन ती बनवली जाते. या भाजीत पोटाचे आजार बरे करण्याची क्षमता आहे. भाजीतील गुणधर्मामुळे कफप्रवृत्ती दुर होते. **आघाडा** :– आघाडा ही रोप वर्गीय वनस्पती आहे. हरीतालीका पुजेत आघाडयाच्या पत्रीला विशेष महत्त्व आहे. या भाजीमध्ये 'अ' जीवनसत्व भरपुर प्रमाणात आढळते, ही भाजी 'पाचक' असून मुतखडा पोटदूखीवर गुणकारी आहे आघाडा रक्त्वर्धक आहे व हाडे बळकट होण्यासाठी तो खाल्ला जातो. राजगीरा, हडसन हया भाज्यांमध्ये असलेल्या फॉस्फरस, कॅल्शीयम व पोर्टेशियम मुळे हाडे बळकट होतात. हडसन भाजी मध्ये असलेल्या घटाकामध्ये हाडे जुळविण्याचा गुण आहे. चमकुरा, चंदनबटवा कडीपत्ता, शेवग्याच्या शेंगा व पाने हयामध्ये असलेल्या लोहा मूळे रक्तक्षयासाठी उपयुक्त भाज्या आहेत.

बिंडासारख्या रान भाज्या बिन विषारी व सुरक्षित असतात. ज्या रानभाज्यांच्या पानांचा रंग गडद असतो त्यांची चव थोडीशी तुरट व कडू असते. मात्र त्यात पौष्टीक गुणधर्मही अधिक असतात. या भाज्याही उकळून शिजवल्या जातात. करटुल सारख्या काटेरी फळ असणाऱ्या भाजीमध्ये नैसर्गिक जीवनसत्व असल्यामूळे ती पचनास सोपी असतात. आघाडा, माळा, पुननर्वा, कुर्डू, मोरंगी, दवणा, काटेसावर, नारई, टाकळा, आंबाडी, भोकर, खडकतेरी, भोवरी यासारख्या भाज्यामध्ये जस्त (झिंक), तांबे, कॉल्शियम याचे प्रमाण अधिक असते. रानकेळी खोकल्यावर रामबाण उपाय आहे. भारंगीची भाजी ही नवीन फुटलेल्या कोंबाच्या व पानांच्या स्वरुपात असते. यात प्रोटीन्सही भरपूर असतात. टाकळयाच्या पानांचा लेप विविध त्वचाविकारावर लावतात. शेवळा खाजरा असतो म्हणून त्यासोबत काकड या वनस्पतीची आंबट फळे घालुन भाजी करतात. शेवळाचा कंद अनेक औषधांमध्ये वापरला जातो.

**रानभाजी संवर्धन** :– सजीव सृष्टीतील प्रत्येक घटक एकमेकांशी व मानवाशी संबंधीत असल्याने जैव विविधतेतील प्रत्येक घटकांचे संरक्षण व त्यांचे संवर्धन होणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष** :– उत्तम पोषण ही आरोग्याची देणगी आहे पण पोषणाच्या दृष्टीणे जर विचार केला तर आपल्या असे लक्षात येते की सर्व लोंकामध्ये आहार आणि पोषणाविषयी जागरुकतेचा अभाव आहे तसेच रानभांज्यांचे महत्त्व व त्यातील पोषक घटकांच्या माहीतीची कमतरता हा घटक कुपोषणाला कारणीभूत ठरतो परंतू जर समाजातील सर्व लोकांनी आपल्या सभोवती सहज स्वस्त व भरपूर प्रमाणात उपलब्ध असलेल्या रानभाज्यांचा व फळांचा आहारात नियमीत समावेश केलातर सर्वाचे आरोग्य उत्तम ठेवण्यास मदत होईल. फक्त गरज आहे केवळ जागरुकतेची.

**संदर्भ ग्रंथ :–**


१. आरोग्यदायी रानभाज्या (मधुकर बाचुळकर) – सकाळ प्रकाशन.
२. ओळख रानभाज्यांची बाचुळकर, वाली, नांगरे) निसर्गमित्र प्रकाशन, कोल्हापूर.
३. https://www.bobhata.com
४. https://maharashtratimes.com
५. https://divyamarthi.bhaskar.com
६. https://www.saamana.com

# मानवाधिकार आणि अन्न सुरक्षा कायदा

**डॉ. संतोष मेंढेकर,** समाजशास्त्र, विभाग प्रमुख, रेणुका कॉलेज, बेसा, नागपूर मो. ९८६००१५०२५

**सारांश:—** संयुक्त राष्ट्र संघाने १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्काचा जाहीरनामा मंजूर केला आणि जगातील बहुतेक सर्व राष्ट्रांनी मानवी हक्काचा जाहीरनामा स्विकारला. भारतात १९९३ साली मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आणि अंमलबजावणीसाठी मानवी हक्क कायदा अंमलात आणला गेला व १९९४ ला राष्ट्रीय मानवी हक्क आयोग स्थापन करण्यात आला. मानवाच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा असूनही २००८ च्या संयुक्त राष्ट्राच्या जागतिक परिषदेत जगातील सर्वात जास्त लोक भारतात अर्धपोटी रहातात असे वास्तव समोर आले आणि ज्यांना अन्न मिळजे ते देखील पुरेसे नसून जवळपास ३४ टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली असल्याने पुरेसा व सकस आहार घेऊ शकत नाही. द इकॉनॉमिस्ट इंटेलिजन्स युनिट ली या संस्थेने काढलेल्या जागतिक अन्न सुरक्षा निर्देशांकाच्या यादीत भारत४४.४ गुणांसह ७० व्या स्थानी आहे. याचाच अर्थ भारतात अन्न सुरक्षिततेची समस्या आहे. म्हणून देशातील जनतेला भुकमुक्त करण्यासाठी १२ सप्टेंबर २०१३ चे अन्न सुरक्षा विधेयक' हे केंद्र सरकारने उचललेले एक ऐतिहासिक पाऊल आहे व अन्न सुरक्षेला वैधानिक हक्क प्राप्त करून देणारा भारत हा पहिला देश आहे.

'अन्न सुरक्षा म्हणजे सक्रिय व स्वस्थ आयुष्यासाठी सर्वांना पुरेसे अन्न धान्य उपलब्ध करून देणे होय' असे जागतिक विकास अहवालात नमूद केले आहे. अन्न सुरक्षा योजनेसाठी अन्नधान्याची उपलब्धता, त्याचे वाजवी दरात सुयोग्य वितरण आणि त्या अन्नधान्यातून पोषक द्रव्ये मिळावीत या पैलूंवर भर देण्यात आला व अशाप्रकारची अन्नसुरक्षा ही चार टप्प्यांमधून पूर्ण होईल. यासाठी अन्न सुरक्षा विधेयकात अनेक तरतूदी ठरविल्या आहेत. या तरतूदींची पूर्तता करतांना देशांतर्गत त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय पातळीवर सुद्धा सरकारला अनेक आव्हाने पेलावी लागतील तसेच अनेक तडजोडी स्विकाराव्या लागतील अश्या परिस्थितीत अन्न सुरक्षा कायद्याला अधिकाधिक मजबूत करण्यासाठी 'अन्न—वस्त्र—निवारा—पाणी—स्वच्छता' यासंपूर्ण समीकरणात परस्पर पुरकता व अविभाज्यता निर्माण करून दूरदृष्टीने अंमलबजावणी करण्यासाठी सकारात्मक प्रयत्नांची गरज आहे. तेव्हाच सर्वांची अन्नाची गरज पूर्ण करणारा मानवाधिकार प्राप्त होईल.

**बीज शब्द :—** मानवाधिकार, भारतीय राज्यघटना, अन्न सुरक्षा कायदा, मूलभूत गरजा, कुपोषण, सकस व पुरेसे अन्न

**प्रस्तावना:—** प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्याचा नैसर्गिक हक्क आहे. समाजजीवनात मानवी हक्कांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मानवी हक्क प्रत्येकाचे जन्मसिद्ध अधिकार असून ते प्रत्येक मानवाच्या अस्तित्वाशी निगडीत, अविभाज्य, सार्वत्रिक, समान, पुरोगामी, मूलभूत असे आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाने १० डिसेंबर १९४८ रोजी मानवी हक्कांचा जाहीरनामा मंजूर केला आणि जगातील बहूतेक सर्व राष्ट्रांनी मानवी हक्काचा जाहीरनामा स्विकारला आहे. स्वतंत्रताप्राप्तीनंतर २६ नोव्हेंबर १९४९ मध्ये भारताची राज्यघटना तयार केली गेली आणि २६ जानेवारी १९५० रोजी संविधानावर आधारीत सार्वभौम, प्रजासत्ताक, गणराज्य म्हणून भारताचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण झाले मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आणि अंमलबजावणीसाठी भारतात १९९३ साली मानवी हक्क कायदा अंमलात आणला गेला. मानवी हक्क सुरक्षितता कायदा १९९४ नुसार भारतात राष्ट्रीय मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली तेव्हापासून मानवी हक्कांच्या संरक्षणासाठी आणि अंमलबजावणीसाठी अन्य घटनात्मक तरतूदी व कायदे करण्यात आलेले आहेत. यापैकी नुकताच दोन वर्षापूर्वी म्हणजे १२ सप्टेंबर २०१३ रोजी संमत झालेला 'अन्न सुरक्षा कायदा' हा मानवाला पुरेसे व सकस अन्न मिळवून देण्यासाठी करण्यात आला आहे. व त्या माध्यमातून अन्नाची गरज पूर्ण होण्याचा मानवाधिकार सर्वसंमत करण्यात आला म्हणून या संशोधन निबंधात 'मानवाधिकार आणि अन्न सुरक्षा कायदा' याचा विचार करण्यात आलेला आहे.

**अध्ययनाची उद्दिष्टये :—** १. संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवी अधिकारातील अन्नाची गरज जाणून घेणे. २. अन्न सुरक्षेची आवश्यकता व कायद्यात रूपांतर होण्याची गरज. ३. अन्न सुरक्ष कायदा व त्यातील तरतूदी. ४. अन्न सुरक्षा धोरणापुढील आव्हाने.

**अभ्यास पद्धती :—** प्रस्तुत शोध निबंध हा द्वितीयक तथ्य संकलनावर आधारित असून यामध्ये इंटरनेट वरील माहिती, विविध मासिके, वार्षिक अहवाल, वर्तमानपत्रातील लेख, संबंधित पुस्तके, अन्न सुरक्षा विधेयक, कॉन्फरन्स विशेषांकांचा आधार घेतला आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या १० डिसेंबर १९४८ च्या मानवी हक्काच्या जाहिरनाम्यात आर्टीकल २५(१) मध्ये असे मान्य करण्यात आले, "Everyone has the right to a standard of living adequate for the health & well being of himself & of his family, including food, clothing, housing & medical care & necessary social services." अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. पण यामध्येही अन्नाशिवाय मानवाच्या अस्तित्वाचा विचार करणे देखील अशक्य आहे. प्राचीन कालखंडापासून मानव अन्नासाठी संघर्ष करीत आलेला आहे. मानवी उत्क्रांतीच्या प्रत्येक टप्प्यांवर मानवाने आपल्या बुद्धीमत्तेच्या प्रगतीच्या पाऊल पुढे टाकले आहे. तरी भुकेला अजूनही पर्याय शोधता आलेला नाही म्हणून अन्नाचा अधिकार हा फक्त मूलभूत मानवी गरजच आहे.

**अन्न सुरक्षिततेची वास्तविकता व निष्कर्ष :—** १) १९७० मध्ये हेग येथे भरलेल्या दुसऱ्या जागतिक अन्न परिषदेत म्हटले की, प्रत्येक व्यक्तीच्या अन्नधान्यविषयक किमान गरजा जो पर्यंत भागविल्या जात नाही तो पर्यंत त्या व्यक्तीला आर्थिक विभाजनाचे महत्त्व वाटणे शक्य नाही. म्हणूनच अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण हया किमान मूलभूत गरजा पूर्ण झाल्याशिवाय विकास करणे अशक्यच होईल. २) आशियाई मानवाधिकार आयोगाने कुपोषण संदर्भातील अहवालात असे नमूद केले की, भारतात दरवर्षी १० लाख बालकांचा कुपोषणाने मृत्यू होत असून त्यातही मुलींचे प्रमाण सर्वाधिक आहे. ३) महाराष्ट्र राज्य आरोग्य संचालनालय २०१०—११ मध्ये महाराष्ट्रातील ३५ जिल्हयांच्या प्रत्यक्ष दौऱ्यामध्ये राज्यातील ४३ हजार बालकांचा कुपोषणाने मृत्यू झाल्याने अहवालात नमूद केले आहे. ४) युनिसेफच्या २०११ च्या अहवालानुसार १० टक्के मुलींमध्ये रक्ताची कमतरता तर ४७ टक्के मुलींचे वजन कमी असल्याचे आढळून आले आहे. संयुक्त राष्ट्र संघाकडून प्राप्त आकडेवारीनुसार इ.स. २००१ मध्ये जगात सर्वाधिक

म्हणजे २१ कोटी कुपोषित व्यक्ती फक्त भारतात होत्या. ५) २००८ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या १८१ सदस्य देशांची केवळ 'भूक' या विषयावर जागतिक परिषद झाली. त्या परिषदेत अधोरेखित झालेले वास्तव म्हणजे 'जगातील सर्वाधिक लोक भारतात अर्धपोटी रहातात' असे होते. जागतिक स्तरावर भुकबळी समाप्त करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या खाद्य व कृषी संघटन यंत्रणेद्वारे सतत प्रयत्न केले जातात. १६ ऑक्टोंबर हा दिवस 'जागतिक खाद्य दिवस' म्हणून पाळला जातो. यादृष्टीने देशातील जनतेला भुकमुक्त करण्यासाठी अन्न सुरक्षा विधेयक हे केन्द्र सरकारने उचललेले एक ऐतिहासिक पाऊल आहे. ६) ग्लोबल हंगर इन्डेक्स २०१४ (GHI 2014) च्या रिपोर्टवरून भारताचे या सूचकांकामध्ये ५५ वे स्थान आहे जे की पूर्वी ८८ विकसनशील देशांमध्ये ६६ व्या क्रमांकावर होते. ७) जागतिक अन्न कार्यक्रम (वर्ल्ड फुड प्रोगाम) च्या पाहणीनुसार २०१२ मध्ये जगातील ८७ कोटी लोक अन्नापासून वंचित होते. यातील ९८ टक्के लोकसंख्या विकसनशील खंडातील आहे. ८) राष्ट्रीय संस्थेच्या एका अहवालानुसार एका प्रौढ व्यक्तीला प्रती वर्षी १८२.५ किलो अन्न धान्याची गरज असते. भारतात ते फक्त १७३.६ किलो प्रती वर्ष इतके आहे. प्रथिनांच्या बाबतीत प्रत्येक व्यक्तीला दररोज ५० मि. ग्रॅम इतकी गरज आहे. परंतु भारतात फक्त १० मि. ग्रॅम इतक्या प्रथिनांचा उपयोग घेतला जातो. यावरून हे स्पष्ट दिसून येते की, भारतात अन्न सुरक्षिततेची समस्या आहे. डॉ. सुखात्मे यांच्या मतानुसार भारतीय नागरिकांना ८५ टक्के प्रोटीन, ७० टक्के लोह, ३० टक्के स्निग्धांश तर १५ टक्के व्हिटॅमीन ए. व सी.चे अंतत्य नगण्य प्रमाण मिळते. ९) भारतातील प्रत्येक व्यक्तीला कमीत कमी २२५० उष्मांक मिळतील एवढे अन्न मिळणे आवश्यक आहे. परंतु आजही जवळ पास ३४ टक्के लोकसंख्या दारिद्रियरेषेखाली असल्याने पुरेसा आहार घेऊ शकत नाही. भारतात अन्न सुरक्षिततेचा प्रश्न अन्नधान्याच्या उत्पादना अभावी नसून लोकांकडे असणाऱ्या खरेदी क्षमतेच्या अभावामुळे आहे म्हणजेच अन्न सुरक्षिततेचा प्रश्न दारिद्रयाशी जोडला जातो. जागतिक बॅकेच्या रिपोर्टनुसाार दक्षिण आाशियातील ५० करोड लोक क्रयशक्तीच्या आधारावर प्रति दिन १.२५ डॉलरपेक्षा कमी खर्चात जीवन जगतात. या रिपोर्टनुसार भारतातील १/३ जनता (३२.७ टक्के) आंतरराष्ट्रीय गरीबी रेषेच्या खाली आहे. अर्थात यांचे प्रती व्यक्ती प्रती दिन उत्पन्न हे क्रयशक्तीच्या आधारावर १.२५ डॉलर पेक्षाही कमी आहे. १०) द इकॉनॉमिस्ट इंटेलिजन्स युनिट लि. (२०१३) या संस्थेने अन्नधान्याची उपलब्धता, नागरिकांची क्रयशक्ती, अन्नधान्याचा दर्जा, अन्नाची सुरक्षितता भ्रष्टाचार इत्यादी घटकांच्या आधारावर जागतिक अन्न सुरक्षा निर्देशांक काढला व त्यासाठी जगातील सुमारे १०७ देशांचा या सर्वेक्षणांतर्गत अभ्यास करण्यात आला या यादीत भारत ४४.४ गुणांसह ७० व्या स्थानी आहे. श्रीलंका, व्हिएतनाम, चीन, इंडोनेशीया, घाना, मलेशिया हे आशियाई देशही या यादीत भारताच्या खुप पुढे आहेत.

एवढे भयाण व्यास्त्व पाहिल्या नंतर भारतातील जनतेला अजुनही पुरेसे व सकस अन्न मिळत नाही हेच या वरून सिद्ध होते. भारतीय राज्य घटनेने व्यक्तीला जीवन जगण्यासाठी जे काही मूलभूत अधिकार दिलेले आहे त्यापैकी कलम २१ मध्ये प्रत्येक भारतीयाला अन्नाचा अधिकार ;तपहीज जव थ्ववकद्ध दिलेला आहे. भारतीय राज्य घटनेच्या कलम ३९;द्ध४७ या मार्गदर्शक तत्वामध्ये अन्न सुरक्षा देण्याच्या धोरणाचा उल्लेख सापडतो. एप्रिल २००१ मध्ये राजस्थानातील Poples Union For Civil Liberties या संघटनेने कलम २१ चा आधार घेऊन 'अन्नाचा मुलभुत अधिकार' याचीका दाखल केली त्यामध्ये अन्नाच्या अधिकाराचा विषय प्रकर्षाने समोर आला. २००३ साली सर्वोच्च न्यायालयाने सर्वांना अन्नाचा अधिकार मिळावा यासाठी निकाल देतांना असे म्हटले आहे की, विधवास्त्रिया ६० वर्षावरीलवृद्ध, उदरनिर्वाहाचे साधन नसणारे कुटुंब प्रमुख, निराधार, अपंग, दुर्धर आजारग्रस्त, गर्भवती स्त्रिया, बाळंतीण स्त्रिया, एकटया राहणाऱ्या स्त्रिया या सर्वांना पुरेसे अन्न उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे निकालात नमूद केले आहे. सरकारने देखील या संदर्भात अनेक कार्यक्रम घोषित केले, काही योजना आखल्यात तर केंद्रातील युपीए सरकारने २००९ मध्ये भारतीय जनतेला निवडणूक जाहीरनाम्याच्या माध्यमातून दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी देशातील १२५ कोटी पैकी ८१ कोटी भारतीयांना दोन वेळेच्या अन्नाची हमी देणारे 'अन्न सुरक्षा विधेयकावर' चर्चा घडवून आणली व त्याला लिखीत रूप देण्यात आले. अतिशय स्वस्त दरात अन्नधान्य उपलब्ध करून देण्याची योजना असलेले हे विधेयक कायद्यात रूपांतरीत होण्यासाठी बरीच प्रतिक्षा करावी लागली. २०११ मध्ये आघाडी सरकारने मांडलेल्या विधेयकाला ५ जुलै २०१३ ला सादर करून माजी पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या जन्मदिनी २० ऑगस्ट २०१३ ला राष्ट्रीय सुरक्षा कार्यक्रम लागु करण्यात आला त्यानंतर अन्न सुरक्षा विधेयकाला २८ ऑगस्ट २०१३ रोजी लोकसभेत मंजूरी मिळाली, तर २ सप्टेबर २०१३ रोजी राज्य सभेने देखील मंजूरीची मोहोर उमटविली आहे आणि राष्ट्रपती मा. श्री. प्रणव मुखर्जी यांनी २०१३ रोजी विधेयकावर स्वाक्षरी करताच विधेयकाचे कायद्यात रूपांतर झाले. व तो लागु करण्यात आला. ३१ जानेवारी २०१४ ला या योजनेचा शुभारंभ होऊन १ फेब्रुवारी २०१४ पासून अन्न सुरक्षा कायद्याच्या अंमलबजावणीला सुरूवात झाली. अशाप्रकारे अन्नसुरक्षेला वैधानिक हक्क प्राप्त करून देणारा भारत हा पहिला देश आहे. यादृष्टीने अन्न सुरक्षा विधेयक हे मानवाधिकार रक्षणाच्या दिशेने उचललेले एक मोठे पाऊल आहे असे म्हणावे लागेल.

कर्नाटकासह काही राज्यांनी १९ नोव्हेंबर पासून म्हणजे माजी पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांच्या जन्म दिनापासून या योजनेचा शुभारंभ केला. महाराष्ट्रात ही योजना डिसेंबर २०१३ पासून लागू करण्यात आली या विधेयकाचा फायदा राज्यातील ६२ टक्के जनतेला होणार असून यामध्ये ग्रामीण भागातील ७६ टक्के आणि शहरी भागातील ४५ टक्के जनतेला याचा फायदा होणार आहे. यासाठी दर महिण्याला ३ लाख ८८ मेट्रिक टन धान्य लागणार असून सुमारे ९०० कोटी रूपये खर्च होणार आहे. या कायद्यामुळे पिवळे, पांढरे रेशनकार्ड रद्द होणार असून या कायद्यांतर्गत येणाऱ्या लोकांनाच यापुढे धान्य मिळणार आहे.

**अन्न सुरक्षा संकल्पनेतील बदल :–** अन्न सुरक्षा ही देशातील अन्नधान्याचा पुरवठा आणि ते व्यक्तीला उपलब्ध होण्याशी संबंधित संकल्पना आहे. १९७४ च्या जागतिक अन्न परिषदेमध्ये अन्न सुरक्षिततेचा भर अन्नधान्याच्या पुरवठयावर दिल्या गेला होता. नंतरच्या परिषदेमध्ये अन्न सुरक्षेच्या व्याख्येमध्ये अन्नधान्याला असलेली मागणी आणि क्रयशक्ती या मुद्यांचा समावेश केला गेला. १९९६ च्या जागतिक अन्न परिषदेच्या अंतीम अहवालात म्हटले की, अन्न सुरक्षितता म्हणजे जेव्हा सर्व व्यक्तींना, सर्वकाळ, त्यांच्या क्रियाशील आणि आरोग्यदायी जीवनासाठी अन्नधान्याची गरज भौतिकदृष्टया आणि आर्थिकदृष्टया पुरेशा प्रमाणात भागवू शकतात एवढे पुरेसे, सुरक्षित, पोषक अन्नधान्य असणे होय.

**अन्न व अन्न सुरक्षा व्याख्या व अर्थ :– अन्नाची व्याख्या–** 'प्रत्येक व्यक्तीची पोषकतत्वाची गरज वेगवेगळी असते. ही सर्व पोषक तत्वे त्या योग्य प्रमाणात ज्या आहारातून मिळतात त्या अन्नाला सकस आहार म्हणतात.'

यानुसार २००८ मध्ये संयुक्त राष्ट्राच्या 'भूक' विषयावरील जागतिक परिषदेत असे अधोरेखित करण्यात आले होते की, जगातील सर्वाधिक लोक भारतात अर्धपोटी राहतात. म्हणून देशातील जनतेला भुकमुक्त करण्यासाठी केन्द्र सरकारने टाकलेले एक ऐतिहासिक पाऊलम्हणजे 'अन्न सुरक्षा विधेयक २०१३' होय.

१) जागतिक अन्न व कृषी संघटना (१९८३) –''सर्व लोकांना सदासर्वदा अन्नासाठी भौतिक व आर्थिक उपलब्धता करून देणे म्हणजे अन्न सुरक्षा होय.''

२) जागतिक विकास अहवाल (१९८६) – ''सक्रिय व स्वस्थ आयुष्यासाठी सर्वांना पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करून देणे म्हणजे अन्नसुरक्षा होय.''

३) दि वर्ल्ड समीट (१९९६) – ''अन्न सुरक्षा म्हणजे जेव्हा सर्व लोकांना प्रत्येक वेळी समाधानकारक, सुरक्षित, सकस अन्न मिळेल त्यावेळी ते आरोग्यदायी व उत्साही जीवन जगतील.''

**अन्न सुरक्षेचे पैलू व अवस्था :–** राष्ट्रसंघाची जागतिक आरोग्य संघटना व जागतिक अन्नधान्य आणि कृषी संघटना यांनी अन्न सुरक्षेसाठी पुढील तीन महत्वपूर्ण पैलूंवर भर टाकलेला आहे. १) उपलब्धता – देशामध्ये प्रामुख्याने अन्नधान्य सातत्याने आणि मुबलक प्रमाणात उपलब्ध असावे. त्याच बरोबर शासनाकडे आवश्यक असा अन्नधान्याचा राखीव कोटा असावा. २) वितरण व वाजवी दर – उपलब्ध अन्नधान्य समाजातल्या सर्व घटकांपर्यंत पोहचविण्यासाठी सुयोग्य वितरण व्यवस्था असावी आणि अतिशय स्वस्त दरात ते लोकांना विकत घेता आले पाहिजे. ३) पोषक द्रव्ये – सर्वसामान्य जनतेला देण्यात येणाऱ्या अन्नधान्यातून लोकांना आरोग्य पोषक द्रव्य योग्य प्रमाणात मिळण्याची हमी असावी.

वरील तीन महत्वपूर्ण पैलूंवरच अन्न सुरक्षा धोरण आधारलेले आहे व पुढील चार अवस्थांच्या माध्यमातून या धोरणातील तरतूदी पूर्ण करण्यात येणार आहेत.

**अन्नसुरक्षेच्या अवस्था :–**

१ ली अवस्था –मानवी जीवन जगण्यासाठी जगातील सर्वांना पर्याप्त संख्येत अन्नधान्य उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

२ री अवस्था –आहाराच्या दृष्टीकोनातून प्रोटीन युक्त घटक असणारी अन्नधान्य आणि डाळीचे पर्याप्त प्रमाण उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

३ री अवस्था –अन्नधान्य आणि डाळीबरोबरच दुध आणि दुग्धजन्य पदार्थ पर्याप्त प्रमाणात उपलब्ध होतील अशी व्यवस्था असावी.

४ थी अवस्था –विकासाच्या अवस्थेत अन्नधान्य, डाळी, दुध व दुग्धजन्य पदार्थ, फळे व भाजीपाला, मास, मांसे, अंडी इत्यादींचा आहारात समावेश केला जातो.

भारतीय अन्नसुरक्षा विधेयकात केवळ पहिल्या व दुसऱ्या अवस्थेचा विचार करण्यात आला आहे व त्यानुसार अन्न सुरक्षा विधेयकातील तरतूदी ठरविण्यात आल्या आहेत.

**अन्न सुरक्षा विधेयकातील महत्त्वाच्या तरतूदी :–** १) या योजनेतील लाभधारक हे अती गरीब, दारिद्रय रेषेखालचे व दारिद्रय रेषेवरील अश्या तीन प्रकारचे लाभधारक असतील. २) या योजनेत ७५ टक्के ग्रामिण जनता व ५० टक्के शहरी भागातील नागरिकांचा समावेश होतो. ३) प्रति व्यक्ती प्रती माह ५ किलो धान्य पुरविले जाईल. तांदूळ ३ रू. प्रति किलो, गहू २ रू. प्रति किलो व ज्वारी बाजरी याचे भरड १ रू. प्रति किलो प्रमाणे उपलब्ध राहणार आहे. ४) प्रत्येक गर्भवती महिलेला आणि स्तनदा महिलेला अंगणवाडीच्या माध्यमातून बाळ जन्मल्या नंतर ६ महिन्यापर्यंत मोफत पौष्टीक जेवण मिळणार आहे. ५) ६ ते १४ वर्षे वयोगटातील प्रत्येक मुलाला रोज एकदा मोफत पौष्टीक गरम जेवणाचा लाभ मिळणार आहे. ६) १८ वर्षापेक्षा अधिक वयाच्या कुटुंबातील सर्वात ज्येष्ठ महिलेला कुटुंब प्रमुख मानले जाऊन तिच्या नावे रेशनकार्ड दिले जाईल. ७) अन्नधान्याची पुर्तता ही कुटुंब आधारित नव्हे तर व्यक्तीनुसार केली जाईल. ८) ही योजना सार्वजनिक वितरण यंत्रणेमार्फत राबविली जाणार आहे. त्यासाठी रेशनच्या दुकानाची पुनर्स्थापना केली जाईल. ९) या कायद्याखाली धान्य पुर्तते साठी विविध राज्य सरकारांनी पुरेश्या धान्याची तजवीज अन्य स्त्रोतातून खरेदी करून करावी. १०) राज्य, जिल्हा, आणि तालूका स्तरावर धान्य साठवणूकीसाठी गोदामांच्या उभारणीवर सरकारकडून लक्ष दिले जाईल. ११) प्रत्येक लोकवस्तीपासून ३ किलो मिटरच्या परिघात या योजनेत धान्य वितरणासाठी स्वस्त धान्य दुकानाची स्थापना होईल याची राज्यसरकारने व्यवस्था करावी. १२) केंद्राच्या साठयात अन्नधान्याचा तुटवडा भासल्यास किंवा पुर–दुष्काळ यासारख्या आपत्तीमुळे सवलतीतील धान्याची पूर्तता करण्यात न आल्यास लाभार्थ्यांची आर्थिक रूपात भरपाई केली जाईल. अश्यावेळेस अन्न सुरक्षा निधी देणे राज्यांना बंधनकारक आहे. त्यासाठी ही योजना Direct Cash Transfer या योजनेशी जोडण्यात येईल.

अन्न सुरक्षा विधेयकावरील अनेक तरतुदींचा समावेश केला असला तरी अन्नाचा अधिकार फक्त अन्न पुरवठा, उत्पादन, वितरण यांच्याशीच फक्त संबंधीत नसून त्यामध्ये तृणधान्य, पाणी, सफाई यंत्रणा आणि अन्नाच्या अनियंत्रीत निर्यातीवर बंदी घालणे या सर्व बाबींचा समावेश आहे. पुरेसे आणि सकस अन्न मिळणे हा प्रत्येकाचा मुलभूत मानवी अधिकार आहे. प्रत्येक व्यक्तीला नुसते खायला अन्न मिळावे असे नसून त्याला सकस आणि पुरेसे अन्न मिळावे, याशिवाय कुणीही उपाशी पोटी राहता कामा नये, हि बाब आंतरराष्ट्रीय मानवी अधिकार कायदयाच्या कक्षेत येते. यासर्व बाबी विचारात घेता भारताच्या अन्न सुरक्षा विधेयकातील तरतूदींची पूर्तता करतांना देशांतर्गत अनेक समस्या निर्माण होतील व त्यासाठी अनेक आव्हाने सरकारला पेलावी लागतील.

**अन्न सुरक्षा धोरणापुढील आव्हाने :–** भारतात राज्यघटनेतील कलम २१ नुसार अन्नाचा अधिकार या अंतर्गत गरीब जनतेसाठी अन्न सुरक्षा योजनेची आखणी केली आहे. पण या विधेयकाच्या यशस्वी अंमलबजावणी काही महत्त्वाची आव्हाने आहेत ती पूढीलप्रमाणे– १) अन्न सुरक्षा योजनेद्वारे सरकारच्या तिजोरीवर वर्षाला १ लाख २५ हजार कोटींपेक्षा अधिक बोजा पडेल व त्याचा परिणाम भारतीय जनतेवर कराचा मोठया प्रमाणात भार येईल. २) भारतात खेडयांची संख्या जास्त आहे आणि या खेडयांमध्ये व दुर्गम भागात अन्नधान्य पोहचविण्यासाठी वाहतूक व्यवस्था मोठया प्रमाणात उपलब्ध नाही. ३) अन्न सुरक्षा योजनेसाठी येणाऱ्या अन्न धान्याच्या साठवणूकीसाठी गोदामांची पुरेशी व्यवस्था व आधुनिक स्वरूपाची गोदामे उपलब्ध नाहीत. ४) सध्याच्या सार्वजनिक वितरण प्रणालीत १० टक्के नागरिक स्वस्त धान्य दुकानातून खरेदी करतात तेव्हा उर्वरित ६५ टक्के लाभार्थी कसे निवडायचे हे सरकारपुढील मोठे आव्हान आहे. ५) भारतात अनेक मोठया सार्वजनिक योजनांमध्ये

भ्रष्टाचार होत आहे. तेव्हा सुरक्षा सारख्या भव्य दिव्य योजनेत भ्रष्टाचार होऊ नये याचे मोठे आव्हान सर्वांपुढे आहे. ६) या धोरणांतर्गत प्रत्येक लाभार्थ्याला धान्य पुरवण्यासाठी अन्नधान्याची आयात करावी लागेल यातून आयात निर्यात तूट वाढेल. ७) या धोरणानुसार सबसिडी अधिक दिल्यामुळे अनुदानाचा बोजा वाढल्यास रूपयाची घसरण होत जाऊन भारतीय अर्थव्यवस्थेवर त्याचा विपरित परिणाम होईल. ८) अन्नधान्याची उपलब्धता, साठवणूक, वितरण व्यवस्था याबाबत खूप मोठे आव्हान सरकारपुढे रहाणार आहे. ९) कामामध्ये आळशी प्रवृत्ती, दिरंगाई यात वाढ होऊन भविष्यात शेतमजूरांचा तुटवडा निर्माण होण्याची शक्यता आहे. १०) आंतरराष्ट्रीय खाद्य संघटनेच्या अहवालानुसार भारतात एका वर्षात सार्वजनिक कार्यक्रमातून जेवढया प्रमाणात अन्नधान्याची नासाडी होत असते त्यातून ७० लाख लोकांचे दोन वेळेचे जेवण झाले असते यावर नियंत्रण ठेवणे आव्हानात्मक राहील. ११) समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, निरक्षरता रूढी परंपराचा अधिक प्रभाव, उदासीन दृष्टीकोण यामुळे शासनाच्या अन्न सुरक्षा योजनेची वास्तव माहीती जनतेपर्यंत पोहचू शकत नाही व त्यामुळे ते शासकीय योजनांना प्रतिसाद देत नाहीत.

**निष्कर्ष** :— राष्ट्रीय अन्न सुरक्षा धोरणासमोर अशाप्रकारची अनेक आव्हाने असली तरी जगातील सर्वात मोठी अन्न सुरक्षेचा अधिकार देणारी ही एकमेव योजना आहे. भारतातील साधारणत: ८२ कोटी जनतेला पोटभर जेवणाचा कायदेशीर हक्क याद्वारे मिळाला असून देशातील कुपोषण, भूकबळी, गरीबी, दारिद्रिय यासह अनेक समस्यांना काही अशी लगाम बसेल हे नाकारून चालणार नाही. फक्त अन्न सुरक्षितता अधिकाधिक मजबूत करण्यासाठी 'अन्न—वस्त्र—निवारा—पाणी—स्वच्छता' यासंपूर्ण समिकरणात परस्पर पूरकता व अविभाज्यता निर्माण करून दुरदृष्टीने धोरणांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी सकारात्मक प्रयत्नांची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ सूची** —


१. मानवी हक्क सद्यास्थिती आणि आव्हाने — प्रा. सुरेश भालेराव, डॉ. प्रविण लोणारकर, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव मार्च २०१३
२. मानवी हक्क — प्रा. व्ही. पाटील, के सागर पब्लिकेशन, पुणे दहावी आवत्ती २०१४
३. भारत का मानव अधिकार (उल्लंघन, संरक्षण, क्रियान्वयन एव उपचार) — रमेश प्रसाद गौतम पृथ्वी पाल सिंह, विश्वविद्यालय प्रकाशन सागर (म.प्र.) २००१
४. मानवाधिकार और संयुक्त राष्ट्र संघ — सतीश चतूर्वेदी, पोईन्टर पब्लिकेशर्स, जयपूर २००७
५. Right to food security Act. Challenges & opportunities, National seminor volume, March 2015
६. Sontosh kumar, food security in India n` Issues & concern, Kurukheshetra Nove. 2013
७. Economics survey of India 2014-15
८. Human Rights concept & standards , Edited by Jan symonides, UNESCO publishing, Rawat publication, Jaipur 2002
९. Ministry of food, govt. of India, www.dfpd.nic
१०. http//en.wikipedia.org/wiki/foodsecurity
११. www.foodsecurity.in
१२. www.nationalfoodsecurityact.2013.


# लिंगभेद व जातीवादामध्ये असणारी मतभिन्नता

**डॉ. प्रमिला डी. भोयर,** इतिहास विभाग प्रमुख, स्व. निर्धन पाटील वाघाये कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाखनी, जि.भंडारा

**प्रस्तावना** :— 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाला उद्धारी' स्त्री व पूरूष किंवा पती पत्नी हे संसाररूपी रथाचे दोन चाके आहेत ते एकमेकांना पुरक आहेत. तरीही समाजात स्त्रीला कमी का समजावे. एक स्त्री सुशिक्षित झाली तर, एक कुटूंब सुशिक्षित होतो. कुटूंबामुळे एक गांव आणि गावामुळे राष्ट्र सुशिक्षित होते. ''मुलापेक्षा मुलगी बरी आणि प्रकाश देते दोन्ही घरी'' अशा प्रकारचे नारे आपण लावतो परंतू परिस्थिती मात्र वेगळीच असते. भारतात पुरूष प्रधान संस्कृती असल्यामुळे स्त्रीयांना अनेक क्षेत्रांपासून दुर ठेवण्यात आले. वैदिक संस्कृतीत स्त्रीयांना मानाचे व आदराचे स्थान असलेले दिसुन येते. उत्तर वैदिक काळात मात्र स्त्रीयांच्या स्थितीत बदल झालेला दिसुन येतो. म्हणजेच स्त्रीयांची स्थिती खालावलेली दिसुन येते. कामाच्या विभागणीतून वर्ग तयार झाले. वर्गाचे वर्ण आणि पुढे वर्णातूनच जात निर्माण झाली. त्यातुनच वर्ग व्यवस्था आणि लिंगभेद सुरू झाला.

स्त्री पूरूष या लिंगभेदावर या समाजात स्तर निर्माण झाले. श्रेष्ठ, कनिष्ठ हि प्रक्रिया पुरातन व सार्वत्रिक आहे. त्यानूसार दर्जा ठरविला जातो, भुमिका ठरतात. अर्थातच त्याचे निर्धारण त्या—त्या समाजाच्या संस्कृतीच्या आधारे होत असते.फक्त स्त्रीमध्ये होत असलेले शारिरिक बदल हे काही ठराविक काळापर्यंत मर्यादीत असतात. आज विज्ञानाने सिद्ध करून दाखवीले की, स्त्री पुरूषापेक्षा कोणत्याही क्षेत्रात कमी नाही ती कोणत्याही प्रसंगाला तोंड देवु षकते. यापूर्वी वैज्ञानिक प्रगती अभावी कोणताही शास्त्रीय आधार नसलेल्या अनेक गैर समजूती स्त्री बाबत प्रचलीत होत्या. एकविसाव्या षतकात आपण आलो तरी, अज्ञानापोटी आणि स्वार्थापोटी त्या खऱ्या आहेत असे म्हणणारे संख्येने मोठे आहेत. स्त्री ही नाजूक आहे म्हणुन ती पुरूषांसारखे कामे करू शकत नाही असा पुरूषांचा समज आहे. तिने फक्त संतती निर्माण करून त्यांचा सांभाळ करावा, त्यांचे पालन पोषण करावे हेच तिचे काम म्हणजेच शेतीला मनुष्य बळाचा पुरवठा करणारी ती एक साधन आहे.

स्त्री ही दुबळी फारशी कार्यक्षम नसलेली, नेहमी कोणाच्या ना कोणाच्या संरक्षणात राहणारी, पुरूषांची गरज असलेली असा गैरसमज होता. त्यामुळे चुल आणि मुल हेच तिचे कार्यक्षेत्र बनले. स्त्री सुंदर आणि चंचल असल्याने तिच्यावर चारित्र्य रक्षणाची काटेकोर बंधने घालण्यात आली. एवढेच नव्हे तर, नैतिकतेचे मानदंड ठरविले गेले आणि त्याला धर्माचा असलेला नसलेला आधारही दिला गेला. स्त्रीने लहानपणी वडीलांवर, तरूणपणी पतीवर आणि म्हातारपणी पुत्रावर संरक्षणासाठी अवलंबून राहावे असे ठरले. स्त्रीने षैक्षणिक, षारिरीक आणि आर्थिक दृश्टया स्वावलंबी असण्याची गरज नाही असे पुरूष प्रधान संस्कृतीत सांगितले गेले. लिंगभेदाव्दारे समाजावर दुर्गामी स्वरूपाचा प्रभाव पडलेला आहे.

पुरूषप्रधान संस्कृती असल्याने पुरूष श्रेष्ठ आणि स्त्रीया कनिष्ठ मानल्या गेल्या. याला कोणताही तक्रशुद्ध शास्त्रीय आधार नाही. परंतू बळी तो कानपिळी किंवा बळी तो गादी बळकावे या तत्वाचा अवलंब केला गेला. साहजिकच समाज संस्कृतीतील नैतिक—अनैतिक, योग्य—अयोग्य, चांगले—वाईट हे सर्व काही पुरूषांनी ठरवायचे. मानव समाजाला अर्थ उत्पादनात विशेषत:

शेतीसाठी अनेक मनुष्य बळाची आवश्यकता असते. त्यामुळे बालविवाह, बहुपत्नीविवाह केवळ मुलींना जन्म देतो म्हणुन पत्नीचा त्याग करून दुसरे लग्न हया समस्याचे विघातक परिणाम स्त्रीयांनाच भोगावे लागतात. मनुष्यबळाचा पुरवठा करणारी स्त्री ही साधन आहे. बालवयात विवाह झाल्यावर अकाली मातृत्व लादले जाते. जनन क्षमतेचा कालखंड लांबतो. यामुळे बालमाता मृत्युचे प्रमाण वाढते. सततच्या प्रसुतीमूळे आरोग्य खालावते आणि स्त्रीचे सरासरी आयुष्यमान कमी होते.

स्त्रीचे कतृत्व मुलांना जन्माला घालणे, त्यांचे संगोपण करणे आणि सर्वाच्या उदरभरणासाठी चुल सांभाळणे हयासाठी चार भिंतीच्या घरातच तिचे जिवन व्यतीत होत असे. तिने शिलरक्षण करावे म्हणुन घराच्या बाहेर पडू नये अशी समाजाची धारणा होती. परपुरूषांशी बोलले तरीसुद्धा घराबाहेर काढली जाई. हया भितीपोटी चुल आणि मुल हेच क्षेत्र योग्य आहे असे तिला वाटू लागले. त्यामुळे तिच्या व्यक्तीविकासाची संधी नाकारल्या गेली.

समाजातिल स्त्रियांचा निम्मा भाग हा पुरूषांवरती अवलंबुन असल्याने आपला पती हाच आपल्या जिवनाचा आधार आहे त्यामुळे पतीची बांधिलकी प्रथम समाजाने स्त्रीवर लादली आणि मग स्त्रियांनीच त्यांचा स्विकार केला. स्त्री पुरूषांची मालमत्ता बनली आपल्या मालमत्तेचा उपयोग तिचा पती कसाही करू शकेल. उदा. पांडवाने द्रोपदीला जुगारात कसे हरले? हे एक उत्तम उदाहरण आहे. पत्नी म्हणुन असलेल्या मालमत्तेचा वापर आपल्या नंतर कोणीही करू नये म्हणुन विकृत मनाच्या पुरूषांनी धर्माचा आधार घेवुन सती प्रथा रूढ केली. पतीच्या मृत्युनंतर पत्नीने चितेत उडी घ्यायची. अश्याप्रकारचे अघोरी कृत्य स्त्रियांवर लादण्यात आले. म्हणुन मुलगी जन्माला आली तर, दु:खाची कुऱ्हाडच त्या कुटूंबावर कोसळली असे समजले जावू लागले. पतीच्या मृत्युनंतर तिने दुसरे विवाह करू नये परंतू पुरूषांनी मात्र दुसरे विवाह करावे. तिने अलंकार, श्रृंगार, चांगले वस्त्र, यांचा त्याग करावा, मुंडण करावे, अंधाऱ्या खोलीत राहावे. मरण येत नाही म्हणन दोन घास खावुन जगावे अशाप्रकारचे जिवन विधवा स्त्रिच्या नशिबी आले होते. समाजात अज्ञानाचे प्रमाण भरपूर आहेत. ब्राम्हण वर्ग सोडला तर, जवळ–जवळ सर्वच समाजात अज्ञान आहे. पुरूष स्त्रियांना तुम्हाला काय कळतो? अशी भाषा बोलतात. त्या काळी स्त्रियांना चुल आणि मुल याच क्षेत्रापुरते मर्यादीत राहावे लागे. वैदिक काळ सोडला तर स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारला गेला होता. म्हणूनच स्त्रिया अज्ञानी राहिल्या. अज्ञान हे लोकसंख्या वाढ, कुपोषण, दारिद्रय, बालमृत्यु, अनारोग्य, फसवणुक, जातियता इत्यादी समस्यांच्या मुळ कारणांपैकी एक. समाज अज्ञानी असण्याचे मुळ कारण म्हणजे स्त्री अज्ञान होय. पुरूषांनी कसेही वागावे, वेसन करावे, बाहेरगांवी जावे, लंपटपणा करावे, जुगार खेळावं हे सर्व त्यांना माफ परंतु स्त्रीयांसाठी मात्र कठोर असे दंडनिय नियम होते. आज देखील यात फारसा फरक पडलेला नाही. हे नैतिकतेच्या दुहेरी मानदंडाची एक व्यवस्थाच रूढ झाली. ज्याचा–ज्याचा स्वंय उपभोग पुरूषांनी वाटेल तसा घेतला परंतू स्त्रीयांच्या वाटयाला मात्र दारून, पिळवणूकीचे आयुष्य आले.

अज्ञान असो किंवा पुरूषी मानसिकता असो पुरूषांनी स्त्रियांना कमी लेखण्यात माघार घेतली नाही. तिची शारिरीक, मानसिक दृष्टया पिळवणूक करण्यासाठी धर्माचा असला नसलाही आधार घेतला आणि धर्माच्या नावावर तिची पिळवणूक चालुच ठेवली. शास्त्रात असे सांगीतले आहे तसे सांगितले आहे असा गवगवा करून पुरूषांनी स्त्रियांवर मनमानी राज्य केले आहे. सतीच्या नावावर स्त्रीचा खुन, देवदासीच्या नावावर तिला वेश्या बनवून तिचा उपभोग घेण्यापर्यंत पुरूषांनी मजल मारली. आजदेखील स्त्रियांचा काळा बाजार दिसुन येतो.

समाजाच्या निम्या लोकसंख्येला स्वार्थान दुबळे ठरविल्याने या देशाची भौतीक प्रगती मोठया प्रमाणात मागे पडली. दारीद्रय, अज्ञान, अनारोग्य यामुळे इथल्या लोकांची गुणवत्ता खालावलेली आहे. दोन चाकी रथाच्या गाडीचे एक चाक मोडल्यावर जी गती त्या रथाला येते आणि ज्या गतीने तो पुढे जातो तिच गती भारताच्या वाटयाला आली. अमर्याद लोकसंख्या आणि वाढत्या अज्ञानामुळे दारिद्रय वाढले, अनारोग्याचा प्रश्न निर्माण झाला. एकुण अर्थार्जन आणि ज्ञानप्रसार यात स्त्रियांना कोणतीच भूमिका नसल्याने भारतीय समाजाची पिछेहाट झाली. ज्या पाश्चिमात्य देशांनी औद्योगिक क्रांती यशस्वी केली. दोन महायुद्धाची संकटे झेलली आणि त्यातुन तावुन सुलाखून बाहेर पडले त्या देशाच्या स्त्रियांनी पुरूषांच्या खांद्याला खांदा लावुन जे योगदान दिले ते अतिशय महत्त्वाचे आहे. परंतू आमची भारतीय मुलगी बि. ए. परिक्षा द्यायला जात असतांनी सुद्धा दादाला सोबत घेवुन जाते. अशी आमच्या भारताची परिस्थिती आहे.

आज देशाने स्त्रियांसाठी अनेक कायदे केले, स्त्री–पुरूष समानता केली तरी भारतीय समाज पुरूष प्रधान असल्याने पुरूषांचे वर्चस्व दिसुन येते आहे. आणि स्त्रियांना अजुनही दुय्यम स्थान दिले जाते हि भारतीय समाज रचनेची शोकांतिका आहे. आज बघितलं तरं स्त्री कोणत्याही क्षेत्रात मागे नाही, आपल्या देशाच्या राष्ट्रपती, मुख्यमंत्री, प्रधानमंत्री, पायलट अशा विविध क्षेत्रात स्त्रिंया पोहचल्या आहेत तरीही मात्र घरी त्यांना गौणच स्थान मिळते.

जगातील सर्वच समाजात सामाजिक स्तर असतात. हे स्तर जन्म, वंश, लिंग, वय, शारिरिक क्षमता, आर्थिक व राजकिय घटक हया आधारे निर्माण झाले. परंतू भारतातील सामाजिक स्तर हे प्रामुख्याने जातीव्यवस्थेवर आधारित आहे. भारतीय समाजात जाती व्यवस्थेला विशेष महत्त्व आहे. हया जाती व्यवस्थेवर भारतात सामाजिक स्तर रचना निर्माण झाली. हे जातीवर आधारित असलेली स्तर रचना बंदीस्त स्वरूपाची आहे. जगाच्या पाठीवर जातीच्या आधारावर स्तर रचना नाही. जाती व्यवस्था भारतीय समाज व्यवस्थेचा एक अविभाज्य घटक आहे. जाती व्यवस्थेशिवाय भारतीय समाज व्यवस्थेचे यथार्थ आकलन होवूच शकत नाही. ही गोष्ट लक्षात घेवूनच एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून समाजशास्त्र व माणसशास्त्राचे लक्ष जातीव्यवस्थेकडे केंद्रीत झाले होते. भारतात वैदीक कालखंडात वर्ण व्यवस्था होती. त्यानूसार ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशा प्रकारचे वर्ण निर्माण झाले होते. नंतरच्या काळात हया वर्णाचे रूपांतर जातीत झाले आणि त्यानंतर चार जातीच्या शेकडो जाती भारतात निर्माण झाल्या. डॉ. आंबेडकर म्हणतात कि, जात हा शब्द समान दर्जाचा नाही, जात असमानतेवर आधारित आहे, उच्च निच्चता जातीमध्ये आहे. उच्च जातीपेक्षा मधली जात कनिष्ट आहे. उच्च जातीला अग्रक्रम आणि कनिष्ट जातीत कमी दर्जा मिळतो. अशा प्रकारे भारतीय समाजाचे वेग–वेगळया जातीत विभाजन झाले आहे. व्यक्तीचा जन्म ज्या जातीत होतो त्याच जातीचा तो समजला जातो परंतू त्याची जात त्याच्या कर्मावरून ठरत नाही. व्यक्तीला जात बदलता येत नाही. त्यामुळे व्यक्तीचा दर्जाही बदलत नाही. अशाप्रकारे जाती व्यवस्थेवर आधारलेले स्तरीकरण बंद स्वरूपाचे आहे.

जाती व्यवस्थेमुळे हिंदु समाजाचे वेगवेगळया खंडात विभाजन झाले. प्रत्येक जातींनी स्वतंत्र आणि वैशिष्टयपूर्ण जिवनपद्धती होती.

प्रत्येक जातीचा स्वतंत्र व्यवसाय होता. व्यक्तींना जातीचे असलेले व्यवसायच करावे, असे बंधन होते. विशेष म्हणजे जातीचे सदस्यत्व जन्माने मिळते त्यामुळे त्या जातीच्या नियमानूसारच जिवन जगावे लागते. आपल्यामध्ये असलेल्या गुण कौशल्यामुळे त्याला आपली जात बदलता येत नाही. प्रत्येक जातीचे काही नियम असतात. उदा. विवाहाविषयी, खाण्यापिण्याविषयी, इत्यादी यांचे जर कोणी उल्लंघन केले तर, त्याला जात पंचायत शासन करित असे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीला आपल्या जातीच्या नियमानूसारच व्यवहार करणे भाग होते.

प्रत्येक जातीत श्रेष्ठ–कनिष्ठता आहे. सर्वात श्रेष्ठ ब्राम्हण समजले जात होते. तर सगळयात कनिष्ठ अस्पृश्य समजल्या जात होते. बाकीच्या इतर जाती ब्राम्हणापेक्षा खालच्या आणि अस्पृश्यांपेक्षा वरच्या, ब्राम्हण आणि अस्पृश्य हया दोन जाती सोडल्या तर बाकीच्या जातींना निश्चित असा क्रम नव्हता. सगळयांचे आचार विचार वेगळे होते. सगळयांची संस्कृती वेगळी होती. अस्पृश्यांचे हातचे अन्न निषेध मानले जाई. सामाजीक संबंध जातीचे कडक बंधन होते. अस्पृश्यांची सावली देखील महाराष्ट्रांमध्ये विटाळ मानत असत. भारतामध्ये अस्पृश्यांची स्थिती अतिशय शोचनिय होती. कनिष्ठ जातीतील व्यक्तिला कोणतेही अधिकार नव्हते. त्यांना इतर अधिकारांपासून वंचीत ठेवले होते. कनिष्ठ जातींना आर्थिक आणि धार्मिक जिवनात मुक्तपणे भाग घेण्यास मनाई होती. पेशवाईच्या काळात अस्पृश्यतेला उधान आले होते.

**निष्कर्ष** :– व्यक्तिला व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य नव्हते. त्यांच्या कुटूंबात असलेला परंपरागत व्यवसाय पिढ्‌यानपिढ्‌या करावा लागत होता. आपल्या आवडी–निवडी किंवा गुणवत्तेनूसार व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य नव्हते. ब्राम्हणांनी अध्ययन, अध्यापन करावे, क्षत्रीयांनी राज्य कारभार आणि देशाचे रक्षण करावे, वैश्यांनी व्यापार आणि शेती करावी आणि शुद्रांनी मात्र हया तिन्ही वर्गाची सेवा करावी अशी सक्ती होती. जातीच्या अनेक उपजाती निर्माण झाल्या आधुनिक काळात पोटजातींमध्ये विवाह करायला लागते. हया पोटजातींमध्ये अनेक लोक अजुनही आपलीच जात शोधतात. आपली जात सोडुन दुसऱ्या जात किंवा पोटजातीशी विवाह करणे हा सामाजिक गुन्हा मानतात. असा गुन्हा करणाऱ्याला दंड देण्याचा अधिकार जात पंचायतीला होता. दुसऱ्या जातीशी विवाह करणाऱ्या व्यक्तीवर बहिष्कार टाकला जाई. भारतात जाती व्यवस्थेला हिंदू धर्माचा आधार आहे जातीचे नियम पाळणे म्हणजे धर्माचे पालन करणे होय हया आधारावरच जाती व्यवस्था मजबूत करण्यात आली. जाती व्यवस्थेमुळे वेगवेगळया जातीतील लोकांना आपलेसे वाटत नाही. फक्त आपल्याच जातीचा विचार करतात. आपल्याच जातीच्या लोकांविषयी आपूलकी वाटते दुसऱ्या जातीचा तिरस्कार करतात. दुसऱ्या जातीला आपल्यापेक्षा कमी समजतात. एकीकडे जातीयता नष्ट व्हावी म्हणून प्रयत्न केला जातो तर दुसरीकडे स्वत:च्या हिताचे रक्षण करण्यासाठी विविध संघटना आढळुन येतात. लोकांमध्ये जातीविषयी आदर भावना निर्माण झाल्यामुळे जाती–जातींमध्ये संघर्ष होतात आणि याचा परिणाम समाज जिवनावर होतो. उदा. जाळपोळ, दंगे, हाणामाऱ्या इत्यादी.

**उपाय** :– लिंगभेद आणि जातीयतेचा प्रश्न भारतामध्ये भेडसावत आहे. स्त्रियांनी विविध क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती केली असली तरी, बोटावर मोजण्याजोग्या स्त्रियां पुढे गेल्या आहेत. जोपर्यंत समाजाची मानसिकता बदलत नाही तोपर्यंत कायदे करूनही पूर्णपणे यश मिळत नाही. कुटूंब उध्वस्त होवू नये म्हणून स्त्रियां स्वतः इच्छेचा त्याग करतात. स्त्री पुरूष हे समान आहे म्हणुन त्यांना समान अधिकार देवून घरात आणि समाजात पुरूषांप्रमाणे स्त्रीयांनाही मानाचे स्थान द्यावे. मुलगी जन्माला येणे हा अभिश्राप नसून मुलं मुली समान आहेत अशी मानसिकता बनवावी तसेच सर्व जाती सारख्याच आहेत कोणतीही जात श्रेष्ठ, कनिष्ठ नाही असे समजावे आणि सर्व जातीच्या, धर्माच्या लोकांसोबत समानतेने वागावे तरच भारताची राष्ट्रीय एकात्मता टिकून राहील. नाही तर येणारा काळ धोक्याचा आहे. जाती–जातीतील संघर्षामुळे समाजातील स्वास्थ्य बिघडते आणि देशाचे एक्य धोक्यात येते. प्रत्येक जात इतर जातीहून वेगळी असते व प्रत्येकाला आपल्या जातीचा अभिमान असतो. परंतू एकांनी दुसऱ्याला कमी समजू नये जर श्रेष्ठ, कनिष्ठ समजले तर समाजात तेढ आणि कडवट पणा वाढत जावून कलह निर्माण होणार. आपल्या जातीची संस्कृती श्रेष्ठ आहे हे पटवून देण्याची स्पर्धा सुरू होते आणि कोणतीही राष्ट्रीय योजना राबविण्यास जातीवादामुळे विलंब होतो. तसेच देशाच्या प्रगतीसंबंधी कोणताही निर्णय ताबडतोब घेता येत नाही.

**संदर्भ सुची** :–

१. आठल्ये; विभा, 'प्राचीन व मध्ययुगीन भारत', अंशुल प्रकाशन रेशीमबाग,नागपूर १९९९.

२. आचार्य; धनजंय, 'भारताचा इतिहास' श्री साईनाथ प्रकाशन, धरमपेठ नागपूर २००४.

३. बोबडे; प्रकाश, 'भारतीय समाजरचना' मंगेश प्रकाशन, नागपूर.

४. देव प्रभाकर, 'प्राचीन भारतीय संस्कृती' विद्या प्रकाशन, १९९७.

५. देसाई; नीरा, 'भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान' पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९०९.

६. पाटील; लीला, 'भारतीय स्त्री जीवन' मेहता पब्लिकेशन, पुणे १९९०.

७. पांडे; धनपती, 'आधुनिक भारत के निर्माता' स्वामी दयानंद सरस्वती प्रकाशन, विभाग सुचना आणि प्रसारण मंत्रालय भारत सरकार १९९२.

८. विद्यालंकार, सत्यकेतू, 'भारत का प्राचीन इतिहास' सरस्वती सदन मसूरी १९६०.

९. साने;गीता, 'भारतीय स्त्री जीवन' मौज प्रकाशन गृह, खटावाडी, गिरगांव.

# शालेय पोषण आहार योजना व महिला स्वयंपाकी—एक अध्ययन (संदर्भ: लाखनी तालुका)

**प्रा..राखी श्रीराम तुरस्कर,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, विदर्भ कला व वाणिज्य महाविद्याय, लाखनी, ता. लाखनी, जि. भंडारा.

**प्रस्तावना**:— शालेय पोषण आहार योजना प्राथमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या पटनोंदणीचे व उपस्थितीचे प्रमाण वाढवावे यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्य शासनाने सन १९९५—९६ सालापासून ही योजना लागू केली आहे. सुमारे २२ वर्षापासून शालेय पोषण आहार योजना विविध बदलासह सुरू आहे. २००८ पासून ही योजना सहावी ते आठवीतील विद्यार्थ्यांनाही लागू केली आहे. केंद्र शासन व राज्य शासनाच्या सहकार्याने शालेय पोषण आहार योजना व मध्यान्य भोजन योजना राज्यातील शाळांमध्ये सुरू आहे.

भंडारा जिल्हयातील लाखनी तालुक्यात १३३ जिल्हा परिषद व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळेत शालेय पोषण आहार योजना सुरू आहे. १२ हजार ३१५ विद्यार्थ्यांना शाळामधून दुपारी भोजन पुरविले जाते. आहार शिजविण्यासाठी लाखनी तालुक्यात २६७ महिला स्वयंपाकी १ मदतनिस कार्यरत आहेत.

मध्यान्ह भोजन योजनेचा समावेश राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३ मध्ये करण्यात आला आहे. या अनुषंगाने केंद्र शासनाने मध्यान्ह भोजन योजना, शालेय पोषण आहार योजना नियमावली २०१५ प्रसिद्ध केली. त्यानुसार शासकिय, स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी अनुदानित शाळा, मदरसा, मक्तबा सर्व शिक्षा अभियान सहायित येथे ६ ते १४ वयोगटातील इयत्ता १ ली ते ८ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या व उपस्थित राहणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यास प्रत्येक शालेय दिवशी पोषणमुल्य युक्त मोफत आहार दिला जातो. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ नुसार शालेय पोषण आहार योजनेच्या संनियत्रणाची जबाबदारी शाळा व्यवस्थापण समितीवर सोपविण्यात आली आहे. तसेच विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या आहाराचा दर्जा, गुणवत्ता व आहार शिजविण्यात येणाऱ्या जागेच्या साफसफाईबाबत नियंत्रण शाळा व्यवस्थापन समितीने ठेवावे असे सुचित केले आहे.

राज्यामध्ये शालेय पोषण आहार ही योजना इयत्ता १ ली ते ८ वीच्या विद्यार्थ्यासाठी राबविण्यात येते. सदर योजनेअतर्गत इयत्ता १ ली ते ५ वी या प्राथमिक वर्गातील प्राथमिक विद्यार्थ्यासाठी ४५० उष्मांक आणि १२ ग्रॅम प्रथिने युक्त तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी या उच्च प्राथमिक वर्गातल विद्यार्थ्यासाठी ७०० उष्मांक आणि २० ग्रॅम प्रथिने युक्त आहार देण्यात येतो. योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून प्रतिदिन प्रति विद्यार्थी प्राथमिक वर्गासाठी १०० ग्रॅम व आणि उच्च प्राथमिक वर्गासाठी १५० ग्रॅम तांदूळ पुरविण्यात येतो. लाभार्थी गट प्राथमिक (१ ली ते ५ वी) करीता प्रतिदिन प्रति लाभार्थी आहार खर्च मर्यादा ४.४८ रूपये आहे. उच्च प्राथमिक (६ वी ते ८ वी) करीता प्रति लाभार्थी खर्च मर्यादा ६.७१ रूपये आहे.

आहार शिजविणाऱ्या महिला स्वयंपाकी हया कर्मचारी आहेत. त्या त्यांच्या न्याय हक्कापासून वंचीत आहेत. शालेय मुलांना अन्न शिजवून वाढण्याचे काम करून कुपोषणाच्या समस्येवर मात करून मुलांमध्ये अध्ययनाची गोळी वाढविण्याचे काम करतांना दिसून येतात. अश्या महिला स्वयंपाकी त्यांच्या अधिकारापासून वंचित असल्याचे दिसून येते आहे. महिला स्वयंपाकी यांचा सामाजिक अध्ययनातून त्याच्यात दर्जात्मक व कार्यात्मक सुधारणा केल्या जावू शकतात काय हा विचार महत्त्वपूर्ण ठरणारा आहे. महिला स्वयंपाकीना कौटूंबिक स्तरावर कार्य करून कामच्या ठिकाणी आपली भूमिका पार पाडावी लागते. त्या दृष्टीने त्यांची धडपड सुरू असते. त्यांना कामाच्या ठिकाणी छळ व मनस्तापही सहन करावा लागतो.

**शालेय पोषण आहार स्वयंपाकी महिलांचे कार्ये**:— शालेय पोषण आहार योजनेमध्ये ग्रामीण भागातील शाळांमध्ये महिला बचत गट स्वयंसेवी संस्था यांचे मार्फत अन्न शिजविण्याचे काम करण्यात येत असते. स्वयंपाकी तथा मदतनीस या कामासाठी ग्रामीण भागामध्ये महिला बचत गट किंवा स्वयंसेवी संस्था किंवा मानधनी तत्वावरील पदासाठी स्वतंत्रपणे अनुदान देण्यात येत असते.

ग्रामीण भागातील शालेय पोषण आहार योजनेत महिला स्वयंपाकी कार्यप्रणाली खालील प्रमाणे आहे.

१. अन्न शिजविण्याचे काम करणे.
२. तांदूळ व धान्याची मालाची साफसफाई करणे.
३. शाळांमध्ये विद्यार्थ्यांना आहाराचे वाटप जेवणाच्या जागेवर करणे.
४. शाळांमध्ये विद्यार्थ्यांनी आहाराचे सेवन केल्यानंतर साफसफाई करणे, स्वयंपाकगृहासह तसेच सांडलेल्या अन्नाची योग्य विल्हेवाट लावणे.
५. भाडयांची साफसफाई करणे व जेवल्यानंतर ताटांची स्वच्छता करणे.
६. पिण्याचे पाणी भरणे व जेवतांना विद्यार्थ्यांना पाणी पुरविणे.
७. शाळा व शाळेचा परीसर स्वच्छ ठेवणे.
८. अन्न शिजविणाऱ्या यंत्रणेच्या आहाराविषयक नोंदी ठेवणे.

**शालेय पोषण आहार स्वयंपाकी महिलांच्या मागण्या**:— शालेय पोषण आहार योजनेत कार्यरत महिला दिवसभर अन्न शिजवण्यापासून ते भांडे व परीसर स्वच्छ करणेपर्यंत अनेक कामे करतात त्यांना शासन तुटपुंजे मानधन देत असते. शालेय पोषण आहारच्या महिला स्वयंपाकी आयटक प्रणित महाराष्ट्र राज्य शालेय पोषण आहार कर्मचारी युनियनच्या माध्यमातून संघटीत झाल्या आहेत. महिला स्वयंपाकीच्या दर्जात सुधारणा व्हाव्यात व न्युनतम गरजा पूर्ण व्हाव्यात यासाठी महिला स्वयंपाकीच्या समस्याकडे गांर्भीयाने लक्ष देणे आवश्यक आहे. त्या मानधनावर काम करणाऱ्या महिला कर्मचारी आहेत. शाळा सुरू होण्यापासून ते सुट्टी होईपर्यत महिला स्वयंपाकी कामाम गुंतलेल्या असतात.

महिला स्वयंपाकीची आर्थिक व सामाजिक प्रगती व्हावी व त्यांच्या दर्जात सुधारणा होऊन सन्मानाने जगण्यासाठी त्यांना काही हक्क दिले पाहीजेत. त्यांच्या मागण्या खालीलप्रमाणे आहेत.

१. शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना दरमहा पाच हजार मानधन देण्यात यावे.
२. मानधनाऐवजी किमान वेतन लागु करावे.
३. शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती तथा सामाजिक सुरक्षा जसे भविष्य निर्वाह निधी पेन्शन लागु करणे.
४. स्वयंपाकी व मदतनिस हे अंशकालीन कर्मचारी आहेत तेव्हा त्यांच्या कामाच्या वेळा ठरवून देण्यात यावे.
५. शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना गणवेश व परीचय पत्र देण्यात यावे.
६. शालेय पोषण आहार कर्मचाऱ्यांना आंदोलनात सहभागी होण्याची मुभा मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीने

देण्यात यावी. त्यांना मिळालेला तो कायदेशिर व संवैधानिक हक्क आहे.

शालेय पोषण आहारमध्ये कार्यरत स्वयंपाकी महिलांना यापूर्वी दरमहा १ हजार रू. मानधन अदा केले जात होते. प्राथमिक शिक्षक संघटना यांच्या मागणीनुसार वाढत्या महागाईमुळे एप्रिल २०१९ पासून दरमहा १ हजार ५०० रू. एवढे मानधन अदा करण्याचा निर्णय शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडून घेण्यात आलेला आहे. याबाबत जिल्हास्तरावरून वेळापत्रक तयार करण्यात आलेला आहे. केंद्र प्रमुखांनी दरमहा ३ तारखेपर्यंत मानधनाची देयके तालुका कार्यालयास सादर करावे लागत आहे. तालुका कार्यालयाकडून सर्व देयकाची तपासणी करून एकत्रित देयके जिल्हा परिषदेस बँक यादीसह सादर करण्यासाठी ५ तारखेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. प्राथमिक शिक्षण संचालनामार्फत स्वयंपाकी व मदतनिस यांना मानधन देण्यासाठी जिल्हा परिषदांना आगाऊ स्वरूपाचा निधी देण्यात येत असतो. स्वयंपाकी महिलांना देण्यात येणारे मानधनाचा विचार करता शासनाच्या किमान वेतनाच्या आदेशाला हरताळ फासल्याचे दिसून येते. स्वयंपाकी महिलांना पाच तास काम करून केवळ दीड हजार रूपयात कामावर ठेवले जाते. त्यामुळे महिला स्वयंपाकीच्या दर्जा बदलात अडसर निर्माण होवून त्यांना दारिद्रियाचे जीवन जगावे लागत आहे.

संदर्भ :–
१. स्त्रिया व कॅम्युनिझम अनुवार – सरला कारखानीस लोकवाङ्य गृह प्रा.लि. मुंबई
२. भारतीय समाज मे महिला उत्पीडन, मंजुषा छिल्लर, अर्जुन पब्लिशिंग, हाऊस, दिल्ली
३. शासकीय परीपत्रके, शालेय शिक्षण विभाग, म.रा.

# कामगार कायदे आणि वर्तमान परिस्थीतीतील कामगारा समोरील आव्हाने

**प्रा. डॉ. प्रदिप एच. गजभिये**, नगर परिषद शिवाजी महाविद्यालय, मोवाड, ता. नरखेड, जि. नागपूर. मो.नं. ९८२२९९१३१४

**प्रस्तावना** :– आधुनिक काळात कामगारांचे कोणत्याही प्रकारचे शोषण होवु नये म्हणुन स्वातंत्र्ययापुर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी औदोगिक क्षेत्रात काम करणाऱ्या मजुरांसाठी आंदोलने करून त्यांच्या अधिकाराचे रक्षण करण्याचा प्रयत्न केला. कायदयाची निर्मीती करण्यात आली. भारतीय संविधानात अनुच्छेद ४२ ते ४८ पर्यंत असंघटीत व संघटीत कामगारासाठी तरतुद करण्यात आली त्यांच्या सर्व अधिकाराचे रक्षण करण्यात आले. परंतु वर्तमान परिस्थितीमध्ये कोरोना या रोगाच्या महामारी मुळे देशातील काही राज्यांनी कामगारांच्या संबंधीत आलेले कायदे रद्द करण्याची घोषणा करून अंमलबजावनी केलेली आहे. त्यामुळे त्याचा परिणाम कामगारांवर पडणार आहे. या भयावह स्थितीचा अध्ययन करण्याच्या उद्देशातुन हा लेख लिहीण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकराची कामगार कायदे निर्माण करण्यात भुमिका २९ जानेवारी १९३८ रोजी मनमाड येथे भरलेल्या अखिल भारतीय जी. आय. पी रेल्वे अस्पृश्य कामगाार परिषदेत आपले विचार व्यक्त करतांना डॉ. आंबेडकर म्हणतात की, ''स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या तत्वावर आधारलेली नवी पदधती हे कामगार संघटनाचे ध्येय असावे असे प्रतिपादन करतात. कामगाार वर्गाच्या जिवन स्तराचे कमी होण्यापासुन संरक्षण करणे हे कामगार संघटनाचे मुख्य उद्देश आहे. जेथे कुठे निष्कृष्ठते कडे नेण्याचा प्रयत्नांना निग्रही प्रतिकार करण्याची व समाधानकारक जीवनस्तर सांभाळण्याची लोकांची वृत्ती नाही जेथे मोठमोठया प्रगतीकारक राष्ट्रातही गरीब लोकांची अवस्था केवळ जीव धारण करण्याच्या स्थीतीपर्यंत पोहचते'' म्हणुन भारतात कामगार संघटनांची नितांत गरज असल्याचे स्पष्ट प्रतिपादन बाबासाहेब करतात.

ऑल इंडिया ॲन्ड युनियन कॉग्रेस ही कामगारांची केंद्रिय संघटना १९१९ ला स्थापन करण्यात आली १९२७ मध्ये दुसरे एक संघटन जी. आय. पी रेल्वेमन्स युनियन या नावाने काढण्यात आले. कामगारांच्या हीतासाठी कामगारांनी संघटन उभारले पाहीजे कामगार संघटनांनी राजकारणात शिरलेच पाहीजे कारण शासन सत्तेवाचून कामगारांच्या हीताचे रक्षण करणे अशक्य आहे. कमीतकमी मजुरीचे दर, कामाच्या वेळा, अन्य नियम यांच्या रक्षणासाठी कायदयाची जोड आवश्यक आहे. म्हणुन बाबासाहेबांनी संविधानात कामगारासाठी तरतुद केली. मुंबई विधानसभेत १५ सष्टेंबर १९३८ रांजी कामगारांवर गुलामगिरीची बंधने लादणे हे लोकशाहीचे विडंबन आहे. असे म्हटले यामध्ये यासंबंधी कायदयावर चर्चा करण्यात आलेली होती. स्वातंत्र्यपुर्वी भारतात ब्रिटीश सरकारने अनेक कामगाार कायदयाची निर्मीती केली. यामध्ये नारायण मेघाजी लोखंडे यांचा सुदधा महत्त्वाचा वाटा आहे. सर्वात जास्त मोलाचे योगदान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आहे. त्यांच्यामुळेच कामगारांच्या कामाच्या तासाची निश्चिती करण्यात आली. वेतन निश्चीती संप करण्याचा अधिकार, युनियन स्थापन करण्याचा अधिकार, वेठबिगार पद्धती नाहीसी करण्यात यासारखे अनेक प्रकारच्या अधिकारांचे संरक्षणा करिता केंदिय मंत्रीमंडळात असतांना सुद्धा विविध कायदे बनविण्यात मोलाचा वाटा आहे.

**संविधानातील तरतुदी आणि कामगार** :– भारतीय संविधानाच्या अंतर्गत अनेक तरतुदी करण्यात आलेली आहे त्या अनुषंगाने भा. स. कलम २३ नुसार व २४ नुसार शोषनविरूद्य हक्क प्राप्त झाला आहे. १. **कलम २३(१)** नुसार माणसांच्या व्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरूपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली आहे आणि या तरतुदींचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा कायदयानुसार शिक्षापात्र अपराध असेल. म्हणजेच माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारी यांना मनाई करण्यात आली आहे. २. **कलम २४** नुसार चौदा वर्षे वयाखालील कोणत्याही बालकास, कोणत्याही कारखान्यात या खाणीत काम करण्यासाठी नोकरीत ठेवले जाणार नाही अथवा कोणत्याही धोक्याच्या कामावर त्यास लावले जाणार नाही अथवा कोणत्याही धोक्याच्या कामावर त्यास लावले जाणार नाही म्हणजेच कारखाने, खाणी इत्यादीमध्ये बालकांना कामाला ठेवण्यास मनाई आहे. ३. **कलम ४२** अन्वये राज्य हे, कामाबाबत न्याय व मानविय परिस्थिती निर्माण करण्यासाठी व प्रसुतीविषयक सहायासाठी तरतुद करील. अर्थात कामाबाबत न्याय व मानवीय परिस्थिती आणि प्रसुतीविषयक सहाय्य यांची तरतुद करण्यात आली. ४. **कलम ४३** नुसार राज्य, यथायोग्य विधीविधानाद्वारे किंवा आर्थिक सुसंघटन करून अथवा अन्य कोणत्याही मार्गाने शेतकी, औदोगिक अथवा अन्य प्रकारच्या सर्व कामगारांना काम निर्वाह वेतन, समुचित जीवनमान आणि फुरसतिचा

आणि सामाजिक सांस्कृतिक संधीचा पुर्ण उपयोग याची शास्वती देणारी अशी कामाची परिस्थिती उपलब्ध करून देण्यासाठी आणि विशेषत: ग्रामीण क्षेत्रामध्ये वैयक्तीक किंवा सहकारी तत्वावर कुटीरोद्योगाचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशिल राहील. ५. **कलम ४३ क** नुसार राज्य कोणत्याही उदयोगध्ंदयात गुंतलेले उपक्रम, आस्थापना किंवा अन्य संघटना यांच्या व्यवस्थापनांमध्ये कामगारांना सहभागी होता यावे यासाठी यथायोग्य विधीविधानाद्धारे किंवा अन्य कोणत्याही मार्गाने उपाययोजना करील. अर्थात कामगारांना निर्वाह वेतन इ. उदयोगधंदयाच्या व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग इ. बाबत संविधानात तरतुद करण्यात आली आहे.

भारतीय संविधानामध्ये कामगारांच्या अधिकाराचे संरक्षण करण्यात आल्यामुळे वेठबिगारीची परिस्थती नष्ट करण्यात आली कामाचे निश्चित वेळ निर्धारीत करण्यात आल्यामुळे फक्त आठ तास कामगारांना काम करावे लागते. जास्तीचा कामाचा मोबदला दिला जातो. संप करण्याचा अधिकार प्रप्त झाला आहे. संघटना स्थापन करण्याची परवान्रगी दिली जाते. निश्चित वेतन करण्यात आला आहे. कामगारासाठी भारतीय संविधानातील विविध कलमानुसार अनेक प्रकारच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच आंतराष्ट्रीय कामगार कायदे सुद्धा लागु करण्यात आलेले आहेत. त्यामुळे संघटीत व असंघटीत कामगारांच्या हीताचे व अधिकाराचे संरक्षण करण्यात येवुन कामगार सुखी व समाधानी जीवन जगण्याचा प्रयत्न करीत आहेत.

**वर्तमान परीस्थतीसमोरील कामगारापुढील आव्हाने** :– भारत सरकारच्या व राज्यसरकारच्या भांडवलवादी व खाजगीकरण्याच्या धोरणामुळे कामगार कायदयात अनेकदा बदल करण्यात आले. त्यामुळे कंत्राटी कामगार अस्तित्वात आलेले आहेत परंतु २०२० मध्ये कोरोना या संसर्गजन्य रोगाच्या प्रभावामुळे संपुर्ण जगात जागतीक महामारी घोषीत करण्यात आली ही घोषणा ॅभ्ढ ने केलेली आहे. यावा प्रभाव संपुर्ण मानवी समाजावर पडला सामाजिक, आर्थिक व्यवस्था ढासळुन पडली त्यामुळे अनेक प्रकारचे परीवर्तन होतांना दिसुन आले. या रोगाला नियंत्रित करण्यासाठी संपुर्ण लॉकडावुन जगातील सर्व देशांनी केल्यामुळे आर्थिक व्यवस्था कोलमडली संघटीत, असंघटीत कामगार गरीब मजुर शेतकरी यांच्यासमोर जिवन जगण्याचा प्रश्न निर्माण झाला भारतात अनेक कामगार आपल्या कामाच्या ठिकाणानासुन आपल्या मुळ गावी जाण्याचा प्रयत्न करतांना दिसत आहेत ज्यामध्ये करोडो लोकांची संख्या आहे. त्यांच्यासमोर जिवन कसे जगायचे हा प्रश्न निर्माण झालेला असुन अनेक कामगार आपल्या गावाला जात आसतांना रस्त्यामध्ये मृत्यू पावत असल्याचे आढळून येत आहे.

अशाच वाईट परिस्थितीमध्ये भारतातील विशेषत: बीजेपी शासीत उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात आणि कांग्रेस शासीत राजस्थान सरकारने कामगार कायदे तीन वर्षासाठी रद्द केल्याचे परिपत्रकच काढले त्यामुळे कामगारांवर या वाईट स्थितीमध्ये आणखी भर पडल्याचे दिसुन आल्याचे स्पष्ट होते. त्यातील काही कामगार विरोधी काळे कायदे पुढील प्रमाने आहेत. १. कारखाने, कचेरी, कोणत्याही आस्थापनेमधील काम करणाऱ्या कर्मचारी किंवा कामगारांचे कामाचे तास आठ वरून बारा तास करण्यरत आले असुन अनिश्चित करण्यात आले. २. कोणत्याही प्रकारची तृटी कोणत्याही वेळेला केव्हाही सुटअी घमता येणार नाही सुटअी देण्याचा सर्व अधिकार मालकांना देण्यात आला आहे. ३. मालकांना केव्हा वेतन दयायचा आहे तो निर्धारीत करण्याचा अधिकार देण्यात आला. ४. कोणत्याही वेळेला केव्हाही कामगारांना कामावरून हाकलुन देण्याचा अधिकार मालकांना देण्यात आला. ५. कामगारांना आग, धुवॉ, जास्त रोशनी, जास्त गरम वातावरण कोणत्याही प्रकारची सुट्टी देणे बंधनकारक राहणार नाही. हा कायदा सुद्धा रद्द करण्यात आला. ६. कामगार कामावर असतांना त्याचा अपघात मृत्यू, जख्मी झाला असल्यास त्याला कोणत्याही प्रकारचे नुकसान भरपाई देणारा कायदा रद्द करण्यात आला. ७. कोणत्याही प्रकारची कामगार संघटना बनविण्याचा अधिकार रद्द करण्यात आला. ८. कोणत्याही प्रकारचे जास्तीत जास्त कामगार ठेवण्याचा तसेच कंत्राटी कामगार ठेवण्याचा अधिकार मालकांना प्राप्त झाला. ९. भविष्य निर्वाह निधी कामगार राज्य विमायोजना रद्द किंवा समाप्त करण्यात आली. १०.बोनस कानुन समाप्त करण्यात आला. ११. कामगार अधिकारी, कामगार न्यायालयात, उदयोग लवाद यांच्याकडे जाण्याचे सर्व अधिकार समाप्त करण्यात आले.

अशाप्रकारे मे २०२० मध्ये उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात राजस्थान या राज्य सरकारांनी लॉकडावुन च्या पाठीमागे कोणत्याही प्रकारची चर्चा न करता चुपचाप संविधानाने दिलेले कायदे रद्द करून उदयोगपती भांडवलदार यांच्या हिताचे धोरण आखले आहे. त्यामुळे वेठबिगारी पद्धती अस्तीत्वात आणण्याचे प्रयत्न करण्यात आले. राजकीय पक्षाच्या ज्या कामगार संघटना आहेत त्या कामगार संघटनांनी कोणत्याही प्रकारचा विरोध केलेला नाही याचाच अर्थ जातीय पदधती असलेल्या संघटनांचा पाठींबा असल्याचे दिसुन यंते.

त्यामुळे कामगारांपुढे अनेक प्रश्न निर्माण झाले ते पुढील प्रमाणे– १. संविधानीक अधिकार संपुष्टात आले. २. जीवंत राहण्याचा प्रश्न निर्माण झाला. ३. कौटुंबिक प्रश्न नव्याने निर्माण करण्यात आले. ४. आर्थिक प्रश्न निर्माण करण्यात आले. ५. सामाजिक समस्या निर्माण करण्यात आले. इ. समस्या निर्माण झाल्यामुळे त्या कशाप्रकारे सोडवायच्या हा प्रश्न निर्माण झाला.

**मुल्यमापन** :– डॉ. बाबासाहेग आंबेडकर यांनी आपल्या संपुर्ण आयुष्यात स्वातंत्र्यपुर्वी असंघटीत अस्पृष्य कामगारंच्या हितासाठी ब्रिटीश काळात कामगार कायदे निर्माण करण्यात आले वेठबिगारीची पद्धती नष्ट करण्यात आली महिलांसाठी कायदे करण्यात आले. या सर्वाकरीता संविधानामध्ये अनेक कायदयाची निर्मीती करण्यात आली असुन कामगारांच्या अधिकाराची सुरक्षा करण्यात आली. संविधानीक प्राप्त झालेले अधिकार ज्या सरकारांनी रद्द करून पुर्वीची वेठबिगारीची पद्धती आणली आहे. अशा शासक वर्गा विरूदध लढण्यासाठी समाजातील विशेषत: अनुसूचित जाती, जमाती आणि इ. मागासवर्गीय लोकांमध्ये जानीव जागृती करून शोषनाविरूद्ध लढा देण्याची गरज निर्माण झालेली आहे. याकरीता मागासवर्गीय समाजातील सामाजिक संघटनांनी आणि लहान राजकीय पक्षांनी, बुद्धीजीवी वर्गानी एकत्र येवुन संविधान समाप्त करणाऱ्या प्रवृत्ती विरोधात कोणत्याही परिस्थितीमध्ये वेळेचा विचार न करता संघर्ष करण्याची आवश्यकता आहे. याकरीता बामसेफ, बहुजन क्रांती मोर्चा, भारत मुक्ती मोर्चा तसेच इतर सामाजिक संघटनांनी प्रयत्न करून संविधान वाचविण्यासाठी पुढाकार घ्यावा तेव्हाच विषमतावादी प्रवृत्तीचा, संविधान विरोधी पृवृत्तीचा नायनाट करणे शक्य होईल.

**संदर्भ:–**


१. भारताचे संविधान
२. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे खंड १८ भाग २
३. दैनिक मुलनिवासी नायक

# विदर्भातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या विविध समस्या व शासकीय योजना

**प्रा. लिना विलास गादेवार,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, रवीद्रंनाथ टागोर कॉलेज ऑफ आर्ट, सायन्स ॲन्ड कॉमर्स, डोगंरगाव (नागपूर).

**प्रस्तावना:—** भारत हा कृषीप्रधान खेडयांचा देश आहे. भारतातील ७५ टक्के लोकसंख्या ही ६ लाख वेगवेगळया खेडयात वास्तव्यास आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेमध्ये कृषीक्षेत्राचा प्रमुख वाटा आहे. किंबहूना भारतीय अर्थव्यवस्थेचा कृषी हा आत्मा आहे. खेडयामध्ये वास्तव्यास असणारे शेतकरी, कास्तकार, गावकरी इ. सर्वसाधारण नावांनी परिचीत असलेला शेतकरी वर्ग असतो. संयुक्त कुटुंबपद्धती हे ग्रामीण समाजाचे मुख्य वैशिष्टे आहे. कुटुंबातील प्रत्येकच अबालवृद्ध शेतीवर प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे अवलंबून असतो.

आज भारताची जगात असलेली ओळख म्हणजे भारतीय ग्रामीण समाज, संयुक्त कुटुंबपद्धती, ग्रामीण भारतीय संस्कृती जात, धर्म आणि समस्या इत्यादी प्रमुख घटक ठरतात. भारताची मुळ प्राचीन सभ्यता आणि संस्कृती ही खेडयातच अस्तित्वात आहे. भारतीय शेतकरी हा संपूर्ण राष्ट्राचा पोशिंदा आहे. म्हणूनच 'शेतकरी सुखी तर देश सुखी' यानुसार भारतीय शेतकऱ्यांना 'जय जवान' प्रमाणेच 'जय किसान' असे म्हटले जाते. आदिम जातीचे विस्तारीत रुप म्हणजे ग्रामीण समाज. गावामध्ये कृषी हा प्राथमिक व्यवसाय असून तो पिढीनपिढी चालत असतो. वंषपरंपरेने शेतीमध्ये वारसा हक्काचे संक्रमण होत असते. आधिच्या पिढीत असलेली शेती ही पुढे मुलांमध्ये वाटणी होवून शेतीचे तुकडीकरण झाले आणि त्यातूनच अल्पभुधारक उदयास आलेत. विदर्भाचे पूर्व विदर्भ आणि पश्चिम विदर्भ असे दोन भाग पडतात. एक भाग म्हणजे अमरावती विभाग यामध्ये अमरावती, अकोला, वाशिम, बुलढाणा आणि यवतमाळ हे पाच जिल्हे येतात. दुसरा नागपूर विभाग यामध्ये नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, वर्धा आणि गोंदिया हे जिल्हे येतात. संपूर्ण महराष्ट्रात विदर्भातच शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत व होत आहेत.

**अध्ययनाची उद्दीष्टे:—** १. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे. २. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जीवनातील विविध समस्यांचा अभ्यास करणे. ३. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या विकासाठी विविध शासकीय योजनांचा आढावा घेणे. ४. अल्पभूधारक शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी उपाय योजना सुचवणे.

**संशोधन पद्धती:—** प्रस्तुत शोध निबंधासाठी तथ्यसंकलन करीत असतांना दुय्यम तथ्य सामुग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. यासाठी संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमान पत्रे व इंटरनेट वर उपलब्ध असलेल्या माहितीचा आधार घेऊन शोध निबंधाचे लेखन करण्यात आलेले आहे.

**अल्पभुधारक शेतकरी वर्ग:—** ग्रामीण समाजात विविध घटकांद्वारे स्तरीकरण झालेले दिसून येते. ज्याच्याकडे फक्त २ ते ५ एकर शेती असते असे शेतकरी अल्पभूधारक समजले जातात. शेती हा मुख्य व्यवसाय आणि त्यातून वाटयाला आलेला अती अल्पशेती आणि त्यावर संपूर्ण कुटुंबाची उपजिविका करण्याची कसरत अल्पभूधारक शेतकऱ्यांना करावी लागते. अल्पभूधारक शेतकऱ्यांना अनेक आर्थिक समस्यांना तोंड देत जीवन संक्रमण करावे लागते. अत्यल्प उत्पन्न, त्यातून स्वत:च्या आणि कुटुंबाच्या मुलभूत गरजा भागविण्याकरीता पैशाचा अभाव यातून आर्थिक समस्यांचा उदय होतो. प्रत्येक वेळी आर्थिक समस्यांची तीव्रता वाढून शेतकरी जीवनात आर्थिक, सामाजिक आणि कौटुंबिक स्वास्थ धोक्यात येते. नैसर्गिक दुष्टचक्र, पिकावर येणारे विविध रोग, शेतमालाला योग्य भाव नसणे, कृषी अत्यल्प उत्पादकता इत्यादीमुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांमध्ये आर्थिक समस्या निर्माण होण्यास सुरुवात होते.

अल्पभूधारक शेतकऱ्यांमध्ये दारिद्रियाची प्रमुख समस्या असते. ऑस्कर लेवीस या फ्रेन्च समाजशास्त्रज्ञाने म्हटल्याप्रमाणे भारत हा समस्यांचा देश आहे. भारतीय ग्रामीण समाजातील गरीबीच्या घटकाला गरीबीची संस्कृती संबोधले आहे. भारतीय शेतकरी हा कर्जातच जन्मतो, जगतो आणि मरतो आणि आपल्या कर्जाचा वारसा हा पुढील पिढीस देत असतो.

**ग्रामीण सामाजातील अल्पभुधारक शेतकऱ्यांची स्थिती:—** ग्रामीण भागात शेतकरी वर्गातील निम्न गट म्हणजे अल्पभूधारक शेतकरी होय. आज भारतात आंध्रप्रदेश, महाराष्ट्र, मध्यप्रदेश इ. प्रमुख राज्यामध्ये शेतकरी आत्महत्या ही मुख्य ज्वलंत समस्या ठरलेली आहे. अल्पभूधारक शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न हे कमी आहे. शेती करण्यासाठी हे सावकारापासून कर्ज घेतात पीक आल्यानंतर आपण कर्ज फेडू शकतो असे त्यांना वाटते. परंतु शेती ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे शेतकरी कर्ज फेडू शकत नाही. सावकारांचा व्याजाचा दर खूप जास्त असतो. त्यामुळे कर्ज वाढत जाते. शेती न पिकल्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या कौटुंबिक आणि इतर गरजा भागवण्यासाठी पुन्हा कर्ज घ्यावे लागते. परिणामत: त्याचे कर्ज वाढत जाते. ग्रामीण भागातील अल्पभूधारक शेतकरी आणि शेतमजूर हे फार मोठया प्रमाणात कर्जबाजारी असल्याचे आढळून येते. विदर्भात २००६ मध्ये करण्यात आलेल्या अध्ययनात ८७ टक्के शेतकऱ्यांनी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्याचे आढळून आले.

**अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या विविध समस्या:—** सन १९४७ मध्ये कृषीचा अर्थव्यवस्थेतील भाग हा ५० टक्के होता. हळूहळू त्यात घट होवून आज २० टक्के शिल्लक राहिलेला आहे. यावरुन आपणास कृषी उत्पादकता आणि भारतातील इतर समस्या यातील असलेल्या तफावतीची जाणीव होते. आज संपूर्ण भारतात ८० टक्के ही अल्पभूधारक शेतकरी आहेत. नागपूर जिल्हा सुद्धा त्याला अपवाद नाही. अल्पभूधारक शेतकऱ्यांमध्ये अल्प जमीन असली तरी त्यात खर्च जास्त असून उत्पन्न कमी होते. त्यातून आर्थिक समस्या निर्माण होतात. पैषाच्या अभावामुळे अल्पभूधारक शेतकऱ्यांमध्ये योग्य दर्जाच्या बि—बियानांचा अभाव, जलसिंचन सोयीचा वापर करण्यास असमर्थ ठरणे, किड रोग निवारण सारख्या पद्धती न वापरणे आणि आधुनिक खते, रसायने इत्यादींचा समावेश आपल्या पिक पद्धतीत करु शकत नाही. त्यामुळे एकंदरीत अल्प उत्पादन आणि आर्थिक टंचाई, त्यातून कर्जबाजारीपणा, व्यसनाधिनता, वैफल्य, मानसिक रोग, आणि शेवटी आत्महत्या पर्यंत सुद्धा अल्पभुधारक शेतकरी जात असतो. महाराष्ट्रात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये अल्पभुधारक शेतकऱ्यांचे स्थान वरचे आहे.

नागपूर जिल्हयातील अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या हया कर्जबाजारीपणा, कुटुंबविघटन, निसर्गाचा असमतोल, खालावलेले आरोग्य, कौटंबिक तणाव व संघर्ष, शेती करण्याची परंपरागत पद्धती इत्यादीशी संबंधीत असतो. अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्या निर्मितीमागील अतिरिक्त कारणात कर्ज, विवाह, सण समारंभ इत्यादींचा समावेश होतो.

**शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या समस्या अंतर्गत प्रमुख कारणे:—** १. कर्ज बाजारीपणा आणि त्यामागील प्रमुख कारणे. २. कृषीकामाचे त्रुटीचे अर्थशास्त्र. ३. सरकारची चुकीची धोरणे

भारतीय शेतीला सर्व बाबतीत सरकारकडून गौण महत्त्व प्राप्त होत आहे. कोणताही व्यवसाय उद्योग किंवा धंदा करतांना तो नफा देणारा नसला तरी त्यातून तोटा होवू नये ही प्रत्येक व्यक्तीची प्रामाणिक इच्छा असते. अनेक पिढयांपासून शेती व्यवसाय करत असल्याने किंवा इतर अन्य कौटुंबिक कारणामुळे ही कुटुंबे तोटयात असणारे शेती व्यवसायच करतांना दिसतात. त्यांच्यापैकी बहुतांश लोकांना शेतीचा जमा खर्च अजिबात समजत नाही. तरिही नफ्यासाठी शेती व्यवसायाचे उद्दिश्ट न ठेवता जिवनाला आधार फक्त मिळावा या समाधानाच्या आधारे ही कुटुंबे शेती व्यवसाय करीत असतात. शेतकरी हळूहळू औद्योगिक वस्तूंचा वापर वाढवत जातो व त्यावरील स्वत:चे विसंबुन राहणे वाढवत असतो. सर्व अहवालात या प्रश्नांवर बरीच चर्चा केली आहे. आजच्या शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाला व हजारोच्या संख्येत होणाऱ्या आत्महत्येला ही बाब सर्वात जास्त जबाबदार आहे. जोपर्यंत हा प्रश्न शास्त्रोक्त पद्धतीने सोडविला जात नाही तोपर्यंत सध्याच्या आत्महत्या थांबणे असंभव आहे. आत्महत्या केलेल्या घटनांची नोंद योग्यप्रकारे सरकार दरबारी न झाल्याने सरकारतर्फे देण्यात येणाऱ्या अनुदानाबाबत अनेक कुटुंबावर दिरंगाई झाल्यास आत्महत्याचे सत्र सतत सुरुच राहील व त्यामुळे सामाजिक संतुलन बिघडू शकते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या हे शेतकरी समाजातले दु:खद प्रकरण आहे. नागपूर जिल्हा हा महाराष्ट्रातील एक महत्त्वाचा आहे. सिंचन, रस्ते, उद्योग इत्यादीच्या अनुशेषांमुळे येथील शेती आणि शेतकरीही अविकसीत राहिला.

**कर्जबाजारीपणा:—** शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असते. शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न हे कमी आहे. शेती करण्यासाठी शेतकरी हे सावकारांपासून कर्ज घेतात. पिक आल्यानंतर आपण कर्ज फेडू शकत नाही. सावकारांचा व्याजाचा दर खूप जास्त असतो. त्यामुळे कर्ज वाढत जाते. शेती न पिकल्यामुळे शेतकऱ्यांना आपल्या कौटुंबिक आणि इतर गरजा भागवण्यासाठी पुन्हा कर्ज घ्यावे लागते. परिणामता: त्यांचे कर्ज वाढत जाते. ग्रामीण भागातील लहान शेतकरी आणि शेतमजूर हे फार मोठयाप्रमाणत कर्ज बाजारी असल्याचे आढळून येते. सावकार कर्ज वापस करण्यासाठी शेतकऱ्यांच्या मागे तगादा लावतो. परंतु शेतकऱ्यांची कर्ज परत करण्याची क्षमता नसते. अशा परिस्थितीत त्यांचे मानसिक स्वास्थ बिघडून तो आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो.

**शेती व्यावसायातील मागासलेपणा:—** शेतीकडे शेतकऱ्यांचा पाहण्याचा दृष्टीकोन आजही उदरनिर्वाह भागविणे एवढयापुरताच मर्यादित आहे. गरजापूर्तीचे साधन म्हणून शेतकरी याकडे पाहतो. शेती करण्याची पद्धती मागासलेली आहे. रासायनिक बी—बियाणे, आधुनिक अवजारे इत्यादीचा वापर करून शेती कसली जात नाही. त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेत अनेक प्रश्न निर्माण होत आहेत. निसर्गाचा लहरीपणा, अल्पभूधारक शेतकऱ्यांविषयी शासनाची उदासीन वृती, शेतकऱ्यांचा उत्पादनाला बाजारपेठेत मिळणारा नाममात्र फायदा. अशावेळी शासनाच्या शेती विषयक योजना शेतकऱ्यांकरीता आशेची किरणे ठरते. पण आजही कित्येक शासकीय कृषीविषयक योजना अल्पभूधारक शेतकऱ्यांपर्यंत पोहचत नाही आणि पोहाचल्या तरी कामचुकार अधिकारी कृषीविषयक योजनांचा फायदा गरजू शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवत नाहीत.

**ग्रामीण कर्जाच्या समस्या:—** शेती व्यवसायाचे स्वरूप उद्योगांपेक्षा वेगळे आहे. त्यामुळे उद्योगांपेक्षा शेती व्यवसायाची समस्या या वेगळया आहे. त्या समस्या पूढील प्रमाणे.

१) **लहान सीमान्त शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष :—** अल्पभुधारक व सीमान्त शेतकऱ्यांकडे शेतीचा आकार फार लहान असतो. त्यामुळे शेतकरी घेतलेले कर्ज परतफेड करू शकत नाही. त्यामुळ हा वर्ग सतत चिंताग्रस्त असतो. श्रीमंत शेतकऱ्यांकडे शेतीचा आकार मोठा असतो. त्यामुळे अशा शेतकऱ्यांना पिकांचे उत्पादन आधिक प्रमाणात घेणे शक्य होते. परंतु लहान शेतकऱ्याकडे पुरेशी पत व तारण ह्यांच्या अभावामुळे अधिकोष व सहकारी यांच्या कडून पुरेसे कर्ज मिळत नाही. त्यामुळे त्यांना नाईलाजाने सावकार व इतर खाजगी घटकाकडून कर्ज घ्यावे लागते. सावकारांच्या जाळयात अडकलेला शेतकरी त्यातून सहसा सुटत नाही.

२) **अपर्याप्त कर्जपुरवठा** :— संस्थात्मक कर्जपुरवठा हा आवश्यक प्रमाणात होत नाही. एवढेच नव्हे तर तो योग्यवेळी व सोयीस्कर अटींवर होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना सावकारांच्या दारी जावे लागते. योग्य वेळी व योग्य प्रमाणात कर्जपुरवठा व्हावा ह्या उद्देशाने व्यापारी अधिकोषांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. परंतु अपेक्षित यश आले नाही. प्रशिक्षित नोकरवर्ग, गटबाजी, बडया शेतकऱ्यांचा प्रभाव इत्यादी विविध कारणांमुळे सहकारी संस्थाकडून सुद्धा पुरेसा कर्जपुरवठा होऊ शकत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांची सावकारी पाशातून व गरिबीच्या दुष्टचक्रातून सुटका होत नाही.

३) **कर्ज वाटणीत असंतुलन** :— भारतात कर्ज वाटप करणाऱ्या विविध संस्था आहे. पण ह्या संस्था समाजाच्या विविध घटकांमधील संतुलनाकडे लक्ष देत नाही. समाजातील अल्पभुधारक, लहान शेतकंऱ्यापर्यंत कर्जाचे वाटप व्हावयास हवे परंतू प्रत्यक्षात मात्र तसे होत नाही.शहरी भागाकड दुर्लक्ष होते. जरी ग्रामीण भागात जो काही कर्जपुरवठा होतो. त्यात मोठया श्रीमंत शेतकऱ्यांना मिळणारा वाटा अधिक असतो. त्यामुळे लहान शेतकऱ्यांना अतिशय कमी प्रमाणात कर्ज मिळते व तेही सूलभतेने होत नाही. त्यामुळे कर्ज पुरवठयात अशा प्रकारचे असंतुलन दिसून येते.

४) **कर्जाच्या परतफेडीची समस्या** :— शेतकरी कर्जाची परतफेड योग्य प्रकारे करत नसल्यामुळे कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था ह्या अडचणीत येतात. उदाहरण द्यावयाचे झाल्याच असे म्हणता येईल की, १९८४—८५ मध्ये, सहकारी संस्थांनी दिलेल्या एकुण कर्जाच्या ४० टक्के कर्ज थकीत होते. व्यापारी अधिकोषांबाबत हेच प्रमाण ५० टक्के होते. अशाप्रकारे कर्ज परतफेडीची समस्या गंभीर स्वरूपाची आहे. ह्याकरिता कर्जाची परतफेड व्हावी म्हणून काही ठोस उपाय योजने आवश्यक आहे.

५) **तारणाची समस्या** :— बहुतांश शेतकऱ्यांजवळ असलेली एकमेव संपत्ती म्हणजे जमिन होय. परंतु शेतकऱ्यांची ही संपत्ती तरल किंवा लवकर रोखतेत परिवर्तन होणारी संपत्ती नाही. शेती ह्या तारणाच्या ठिकाणी रोखता फारशी नसल्यामुळे शेतीच्या तारणावर कर्ज देण्यास कर्जसंस्था लवकर तयार होत नाहीत. शेतीचे तारण स्वीकारले तरी छोटया शेतकऱ्यांना आवश्यक ते कर्ज मिळू शकत नाही कारण त्यांच्याजवळ शेती कमी असते. म्हणून कर्ज देण्यास आधार जमीन न ठेवता शेतकऱ्यांची विकासक्षमता व कर्तबगारी ही लक्षात घ्यावयास हवी.शेतकऱ्यांची कर्ज फेडण्याची क्षमता लक्षात घेवून कर्ज द्यावयास हवे.

६) **घेतलेल्या कर्जाचा उपयोग** :– शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती समाधानकारक नसल्यामुळे मिळालेल्या कर्जाचा बराचसा भाग अनुत्पादक कार्याकरिता खर्च होतो. त्यामुळे कर्जाची परतफेड करण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण होत नाही व त्यांच्यावरील कर्जाचा बोझा वाढत जातो.

वर वर्णन केलेल्या समस्या कर्ज रचनेतील दोष दर्शवितात हे दोष दूर करून कर्जवाटपाची क्षमता वाढविणे अत्यावश्यक आहे.

**शेतकऱ्यांच्या समस्या निर्माण होण्याची कारणे** :– कोरडवाहू शेती, सिंचनाचा प्रश्न, विजेची टंचाई, कर्जबाजारीपणा, बियाण्यांचा प्रश्न, सहकारी संस्थाची अकार्यक्षमता, प्रक्रिया उद्योगांचा अभाव, शेतमालाला पाडून भाव देणे, बाजारपेठेतील दोष, शेतीवर आधारीत जोडधंद्याचा अभाव, नैसर्गिक आपत्ती, अपूर्ण दोषपूर्ण विमा पद्धती, इत्यादी कारणे शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार आहेत.

शेतकऱ्यांसाठी असलेल्या शासकीय योजनांच्या योग्य अंमलबजावणीचा अभाव, शेतकऱ्यांच्या माहितीचा अभाव, परिसरातील प्रभावी नेतृत्वाचा अभाव, सहकारी क्षेत्रातील भ्रष्टाचार व हलगर्जीपणा व वाढत असलेले खालच्या पातळीचे राजकारण, शेतीवर वाढत्या लोकसंख्येचा भार, वाढती ग्रामीण बेकारी इ. कारणे देखिल ग्रामीण समाजाच्या मागासलेपणाची सांगता येतील.

शेतकऱ्यांचा आणि त्यातही पश्चिम विदर्भातील शेतीच्या प्रश्नांचा विचार केला तर त्यांचा एक प्रश्न नाही तर अनेक प्रश्न आहेत. उदा. कोरडवाहू शेती, सिंचनाचा प्रश्न, विजेची टंचाई, कमी उत्पन्न, कर्जबाजारीपणा, बियाण्यांचा प्रश्न, सहकारी संस्थेची अकार्यक्षमता, प्रक्रिया उद्योगांचा अभाव, शेतमालाचे न परवडणारे भाव, विपणणातील विविध दोष, शेतीवर आधारित जोडधंद्याचा अभाव, शेतीचा वाढता खर्च, त्यातून निर्माण होणारा कर्जबाजारीपणा, नैसर्गिक आपत्ती, निसर्गाचा लहरीपणा, अपूर्ण व दोषपूर्ण विमापद्धती, शेतकऱ्यांसाठी असलेल्या शासकीय योजनांची योग्य अंमलबजावणी न होता, शेतकऱ्यांना योजनांची माहिती नसणे, शेतीवर वाढता लोकसंख्येचा दबाव, वाढती ग्रामीण बेकारी असे अनेक प्रश्न आहेत. त्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी व्यवस्थापन होणे गरजेचे आहे.

**शेतकऱ्यांच्या हितासाठी विविध शासकिय योजना :–**

१. **प्रधानमंत्री किसान सन्मान निधी** या योजनेतून अल्पभूधारक शेतकरी कटुंबांना वर्षाला ६ हजार रूपये थेट अनुदान मिळेल. ५ एकरपर्यत (२ हेक्टर) जमीन असलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात हे अनुदान जमा होईल. २ हजार रूपयांच्या तीन हप्त्यांत ही रक्कम देण्यात येईल.

२. **प्रधान मंत्री किसान मान धन योजना (अल्पभूधारक व मध्यम शेतकऱ्यांसाठी निवृत्तीवेतन योजना)** – हवामान बदल बेभरवश्याची असणारी बाजारपेठ यामुळे शेतकऱ्यांच्या शेती उत्पन्नात सातत्य राहत नाही. वृद्धपकाळात शेतकऱ्यांस नियमित उत्पन्नाचे साधन नसल्याने त्याची मोठी आर्थिक कुचंबणा होते. हि बाब लक्षात घेऊन केंद्र शासनाने देशातील शेतकऱ्यांच्या हितासाठी दि. ०९ ऑगस्ट २०१९ पासून देशात प्रधानमंत्री शेतकरी मानधन योजना सुरू केली आहे. या योजनेमध्ये १८ ते ४० वयोगटातील २ हेक्टर पर्यंत शेती असलेले सर्व अल्पभूधारक शेतकरी भाग घेवू शकतील. जे शेतकरी यात भाग घेतील त्यांना वयाची ६० वर्ष पूर्ण झाल्यानंतर प्रती महिना रू. ३,०००/– पेन्शन मिळणार आहे. यात लाभधारक शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्याच्या पत्नीस सुद्धा निवृत्ती वेतन मिळण्याची तरतूद आहे.

३. **पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना** – जे विद्यार्थी अल्पभूधारक आहे आणि वसतीगृहावर राहतात अशा विद्यार्थ्यांना या योजनेचा फायदा होतो. गरीब शेतकरी कुटुंबातून आलेल्या मुलांची शिक्षणाची वाट सोपी व्हावी म्हणून राज्य सरकारने पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता ही योजना आणली. या योजनेअंतर्गत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी अल्पभूधारक असल्याचा दाखला दाखवणं गरजेचं असते. पण तो मिळवतानाच या विद्यार्थ्यांची दमछाक होऊ लागली आहे.

याशिवाय, ४. कृषि अवजारे व आयुध्ये वाटप योजना (लाभार्थी अल्पभूधारक शेतकरी असावा.) ५. शेतमाल तारण कर्ज योजना. ६. संरक्षित शेतीसाठी शासनाच्या योजना. ७. शेतात, बांधावर वन वृक्ष लागवडीसाठी अनुदान योजना. ८. बांधावर वृक्ष लागवड योजना. ९. प्रक्रिया उद्योगाला चालना देणारी मुख्यमंत्री कृषी व अन्न प्रक्रिया योजना. १०. शेतमाल तारण कर्ज योजना. ११. हवामानावर आधारित फळंपिक विमा योजना. १२. प्रधानमंत्री पीक विमा योजना : ३ हजारात मिळणार ६० हजाराचे विमा संरक्षण. १३. पीक विमा योजना. १४. शेतमालतारण कर्ज योजना : शेतकऱ्यांना आर्थिक व्यवस्थापनाची सुवर्णसंधी इत्यादी शासकीय योजना आहेत.

**शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या रोखण्याचे उपाय:–** १) शेतमालास योग्य किंमत देणे. २) बॅकांतर्फे शेतकऱ्यांसाठी कर्जाची व्यवस्था करणे. ३) सिंचनाच्या सोयी उपलब्ध करून देणे. ४) शेतकऱ्यांचे जुने कर्ज माफ करणे. ५) ग्रामीण भागात शेतीसाठी विद्युत पुरवठा उपलब्ध करून देणे. ६) शेतकऱ्यांना कृषी तंत्रज्ञानाची माहीती उपलब्ध करून देणे. ७) नैसर्गिक आपत्ती आणि जंगली जनावरांमुळे पिकांची हानी झालेल्या शेतकऱ्यांना त्वरित शासकीय मदत पुरवणे. ८) ग्रामीण भागात सामुहिक विवाहास प्रोत्साहन देणे. ९) ग्रामीण भागात व्यवसायाच्या संधी उपलब्ध करून देणे. १०) शेतकऱ्यांच्या शेतमालास बाजारपेठ उपलब्ध करून देणे.

**सारांश:–** थोडक्यात पारंपारिक पद्धतीने शेती करणारा अल्पभूधारक शेतकरी वर्ग शेतीवर अवलंबून असतो. मुलांचे शिक्षण, आरोग्य, विवाह समारंभ या आवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी सतत दिवस रात्र मेहनत करतो. शेतीतून अल्प उत्पन्न मिळत असल्यामुळे त्याच्यावरील गरजा पूर्ण होत नाही. शेती उत्पादनाच्या बळावर मी हे कर्ज परत करणार परंतु शेती उत्पादन अनपेक्षितपणे कमी झाल्यास शारीरिकदृष्टया सक्षम असणारा हा अल्पभूधारक शेतकरी मानसिकदृष्टया मात्र हतबल होतो. जगावे कि मरावे असा वैफल्यग्रस्त प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण होतो.

**संदर्भ ग्रंथ**

१. भारतीय समाज संरचनात्क प्रश्न आणि समस्या, डॉ. प्रदीप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२. सेट. नेट समाजशास्त्र, प्रा. मनोहर तोटरे, विद्याभारती प्रकाशन.
३. भारतीय अर्थशास्त्र, डॉ. जी. एन. झामरे, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स.
४. https://www.vkhindiworld.com
५. https://marathikrishijagram.com

# ऊसतोड महिला कामगार व शासकिय धोरण

**प्रा. महादेव चैतराम चुंचे**, कुंभलकर कॉलेज ऑफ सोशल वर्क, वर्धा.

**सारांश:** भारत हा साखर उत्पादनांमध्ये जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये साखर उद्योगाची महत्त्वाची भूमिका आहे. साखरही मानवाच्या जीवनामध्ये अत्यावश्यक गरज बनली आहे. कारण साखरेचा उपयोग निव्वळ चहा किंवा गोड पदार्थ बनवण्यापुरता मर्यादित राहिलेला नसून औषध निर्मिती तथा जीवनावश्यक वस्तू तयार करण्याकरिता साखरेचा वापर केला जात आहे. साखर निर्मिती करण्याकरिता प्रमुख चार घटक मानले जातात. त्यामध्ये ऊस शेतकरी, ऊसतोड व वाहतूक कामगार, साखर कारखाना कामगार आणि साखर कारखानदार हे सर्व एकमेकांवर अवलंबून असतात. ऊसतोड कामगार घटकाच्या अनुषंगाने, ऊसतोड महिलांच्या समस्या, भारतातील महिलांची स्थिती तसेच केंद्र व राज्य शासनाच्या धोरणांची फलश्रुती याचा संशोधनात्मक आढावा सदरील शोध निबंधात घेतला आहे.

**प्रस्तावना:–** समाजाला साखर मिळावी, म्हणून आयुष्यभर साखर झोप न घेऊ शकणारे, जीवनातील कडवट प्रसंगाचा सामना करणारे, असंख्य कामगार हालअपेष्टांचे जीवन जगत आहेत. त्यातील ऊसतोड महिला कामगार हया सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्यांनी ग्रस्त आहेत. ऊसतोड महिलांच्या प्रश्ना संदर्भात ऊसतोड कामगार संघटना ऊसतोड कामगारांना न्याय मिळवून देण्याकरिता सक्रिय आहेत. तसेच स्वयंसेवी संस्था सुद्धा ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या समस्या सोडविण्याकरिता प्रयत्नशील आहेत. तसेच शासन व्यवस्था महिला विषयक धोरण, योजना, कार्यक्रम व कायद्याद्वारे महिलांना सक्षम व सुरक्षा प्रदान करीत असल्याचे दिसून येते. परंतु जेवढे यश अपेक्षित आहे तेवढे मिळविणे म्हणजे एक आव्हान आहे.

**शोधनिबंधाचे उद्देश:–** १. ऊसतोड महिलांच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्यांचे अध्ययन करणे. २. ऊसतोड महिला कामगार व शासकीय धोरण यातील सहसंबंध अभ्यासणे.

**गृहीतकृत्ये :–** १. ऊसतोड महिलांची आर्थिक स्थिती बिकट असल्याचा वाईट परिणाम महिलांच्या आरोग्य व सामाजिक स्थितीवर होतो. २. ऊसतोड महिलांना शासकीय धोरणांची माहिती पुरेशी नसल्यामुळे त्यांचे योजनेचा लाभ घेण्याचे प्रमाण कमी आहे.

**संशोधन पद्धती :–** प्रस्तूत शोध निबंधामध्ये व्यष्टी अध्ययन या गुणात्मक संशोधन पद्धतीचा व दुय्यम तथ्य संकलन स्त्रोतांचा वापर केला आहे.

**व्यष्टी क्रं. १ :** शकुंतलाचा (नाव बदलले आहे) जन्म एका गरीब आदिवासी कुटुंबात झाला. शकुंतलाला एक मोठा व एक लहान भाऊ व लहान बहीण आहे. वडिलांना शेती नावापुरती होती. कुटुंबात आईच्या रोजमजुरीवर चालत असे. कारण वडिलांना दमा असल्याने ते काम करू शकत नव्हते. शकुंतलाची आई फार कष्टाळू व मनमिळावू असल्यामुळे तिला निरंतर काम मिळत असे. शकुंतलाची आई प्रत्येक दिवस मागे टाकत, मुलांना लहानाचं मोठं करण्याकरिता, आलेल्या परिस्थितीला समर्थपणे तोंड देत होती. शकुंतलाचा मोठा भाऊ राम व शकुंतला आईसोबत मजुरीला जात असत. पुढे रामचं लग्न केलं व ऊसतोडीला पाठवल. शकुंतला शाळेमध्ये फार हुशार असल्यामुळे तिचे गुरुजी सदैव कौतुक करायचे. त्यामुळे शकुंतलाला शिक्षणामध्ये रस येत होता आणि ती शिक्षण घेऊन मोठे होण्याचे स्वप्नही पाहू लागली. तेवढ्यत लग्नाकरिता स्थळ येऊ लागली. शकुंतलाच्या आई–वडिलांनापण शकुंतलाच लग्न करून रिकाम होण्याची घाई लागली होती. शकुंतलाने नुकतीच सात्वी बोर्डाची परीक्षा दिली होती. गावामध्ये पुढील शिक्षणाची सुविधा नव्हती. पुढील शिक्षण घेण्याकरिता दुसऱ्या गावी पायी पाच–सहा कि.मी. जावे लागत असल्यामुळे शकुंतलाच्या वडिलांना मुलीने शिक्षणासाठी बाहेरगावी जाणे पसंद नव्हते. किंबहुना शकुंतला चे बाहेर जाणे धोक्याचे वाटत होते. त्यामुळे शकुंतलाचा विवाह एका ऊसतोडी करणाऱ्या मुलासोबत दोन दिवसात गेटकिन पद्धतीने उरकून टाकला. शकुंतलाला प्रश्न विचारला, तुम्हाला लग्नासंदर्भात विचारलं होतं का? तेव्हा शकुंतला मान खाली घालून शांतपणे म्हणाली ''मला काही कळत नव्हतं तेव्हा”.

शकुंतलाचा संसार अठराविश्व दारिद्रय व व्यसनाधीन कुटुंबात सुरू झाला. डोक्यावर सहा लोखंडी पत्र तर त्याला चार मेडीचा आधार व आजुबाजूला तुराट्याच कुंपण असं तिचं सात बाय सातचं घर. त्यामध्ये सासू–सासरे ननंद, दीर, जाऊ व शकुंतला जोडपं असे एकूण सात माणसं दाटीवाटीने राहत होते. शकुंतलाच्या सासु–सासऱ्यांनी, मुलाचं लग्न ऊसतोडी करिता नवीन फुल कोयतं (जोडी) तयार करण्यासाठी केलं होतं. लग्नाच्या आधीच एका फुल कोयत्याची उचल घेतली होती. व लग्न आणि व्यसनात खर्चही केली होती. त्यामुळे शकुंतलाला उचलीचा पैसा पाहण्याकरिता सुद्धा मिळाला नव्हता.

हा सर्व प्रकार माहेरच्या लोकांना सांगण्याची व यातून मुक्त होण्याची तिची इच्छा होती. परंतु तिचं दुसरं मन सांगत होतं, एकदा का मुलीचं लग्न आई–वडिलांनी केलं की त्यांची जबाबदारी संपली म्हणजे माहेरचे दार बंद. जर माहेरला गेले तर लोक नावे ठेवतील व यामध्ये स्वत: बरोबर आई–वडिलांचे सुद्धा अब्रू लयाला जाईल. त्यामुळे आहे त्या परिस्थितीला सामोरे जाणे हा एकमेव मार्ग आहे. त्यामुळे शकुंतलाने माहेरी जाण्याचा विचार सोडून दिला आणि सक्षमपणे परिस्थितीवर मात करण्याचे ठरवले. मग जीव गेला तरी बेहत्तर!

शकुंतलाने आपल्या पतीसह पहिल्या वर्षी ऊस तोडणी करिता कर्नाटक गाठले. शकुंतलाची दिवसाची सुरुवात पहाटे चार वाजल्या पासून होत असे. त्यामध्ये घरगुती कामे करून उसाच्या फडात इतर महिलांबरोबर जावे लागत असे व दिवसभर पती बरोबर ऊस तोडून बांधणे व गाडीत भरणे तसेच रात्री स्वयंपाक आणि नवऱ्याची वासना पूर्ण करणे. जर गाडी रात्री आली तर भरणे. हा तिचा दिनक्रम असे. मात्र यामध्ये तिला पती व इतर लोकांबरोबर ऊस तोडताना खुप त्रास होत असे. तसेच तिला ऊस भरतानां, तिच्या वजनाच्या दुप्पट वजनाच्या मोळया डोक्यावरून वाहने असह्य होत असे, तिची उंची कमी असल्यामुळे तिला तीव्र व उंच फळीवर दोन पावले अधिक टाकावे लागत असे. विश्रांती घेण्याकरिता तिला मुभा नव्हती. शकुंतलाला महिने गेले होते. त्यामुळे तिला एका जिवा बरोबर दोन जीव सांभाळावी लागत होती. परंतु या ऊसतोडीच्या धंद्यात असं कोणतंही कारण चालत नाही. सर्वांना धंदा प्यारा असतो. कामामध्ये कमी–जास्त पण चालत नाही. सर्वांनी सारखे काम करणे हा अलिखित नियम असतो. किंबहुना हंगामी काळात ऊसतोड कामगार

मुकादमाचे गुलाम असतात. शकुंतलाला एक—एक दिवस साला प्रमाणे वाटत होता. याबरोबरच नवरा दररोज दारू ढोसून तिला मारहाण करीत असे व लोकांसोबत वाद घालत असे. त्यामुळे लोक ही शकुंतलाला मदत करू पाहत नव्हते. अशा स्थितीमध्ये पोटाला मुलगा यावा म्हणून ती देवाचे उपवास ही करत होती. या उपवासामध्ये तिला भाकरी शिवाय इतर काही खायला मिळत नव्हते. आणि नवरा लक्ष देत नव्हता. यामुळे सततच्या उपासमारीमुळे तिचं दिवसेंदिवस वजन घटत होतं. तिला पोषण आहाराची व योग्य औषधोपचाराची नितांत आवश्यकता होती. परंतु आदिवासी असल्याने तिचा व तिच्या नवऱ्याचा आणि इतर टोळीमधील लोकांचा भूत, प्रेत, काळी जादू, पांढरी जादू यावर अफाट विश्वास होता. शकुंतला आजारी पडली तर भूत वा काळ्या जादूचा प्रभाव असल्याचे सर्वजण समजत होती. त्यामुळे ती कायम औषधोपचारा पासून वंचित राहिली आणि याचा दुष्परिणाम हा तिच्या गर्भावर होऊन, गर्भपात झाला. गर्भ मुलीचा असल्याने कुणालाच काही वाटले नाही. उलट काहींनी बरे झाल्याचा अनंद व्यक्त केला. तर मुकादमाने हा सर्व प्रकार जादूटोण्याचा असल्याचे सांगून शकुंतलाला परत दोन दिवसांनी कामावर लागण्याचे आदेश दिले. या हंगामात साखर कारखाना साडेपाच महिने चालला. शकूंताला गावी आली तेव्हा तिच्या शरीरांच चिपाडं झाल होतं.

गावाकडे आल्यास शकुंतलाला मजुरी शिवाय पर्याय नव्हता. तिच्या नशिबी विश्रांती घेणे हा गुन्हा होता. सलग दहा ते बारा वर्ष ऊस तोडणी करून केवळ ननंदचे लग्न व आदिवासी विभागातून मिळालेल्या घरकुल योजनेच्या आधारावर एका खोलीचं घर बांधलं होत. या व्यतिरिक्त कुठलीच आर्थिक गुंतवणुक केली नव्हती. सर्व काही व्यसनांमध्ये खर्च झालं होतं. शकुंतला नवऱ्याच्या व्यसनामुळे व त्याच्या वागण्यामुळे कंटाळून गेली होती. शकुंतलाने तिची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने तिने तिचे दोन मुलं व एक मुलगी आई—वडीलांकडे सांभाळ करण्यासाठी पाठवली होती. त्यामुळे मूलबाळं शिक्षण घेऊ शकत होते. नंतर शकूंतलाने आई—वडिल व भावाच्या आश्रयाला जाण्याचं ठरवले. नवऱ्याचा फार विरोध होता. परंतु न डगमगता तिने हा निर्णय घेतला आणि आई—वडिलांकडे आली.

आई—वडील व भावांच्या दबावामुळे शकुंतलाचा नवरा तिला मारहाण करीत नसे. तसेच मुकादम ही बदलल्यामुळे उचल घेण्याकरिता व खर्च करण्याकरिता शकुंतलाला अधिकार मिळाल्याने ती उचलीचा पैसा मुलांच्या शिक्षणावर, घरखर्च व बचत गटांमध्ये गुंतवणुक म्हणून खर्च करू लागली. भ्रष्ट प्रशासन व एजंटमुळे तिला तिच्या मुलाचे जातीचे प्रमाणपत्र काढण्यासाठी तब्बल १० ते १५ हजार रुपये मोजावे लागले. त्याकरीता तिला पाच महिणे ऊस तोडवा लागला. तसेच पुढे एकदाच दोन वर्षाची उचल उचलून, तिन राहण्यासाठी डोंगराच्या पायथ्याशी दोन गुंठा जागा घेतली. नवऱ्याची दारू ही सुटली. त्यामुळे २० वर्षानंतर तिच्या कुटुंबाची परिस्थिती हळूहळू सुधारत आहे. मोठा मुलगा आदिवासी वस्तीगृहात प्रवेश मिळाल्यामुळे, बीएसडब्ल्यू पदवीचे शिक्षण घेत आहे. मुलीने दहावीची परीक्षा दिली आहे. आणि लहान मुलगा मागासवर्गीय आश्रम शाळेत आठव्या वर्गात प्रवेशित आहे. मुलांची शैक्षणिक प्रगती पाहून शकुंतलाच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे. परंतु तब्बल वीस वर्ष ऊस तोडणी केल्यामुळे शकूंतलाला मुळव्याध, हात, पाय गुडघे, कंबर दुखणे व सतत ताप असलेल्या जीवघेणे आजार जडले आहेत. कर्नाटक राज्यात जास्तीत जास्त वेळा ऊस तोडल्यामुळे तिला चांगली कन्नड भाषा येत आहे. तिचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन सकारात्मक आहे. सध्या शकुंतलाला मुलीचे लग्न करण्याची घाई लागली आहे. कारण दरवर्षी ऊसतोडीला जावे लागत असल्यामुळे मुलीचा सांभाळ करणे शक्य होत नाही. तसेच वडील मरण पावल्यामुळे व आईला रोजमजुरीला जावे लागत असल्याने, मुलीकडे लक्ष देण्यासाठी कोणी नसल्यामुळे तसेच बाहेरगावी मुलीला पाठवण्याचं धाडस ती व तिचा नवरा करत नाहीत. मुलगी फार हुशार आहे. ती ही तिच्या आईप्रमाणे शिक्षण घेऊन मोठे होण्याचे स्वप्न पहात आहे. परंतु तिच ही शकुंतला सारखं लग्न होतं की काय? याची भीती वाटत आहे.

बीड जिल्ह्यात गावागावात शकुंतला सारखे जीवन जगणाऱ्या माऊली भेटतात. त्यांच्या समस्यांचं वास्तव भयवह आहे. या अनुषंगानेच समाजातील महिलांच्या स्थितीचा आढावा घेतला असता असे लक्षात येते की, महिलांच्या स्थितीच्या अनुषंगाने १४५ देशाच्या यादीमध्ये भारताचे स्थान १०८ वर आहे. तर भारतातील बालविवाहाचे प्रमाण हे ४७ टक्के आहे. तर महाराष्ट्रात ३६ टक्के आहे. १५ ते १९ वर्षातील मातांचे प्रमाण दहा टक्के आहे. तसेच युनिसेफच्या अहवालानुसार जगातल्या अर्भक मृत्यूचा दर २० पेक्षा कमी वयात गर्भवती होणाऱ्या मातांमध्ये ५० टक्यापेक्षा ही जास्त आहे. जर जगभर असेच राहिले तर दरवर्षी १४.२ दशलक्ष बालविवाह एका वर्षाला म्हणजेच ३९ हजार बालविवाह दररोज होतील. तसेच संयुक्त राष्ट्राच्या अंमली पदार्थ आणि गुन्हेगारी कार्यालयाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, जगभरामध्ये दररोज सरासरी १३७ महिलांची हत्या त्यांच्या जोडीदार अथवा कुटुंबातील व्यक्ती कडून केली जाते. तसेच जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, जगातील तीन पैकी एक महिलेवर शारीरिक किंवा लैंगिक अत्याचार होतो. जगात हे प्रमाण ३५ टक्के आहे. तर जगात ३८ टक्के महिलांची खुन हे त्यांच्या पतींनी केले आहेत. तर भारतात ३७.७ टक्के महिलांवर हिंसाचार झाला आहे. भारतात दर ७८ मिनिटांनी एक हुंडाबळी जातो. तर ५९ मिनिटांनी एक महिलेवर लैंगिक अत्याचार होतो. तसेच ३४ मिनिटांनी एका महिलेवर बलात्कार होतो. तर १२ मिनिटांनी एक महिलेवर शारीरिक अत्याचार होतो. तसेच तीन महिलांपैकी एका महिलेस हुंड्यासाठी शारीरिक व मानसिक छळ सहन करावा लागतो. तर आरोग्याच्या दृष्टिकोनातून पाहिले तर भारतात ६७ टक्के महिलांची प्रसूती सुईणींकडून होतात. दहा ते अकरा महिलांपैकी एक महिला मधुमेह आजाराने ग्रस्त आहे. तसेच भारतातील १२ टक्के महिलांना स्तनाचा कक्ररोग होण्याचा धोका आहे. तसेच जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, भारतात पाच महिला पैकी एक महिला मानसिक आजाराला बळी पडते. तर भारतात कुपोषित महिलांची प्रमाण जवळपास ५७ टक्के आहे. आणि भारतातील ग्रामीण क्षेत्रात ६७ टक्के कुटुंबात चुलीवर स्वयंपाक केला जातो. त्यामुळे चुलीतून निघणाऱ्या धुराचा महिलांच्या अरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे.

महिलांच्या समस्या सोडविण्याकरिता व महिलांना सक्षम बनवण्यासाठी केंद्र व राज्य शासन तसेच स्वयंसेवी संस्था क्रियाशील आहेत. केंद्र शासनाने पहिले राष्ट्रीय महिला सक्षमीकरण धोरण, २००१ मध्ये आणले तर दुसऱ्या राष्ट्रीय महिला धोरण, २०१६ चा मसुदा जाहीर केला आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने पहिले महिला धोरण, १९९४ मध्ये आणले तर दुसऱ्या महिला धोरणाचा मसुदा, १९९८ मध्ये तयार केला होता. परंतु सत्ता परिवर्तनामुळे सदरील धोरण अंमलात आले नाही. पुढे २००१ मध्ये

तिसरे महिला धोरण जाहीर केले व २०१४ पासून चौथे महिला धोरण राबविली जात आहे. शासकीय धोरणां बरोबरच योजना, कार्यक्रम उपक्रम व कायद्याची निर्मिती करून, प्रशासनाद्वारे त्याची अंमलबजावणी होत असल्यामुळे महिला सक्षमीकरणाचे स्वप्न साकार होत असल्याचे आढळते. परंतु परिवर्तनाची वा बदलाची गती मंद आहे तीला गती देण्याकरीता अनेक आव्हाने समोर जाणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष** :— १. ऊसतोड महिलांवर रुढी—परंपरा व अंधश्रद्धांचा प्रभाव असल्याने, महिला उपवास, वृत, नवस करतात. त्यामुळे त्यांची सतत उपासमार होते. व महिला कुपोषित होतात. २. ऊसतोड महिलांना पुरुषाबरोबर ऊसतोडीचे अवजड काम करून घरगुती कामही करावे लागते. म्हणजेच अतिकाम, झोप कमी, आरोग्याकडे दुर्लक्ष व वेळेवर औषधोपचार घेत नसल्यामुळे महिलांना जीवघेणे आजार होतात. ३. ऊसतोड महिलांचे पती व्यसनाधीन व वर्चस्व दाखवित असल्यामुळे महिला कौटुंबिक हिंसाचारास बळी पडतात. तसेच आर्थिक गुंतवणुक करण्यास असफल होतात. ४. मुलांकडील लोक नवीन कोयतं (जोडी) तयार करण्यासाठी तर मुलीकडील लोक जबाबदारीतून मुक्त होण्याकरिता मुला, मुलीचा विवाह किंबहुना बालविवाह करतात. त्यामुळे मुला—मुलींचे शैक्षणिक नुकसान होतेच होते त्याबरोबर मुलीस कमी वयात गर्भधारणा व मुल झाल्याने तिच्या शरीराची झीज होते. ५. महिला विषयक धोरणं, योजना व कायद्यामुळे व स्वयंसेवी संस्थांच्या प्रयत्नामुळे महिलांची सर्वांगीण स्थिती सुधारण्यास चालना मिळत आहे.

**शिफारशी**:— १. ऊसतोड महिला करिता शासकीय योजना व आरोग्यविषयक सुविधांचा लाभ घेण्यासाठी महिलांना प्रेरित करणे आवश्यक आहे. २. बाल विवाहावर प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कौटुंबिक समुपदेशन करावे तसेच शालेय व स्थानिक स्तरावरून मुलींच्या विवाह संदर्भात घडणाऱ्या विवाहपूर्व घडामोडीवर बारकाईने लक्ष देऊन योग्य ती तत्काळ कारवाई करावी जेणेकरून बालविवाह थांबविण्यास मदत होईल. ३. महिलांमधील अंधश्रद्धा कमी करण्यासाठी शासन व स्वयंसेवी संस्थांनी अंधश्रद्धा निर्मूलन कार्यक्रमाची मालिका ग्रामीण भागात चालवावी. ४. ऊसतोड कामगारांची नोंदणी करणे आवश्यक आहे जेणेकरून कायदेशीररीत्या ऊसतोड कामगार म्हणून सिद्ध होईल याची सर्वस्वी जबाबदारी शासन व साखर कारखानदार यांनी घेणे अनिवार्य आहे. ५. ऊसतोड कामगारांच्या समस्यांवर संशोधन होणे अत्यावश्यक आहे.

**संदर्भ :**


1. https://www.loksatta.com-cdn-amppRoject-org/v/s/
2. https://www.bbc.com-cdn-amppRoject-org/v/s/www-bbc-com/marathi/amp/international&46348048\amp_js_
3. https://www.dainikprabhat.com/increase&in&violence&against&women/
4. https://www-tarunbharat-net/Encyc/2019/5/17/article&of&Gajanan&Nimdeo&on&women&empowerment-html
5. https://maharashtratimes&com-cdn-amppRoject-org/v/s/maharashtratimes-com/editorial/column/health/women&health/amp_articleshow/46498172-cms\amp_js


# आयुका ग्रंथालयातील ई—स्त्रोत व्यवस्थापन : एक सर्वेक्षण


**आनंद ठाकुरदास मालेवार**, संशोधक विद्यार्थी, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर.

**श्री. सुनिल भाऊरावजी कान्होलकर**, ग्रंथपाल, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा.


**प्रस्तावना**:— महिती तंत्रज्ञानाचे वर्चस्व असलेल्या या आधुनिक जगात तंत्रज्ञान आणि विकास क्षेत्रात प्रत्येकजण आपल्या माहितीप्राप्तीसाठी प्रयत्नशील आहे. माहिती स्फोटांमुळे, शैक्षणिक प्रणालीची प्रगती तसेच तंत्रज्ञानामध्ये बदल, वापरकर्त्याची आवश्यकता आणि निवड तसेच मागणी हया साऱ्या गोष्टींमध्ये झपाटयाने बदल होत आहे तद्वतच वाढही होत आहे, कारण माहिती आणि ज्ञानापर्यंत पोचण्याच्या पारंपारीक आणि जुन्या पद्धती आता कालबाह्य होत आहेत, कारण त्या वेळखाऊ, त्रासदायक तर आहेतच शिवाय त्या ठिकाण, व्यक्ती आणि संबंधीत्वयक्तींची उपलब्धता आणि स्त्रोत यावर अवलंबून आहेत. इलेक्टॉनिक स्त्रोत जगातून कोठूनही सहज उपलब्ध होतात. इ—स्त्रोत संशोधन आणि विकास आणि मार्गदर्शन क्रिया करतांना अधिकाधीक मूल्य जोडते. हे उपयोक्ता, सेवा प्रदाता, ग्रंथपालाचा वेळ वाचविते आणि शिवाय मिळविलेली माहिती एकाकडून दुसऱ्याकडे प्रसारित करण्यासाठी जलदगतीचा एक प्रकार आहे. ई—स्त्रोत सर्वच प्रकारच्या आणि आकारांच्या ग्रंथालयासाठी वाढत्या प्रमाणात महत्त्वपूर्ण ठरत आहेत. आजकाल माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञान क्षेत्राचा अशा प्रकारे विकास होत आहे की, पारंपारिक ग्रंथालय प्रणालीच्या माध्यमातून ई—स्त्रोतांच्या तुलनेत जलद माहिती पुरविणे शक्य नाही म्हणूनच वर्तमानातली ग्रंथालये पारंपारिक ग्रंथालये राहिलेली नसून ते ज्ञान आणि माहिती केंद्रात विकसित होत आहेत. इलेक्ट्रानिक स्त्रोत सुव्यवस्थितपणे व्यवस्थापीत केले गेले पाहिजे. मुळात इलेक्ट्रॉनिक स्त्रोत व्यवस्थापन प्रणाली ग्रंथपालांसाठी एक साधन आहे, परंतु त्याचा परिणाम शेवटच्या उपयोक्त्यावरदेखील होतो. उपयोक्त्यांसाठी इलेक्ट्रॉनिक स्त्रोत व्यवस्थापन प्रणालीमध्ये एकत्र केलेली माहिती ई—स्त्रोतांशी सुसंवाद साधण्याचा एक आरंभ बिंदू म्हणून कार्य करू शकते.[1]

**ई—स्त्रोत म्हणजे काय?** :— ई—स्त्रोत एक इलेक्ट्रॉनिक माहिती स्त्रोत आहे, ज्याला आपण वेबच्या माध्यमातून परिसरात किंवा बाहेर उपलब्ध होऊ शकते. आपणांस हवी असलेली माहिती, आवश्यकता असेल तेव्हा, वर्षातून, आठवड्यातून, दिवसाला केव्हाही प्राप्त करू शकतो. ई—स्त्रोत संगणकाच्या वापराद्वारे एन्कोड (encode) केलेले आणि उपलब्ध असलेल्या कोणत्याही कार्याचा संदर्भ देते ज्यामध्ये भौतिक स्वरूपात ऑनलाईन आणि इलेक्ट्रॉनिक डेटा दोन्हीही समाविष्ट आहेत. कोणताही डेटा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात सदूर सर्वरमध्ये संग्राहित केला जाऊ शकतो आणि इंटरनेट वापरून तो इलेक्ट्रॉनिकपणे प्राप्त केला जाऊ शकतो. या धोरणामध्ये विनामूल्य इंटरनेट स्त्रोत आणि इलेक्टॉनिक स्त्रोत किंवा ग्रंथालयाद्वारे खरेदी केलेले व्यावसायीक स्त्रोत, व्यावसायीक संस्था, ना नफा संस्था किंवा कोणत्याही बाह्य संस्थांचा समावेश आहे. ई—स्त्रोत ग्रंथालय संग्रहाचा एक भाग म्हणून गंथालय संग्रहणात लक्षणीय वाढ करित आहे. जे ग्रंथालयाच्या संसाधनात संभाव्य मूल्यात भर घालते. ज्याचे

काही सामान्य प्रकार आहेत : १. अनुक्रमनिका आणि सारांश डेटाबेस (Indexing and abstracting databases) २. ई–वृत्तपत्र / मासिक (E-newsletter / magazine) ३. इलेक्ट्रॉनिक शोधप्रबंध (ElectRonic Thesis and Dissertations) ४. संपूर्ण मजकूर डेटाबेस ५. ई–जर्नल्स् ६. ई–पुस्तके ७. ई–विनिबंध ८. संदर्भ डेटाबेस (निर्देशिका, शब्दकोश, विश्वकोश इ.) ९. संख्यात्मक आणि सांख्यिकीय डेटाबेस.

**ई–स्त्रोतांचे फायदे:–** संशोधन प्रकाशनाच्या सध्याच्या प्रचलित प्रणालीशी संबंधीत असंख्य अडचणींना प्रिंट जर्नल सोबत, उच्च जर्नल किंमत, अनेक नियतकालिकांच्या प्रसारामुळे एखाद्या विषयावरील लेखांचे विखुरलेले प्रकाशन, त्यात लागणारा दीर्घकालीन विलंब, उल्लेख यंत्रणेत (Refereeing Systems) पुनरावलोकनासाठी पूर्वाग्रह, कमी खपाचे जर्नल्स्, लेखकांना वेळेवर अभिप्राय नसणे आणि ग्रंथालय आणि माहितीशास्त्र केंद्रात ई–जर्नलच्या समावेशामुळे विद्वान लेखनाची पुनर्विक्री कमी होणे अशा अनेक अडचणींसोबत संशोधन प्रकाशनाच्या सध्याच्या प्रचलित प्रणालीशी संबंधीत असंख्य अडचणींना सामोरे जावे लागते. या सर्व अडचणी ई–स्त्रोतसारख्या माध्यमात येत नाही. आपणांस ई–स्त्रोतांचे आणखी काही फायदे पुढीलप्रमाणे सांगता येतील. १. ई–स्त्रोत किंवा ई–जर्नलचे जलद संशोधन शक्य आहे, २. उद्धृत लेखांचे आणि डेटाबेसचे हायपरटेक्स्ट दुवे, ३. मजकूराचा ऑनलाईन शोध, ४. दृत वितरण लेख पर्याय, ५. लेख चोरी किंवा विकृतीबद्दल चिंता नाही, ६. कपाट संग्रहणाची समस्या नाही, ७. ग्रंथालयबाह्य प्राप्त योग्यता,

एकाच वेळी एकापेक्षा जास्त उपयोक्त्यांनी वापर करणे (काही परवाने तशी मुभा प्रदान करतात.) सर्व ई–स्त्रोत उपयोक्त्याशी संबंधीत आणि योग्य असणे आवश्यक आहे तसेच वर्तमान शैक्षणिक गरजा प्रतिबिंबीत करणारेसुद्धा असावेत. ग्रंथालयांनी उपलब्ध असलेल्या विविध मार्गांनी ई–स्त्रोत प्राप्त केले असावेत. जसे–प्रकाशकांद्वारे, सेवा प्रदाते अणि विक्रेते इत्यादी.[२]

**ई–स्त्रोतांची वैशिष्ट्ये:–** ग्रंथालयातील ई–स्त्रोतांची मुख्य वैशिष्ट्ये पुढीलपमाणे सांगता येतील. १. कोणत्याही भौतिक अस्तित्वाशिवाय कुठेही, केव्हाही, कोणालाही सहज उपलब्ध किंवा प्राप्त करता येऊ शकते. २. प्राप्त न करण्यायोग्य स्वरूपातील साहित्य प्रदर्शित करण्याची क्षमता, जसे मोठया आकाराचे नकाशे. ३. तुलनात्मकदृष्ट्या आर्थिक आणि अध्यापन सामग्रीमध्ये संकलित होण्याची संभाव्यता. ४. जोडणी किंवा दुव्यांद्वारे संबंधीत साहित्य प्राप्त करणे. ५. संपूर्ण मजकूरासहित वर्धित शोध क्षमता. ६. विभिन्न माध्यमांचे एकत्रीकरण. उदा. चित्र, आवाज, चलचित्र.[३]

**आयुका:–** इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रॉनॉमी ॲन्ड ॲस्ट्रोफिजिक्स (IUCAA) ही पुणे विद्यापीठाच्या आवारात असलेली एक संशोधन संस्था आहे. ती आयुका या संक्षिप्त नावाने प्रसिद्ध असून स्थापना १९८८ केली गेली. या संस्थेत प्रामुख्याने खगोलशास्त्र, खगोलभौतिक या प्रमुख विषयांवर संशोधन केले जाते. या संस्थेचे पहिले संचालक म्हणून प्रसिद्ध भौतिकशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर हे होते. या कॅम्पसची रचना भारतीय वास्तुशास्त्रज्ञ चार्ल्स कोर्रिआ यांनी केली.[४]

भारतीय विद्यापीठातील खगोलशास्त्र आणि खगोल – भौतिकशास्त्रातील सक्रिय गटांच्या वाढीस प्रोत्साहन देण्यासाठी इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रॉनॉमी ॲन्ड ॲस्ट्रोफिजिक्स भारतीय विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापना केलेली आहे. खगोलशास्त्र व तसेच खगोलभौतिकशास्त्रातील अध्यापन व विकासासाठी विद्यापीठ क्षेत्रातील उत्कृष्टतेचे एक केंद्र व्हावे असे संस्थेचे लक्ष्य आहे. सध्या आयुकामध्ये २३ प्राध्यापक, ३५ पोस्ट डॉक्टरेट फेलो, ४१ संशोधक विद्यार्थी आहेत.[५]

**आयुका ग्रंथालय:–** आयुका ग्रंथालयाने उपयोक्त्यांना आपल्या विस्तृत ग्रंथ संग्रहणातून खगोलशास्त्र, खगोलभौतिकशास्त्र, गणित, संगणकशास्त्र आणि इलेक्ट्रॉनिक्स् आणि संबंधीत क्षेत्रातील पुस्तके आणि विविध जर्नल्स् उपलब्ध करून दिलेली आहेत. आयुका हे एक मुक्तद्वार धोरणात्मक गंथालय आहे. जे दिवसभर खुले ठवले जाते. ग्रंथालयाने खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र क्षेत्रातील महत्त्वपूर्ण नियतकालीकांची सदस्यता स्विकारली असून त्यामधील बरीच नियतकालिके इलेक्ट्रॉनिक स्वरूपाची आहेत. ई–ग्रंथालय या ॲप्लीकेशनद्वारे अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञान समाविष्ट करून आणि पारंपारिक ग्रंथालयाची छाप दिल्याने या ग्रंथालयाचे वर्णन संकरित (Hybrid) ग्रंथालय म्हणून केले जाऊ शकते. आयुकाचे ग्रंथालय आयुकाच्या सर्वात सुंदर “वराहमिहिर” या इमारतीमध्ये स्थापन केलेले आहे. आयुका गंथालय हे भारतातील खगोलशास्त्र आणि खगोलभौतिकशास्त्र विषयातील अत्याधुनिक ग्रंथालयापैकी एक आहे, ज्यामध्ये अंदाजे १९५०० पुस्तके असून १०० पेक्षा जास्त वैज्ञानिक नियतकालिकांची सदस्यता घेतलेली आहे. संगणकीय डेटाबेसच्या माध्यमातून कार्ड इंडेक्स पाठविणारे हे देशातील पहिले ग्रंथालय आहे. तसेच ग्रंथालय परिसराबाहेर उपयोक्त्यांना ईजप्रॉक्सि) माध्यमातून ई–स्त्रोतांची सदूर सेवा दिली जाते. ई–ग्रंथालय टर्मिनलद्वारे ओपॅक उपलब्ध करून दिलेले आहे तसेच वेब ओपॅकद्वारे ग्रंथालय संग्रहाचा शोध घेतला जाऊ शकतो.

**आयुका ग्रंथालयातील ई–स्त्रोत:–** आयुका ग्रंथालयाने आपल्या उपयोक्त्यांसाठी बऱ्याच ई–स्त्रोतांची सदस्यता घेतलेली दिसून येते. त्यात प्रामुख्याने ई–शोध सिंधु आणि ई–ग्रंथालय यांचा समावेश आहे. आयुका ग्रंथालयाचे ई–स्त्रोत संग्रह तक्ता क्र. १ मध्ये दिलेले आहे.

**तक्ता क्र. ०१**

| अ.क्र. | ई–स्त्रोत | उपलब्ध संख्या |
|---|---|---|
| १ | सीडी/डीव्हीडी | ४५५ |
| २ | वीडीओ कॅसेट्स | ४७ |
| ३ | शोधप्रबंध | ३९ |
| ४ | ई–जर्नल्स् | ३८७३ |
| ५ | ई–पुस्तके | ९२२६ |
| ६ | संशोधन प्रकाशने | १७७५ |
| ७ | ऑनलाईन जर्नल्स् (ई–शोधसिंधू) | ६०००+ जर्नल्स् ३१३५०००+ ई–पुस्तके |

**तक्ता क्र. ०२**

आयुका ग्रंथालयात खालील प्रमुख ई–स्त्रोत (ई–पुस्तके, ई–जर्नल्स्) वर्गणी माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत.

| नाव | वेब दुवा | उपलब्ध शिर्षक |
|---|---|---|
| अमेरिकन इन्स्टिट्युट ऑफ फिजिक्स | https://aip.scitation.org/ | २४ |
| अमेरिकन फिजिकल सोसायटी | https://www.aps.org/ | १५ |
| एमरॉल्ड | https://www.emerald.com/insig | ११७३ |
| ISID (डेटाबेस) | http://isid.org.in/ | |
| JCCC (डेटाबेस) | http://www.jccc-ugcinfonet.in/ | |
| सायन्स डायरेक्ट | https://www.sciencedirect.com/ | ४२२७+ जर्नल्स २९९०५+ पुस्तके |
| टेलर ॲन्ड फ्रॅन्सिस | https://taylorandfrancis.com/ | २६००+ जर्नल्स १२००००+ पुस्तके |

| | | |
|---|---|---|
| स्प्रिंगर | https://link.springer.com/ | ३६६०+ जर्नल्स् २७१४५४+ ई–बु |
| निंबस | https://www.indianjournals.com/ijor.aspx | ७००००+ जर्नल्स् ५०००००+ ई–बु |
| aribib (डेटाबेस) | https://wwwadd.zah.uni-heidelberg.de/aribib/docs/index | |
| खगोलशास्त्र ज्ञानकोश (डेटाबेस) | http://astRothesaurus.org/ | |
| इन्स्पायर (डेटाबेस) | https://inspirehep.net/ | |
| VizieR डेटाबेस | https://vizier.iucaa.in/ | |
| चंद्र संग्रह (Archive) | https://asc.harvard.edu/ | |
| अर्क्सिव्ह (arXiv) | https://arxiv.org/ | |

आकृती क्रमांक १




**ई–स्त्रोत व्यवस्थापन संकल्पना:–** सध्याच्या डिजीटल युगामध्ये माहिती सहजपणे प्राप्त करता येणे आणि तिची व्यापकता यासारख्या कारणांमुळे ग्रंथालये अधिकाधिक ई–स्त्रोत उपलब्ध करून देत आहेत. ग्रंथालयामध्ये ई–स्त्रोतांच्या वाढीमुळे त्यांचे संपादन व देखभाल ही एक गुंतागुंतीचे बात बनलेली आहे. यामुळे ग्रंथालयात ई–स्त्रोत सोयीस्करपणे व्यवस्थापित आणि वितरित करण्यासाठी एखादे धोरण तयार करणे भाग पडते. म्हणूनच ई–स्त्रोत व्यवस्थापन किंवा इलेक्ट्रॉनिक स्त्रोत व्यवस्थापन (ERM) ग्रंथालय व्यावसायिकांसमोर एक आव्हान बनले आहे ज्याचे संशोधन आणि सराव करून लक्ष देणे आवश्यक आहे. याच आव्हानांचा सामना करण्यासाठी ग्रंथालय व्यावसायिक आणि आशय प्रदात्यांनी ई–स्त्रोतांच्या व्यवस्थापनासाठी अधिक पद्धतशीर मार्गाने इलेक्ट्रॉनिक स्त्रोत व्यवस्थापन प्रणाली (ERMS) विकसित करण्याचा निर्णय घेतला. साधने, तंत्रज्ञान आणि मानक यांच्या मदतीने ईआरएमएस विकसित केले जाऊ शकते. जुन्या पद्धतीत परावर्तित होण्याच्या मार्गावर ग्रंथालयांना ई–स्त्रोत व्यवस्थापनाच्या विविध बाबींबद्दल स्पष्टता असणे आवश्यक आहे. स्पष्टता आणि स्विकार्यता आणण्यासाठी इलेक्ट्रॉनिक स्त्रोत व्यवस्थापनाच्या विविध पैलूंवर संशोधन आणि नावीन्यता आणणे आवश्यक आहे. इलेक्ट्रॉनिक स्त्रोत व्यवस्थापनाचा अवलंब केल्याने पद्धतशीर व्यवस्थापन आणि ग्रंथालयांच्या स्त्रोतांचा इष्टतम उपयोग होईल. या पार्श्वभूमीवर असे मानले जाते की, भारतातील शैक्षणिक किंवा विशेष ग्रंथालयामध्ये ई–स्त्रोत व्यवस्थापनाचा अवलंब करणे आणि त्यामध्ये सराव करणे यात कोणताही फरक असून नये. ही एकरूपता दोन कारणांमुळे गृहित धरली जाते. (१) स्पर्धात्मकता, (२) नवीन कल्पना अंगिकारण्याची क्षमता.[६]

**आयुकातील ई–स्त्रोत व्यवस्थापन:–** आयुका ग्रंथालयात ई–नमुन्यात माहिती स्त्रोत प्राप्त केले जाते. सामान्यत: सीडी–रॉम आणि जर्नल्स्, मानक किंवा अहवाल आणि ग्रंथसूची, डेटाबेस यासारख्या प्राथमिक स्त्रोतांना ऑनलाईन प्राप्तता दिली जाते. संशोधकांना किंवा उपयोक्त्यांना वेगवेगळ्या प्रकाशकांच्या बेजपोर्टलवर माहिती शोधणे किंवा तिला प्राप्त करणे अवघड आहे. म्हणूनच आयुकाने आयुका ग्रंथालयातील मोठ्या संख्येने ई–स्त्रोतांचे व्यवस्थापन करण्यासाठी आयुका ग्रंथालयाचे होम पेज तयार करून त्यात विविध प्रकारचे दुवे जोडून दिलेले आहेत. त्यात ऑनलाईन स्त्रोतांच्या दुव्यासोबत ऑफलाईन स्त्रोतांचे दुवे सुद्धा दिलेले आहेत. आकृती क्र. २ मध्ये आयुका ग्रंथालयाच्या होम पेज पोर्टलद्वारे स्त्रोत उपलब्धता दर्शविलेली आहे.

आकृती क्रमांक २




आकृती क्र. ३




आकृती क्र. ३ मध्ये आयुका ग्रंथालयाच्या होमपेज पोर्टलद्वारे स्त्रोत उपलब्धता दर्शविलेली आहे.

आयुका ग्रंथालय ई–स्त्रोत व्यवस्थापन वेब पोर्टल https://eg4.nic.in/Universities/OPAC/Default.aspx?LIB_CODE=IUCAA वर माहिती मिळविता येईल.

आकृती क्र. ४



आयुका ग्रंथालयामार्फत उपयोक्त्यांना पोर्टलवर अनेक स्त्रोत उपलब्ध करून दिल्या जातात. पोर्टल वर्णमालेनुसार शिर्षकयादी, विषययादी, प्रकाशकयादी वगळता सर्व स्त्रोतांसाठी एकत्रित शोध प्रदान करतो.

**आयुका ग्रंथालयातील उपयोक्त्यांवर बाह्य परिसर ई–स्त्रोतांचा प्रभाव**:— सन २०१८–१९ मध्ये आयुका ग्रंथालयातील बाह्य परिसर उपयोक्त्यांनी ईजप्रॉक्सि (EzpRoxy) प्रणालीच्या माध्यमातून केलेल्या ई–स्त्रोत उपयोगाची आकडेवारी खालील आकृती क्र. ५ मध्ये दिर्शविलेली आहे. ती बाह्य ई–स्त्रोतांच्या उपयोगाच्या आकडेवारीवर परिणाम करते.[७]

आकृती क्र. ५




**६ निष्कर्ष** :— सदर ग्रंथालय किंवा सध्याच्या युगातील ग्रंथालये विविध आव्हानांचा सामना करण्यासाठी तसेच उपयोक्त्यांना पुरेशी सेवा देण्यासाठी सुसज्ज झाल्याचे निदर्शनास येते. हल्ली ग्रंथालयात पर्याप्त संख्येत संगणक, वेगवान इंटरनेट जोडणी आणि माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या इतर सर्व अनुप्रयोगांची सुविधा असणे आवश्यक आहे. याव्यतिरिक्त ग्रंथालयात उपयोक्ता शिक्षण ई–स्त्रोतांच्या सर्वोत्तम आणि सर्वाधिक वापरासाठी महत्त्वपुर्ण भूमिका बजावते. म्हणूनच, आम्ही ग्रंथालय व्यावसायीकांनी उपयोक्त्यांना आधुनिक सेवा–सुविधा पुरविण्याची संकल्पना आपल्या मनात कायम ठेवली पाहिजे. उपलब्ध असलेल्या ई–स्त्रोतांवरून ग्रंथालय अधिकाधिक आधुनिकतेच्या दृष्टीने कार्य करित आहे. ई–स्त्रोतांचे प्रमाण अधिक असुनही बाह्य परिसर उपयोक्ते ई–स्त्रोत उपयोगाचे प्रमाण कमी झाल्याचे दिसून येते, याचे एक कारण कमी दर्जाची इंटरनेट जोडणी असू शकते.

**References:-**

1. Sinha, Madhulika and Thacker, Vaibhavi A. (2010). Study of e-resource acquisition policies in consortia: a possibility. In: Re-engineering of library and information services in digital era, pRoceedings of the PLANNER 2010, edited by Jagadish ARora, organised by INFLIBNET Centre, Ahmedabad in collaboration with Tezpur University, held at Tezpur on February 18-20, 2010. Ahmedabad: INFLIBNET Centre, pp.155-164
2. Satpathy Kishor C., Sarma Rahul and Sarma Roon Devi (2012). E-Resource Management in Technical Institute Library: A Case Study on NIT Silchar. In: Building Participatory Library Services in Degital Era, pRoceedings of the PLANNER 2012, edited by Jagadish ARora, organised by INFLIBNET Centre, Ahmedabad in collaboration with Sikkim University, held at Gangtok on March 01-03, 2012. Ahmedabad: INFLIBNET Centre, pp.202-208
3. Karmakar Gouri S, Deka Prasanta K, Singh Sanjay K., Sarkar Sankar (2012). E-Resources in College Libraries of Guwahati with Reference to NLIST: A Study. In: Building Participatory Library Services in Degital Era, pRoceedings of the PLANNER 2012, edited by Jagadish ARora, organised by INFLIBNET Centre, Ahmedabad in collaboration with Sikkim University, held at Gangtok on March 01-03, 2012. Ahmedabad: INFLIBNET Centre, pp.412-418.
4. https://en.wikipedia.org/wiki/Inter-University_Centre_for_AstRonomy_and_AstRophysics. (accessed on 02.05.2020)
5. Paranjape Aseem (2019). Inter-University Centre for AstRonomy and AstRophysics n` Pune: 31st Annual Report 2018-2019. p. 12.
6. Patra Nihar Kanta (2014). ElectRonic Resource Management: A Case Study of Management School Libraries in India. Ph. D. Thesis submitted to Annamalai Sambalpur University,p. 1
7. Paranjape Aseem (2019). Inter-University Centre for AstRonomy and AstRophysics - Pune : 31st Annual Report 2018-2019. p. 160.
8. https://www.iucaa.in/index.html (Accessed on 03.05.2020)

# निरोगी राहण्याकरिता प्राणायाम

**प्रा. नरेश पांडुरंगजी बोरकर**, श्रीमती रेवाबेन मनोहरभाई पटेल महिला कला महाविद्यालय, भंडारा. मो. ९४२१७१६५९६

**प्रस्तावना :—** श्वासाच्या गतीला नियंत्रित करण्याला प्राणायाम म्हणतात. प्राणायाम श्वासाला निश्चित गतित ओढून फुफ्फुसात हवा भरते. तिला एका निश्चित वेळेपर्यतं थांबवून ठेवणे नंतर तिला निश्चित गतीत फफुफ्फुसामधून हवा बाहेर काढून त्याला खाली करणे पुन: निश्चित गतित फुफ्फुसात हवा भरण्याच्या प्रक्रियेला निश्चित वेळेपर्यत पुन:पुन करण्याच्या क्रियेला प्राणायाम म्हणतात. प्राणवायु वैश्विक जीवन शक्ती होय. तर आयाम म्हणजे तिला नियंत्रित करणे होय. आपल्या शरीराकरिता प्राण शक्तीचे खुप महत्त्व आहे. श्वसनाच्या माध्यमातून प्राणावर निमंत्रण प्राप्त करणे म्हणजे प्राणायाम. ही प्रक्रिया नलिकेव्दारे श्वास घेण्यावर अवलंबून असते. प्राचीन काळात श्वसन प्रक्रियेचे महत्त्व माहीत होते. प्राणायामाच्या सतत सरावामुळे प्राणशकितेच्या प्रमाणात वृद्धी होउन श्वसनाचे अडथळे दुर केले जात होते.

दहयन्ते ध्यायमानाना धातुना हि यथा मला : !
तथेन्द्रियाणा दहयन्ते दोषा : प्राणस्थ निज्यहात !!

मनू ने म्हटले आहे की, जसे अग्नीमध्ये सुवर्णाला घातले तर त्याचे मळ नष्ट होते. त्याचप्रकारे प्राणायाम केल्याने इंद्रियांमधील मळ नष्ट होतो. प्राणायाम संजीवनी शक्ती होय. ज्याने शारीरिक आरोग्य तर सदृढ बनते. त्याचबरोबर मनाची एकाग्रता वाढते. प्राणायामाव्दारे मानसिक शांती आणि आध्यात्मीक विकासाचा मार्ग प्रशस्त होतो. प्राणायाम प्राणाला अनुवासीत करण्याची प्रक्रिया होय. प्राणायाम श्वासक्रियेचा सम्यक नियमन आणि नियोजन होय. प्राणायामच एक मात्र साधन आहे ज्यामुळे व्यक्ती श्वास, मन आणि प्राणाला वशित करून सुप्त चेतना जागृत करतो.

**प्राणायाम रोग प्रतिकार शक्ती वाढवितो**:— प्राणायाम श्वासाच्या गतीवर नियंत्रण करतो. प्राणायाम रक्तसंचाराला सुनियोजित करतो. तसेच मस्तिष्क, मेरूदण्ड, हृदयाच्या मांसपेशीला तसेच नाडी मंण्डलच्या कार्यक्षमतेला व्यवस्थित करीत असतो. त्यांना अतिरिक्त शक्ती प्रदान करतो. प्राणायामाव्दारे हृदय, फुफ्फुस आणि पोटाच्या मांसपेशिची मालिश होते. त्याचप्रमाणे किडनीची कार्यक्षमता वाढते.

प्राणायाम मध्ये श्वास घेण्याच्या तीन क्रिया आहेत. — १. पुरक :— श्वास आत घेतल्यानंतर फुफ्फुसाच्या कप्प्यात भरून ठेवण्याच्या क्रियेला पुरक असे म्हणतात. २. कुंभक :— कुभंक दोन प्रकारचा असतो. आंत कुभंक व बाहय कुभंक. श्वास आत ओढल्यानंतर श्वासाला आत रोखुन ठेवण्याच्या क्रियेला आत कुंभक म्हणतात. तर श्वासाला बाहेर सोडल्यानंतर बाहेरच काही वेळ रोखुन ठेवण्याच्या क्रियेला बाहय कुभंक असे म्हणतात. ३. रेचक :— फुफ्फुसामधून श्वास हळू—हळू बाहेर काढण्याला रेचक क्रिया म्हणतात.

**प्राणायाम साठी आवश्यक परिस्थिती** :— १. प्राणायाम अभ्यासापुर्वी मुत्राशय व आतडे रिकामे असावयास पाहीजे. २. प्राणायाम उपाश्यापोटी करावयास पाहीजे. ३. प्राणायाम अभ्यासानंतर अर्ध्या तासानंतरच हलके आहार घ्यावे. ४. प्राणायाम अभ्यास सुर्योदयापुर्वी तसेच सुर्यास्तानंतर करावे. ५. प्राणायाम अभ्यास कमीत—कमी १५ मिनिट प्रतिदिवस केले पाहीजे नंतर सरावाने अर्धा तासपर्यंत करता येते. ६. प्राणायाम हवेशीर व स्वच्छ ठिकाणी करावे. ७. प्राणायाम शीतली व शितकारी प्राणायाम सोडून इतर प्राणायामाचा अभ्यास श्वसनक्रिया केवळ नाकानेच केले पाहीजे. ८. प्राणायाम अभ्यासाकरिता निद्रासन, पदमासन योग्य आहेत. ९. प्राणायाम अभ्यास करतेवेळी मांसपेशिवर कोणतेही ताण नको.

**प्राणायामाचे प्रकार**:— शास्त्राामध्ये जवळपास पन्नास प्राणायाम प्रकारांचा उल्लेख मिळतो. मुख्य रूपात अनुलोम—विलोम कपालभाती, भ्रामरी, भ्रस्त्रिका, उज्जाई, शितली शितकारी प्राणायाम आहेत.

१. **अनुलोम विलोम** :— अनुलोम या शब्दाचा अर्थ सरळ व विलोमचा अर्थ उलट होतो. अनुलोम विलोम प्राणायाम करंतानी कोणत्याही एका ज्ञानात्मक आसनात बसून कंबर, मान व डोक्याला सरळ ठेवावे. डाव्या नाकपुडीने पुरक करावे त्यानंतर यथाशक्ती कुभ्भकं करून उजव्या नाकफुडीने रेचक करावे. याच क्रियेला विरूद्ध करावे म्हणजेच उजव्या नाकपुडीने पुरक, कुभंकानंतर डाव्या नाकपुडीने रेचक करावे. याप्रकारे अनुलोम—विलोम एक प्रक्रिया पुर्ण होते. याच क्रियेला पुन:पुन: करावे. यामुळे वायुविकार दुर होतात.

२. **कपालभाती प्राणायाम** :—कपालभाती शब्दाची उत्पत्ती संस्कुतमधून झाली आहे. याचा अर्थ कांती बरोबर चेहरा चमकतो. कपालभाती प्राणायाम एक अत्याधिक उर्जा देणारा पोटाचा व्यायाम होय. या प्राणायामात जोरात श्वास सोडले जाते व सामान्यरूपात श्वास आंत घेतले जाते. पाठीला सरळ ठेवून आरामदायक आसनात बसावे. पोटाला फुगवत हळू—हळू श्वास नाकाव्दारे आंत घ्यावे नंतर पोटाला आत ओढत श्वासाला बाहेर काढावे फुफ्फुस स्वत: हवेने भरतात १० ते १५ वेळा जोरात श्वास घ्यावे व सोडावे नंतर लांब श्वास घेत सोडावे. या प्राणायामामुळे रक्त शुद्ध होते. शरीराला अतिरिक्त ऑक्सीजनची पुर्तता होते. पाचनतंत्र सुधारते, चितंन व मन शुद्धीकरण करीता मस्तिष्क तयार होते. फुफ्फुस व समस्त श्वसनप्रणालीला उपयुक्त आहे.

३. **भस्त्रिका प्राणायाम** :— भस्त्रिका प्राणायामचा अर्थ लोहाराच्या धौकनीप्रमाणे दोन्ही नाकपुडयांतून श्वास घ्यावे. श्वास घेतेवेळी पोटाला बाहेर काढावे व श्वास सोडतेवेळी पोट आंतमध्ये घालावे थकवा झाल्यास उजव्या नाकपुडीमधून पुरक करावे नंतर कुभंक करून डाव्या नाकपुडीमधून रेचक करावे या क्रियेला पुन:पुन: करावे. भस्त्रिका प्राणायामाचा सहजरूप कपालभातीची प्रक्रिया होय. कपालभाती मध्ये श्वसन मंद असतो. व उच्छवसन प्रबळ असतो. प्रत्येक उच्छवसानंतर कुभ्भंक सुक्ष्म असतो. जेव्हा नंतरची श्वासनक्रिया जास्त श्वासामध्ये होत असेल तर भस्त्रिकाचा ठिकाणी कपालभातीचे काही चक्र करावे. भस्त्रिका व कपालभाती प्राणायामामुळे यकृत, प्लीहा, पाचनग्रंथी तसेच पोटाचा मांसपेशी क्रियाशील व शक्तीशाली होतात. पाचनशक्तीत वाढ होते. वात—पित्त, कफ इत्यादी रोग ठिक होतात. हृदय चांगले राहते. तसेच हृदयाचा रोग दुर होतो.

४. **भ्रामरी प्राणायाम** :—कोणत्याही ध्यानात्मक आसनात बसून श्वास पुर्ण आत भरून मध्यमा बोटाने नाकाच्या मुळात डोक्याजवळच्या दोन्ही बाजुने थोडे दाबावे मनाला आज्ञाचक्रांत केंद्रित करावे. अगंठयानी दोन्ही कानांना पुर्ण बंद करून आत भुंग्याप्रमाणे गुजंन करत नाद रूपात ओम चा उच्चार करत श्वास बाहेर सोडावा पुन्हा याच प्रकारे आवृत्ती करावी. ३ ते ५ सेकंदात नादरूपात श्वास बाहेर सोडावे. एकवेळा भ्रामरी पुर्ण झाल्यावर त्वरीत पुन्हा त्याचप्रकारचा अभ्यास केला पाहीजे. अशा ५ ते ७ आवृत्ती

करावयात. भ्रमरी करंतानी नाद हा भुंग्याच्या गुंजनाप्रमाणे मधूर आणि सहज ठेवायला पाहीजे तसेच डोक्यावर अधिक दाब देउ नये.

५. **उज्जाई प्राणायाम** :— सर्वप्रथम पदमासन किंवा आरामदायक आसनात बसावे व सामान्य श्वास घ्यावे. थोडया वेळानंतर आपले लक्ष आपल्या गळयाकडे द्यावे. असे अनुभव करावे की, श्वास आपल्या गळयाकडून जात आहे. यावेळेस पोटाला थोडासा आंतमध्ये ओढून कंठदाराला संकुचित करावे व गळयाव्दारा ५ ते ७ वेळा श्वास घ्यावे काही दिवस याप्रकारे अभ्यास करावे असे केल्याने गळयामधून श्वास घेणे व सोडण्यामध्ये हळू आवाज आला पाहीजे. त्यानंतर श्वास घेणे व सोडण्यामध्ये हळू आवाज आला पाहीजे त्यानंतर श्वास लांब व आतमध्ये हळू आवाज आला पाहीजे. गळयाला थोडासा दाबून खराटे सारखा गळयातून हृदयापर्यत तसेच हृदयापासून गळयापर्यत श्वास सोडावे असे १५ ते २० मिनिंटापर्यंत करावे. उज्जाई प्राणायामाव्दारे नाक, कान व गळयाचे रोग दुर होतात. सर्दी व खोकला यामध्ये लाभदायक असते.

**निष्कर्ष** :— १. दैनंदिन जिवनात प्राणायामाचे अंत्यत महत्त्व सांगितले आहे. प्राणायामाने आंतरिक शक्ती वाढविली जाते. २. प्राणायामच्या व्यामाने शरीरातील कॉर्बनडायऑकसाईडची मात्रा कमी होते ऑक्सीजनची मात्रा वाढते. ३. प्राणायाममुळे श्वास उच्छश्वनाच्या क्रियेवर नियंत्रण करून संपूर्ण शरीर निरोगी ठेवण्याचे कार्य केले जाते. ४. प्राणायामाच्या सततच्या अभ्यासामुळे रक्त शुद्ध होते. कुडंली जागृकता साध्य होते. ५. शरीरातील स्थुलता, मधुमेह, गॅस बद्धकोष्टता, आम्लपित, मुत्रपिंड, थाईरॉईड, फुफुस आणि कंठविकार तसेच सर्व नाडया परिशुद्ध होतात.

**समारोप**:— प्राणायामाच्या अभ्यासाने सपूंर्ण मानवजातीचे कल्याण होउ शकते. प्राणायाम रोगप्रतिकार शक्ती वाढवितो. स्वत: करिता रोज वेळ काढून रोज एक तास तरी प्राणयाम करावा. आरोग्याचे मुलमंत्र म्हणजे प्राणायाम होय. ऑक्सीजनची मात्रा वाढवून अशुद्ध वायू बाहेर पडते. रक्ताभिसरण संस्था सुरळीत चालू राहील. हृदयविकारासारखे आजार बळावणार नाही. याकरीता आष्टांग योगामध्ये प्राणायामाचे महत्त्व सांगितले आहे. बऱ्याच योग अभ्यासकांनी विविध उपाययोजना सांगुन त्याचे महत्त्व पटवून दिलेले आहे. प्राणायामाचा अभ्यास करंतानी पहिल्यांदा प्रशिक्षकांकडून सराव करावा व समजून घ्यावा नंतर हळूहळू अभ्यास वाढवावा.

**संदर्भ सुची**

१. डॉ. सुशीलकुमार व्यास — योग शिक्षा,प्रकाशन खेल साहित्य केंन्द्र ७ अंसारी रोड दरियागंज नई दिल्ली
२. डॉ. उषा गोपाल— प्राणायाम तथा यौगिक व्यायाम प्रकाशन— स्पोर्टस पब्लिकेशन्स ग्राउण्ड फलोर अंसारी रोड नई दिल्ली
३. डॉ.वी. के शर्मा— स्वास्थ एंव शारीरिक शिक्षा प्रकाशक—सरस्वती हाउस प्रा. लि.—९ दरियागंज समीप एल.आई. नई दिल्ली
४. योग संदेश जुलै—२०१६
५. https://www.jasatta.com
६. http://medium.cpm
७. http://www.myuplcher.com

# कोरोना विषाणू (कोविड–१९) आणि स्थलांतरीत कामगार

**प्रा. डॉ. विलास घोडे,** सहयोगी प्राध्यापक, बी. पी. नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ सोशल वर्क, हनुमान नगर, नागपूर.

**प्रस्तावना:–** विश्वातील चीनमधील हुबेई प्रातांतील वुहान हे शहर कोरोना विषाणुचे उगम स्थान असल्याचे म्हटल्या जाते. वुहानमधील इन्स्टिटयूट ऑफ व्हायरॉलॉजीमध्ये वटवाघुळ या प्राण्यावर केलेल्या प्रयोगानंतर वटवाघुळच्या विष्ठेचा सीफूड मार्केटमधून झालेला प्रसार यामधूनही कोरोना या विषाणूचा प्रसार झाल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या शहरामध्ये सप्टेंबर २०१९ पासून कोरोनाचा प्रसार सुरु झाला. हुबेई प्रातांत २३ जानेवारी ते २४ मार्च २०२० या कालावधीत लॉकडाऊन घोषित करण्यात आला होता. तर वुहान शहरामध्ये ८ एप्रिल २० ला लॉकडाउन उठविण्यात आले होते. त्यानंतर कोरोनाच्या रुग्णसंख्येला आटोक्यात आणण्यात चीनला यश मिळाले. जगातील जवळपास १९५ देशामध्ये कोरोनाचा फैलाव झालेला आहे. त्यामध्ये सर्वात जास्त प्रादुर्भाव अमेरिका, स्पेन, इटली, ब्रिटन, इरान या देशामध्ये झालेला आहे. प्रत्यक्षात मात्र कोरोनाने डिसेंबर १९ पासून उग्ररुप धारण केले आहे. भारतात कोरोनाचा पहिला रुग्ण ३० जानेवारीला २०२० ला केरळ राज्यात आढळून आला. त्यानंतर भारतात ५५ दिवसांनी कोरोना विषाणुचा फैलावामुळे लॉकडाऊन घोषित केले.

कोरोना एक मानवनिर्मित विषाणू असल्याचे म्हटल्या जात आहे. मानवी चुकांमुळे हे महामारीचे संकट माणसांनी स्वत:च्या हाताने स्वत:वर आणि विश्वावर ओढवून घेतलेले आहे. नैसर्गिक संकट काही कालांतराने कमी होत असते. परंतु कोरोनाचा प्रादुर्भावाची संख्या दिवसेंदिवस वाढत जात आहे. केंद्र व राज्य सरकारनी कोरोनाचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी अनेक लोकहितार्थ निर्णय घेतलेले दिसून येते. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी प्रथमत: लॉकडाउन २४ मार्च ते १४ एप्रिल २० पर्यंत घोषित करण्यात आले होते. परंतु या लॉकडाउनचे महत्त्व लोकांना कळण्यास बराच वेळ लागला. काही लोक विनाकारण रस्त्यांनी फिरत होते. तसेच लोकांची गर्दी नेहमी प्रमाणे होत होती. शासनाकडून दिलेल्या सूचनांची अमलंबजावणी पूर्णपणे होत नव्हती. याचा ताण डॉक्टर, पोलिस विभाग व इतरही कोरोना योद्धयांवर आलेला दिसून येतो.

कोरोनाचा प्रादुर्भाव मानवी जीवनाच्या सर्वच पैलूवर झालेला दिसून येतो. मानवी जीवन एकमेकांवर अवलंबून असल्यामुळे त्यांचा प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष परिणाम प्रत्येक पैलूवर झालेला दिसून येतो. लॉकडाऊन निर्णयामुळे जीवनाची दिवस–रात्र फिरणारी चक्र पुर्णपणे थांबविण्यात आली. यांचा परिणाम सरकारचे महसुली उत्पन्न थांबले, उद्योगधंदे बंद झाले, शासकीय व खाजगी कार्यालये बंद झाली, महाविद्यालये बंद झाली, फक्त जीवनावश्यक असलेल्या वस्तुंचा व्यवहार होत होता. सर्वच प्रकारचे उद्योगधंदे बंद झाल्यामुळे याचा सर्वात जास्त परिणाम गरिब माणसांवर आणि अस्थायी कामगारांवर झाला. अस्थायी कामगारांचे कामही बंद झाले आणि स्वत:जवळ असलेला पैसा ही संपला. त्यामुळे त्यांच्यासमोर जीवन मरणाचा प्रसंग निर्माण झाल्यामुळे गावाची ओढ मनामध्ये निर्माण होऊ लागली. त्यामुळे कामगार स्थलांतराची समस्या निर्माण झाली.

भारतात मार्च महिन्यापासून कोरोनाचा जास्त फैलाव दिसू लागला. त्यामुळे लॉकडाऊन घोषित करुन सर्व प्रकारचे धार्मिक सभा, गर्दीचे कार्यक्रम, उत्सव यावर बंदी घालण्यात आली होती. परंतु राजधानी दिल्लीत निजामुद्दिन येथे अलीकडेच तबलीगी जमातने मरकजचे आयोजन केलेले होते. या मरकजमध्ये राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरुन सुमारे ३४०० प्रतिनिधी सहभागी झाले होते. या कालावधीत या लोकांनी मोठया प्रमाणात प्रवास करुन देशातील विविध राज्यामध्ये कोरोनाचा फैलाव झाल्याची घटना समोर आल्यात. या मरकजमध्ये सहभागापैकी १७ राज्यातील १,४४५ जणांना कोरोनाची बाधा झाल्याचे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने अधिकृतपणे घोषित केले आहे. तसेच या मरकजमध्ये १५ देशातून हे विदेशी नागरिक सहभागी झाले होते.

कोरोनाच्या महामारीमध्ये डॉक्टर्स, नर्स, पोलिस विभाग, स्वच्छता कर्मचारी, अन्न–धान्य विभाग यांचे योगदान मोठया प्रमाणात आहे. मुंबईत देशातील दिल्लीनंतर सर्वात जास्त केंद्रीय कार्यालये आहेत. महाराष्ट्रात जवळपास ३५० आयएएस असतांना सुद्धा जवळपास १५० आयएएस अधिकाऱ्याचा कोरोना महामारीच्या कार्यात प्रत्यक्ष सहभाग दिसून आला नाही. याशिवाय नौदल, तट रक्षकदल, कस्टम्स, निमलष्करी दले असुन सुद्धा इतर प्रशासनाच्या कामात सहभागी करुन घेतले नाही तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेतील पदाधिकारी, शहरी भागातील नगरसेवक, आमदार, खासदार आणि इतरही लोकप्रतिनिधी यांच्यामध्येही कोरोना कामासंबंधी पाहिजे तसे समन्वय दिसून आलेला नाही. प्रशासनाचे आणि नोकरशाहीचे समन्वय असणे गरजेचे आहे. वरीष्ठ आणि कनिष्ठ अधिकारी यांच्यामध्ये संवाद आणि आपत्ती व्यवस्थापन कार्यात समन्वय असणे महत्त्वाचे असते. लॉकडाउन सुरु झाल्यानंतर फक्त चार–पाच विभागाचे कार्य निरंतरपणे सुरु होते. देशातील कोरोनाचा प्रभाव महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू, दिल्ली, राजस्थान, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेश, प. बंगाल, पंजाब आणि तेलंगणा या राज्यामध्ये जास्त प्रमाणात दिसून येते. या राज्यामध्ये लॉकडाऊन घोषित झाल्यामुळे राज्यातील उद्योगधंदे पूर्णपणे बंद झाल्यामुळे त्यांच्या परिणाम सर्वात जास्त असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांवर झाला आणि कामगारांची विदारक परिस्थिती त्या त्या राज्यात निर्माण झाली. कामगाराच्या व्यथा समोर आल्यात.

भारतीय कार्यपद्धतीमध्ये केंद्र व राज्य सरकार असे दोन महत्त्वाच्या बाजू आहे. भारतातील लोकशाहीमध्ये लोकप्रतिनिधीनी आणि शासनाने नियुक्त केलेले अधिकारी यांच्या समन्वयातून आणि सहकार्यातून देशाचा व राज्याचा कारभार चालत असतो. या सर्वांनी एकात्मिक दुष्टिकोन समजून कार्य करण्यासाठी समन्वय साधला पाहिजे आणि कार्यामध्ये एकसूत्रता ठेऊन या जागतिक महावारीवर मात करण्याची अत्यंत आवश्यकता आहे.

देशातील कोरोनाचे संकट कधी नियंत्रणात येणार किंवा नष्ट होणार यांचा योग्य अंदाज सध्यातरी घेता येत नाही. कोरोना विषाणु बाबत खात्रीपूर्वक लस आणि औषधपचार नसल्यामुळे नियंत्रणात येणे शक्य नाही. तरी डॉक्टर्स आणि त्यांची टिम शर्तीचे प्रयत्न करुन रुग्णांना सेवा देण्याचे काम करीत आहे. वैज्ञानिक, तज्ज्ञ कोरोना विषाणूसंबंधी लस शोधण्यासाठी दिवस रात्र प्रयोगशाळेत प्रयत्न करीत आहे. सध्यातरी कोरोना विषाणू ला प्रतिबंधात्मक उपाय योजनेच्या शिवाय कोणताही पर्याय नसल्यामुळे प्रशासनाची जास्त प्रमाणात जबाबदारी वाढलेली आहे. प्रशासनाच्या समोर सामान्य जनतेपर्यंत प्रतिबंधात्मक उपाययोजना, आरोग्यविषयक जनजागृती आणि नियमांची अंमलबजावणी हाच रामबाण उपाय दिसून येत आहे.

**जागतिक कोरोना विषाणु महामारीची आकडेवारी**

| दिनांक | कोरोनाची जागतिक आकडेवारी | | कोरोनाची भारतातील आकडेवारी | | कोरोनाची महाराष्ट्रातील आकडेवारी | |
|---|---|---|---|---|---|---|
| | कोरोना संक्रमित रुग्ण | कोरोना मुळे मृत्युची संख्या | कोरोना संक्रमित रुग्ण | कोरोना मुळे मृत्युची संख्या | कोरोना संक्रमित रुग्ण | कोरोना मुळे मृत्युची संख्या |
| २०/४/२० | २४०६२९४ | १६५०४९ | १६११६ | ५१९ | ४२०० | २२३ |
| २५/४/२० | २८२७९८१ | १९७०८२ | २३४५२ | ७२३ | ६८१७ | ३०१ |
| ३०/४/२० | ३२०५७२६ | २२७२९० | ३१७८७ | १००८ | ९९१५ | ४३२ |
| ५/५/२० | ३६४२२३६ | २५२२४० | ४२८३६ | १३८९ | १४५४१ | ५८३ |
| १०/५/२० | ४१००७२६ | २८०४३१ | ५९६६२ | १९८१ | २०२२८ | ७७९ |
| १५/५/२० | ४५२४८५६ | ३०३३४५ | ७८००३ | २५४९ | २७५२४ | १०१९ |
| २०/५/२० | ४९८५९८२ | ३२४८९० | १०११३९ | ३१६३ | ३७१३६ | १३०२ |
| (स्त्रोत: कोरोना विषाणूची आकडेवारी न्युज मधून घेण्यात आलेली आहे) | | | | | | |

जागतिक स्तरावरुन कोरोनाची आकडेवारी लक्षात घेता, अमेरिका, स्पेन, इटली, फ्रान्स, जर्मनी या देशाच्या तुलनेत कोरोना महामारी चे प्रमाण भारतात कमी आहे. परंतु अमेरिका, स्पेन, इटली, फ्रान्स, जर्मनी या देशासारखी आपल्याकडे अद्ययावत वैद्यकिय सोयी सुविधा नाही त्यामुळे प्रतिबंधनात्मक उपाययोजना हेच कोरोनाचा प्रसार थांबविण्यासाठी महत्त्वाचे पाऊल आहे. सरकारने कोरोना प्रसार थांबविण्यासाठी आकस्मिकरित्या संपुर्ण देशामध्ये लॉकडाऊन घोषित केले. त्यामुळे कोरोनाचा प्रसार थांबविण्यासाठी काही प्रमाणात शासन आणि प्रशासन यशस्वी झाले. परंतु कोरोनाचा लॉकडाऊन वाढविण्याची आवश्यकता पडल्यामुळे सामान्य लोकांमध्ये मोठया प्रमाणात अस्वस्थता निर्माण झाली. त्यांचा असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांवर जास्त परिणाम झालेला दिसून येतो.

**शोध निबंधाचे उद्देश:—** १. जागतिक कोरोना विषाणू महामारीच्या परिस्थितीचे विश्लेषण करणे. २. भारतातील कामगारांवर कोरोना विषाणू महामारीचा झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे. ३. भारतातील कोरोना विषाणू महामारी मध्ये कामगारांसाठी केलेल्या उपाययोजनाचा अभ्यास करणे

**अध्ययन पद्धती:—** प्रस्तुत शोधनिबंधाच्या अध्ययनसाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आलेला आहे. यामध्ये मासिके, वृत्तपत्रातील लेख आणि इंटरनेटवरील माहिती यांचा उपयोग प्रस्तुत शोध निबंधासाठी करण्यात आलेला आहे.

देशाचा विकासामध्ये श्रमिकांच्या श्रमाला अन्यसाधारण महत्त्व आहे. श्रमिकांचे विकासामधील योगदान फार मोलाचे आहे. उद्योगधंदाच्या स्पर्धेत कामगारांच्या श्रमाची इज्जत न करता त्यांची हेटाळणीच करण्यात आलेली आहे. कोरोना विषाणू महामारीच्या फैलावामुळे संपूर्ण जगभर धुमाकूळ घातलेला आहे. त्यामुळे जगभरातल्या देशांची अर्थव्यवस्था विस्कळीत झालेली आहे. बुद्धीवंत व वैज्ञानिक लोकांनी ओढवून आणलेले हे संकट दिवसेंदिवस गंभीर स्वरुप धारण करीत आहे. जगातील वर्चस्वाच्या स्पर्धेतून, सुपरपॉवर होण्याच्या आकांक्षाने आणि एकमेकांना मागे आणण्याच्या दृष्टिकोनातून जैविक युद्धाची सुरुवात झाल्याचे दिसून येते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी अगदी उघडपणे या कोरोना व्हायरस ला 'चिनी व्हायरस' म्हटलेले आहे.

संपूर्ण जगावर ओढावलेली कोरोना विषाणूची आपत्ती तिसऱ्या महायुद्धासारखी भीषण आहे. जगातील बहुतांश देश आपापल्या परीने या संकटाचा सामना करीत आहेत. या आजाराचा जनक असलेल्या चीनमध्ये सुमारे तीन महिने लॉकडाऊन होते. चीनमधील ज्या वुहान शहरातून या विषाणूचा प्रादुर्भाव झाला ते महानगर तब्बल १०७ दिवसांनी पूर्वपदावर आलेत. चीनमध्ये कोरोनामुळे चार हजार लोकांचा मृत्यु झाल्याचे सांगितल्या जाते. कोरोनाचा प्रभाव आज सर्वात जास्त अमेरिका, स्पेन, इटली, फ्रान्स, जर्मनी यादेशामध्ये झालेला आहे.

जगामधील ८० टक्के लोक कामगारांच्या श्रेणीमध्ये मोडतात. भारतामध्ये १३५ कोटीच्या लोकसंख्येमध्ये ८० टक्के लोक असंघटित क्षेत्रात काम करतात. यामध्ये अनेक क्षेत्रातील कामगारांचा समावेश होतो. कोरोनाच्या महामारीमुळे शेती क्षेत्रातील कामगार, कारखान्यातील कामगार, इतर क्षेत्रातील कामगाराची परिस्थिती अत्यंत वाईट झालेली आहे. कोरोनाच्या फैलावामुळे आकस्मीकपणे देशामध्ये लॉकडाऊनचा निर्णय घ्यावा लागला. या लॉकडाऊनमुळे लहान—मोठे उद्योग बंद होऊन असंघटित क्षेत्रातील काम करणाऱ्या कामगारांचा रोजगार हिरावून घेतला. लॉकडाऊनमुळे रोजगार तर गेला परंतु लॉकडाऊन टप्प्याटप्प्याने वाढत गेल्यामुळे कामगारांचा रोजगारासंदर्भात आशा मावळल्यात. त्यामुळे कामगारांच्या मनात अनेक प्रश्न स्वत:प्रती आणि कुटुंबाप्रती निर्माण झाल्यात. आपल्या समस्या गावात जाऊन सोडवून शकतो या आशेने मजुर गावाकडे जाण्याची हलचल करु लागला. कामगारांनी लॉकडाऊनच्या दुसऱ्या टप्प्याच्या शेवटी गावाकडे जाण्याची मोहिम सुरु केली. परंतु शासनानी त्यांच्याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही. लॉकडाऊनच्या तिसऱ्या टप्प्यात कामगारांची स्वगावी जाण्याची मोहिम तीव्र झाली. अनेक मजुर लहान मुलांना पाठीवर घेऊन, खाण्यापिण्याचे साहित्य घेऊन आणि कुटुंबासोबत पायदळ स्वगावाच्या दिशेने निघाले. या सर्व विदारक परिस्थितीमध्ये शेकडो कामगारांचे बळी गेले. शासनानी उशिरा श्रमिक ट्रेन सुरु केल्यात पण त्याही कामगारांच्या संख्येपुढे कमी पडल्यात. महाराष्ट्र सरकारने परप्रांतीय मजुरांना त्यांच्या राज्याच्या सिमेपर्यत बसने पोहचविण्याची व्यवस्था केली. अनेक कामगार मिळेल त्या साधनानी गावाला निघालीत. पण कळत न कळत अनेक कामगारांचा अपघातामध्ये बळी गेला.

देशात जवळपास १२ ते १४ कोटी कुशल आणि अर्धकुशल मजुर वर्ग आहे. मजुर वर्ग योग्य मोबदला मिळण्याच्या आशेने आणि कुटुंबाचा चांगल्या प्रकारे उदरनिर्वाह करण्याच्या हेतुने आपल्या राज्यातून परप्रांतात जात असतात. या स्थलांतरित मजुरापैकी सुमारे ४ ते ४.५ कोटी बांधकाम आणि निर्माण कार्यात काम करित आहे. सुमारे २ ते २.५ कोटी घरगुती क्षेत्रातील कामगार आहे. तर १ ते १.५ कोटी मजुर वस्त्रोद्योगात क्षेत्रात काम करित आहे. आणि १ ते १.५ कोटी मजुर वीट भट्टीत काम करित असून उर्वरित कामगार खाणी, परिवहन, ठोक बाजार व शेतीच्या इ. क्षेत्रात काम करित आहे. १९७९ मध्ये आंतरराष्ट्रिय स्थलांतरित श्रमिक कायदा तयार करण्यात आला. परंतु या कायदा अंमलबजावणी प्रभावी होत नसल्यामुळे कामगारांच्या प्रश्न व समस्या सोडविल्या जाऊ शकत नाही. पूर्वी बिहार आणि उत्तर प्रदेश राज्यातील मजुर मोठया प्रमाणात परप्रांतात जाऊ काम करित होता. सध्यातर मध्यप्रदेश, छत्तीसगड, झारखंड, ओडिसा, राजस्थान आणि ईशान्य राज्यातील मजूर मोठया प्रमाणात रोजगारासाठी स्थंलातर होत आहे. महाराष्ट्रात मोठया प्रमाणात औद्यागिक वसाहती असल्यामुळे इतर राज्याच्या तुलनेत कामगारांची संख्या जास्त आहे. तसेच मुंबई या शहरातून सरकारला सर्वात जास्त महसूल मिळत असून लोकांना रोजगार सुद्धा मिळत आहे. महाराष्ट्रात मुंबई, इचलकरंजी, पुणे, कोल्हापूर, नाशिक, औरंगाबाद आणि नागपूर येथील औद्योगिक वसाहतीमध्ये उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश, ओडिशा आणि पश्चिम बंगाल या विविध राज्यातील कामगार मोठया प्रमाणात काम करतात. देशातील सर्व राज्यामधून कोरोना विषाणूच्या महामारीमुळे असंघटित क्षेत्रातील

कष्टकरी मजूर वर्ग शहरे सोडून कुटुंबाच्या ओढीने धोकादायक निर्णय घेऊन गावांकडे रस्त्यांनी पायी चालत आहे. कामगार आपल्या कुटुंबासह हजारो किलोमिटर प्रवास करण्याचा जिद्दीने निघालेला आहे. तसेच काही कामगार स्वत: नवीन सायकल घेऊन गावाच्या दिशेने निघालेले होते. हे सर्व परप्रांतीय कामगार अनुसूचित जाती, मागासवर्गीय, ओबीसी, आदिवासी, अल्पसंख्याक भटक्या जाती जमातीतील आहेत. लोकांना त्यांच्या गावात रोजगार मिळत नसल्यामुळे शहराकडे येतात. हा कामगार वर्ग रोजगार मिळेल त्या कारखाण्यात काम करित असतात. कामावर नियुक्त होण्यापूर्वी कोणत्याही शर्ती व अटि लिहून दिलेल्या नसतात. कामगारांना मिळणाऱ्या वेतनाची निश्चितपणे हमी नसते व कायदेशिर दृष्टया नोकरीची हमी नसते. कामगारांना दिल्या जाणाऱ्या निवाराची व्यवस्था तर अतिशय दयनिय आहे. त्यांच्यासाठी कामाच्या ठिकाणी झोपडयाबांधून त्यांच्या राहण्याची व्यवस्था केलेली असते. पण या ठिकाणी कोणत्याही मुलभूत प्रकारच्या सोयी व सुविधा, स्वच्छता आणि आरोग्याच्या सुविधा नसतात. अशाही परिस्थितीत कामगार वर्ग काम राहतात आणि जीवनाचा उदरनिर्वाह करीत असतात. कोरोना सारख्या महामारीने मजुर वर्गाचे जीवन उद्ध्वस्त करुन त्यांना रस्त्यावर आणून सोडलेले आहे. रोजगार गेल्यामुळे 'इकडे आड आणि तिकडे विहिर' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे त्यांच्यासमोर जीवन मरणाचा प्रसंग निर्माण झाला.

कोरोना महामारीमुळे देशातील असंघटित आणि अस्थायी कामगारांची परिस्थिती आणि वास्तविकता देशातील राज्यकर्त्यापुढे आणि प्रशासनापुढे आलेली आहे. अशा परिस्थितीतून बोध घेऊन कारखानदार मालकाच्या हिताच्या कायद्यासोबतच प्रत्येक मजुर वर्गाला अशा परिस्थितीमध्ये कारखानदारांकडून सुरक्षा, संरक्षण आणि मदत मिळाली पाहिजे अशा स्वरुपाच्या कायद्यांची गरज आज भासत आहे. कोरोना महामारी मध्ये अनेक कारखानदारांनी मजुरांना बेवारस सोडलेले आहे. मजुरांचा त्यांचा कुटुंबाचा विचार न करता त्यांना बेरोजगार बनविले आहे. तसेच श्रमिक आयोग तयार करुन देशातील किंवा त्या त्या राज्यातील प्रत्येक क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची शासन दरबारी नोंद होणे अत्यावश्यक आहे. आपल्या देशात प्रत्येक क्षेत्रासाठी कायदे बनविले आहे. पण त्याची अंमलबजावणी कठोरपणे प्रशासनाकडून होत हेच आपले दुर्दैव आहे. त्यामुळे सामान्य माणसाचा विश्वास उडालेला आहे. या कोरोना महामारीमुळे जी समाजाची वास्तविकता समोर आलेली आहे. त्यावर समस्यांवर विचारमंथन करुन रचनात्मक कार्याची निर्मिती करणे आणि प्रभावी धोरणे आखणे आजच्या काळाजी गरज आहे.

कोरोना विषाणूच्या फैलावामुळे करण्यात आलेल्या लॉकडाउनमुळे असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारावर मोठया प्रमाणात परिणाम झालेला आहे. त्याचप्रमाणे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांवर सुद्धा आर्थिक दृष्टया परिणाम झालेला आहे. अशा या परिस्थिती मध्ये उद्योग आणि अर्थव्यवस्थेला संजिवनी देण्यासाठी, असंघटित क्षेत्रातील कामगारांना व ग्रामीण शेतकऱ्याना मदत करण्यासाठी देशा पंतप्रधानानी २० लाख कोटीचे 'आत्मनिर्भर भारत अभियान' अंतर्गत पॅकेज देण्याचे घोषित करण्यात आलेले आहे. या अभियानामुळे ११ कोटी पेक्षा अधिक लोकांना रोजगार मिळणार असल्याचे सांगण्यात आलेले आहे. कोरोना विषाणूचा प्रादूर्भाव व लॉकडाऊनमुळे गोरगरिबाचे आणि मजुर वर्गाचे कामबंद झाले त्यामुळे त्यांचा रोजगार बुडाला आणि देशातील गरीब व मजुर जनता उपाशी राहु नये, त्यांना दोन वेळेचे पुरेशे धान्य मिळावे म्हणून शासनाने प्रधानमंत्री गरीब कल्याण योजनेंतर्गत दर महिन्याला मिळणाऱ्या धान्या व्यतिरिक्त एप्रिल ते जून या ३ महिन्यांकरिता प्रत्येक व्यक्ती ५ किलो गव्हू व तांदूळ देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे कोणत्याही राज्यातील रेशन कार्डधारक इतर कोणत्याही राज्यात असला तरी तेथील रेशन दुकानातून धान्य मिळण्याची अनुमती देण्यात आलेली आहे. रेशन कार्ड नसलेल्या गरिबांना रेशन देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. केद्र सरकारने जुलै महिन्यापर्यंत आठ कोटी स्थलांतरित श्रमिकांच्या रेशनासाठी साडेतीन हजार कोटीची व्यवस्था करण्यात आलेली आहे. ग्रामीण भागातील ३३ लाख मजुरांना नरेगा अंतर्गत रोजगार उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच कामगारांच्या किमान वेतनामध्ये वाढ करण्यात आलेली आहे.

केंद्रीय अर्थमंत्री यांनी प्रवासी मजुरांना पुढील दोन महिन्यासांठी मोफत धान्य पुरवठा दिल्या जाण्याची घोषणा केलेली आहे. तसेच ज्या मजुरांकडे रेशन कार्ड नाही त्यांनाही धान्य मिळणार असल्याचे स्पष्ट केले. देशातील ८ कोटी गरीब प्रवासी मजुरांना प्रति महिना पाच किलो धान्य देऊन मजुरांची समस्या सोडविण्याचा प्रयत्न करण्यात आला. तसेच केंद्र सरकारने स्थानिक प्रशासनाला आदेश देऊन स्थलांतरित मजुरांसाठी निवारा केंद्र उभारुण त्यांच्या जेवणाची, राहण्याची आणि आरोग्य सुविधाची व्यवस्था करण्यात आली आहे.

लॉकडाऊनमुळे देशातील विविध राज्यात थांबविण्यात आलेल्या श्रमिकांसाठी १ ते १४ मे पर्यंत ८०० श्रमिक रेल्वेच्या माध्यमातून १० लाख श्रमिकांना त्यांच्या स्वगावी पोहचविण्यात आलेले आहे. अजुनही श्रमिकांचा गरज लक्षात घेऊन श्रमिक रेल्वेद्वारे त्यांना त्यांच्या गावी निशुल्क पोहचविण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. आंतर राज्यामध्ये महाराष्ट्र सरकारने बस द्वारे मजुरांना त्यांच्या गावी पोहचवून देण्याची जबाबदारी स्वीकारलेली आहे. काही श्रमिकांनी मालवाहू ट्रक–टेम्पोतून बेकायदा प्रवासी वाहतूक सुरु केलेली. गुरा–मेंढरांप्रमाणे माणसे कोंबून कामगारांनी प्रवास सुरु केलेला आहे. तर काही कामगांरानी वाहतूक व्यवस्था उपलब्ध नसल्याने आणि आर्थिक टंचाईमुळे श्रमिकांनी तांडे रस्ते, महामार्ग, घाटमार्गाकडून प्रवास करित आहे. कामगार एका बाजूने जीव वाचवण्यासाठी प्रयत्न करीत असून दुसऱ्या बाजून जीव धोक्यात घालून हजारो मैल चालतच प्रवास करित आहेत. काही कामगारांना त्यांच्या स्वगावी पोहचवून देण्याची जबाबदारी जरी शासनाने स्वीकारली तरी जवळपास ११६ स्थलांतरित कामगारांचा रस्ते आणि रेल्वे अपघातात मृत्यु होऊन १५० पेक्षा जास्त कामगार अपघातामध्ये जखमी झालेले आहे. राज्यात सध्या २८८४ निवारागृह असुन त्याठिकाणी ३,७१,३१० परप्रांतीय कामगार वास्तवय करित आहे. उन्हाळाचे दिवस असल्यामुळे अनेक कामगाराना उष्माघाताचा परिणाम होऊन प्राण गमवावे लागले आहे. सरकारने कोरोना फैलाव होऊन नये म्हणून प्रत्येक प्रवासी मजुरांची वैद्यकिय तपासणी करुन आणि इतर बाबींचा पूर्तता करुन त्यांच्या प्रवासाची व्यवस्था करण्यात येत असुन मजुरांचा स्थलांतराचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केल्या जात आहे.

**संदर्भ:**
१. लोकाशही वार्ता दैनिक वृत्तपत्र
२. लोकमत दैनिक वृत्तपत्र
३. महाराष्ट्र टाईम्स दैनिक वृत्तपत्र
४. तरुण भारत दैनिक वृत्तपत्र

Volume – 09, Issue – 01, January - June, 2020/ ISSN 2278-3199

# ग्रामीण भागाची विपन्नावस्था आणि त्यातून निर्माण झालेले प्रश्न

**प्रा. आर. जी. कुमावत,** समाजशास्त्र विभाग प्रमुख, बहिर्जी स्मारक महाविद्यालय, वसमत

**प्रस्तावना:—** 'खेडे' भारतीय संस्कृतीचा आधारभूत घटक आहेत. हजारो वर्षांपासून चालत आलेल्या कृषी व्यवसायाने भारतीय संस्कृतीला समृद्ध केले. योग विद्या, आयुर्वेद, विविध प्रांतातील लोक गीते, लोकसंगीत, लोककला, लोकनृत्य इत्यादी घटक भारतीय ग्रामीण संस्कृतीचे अविभाज्य घटक आहेत. आज याच संस्कृतीमुळे भारताला जगात आदराचे स्थान आहे. त्यामुळेच जगातील सर्वच विकसित देश भारतीय संस्कृतीचे अनुकरण करत त्यांच्या संस्कृतीत बदल घडवून आणत आहेत. शेकडो साम्राज्यांनी भारतावर आक्रमणे केली, हजारो वर्ष त्यांनी राज्य केले तरी देखील भारतीय संस्कृती अभेद्य राहिली. स्वातंर्त्योत्तर कालखंडानंतर मात्र भारतीय संस्कृतीत तीव्र परिवर्तने घडून येण्यास सुरुवात झाली. त्याचे कारण म्हणजे हजारो वर्षांपासूनची आपली समृद्ध संस्कृती ज्या ग्रामीण समाजाच्या उदरात विकसित झाली त्या ग्रामीण भागाकडे आपले दुर्लक्ष झाले. स्वातंर्त्योत्तर कालखंडानंतर जेवढे शहरांच्या भरभराटी वर लक्ष दिले गेले तेवढे दुर्दैवाने ग्रामीण विकासाकडे दिले गेले नाही. बी व्ही जोंधळे लिहितात की, शासनाच्या निष्क्रियतेचा पुरावा म्हणजे तिसऱ्या पंचवार्षिक योजनेत शेतीवर एकूण बजेटच्या ३० टक्के खर्च होत असे. चौथ्या पंचवार्षिक योजनेत तो २२ टक्के तर पाचव्या पंचवार्षिक योजनेत तो बारा टक्के इतका खाली आला. देशात ६४ टक्के जनता शेती व्यवसायावर अवलंबून आहे आणि शेती क्षेत्रांवर अवघा २.५ टक्के खर्च होतो, अशी जर आकडेवारी सांगत असेल, तर शेतकरी मग विपन्नावस्थेत सापडला, तर नवल ते कोणते? या पार्श्वभूमीवर शेती आणि शेतकऱ्यांच्या समस्येचा म्हणूनच मूलभूत स्वरूपात विचार होणे गरजेचे आहे.[१]

जोंधळे यांनी येणाऱ्या प्रत्येक पंचवार्षिक योजनेत शासनाचा शेतीसाठी असणारा खर्च कसा कमी कमी होत गेला हे निदर्शनास आणून दिले. शासनाचे उदासीनतेचे धोरण आणि इतरही अनेक कारणे कृषी आणि ग्रामीण समाजाच्या विपन्नावस्थेला कारणीभूत ठरली. पुढे याचा परिणाम असा दिसून आला की, खेड्यातील लोकांनी मोलमजुरीसाठी शहराकडे स्थलांतर सुरू केले, ज्यांना शेती सोडून जाणे शक्य नव्हते असे शेतकरी कर्जबाजारी झाले, कर्जबाजारीपणामुळे शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्यास सुरुवात केली. अर्थात ग्रामीण विपन्नावस्थेतुन निर्माण झालेले हे प्रश्न आहेत.

प्रस्तुत संशोधनातून भारतातील ग्रामीण भागात निर्माण झालेल्या दुर्दशेचे चित्र प्रस्तुत करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या सोबतच या दुर्दशेतुन शेती, शेतकरी आणि एकूणच ग्रामीण क्षेत्रात नव्याने निर्माण झालेल्या प्रश्नांवर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**संशोधन पद्धती:—** प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनासाठी द्वितीय साधन सामुग्री चा आधार घेतला आहे. यामध्ये मासिके, वृत्तपत्र आणि विशेषत: इंटरनेटवरील साहित्याचा आधार घेण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधनात संख्यात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला असल्यामुळे विशिष्ट घटकाच्या स्पष्टीकरणासाठी आकडेवारीवर भर देण्यात आला आहे.

**संशोधनाचे उद्देश :—** आजच्या ग्रामीण समाजाच्या विपन्नावस्थेचे वास्तव चित्र स्पष्ट करून या विपन्नावस्थेतुन ग्रामीण समाजात जे नवे प्रश्न उभे राहिले आहेत त्यावर प्रकाश टाकणे हा मुख्य हेतू या संशोधनाचा असल्यामुळे या संशोधनाचे पुढीलप्रमाणे दोन मुख्य उद्देश ठरविण्यात आले आहेत. १. भारतीय ग्रामीण समाजाच्या सद्यस्थितीतील विपन्नावस्थेचे विश्लेषण करणे. २. या विपन्नावस्थेतून निर्माण झालेल्या प्रश्नावर प्रकाश टाकणे.

**खेडे आधुनिकीकरणापासून दूर:—** एका बाजूने शहरांना आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत समाविष्ट केले जात आहे, तेच दुसऱ्या बाजूने असे दिसते की देशातील खेडे आधुनिकीकरण यापासून कोसो दूर आहेत. शहरे स्मार्ट बनत आहेत, परंतु खेड्यात साधी इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही. इंटरनेट उपलब्ध असले तरी तिचा वापर करणे खेड्यातील लोकांना परवडत नाही. 'केंद्र सरकारने स्मार्ट सिटीची अतिशय महत्त्वाकांक्षी योजना आखली आहे. ही योजना बदलत्या विश्वाचा वेध घेऊन आखली गेली आहे. शहरांचे नियोजन अतिशय योग्यरीत्या आणि बदलती जीवनशैली लक्षात घेऊन ही योजना राबविण्यात येणार आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या पहिल्या १०० शहरांच्या यादीत पुणे आणि सोलापूर यांचा समावेश झाला आहे'[२] शहरांचा चेहरा स्मार्ट करणे मुळीच वाईट नाही. उलट अधिक वेगाने स्मार्ट शहरांची संख्या वाढली पाहिजे. परंतु यासोबतच देशाच्या ग्रामीण भागांनाही माहिती तंत्रज्ञानाचा आधार देऊन आधुनिकीकरणाच्या प्रक्रियेत समाविष्ट केले पाहिजे. इंटरनेट, माहिती तंत्रज्ञान, संगणक ही आजची आधुनिकीकरणाची साधने आहेत. कारण याच साधनांच्या सहाय्याने माहितीचा जलद प्रवास होण्यास मदत मिळते. शहरी भागात माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांचा जलद प्रवास झाला, परंतु ग्रामीण भागातील प्रसार अतिशय मंद आहे. What does that mean for India? There are 731 districts in India; aRound 300 of them are officially recognized as a backward district of the country. This means the development indices here are poorer than the rest of the country. There are over 566 million internet users in India but only 200 million are From rural India, which accounts for almost 67% of the country's total population. Given the vast demographic divide, the most backward communities, some which are not even recognized, still face information poverty in this digital shift.'[3]

लेखकांनी स्पष्ट केले की, भारतात इंटरनेट तंत्रज्ञान वापरकर्त्यांची संख्या ५६६ दशलक्ष असून त्यापैकी २०० दशलक्ष खेड्यातील लोकांच्या कडून हे तंत्रज्ञान वापरले जाते. अर्थात यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ढोबळमानाने ६५ टक्के जनता ग्रामीण भागात निवास करते असे गृहीत धरले तर या ६५ टक्के लोकांपैकी २०० दशलक्ष लोक इंटरनेट तंत्रज्ञान किंवा माहिती तंत्रज्ञानाचा वापर करतात. हेच प्रमाण शहरी भागासाठी म्हणजेच ३५ टक्के लोकांपैकी ३६६ दशलक्ष लोक या तंत्रज्ञानाचा वापर करतात. यावरून ग्रामीण भागात इंटरनेट तंत्रज्ञान वापरकर्त्यांची संख्या खूपच कमी आहे. हे तंत्रज्ञान संपूर्ण ग्रामीण भागात आणखी पोहोचले नाही.

याच संदर्भाचा विचार करून सोप्या भाषेत सांगावयाचे झाल्यास शहरी भागातील ८१ टक्के पेक्षा अधिक लोक इंटरनेट तंत्रज्ञान वापरतात तर ग्रामीण भागातील केवळ ३१ टक्के पेक्षा काहीसे अधिक लोक इंटरनेट तंत्रज्ञान वापरतात. याचाच अर्थ असा की आजही जवळपास ६९ टक्के ग्रामीण भागातील लोकांकडे इंटरनेट तंत्रज्ञान उपलब्ध नाही. झपाट्याने बदलणारे जागतिक संदर्भ केवळ माहितीचा अभाव असल्यामुळे ग्रामीण भागात पोहोचत नाहीत. अशा परिस्थितीत ग्रामीण भागातील व्यवसायांचे, कृषी क्षेत्राचे, कृषिपूरक

उद्योगधंद्यांचे आधुनिकीकरण घडून येणे नजीकच्या काळात तरी शक्य दिसत नाही.

**जागतिकीकरणाचे आरिष्टः—** जागतिकीकरणामुळे शहरे उद्योगधंदे झळाळले. शहरी जीवनशैली आमूलाग्र बदलली. मध्यमवर्गाचा उदय होऊन त्यांचे सबलीकरण घडून आले, शहरी उद्योग धंदे वाढले, शहरात रोजगार वाढला, पायाभूत सुविधाही वाढल्या. असे असले तरी जागतिकीकरण्याच्या धोरणाचा ग्रामीण भागाला फायदा होण्याऐवजी ग्रामीण आणि कृषी क्षेत्राचे त्यामुळे नुकसानच झाले. जागतिकीकरणामुळे ग्रामीण आणि कृषी क्षेत्राचे कशाप्रकारे नुकसान झाले याचे काही उदाहरणे आपण पाहू शकतो.

**१. आयात शुल्कात घटः—** जागतिकीकरणाने कृषी क्षेत्रावर संकटाची कु—हाड चालविली. जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारलेल्या आपल्या शासनाने सुरुवातीपासूनच शहरी उद्योगधंद्यांना बळकटी देत कृषी क्षेत्राकडे कसे दुर्लक्ष केले आणि त्यातून कृषी क्षेत्राची कशी अवनती निर्माण झाली याबाबत एका लेखात माहिती देण्यात आली ती अशी, 'The Structural Adjustment Program (S A P) of liberalizing the Indian economy was undertaken in 1991 as per the directives of International Monetary Fund and World Trade Organization. Major reforms were intRoduced in the real and financial sectors of the economy with a view to increase its efficiency and pRofitability. Trade was also liberalized; the import and custom duty of many pRoducts where drastically reduced or abolished completely. Removal of all restrictions on imports lead to a steep fall in their domestic prices rendering them unpRofitable for production. The government started disinvesting in agriculture and the industrial sector allowing the private sector to take over. The government reduced different types of subsidies to agriculture which increased the cost of cultivation. This lead to the agrarian crisis as it had an adverse impact on the agricultural sector'[4]

स्पष्ट आहे की, जागतिकीकरणाचे धोरण स्वीकारल्याबरोबर शासनाने कृषी क्षेत्रातील गुंतवणुक थांबविली. सर्व अनुदाने बंद करण्याचा निर्णय घेतला. कृषी क्षेत्रात खाजगीकरणाचाही घाट घातला. याचा एकूण परिणाम म्हणजे कृषी क्षेत्राचा विकास मंदावला. जागतिकीकरणाच्या पुढील एक ते दीड दशकातच लाखो शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग स्वीकारण्यास सुरुवात केली. वरील उताऱ्यात आढळून येते की जागतिकीकरणाच्या धोरणामुळे बाहेरील देशातून येणाऱ्या कृषी उत्पादनासाठी शासनाने सर्व बंधने शिथिल केली आहेत. त्यामुळे स्थानिक बाजारात उत्पादनाचे भाव तीव्रगतीने कोसळण्यास सुरुवात झाली. अशा स्थितीत भारतातील शेतकऱ्यांना अल्प किंमतीत आपले कृषी उत्पादने विकावे लागले आणि लागत आहेत. ज्यातून लागवडीचा खर्चही परत मिळणे अवघड होते.

**२. ग्रामीण भागासाठीच्या सरकारी खर्चात कपातः—** शासनाने साधारणतः १९९०च्या दशकानंतर ग्रामीण भागाच्या विकासासाठी केल्या जाणाऱ्या सरकारी खर्चात कपात करण्यास सुरुवात केली. विकसित देशांचा विचार केल्यास या देशांनी विविध मार्गाचा अवलंब करत तेथील शेतकऱ्यांना प्रचंड अनुदाने देऊन कृषी क्षेत्राचा विकास घडवून आणला. विकसित देश कृषी विकासासाठी नानाविध अर्थसहाय्य करून आपल्या देशात कृषी क्षेत्रात आधुनिक संशोधने घडवून आणत आहेत. या देशांनी आर्थिक पाठबळ पुरवून विज्ञान—तंत्रज्ञान, अत्याधुनिक अवजारे, औषधे, खते, बी बियाणे इत्यादी आधुनिक तंत्रज्ञानाची निर्मिती करून कृषी क्षेत्राला अद्यावत केले आहे. इजरायल सारखे देश याचे उत्तम उदाहरण आहे. परंतु भारतात कृषी विकासासाठी अधिकचे आर्थिक पाठबळ पुरविण्याऐवजी आर्थिक निर्गुंतवणूकीचे धोरण हाती घेतल्याचे निदर्शनास येते. दास आणि अल्बर्ट ख्रिस्तोफर लिहितात की, 'The expenditure of the government in rural development, including agriculture, irrigation, flood contRol, village industry, energy and transport, declined From an average of 14.5 percent in 1986-1990 to 6% in 1995-2000. When the economic reforms started, the annual rate of growth of irrigated land was 2.6 to percent; later it got reduced to 0.5 per cent in the post reform period.'[5]

दास आणि अल्बर्ट यांनी अतिशय महत्त्वाच्या बाजूवर लक्ष वेधले. शासनाकडून ग्रामीण विकासासाठी केल्या जाणाऱ्या खर्चाच्या रकमेत साधारणतः ९०च्या दशकापासून सातत्याने कपात होणे याचाच अर्थ ग्रामीण भागाच्या विकासाकडे दुर्लक्ष झाले असा होतो. ९० च्या दशकापर्यंत सरासरी हा खर्च १४.५ टक्के होता त्यात घट होऊन २००० सालापर्यंत हा खर्च ६ टक्क्यांपर्यंत खाली आला. ग्रामीण भागात भारताच्या एकूण लोकसंख्येचा ६५ टक्के भाग निवास करतो. या लोकसंख्येच्या सर्वांगीण विकासाकरिता शासकीय पातळीवर जागतिकीकरणाच्या धोरणाच्या कालखंडापासून सातत्याने दुर्लक्ष होत गेल्याचे लेखकांनी लक्षात आणून दिले.

याच दृष्टिकोनातून आणखी एक अभ्यास प्रवीण झा आणि नीलयला अचार्य यांनी केला. केंद्र आणि राज्य सरकारांच्या आपल्या वित्तीय अंदाजपत्रकातील ग्रामीण अर्थकारणातील वाटा किंवा खर्च कशाप्रकारे उत्तरोत्तर कमी होत गेला याची आकडेवारी त्यांनी या अभ्यासातून प्रस्तुत केली. ते लिहितात, 'The relevant data show that the shares of budgetary expenditure on RE total combined budgetary expenditure were 11.4 and 12.0 per cent, respectively, in 1950-51 and 1960-61. There was then a noticeable deep in the mid-to- late 1960s (9.9 per cent, annual average for 1966 to 1969), before this share rose during the 1970s and 1980s. From the mid-1970s, the share of budgetary expenditure on RE moved upward, to reach 10.9 per cent in the 1980s (annual average for 1980-81 to 1989-90). Thereafter it declined continuously, until it reached 9.7 per cent in the last decade (annual average for 2000-01 to 2009-10).[6]

**कमकुवत पायाभूत सुविधाः—** विज, पाणी, रस्ते इत्यादी महत्त्वपूर्ण घटक पायाभूत सुविधांमध्ये समाविष्ट होतात. भारतात शहरी भागांच्या तुलनेत ग्रामीण भागात पायाभूत सुविधा कमकुवत आहेत. पाण्याचा प्रश्न सर्वाधिक गंभीर आहे. शेतीसाठी मुबलक पाण्याची गरज आहे. एकविसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात आम्ही प्रवेश केला असला तरी बहुतांश शेतकरी मान्सून वर आधारित शेती करतात. 'The Economic Survey 2017-18 estimates that farmers without irrigation stand to lose nearly 14% of their income because of rainfall shocks. And even among farmers with irrigation, 62% rely on groundwater as the source of irrigation, which exposes them to the vagaries of the monsoon. Groundwater, which is the result of rain seeping into the ground, also forms the backbone of water supply in rural areas. In villages, 85% of water needs are supplied through groundwater, according to the World Bank.'[7]

जागतिक बँकेच्या विचारांची दखल घेता स्पष्ट होते की, भारतातील शेती ही निसर्गाच्या लहरीवर अवलंबून आहे. शेतीच्या सिंचनाचा प्रमुख स्त्रोत हा केवळ भूजल आहे. सहाजिकच पाण्याची

साठवणूक क्षमता आपल्याकडे कमी आहे. धरणे, कालवे, तळी यांची अपुरी संख्या भारतातील शेतीला पारंपारिक बनविते.

आज भारतातील जवळपास सर्व खेड्यांमध्ये वीज पोहोचली आहे असा दावा केला जातो. निश्चितच ही अभिमानास्पद बाब आहे. परंतु असे असले तरी साधारणत: २०१५ ते २०१८ पर्यंत अंदाजे १५ ते १८ हजार गावांमध्ये वीज पोहोचली नव्हती. ही वस्तुस्थिती आहे. 'Homes without electricity are spread across major provinces of the country, such as Assam, Bihar, Jharkhand, Odisha, Madhya Pradesh and Rajasthan, each having nearly 6 million and unconnected households." Uttar Pradesh, the giant North Indian state, accounts for 14.6 million households without electricity access", says Debajit Palit, associate director at the Energy and Resources Institute.'[9]

forbes.com ने जी वस्तुस्थिती मांडली त्याचा विचार केला असता भारतातील ईशान्य भागातील काही राज्य तसेच राजस्थान बिहार उत्तरप्रदेश मध्यप्रदेश यासारख्या इतरही काही राज्यातील कित्येक कुटुंबे विजेच्या लाभापासून वंचित होती हे समजते. विजेचा आणि रोजगार, शिक्षण, तंत्रज्ञानाचा, उद्योगधंद्यांचा जवळचा संबंध आहे. त्यामुळे विजेच्या सुविधा अभावी या राज्यांना आणि येथील कुटुंबांना विकासापासून, प्रगत प्रवाहापासून किती दूर फेकले हा स्वतंत्ररीत्या संशोधनाचा विषय ठरू शकतो.

वरील मुद्यांचा विचार केल्यास स्वातंर्त्योत्तर कालखंडापासून ग्रामीण भागाच्या भरीव विकासाकडे कसे दुर्लक्ष झाले आणि या दुर्लक्षिततेच्या धोरणामुळे ग्रामीण भाग विकासापासून कसा वंचित राहिला याचे दर्शन घडते. प्रश्न इथेच संपत नाही भारतीय समाजाच्या एकूण लोकसंख्येच्या मोठ्या भागाला जी ग्रामीण भागात निवास करते अशा विशाल लोकसंख्येच्या विकासाकडे दुर्लक्ष झाल्यामुळे अनेक मोठे प्रश्न निर्माण झाल्याचे प्रत्ययास येते. यापैकी काही प्रश्नांना खालील प्रमाणे समजून घेता येईल.

**१. कर्जबाजारीपणा** :— ग्रामीण आणि कृषी विकासाकडे सातत्याने दुर्लक्ष झाल्यामुळे भारतातील भारतातील शेतकरी कर्जबाजारी झाले. विशेषत: मागास प्रदेशातील मागास विभागातील शेतकऱ्यांच्या कर्जाचा विळखा नजीकच्या काळात तरी सुटणे शक्य दिसत नाही. याबाबत श्रीनिवास खांदेवाले लिहितात की, विदर्भ—मराठवाड्यात मात्र परिस्थिती वेगळी आहे. प्रामुख्याने कोरडवाहू शेतीमध्ये उत्पन्नाची शाश्वती नसल्यामुळे सहकारी आणि राष्ट्रीयीकृत बँका कर्ज देताना हात आखडता घेतात. त्यामुळे शेतकऱ्यांना खाजगी सावकारांकडून कर्ज घ्यावेच लागते. बरीचशी सावकारी विनापरवाना चालत असल्यामुळे त्यांची एकत्रित आकडेवारी सुद्धा उपलब्ध नसते. त्यांचा प्रश्न गंभीर आहे, हे आर्थिक वातावरणात जाणवते. सावकारी कर्जाचा समावेश ७/१२ उताऱ्यांमध्ये नसतो. त्यामुळे ७/१२ चा उतारा कोरा करा ही मागणी १०० टक्के शेतकऱ्यांना १०० टक्के कर्जमुक्त करणारी नाही.[९]

**२. शेतकऱ्यांच्या आत्महत्या**:— शेती क्षेत्राकडे झालेल्या दुर्लक्षाचा एकूण परिणाम म्हणजे शेतकऱ्यांनी सुरू केलेल्या आत्महत्या होय. या आत्महत्यांचा दर दिवसेंदिवस वाढतच चालला आहे. अलीकडील काळात तर या आत्महत्येचा दर एक लाख लोकसंख्येमागे दहा शेतकरी आत्महत्या करतात असे आकडेवारीवरून दिसून येते. 'The farmers suicide rate in India had ranged between 1.4 and18 per 100000 total population, over a 10 year period through 2005, however the figures in 2017 and 2018 showed an average of more than 10 suicide daily'[10]

**निष्कर्ष**:— १. स्वातंत्र्योत्तर कालखंडात शहरी भागाच्या विकासाकडे लक्ष पुरवीत असताना ग्रामीण विकासाकडे दुर्लक्ष झाले. २. परिणामी ज्या तुलनेत शहरांचे आधुनिकीकरण घडून आले त्या तुलनेत खेडी आधुनिकीकरण यापासून आजही दूर आहेत. ३. तंत्रज्ञानाच्या वापरात ग्रामीण भाग पीछाडीवर आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या वापराबाबत डिजिटल डिव्हाइड आढळते. ४. जागतिकीकरणाच्या धोरणातून शेती आणि शेतकऱ्यांचा फायदा होण्याऐवजी त्यांचे नुकसान झाले. आयात शुल्कात घट झाल्यामुळे शेतकऱ्यांच्या कृषी उत्पादनाचे भाव कोसळले. ५. ग्रामीण भागासाठीचा अर्थ पुरवठा उत्तरोत्तर कमी होत गेला. ६. ग्रामीण आणि कृषी विकासाकडे झालेल्या दुर्लक्षामुळे शेतकरी कर्जबाजारी झाले. त्यांच्या आत्महत्येच्या दरामध्ये घट होण्याऐवजी वाढ झाल्याचे आढळते.

**संदर्भ**:—


१. जोंधळे बी व्ही. २०१८. डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि भारतीय शेतीचे प्रश्न, अक्षर गाथा (त्रैमासिक) जानेवारी—मार्च, अंक ४ था, पृ. क्र. ११३.

२. लोकराज्य, मार्च २०१६, पृष्ठ क्रमांक २६

३. Manzar Osama and Singh Kirti, 'India's Fight Against Digital Divide', <a href='https://difindia.org/indias-fight-against-the-digital-divid/'target'=_blank'style='text_decoration:none;rel ='noopner noreferrer'>India's Fight Against the Digital Divide</a>, accessed on 27 April 2020, at 2: 20 PM)

४. Bhosale S. K. 2015. Effect of Globalization on Agriculture. dspace.vpmthane.org>jspuiPDF FC Sem 2 Effect of Globalization on Agriculture. pdf https://www.google.com/, accessed on 9.5.2020, at 3:00PM)

५. Dhas, Christoffer Albert.2009. Agricultural Crisis in India: The Root Cause and Consequences. https//ideas.repec.org> pra>motapa Web results Agricultural Crisis in India: The Root Cause and Consequences-https://www.google.com/ , accessed on 9.5.2020, at 8.:00 PM)

६. Jha Pravin and Acharya Nilchala, Expenditure on the Rural Economy in India's Budgets since the 1950s: An Assessment, Review of Agrarian Studies, Vol. 1, No. 2, July-December-2011, <https://www.ras.org.in>, accessed on 26.05.2020, at 2:30 PM)

७. Alexander Sneha, Padmanabhan Vishnu, 'The Roots of India's depening rural water crisis.' livemint, 28.07.2019. <https://www.livemint.com)ews/india/>, accessed on 26.05. 2020, at 3:00 PM)

८. D'Cunha Suparna Dutt, Modi Announces '100% Village Electrification' But 31 Million Indian Homes Are Still in The Dark', May 7 2018. <https://www.forbes.com/sites/Suvarna dutt/2018/05/07modi-announces-100-village-electrification-but-31-million-homes-are-still-in-the-dark/,accessed on 26.05. 2020.)

९. खांदेवाले श्रीनिवास. २०१७, भारतीय शेती प्रश्नाचा जागतिक संदर्भ: परिवर्तनाचा वाटसरू, ऑगस्ट, अंक ७ वा, पुणे.

१०. Farmers' Suicides in India-https://en.wikipedia.org/ wiki/ Farmers%27_suicides_in_India, accessed on 27.05.2020.

# कोवीड–१९: जागतिक महामारी

**डॉ. नलिनी आय. बोरकर**, समाजशास्त्र विभाग, कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय, पेट्रोलपंप, जवाहरनगर जि. भंडारा.

**प्रस्तावना**:– कोरोना व्हायरस हा आजारपण पसरविणारा एक विषाणूंचा एक गट आहे. या विषाणूचा प्रसार मानवांमध्ये श्वसन संसर्गाने होतो. हे संसर्ग बऱ्याचदा सौम्य, परंतु संभाव्य प्राणघातक असतात. कोरोना व्हायरसचा प्रतिबंध करणारी लस किंवा रोग झाल्यास घ्यायची अँटीव्हायरल औषधे अजूनतरी उपलब्ध नाहीत. कोरोना विषाणू प्रथम १९६० च्या दशकात सापडले. सर्वात आधी सापडलेल्यांमध्ये कोंबड्यांमध्ये एक संसर्गजन्य ब्रॉन्कायटीस विषाणू आणि सामान्य सर्दी असलेल्या दोन रुग्णांमध्ये (नंतर ह्यूमन कोरोना व्हायरस ओसी २२ ई आणि ह्यूमन कोरोना व्हायरस ओसी named43 असे नाव देण्यात आले) होते. २००३ मध्ये सार्स–सीओव्ही, एचसीओव्ही एनएल २००४ मध्ये एचकेयू १, २०१९ मध्ये मेर्स–सीओव्ही आणि २०१९ मध्ये एसएआरएस–कोव्ही–२ (पूर्वी २०१९–एनसीओव्ही म्हणून ओळखले जाणारे) या कुटुंबातील अन्य सदस्यांची ओळख पटली आहे. यामध्ये गंभीर श्वसनमार्गाचे संक्रमण होते.

**कोरोना व्हायरसचा उगम**:– कोरोना व्हायरस पहिल्यांदा १९३० च्या दशकात सापडले जेव्हा संसर्गजन्य ब्रॉन्कायटीस विषाणूमुळे (आयबीव्ही) पाळीव कोंबड्यांना तीव्र श्वसन संसर्ग झाल्याचे दिसून आले. १९४० च्या दशकात माऊस हेपेटायटीस व्हायरस (एमएचव्ही), आणि ट्रान्समिस्सिबल गॅस्ट्रोएन्टेरिटिस व्हायरस (टीजीईव्ही) मूळे आणखी दोन प्राणी कॉर्नोव्हायरस अलग ठेवण्यात आले होते. १९६० च्या दशकात मानवी कोरोनाव्हायरस सापडले. सर्वात आधी अभ्यास केलेला सामान्य सर्दी असलेल्या मानवी रूग्णांद्वारे होता, ज्याला नंतर मानवी कोरोना व्हायरस २२९ई आणि ह्यूमन कोरोनाव्हायरस ओसी४३ ओसी असे नाव देण्यात आले. माणसांमध्ये सार्स–सीओव्ही, २००३ मध्ये एचसीओव्ही एनएल६३, २००४ मध्ये एचकेयू १, २०१२ मध्ये मेर्स–सीओव्ही आणि २०१९ मध्ये एसएआरएस–कोव्ह–२ यासह इतर मानवी कोरोना व्हायरस ओळखले गेले. डिसेंबर २०१९ मध्ये आढळलेल्या या विषाणूला ढोबळमानाने कोवीड–१९ असे संबोधण्यात येते. कोरोना व्हायरस हे कंद आकाराच्या पृष्ठभागाचा अंदाजानुसार मोठा प्लीओफॉर्मिक गोलाकार कण आहेत. व्हायरस कणांचा व्यास सुमारे १२० नॅनोमिटर आहे. विद्युतपरमाणु सूक्ष्म आलेखमधील विषाणूचा लिफाफा विद्युतपरमाणु दाट कवच असलेली एक वेगळी जोडी दिसून येते.

जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, सार्स–सीओवी या विषाणूची ओळख २००३ मध्ये झाली. २००२ ला चिन मध्ये या रोगाने पहिला मनुष्य संक्रमीत झाला होता. २००२–२००३ मध्ये चीन/हॉगकॉग मध्ये जवळपास ६५० लोकांचा मृत्यू झाला होता. असे मानले जाते की हा रोग मांजरीपासून माणसांना झाला. मर्स–सीओवी या विषाणूच्या संक्रमणाचा पहिला रोगी २०१२ ला सौदी अरेबीया मध्ये सापडला होता. मिडिल इस्ट मध्ये या विषाणूच्या संक्रमणाने ८०० पेक्षा जास्त लोकांना प्राण गमवावे लागले होते. या रोगाची लागण उंटामुळे माणसांना झाली होती. नवीन कोरोना स्ट्रेन (चीनमध्ये–सार्स सारखा व्हायरस) या रोगाचा पहिला पीडीत चीनच्या वुहान मध्ये डिसेंबर २०१९ मध्ये आढळून आला. आणि त्यानंतर पुढील काही महिन्यात अनेक देशांमध्ये या रोगाची लागण झाली. आजपर्यंत हजारो लोकांचा मृत्यू या विषाणूमुळे झाला आहे.

**कोरोना व्हायरसच्या संसर्गाची लक्षणे**:– कोरोनाची सर्वात सामान्य लक्षणे म्हणजे ताप, थकवा आणि कोरडा खोकला. काही रुग्णांना वेदना, अनुनासिक रक्तसंचय, वाहणारे नाक, घसा खवखवणे किंवा अतिसार होऊ शकतो. ही लक्षणे सहसा सौम्य असतात आणि हळूहळू सुरू होतात. काही लोकांना संसर्ग होतो पण त्यांच्यात कोणतीही लक्षणे दिसत नाहीत आणि त्यांना बरे वाटत नाही. बहुतेक लोक (सुमारे ८० टक्के) विशेष उपचार न घेता या आजारातून बरे होतात. कोरोना होणाऱ्या प्रत्येक ६ पैकी १ व्यक्ती गंभीर आजारी पडते आणि तिला श्वास घेण्यास त्रास होतो. वृद्ध लोक आणि उच्च रक्तदाब, हृदयरोग किंवा मधुमेह यासारख्या मूलभूत वैद्यकीय समस्या असलेल्या लोकांना गंभीर आजार होण्याची शक्यता असते. ताप, खोकला आणि श्वास घेण्यात अडचण असलेल्या लोकांनी वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे.

**कोरोना व्हायरस च्या संसर्गाची जागतिक स्थिती**:– २०१९ मध्ये कोरोना व्हायरसचा एक उपप्रकार चीनमधील वूहान शहरात आढळून आला. याला कोव्हिड–१९ असे नाव देण्यात आले. सुरुवातीस वुहान व आसपासच्या प्रदेशात पसरलेला हा विषाणू त्याच्या इतर उपप्रकारांपेक्षा अधिक तीव्रतेचा असून या विषाणूंमूळे व्यक्तींच्या मृत्यूचे प्रमाण मोठे आहे. या विषाणूंमूळे संक्रमित झालेल्या लोकांची संख्या जगभरात आज जवळपास  ६३ लाखाच्या जवळ आहे. जगभरात आजपर्यंत कोरोना वायरस मूळे जवळपास ३.७४ लाखापेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला आहे. तथापी समाधानाची बाब ही आहे की या व्हायरसमूळे संक्रमीत झालेल्या जवळपास २८. ४७ लाख लोक ठीक सुद्धा झालेले आहेत.

कोविड–१९ मूळे अमेरिका सर्वात जास्त प्रभावित झाला आहे. अमेरिकेत कोविड–१९ मुळे बाधीत झालेल्या रूग्णांची संख्या संख्या १८.३७ लाखाच्याही वर गेलेली असून आत्तापर्यंत १०६,१९५ लोकांचा मृत्यू झालेला आहे. ब्राजील, भारत, रूस आणि पेरू यासारख्यां देशांमध्ये सुद्धा या विषाणूंमूळे मृत्यूंची संख्या लक्षणिय आहे.[१] आज दि. २ जून २०२० ला जागतिक आरोग्य संघटनेच्या वेबसाईट नुसार संपूर्ण जगात कोरोनाने संक्रमित झालेले एकूण ६१ लाख ४० हजार ९३४ रूग्ण असून आत्तापर्यंत ३ लाख ७३ हजार ५४८ लोकांचा कोरोनामूळे मृत्यू झालेला आहे.[२] थोडक्यात, जगातील बहुतांश देशांमध्ये कोरोना या विषाणूंमूळे संक्रमीत झालेले व या विषाणूंच्या संक्रमणामूळे मृत्यू झालेल्या लोकांची संख्या अधिक आहे.

**भारतातील कोरोनाची स्थिती**:– जागतिक आरोग्य संघटनेच्या ताज्या अपडेटनुसार भारतात आज एकूण १ लाख ९० हजार ५३५ कोरोनाचे अॅक्टीव्ह रूग्ण असून भारतात आत्तापर्यंत या रोगाने एकूण ५ हजार ३९४ लोकांचा मृत्य झालेला आहे.[८]

India COVID-19 Coronavirus cases by state/UT[3]

| Name of State / UT | Total Confirmed Cases* | Cured | Death** |
|---|---|---|---|
| Total# | 158,333 | 67,692 | 4,531 |
| Andaman and Nicobar Islands | 33 | 33 | 0 |
| Andhra Pradesh | 3,171 | 2,057 | 58 |
| Arunachal Pradesh | 2 | 1 | 0 |
| Assam | 781 | 87 | 4 |

| | | | |
|---|---|---|---|
| Bihar | 3,061 | 1,083 | 15 |
| Chandigarh | 279 | 187 | 4 |
| Chhattisgarh | 369 | 83 | 0 |
| Dadar Nagar Haveli | 2 | 0 | 0 |
| Delhi | 15,257 | 7,264 | 303 |
| Goa | 68 | 37 | 0 |
| Gujarat | 15,195 | 7,549 | 938 |
| Haryana | 1,381 | 838 | 18 |
| Himachal Pradesh | 273 | 70 | 5 |
| Jammu and Kashmir | 1,921 | 854 | 26 |
| Jharkhand | 448 | 185 | 4 |
| Karnataka | 2,418 | 781 | 47 |
| Kerala | 1,004 | 552 | 7 |
| Ladakh | 53 | 43 | 0 |
| Madhya Pradesh | 7,261 | 3,927 | 313 |
| Maharashtra | 56,948 | 17,918 | 1,897 |
| Manipur | 44 | 4 | 0 |
| Meghalaya | 20 | 12 | 1 |
| Mizoram | 1 | 1 | 0 |
| Nagaland | 4 | 0 | 0 |
| Odisha | 1,593 | 733 | 7 |
| Puducherry | 46 | 12 | 0 |
| Punjab | 2,139 | 1,918 | 40 |
| Rajasthan | 7,703 | 4,457 | 173 |
| Sikkim | 1 | 0 | 0 |
| Tamil Nadu | 18,545 | 9,909 | 133 |
| Telengana | 2,098 | 1,284 | 63 |
| Tripura | 230 | 165 | 0 |
| Uttarakhand | 469 | 79 | 4 |
| Uttar Pradesh | 6,991 | 3,991 | 182 |
| West Bengal | 4,192 | 1,578 | 289 |
| Cases being reassigned to states | 4,332 | 0 | 0 |

**महाराष्ट्रामधील कोरोनाची स्थिती**:— महाराष्ट्रात ३१ मे २०२० पर्यंत कोरोनाची लागण झालेले एकूण ६७,६५५ रूग्ण आहेत. यापैकी २२८६ लोकांचा मृत्यू झाला असून २६,९९७ रूग्ण बरे होवून घरी गेले आहेत.[४]

**महाराष्ट्रातील कोरोना रूग्णांची जिल्हानिहाय आकडेवारी.**[५]

| जिल्हा | रूग्णांची संख्या | मृत्यू |
|---|---|---|
| मुंबई | ३९६८६ | १२७९ |
| ठाणे | ७०९ | ०७ |
| ठाणे महापालिका क्षेत्र | ३७२१ | ८२ |
| नवी मुंबई महापालिका क्षेत्र | २६७३ | ६१ |
| कंडोमपा क्षेत्र | १३१८ | २५ |
| उल्हासनगर म. क्षेत्र | ३३१ | ०६ |
| भिवंडी महापालिका | १३४ | ६ |
| मिरा—भाईंदर महापालिका | ६९९ | १३ |
| पालघर | १४४ | ०३ |
| वसई—विरार म. क्षेत्र | ८७४ | २७ |
| रायगड | ६०९ | १८ |
| पनवेल महापलिका | ४९९ | २१ |
| नाशिक | १६२ | ०० |
| नाशिक महापालिका | २२५ | ०८ |
| मालेगांव महापालिका | ७४८ | ५८ |
| अहमदनगर | ९४ | ०६ |
| अहमदनगर महापालिका | २६ | ०० |
| धुळे | ३६ | ०८ |
| धुळे महापालिका | १०४ | ०८ |
| जळगांव | ४४९ | ६३ |
| जळगांव महापालिका | १६७ | ०९ |
| नंदुरबार | ३५ | ०३ |
| पुणे | ५४७ | १२ |
| पुणे महापालिका | ६९०४ | ३०८ |
| पिंपरी चिंचवड | ४६८ | ०९ |
| सोलापूर | ४६ | ०३ |
| सोलापूर महापालिका | ८५१ | ६७ |
| सातारा | ५२३ | १६ |
| कोल्हापूर | ४२८ | ०४ |
| कोल्हापूर महापालिका | २९ | ०० |
| सांगली | १०१ | ०० |
| सांगली—मिरज—कुपवाड मनपा | ११ | ०१ |
| सिंधुदुर्ग | ३३ | ०० |
| रत्नागिरी | २६४ | ०५ |
| औरंगाबाद | ३९ | ०१ |
| औरंगाबाद महापालिका | १४६२ | ६४ |
| जालना | १२५ | ०० |
| हिंगोली | १४९ | ०० |
| परभणी | ४३ | ०१ |
| परभणी महापालिका | २० | ०० |
| लातूर | ९८ | ०३ |
| लातूर मनपा | २७ | ०० |
| उस्मानाबाद | ७३ | ०१ |
| बीड | ४७ | ०० |
| नांदेड | २४ | ०० |
| नांदेड मनपा | ८७ | ०६ |
| अकोला | ४४ | ०५ |
| अकोला महापालिका | ५४० | २३ |
| अमरावती | १६ | ०२ |
| अमरावती महापालिका | २१० | १४ |
| यवतमाळ | १३० | ०१ |
| बुलढाणा | ६२ | ०३ |
| वाशिम | ०८ | ०० |
| नागपूर | ३७ | ०० |
| नागपूर महापालिका | ५४७ | १० |
| वर्धा | १२ | ०१ |
| भंडारा | ३२ | ०० |
| गोंदिया | ६६ | ०० |
| चंद्रपूर | १६ | ०० |
| चंद्रपूर महापालिका | ०९ | ०० |
| गडचिरोली | ३५ | ०० |
| इतर राज्ये | ५९ | ५ |

एकंदरीत, आज कोरोना व्हायरसच्या संसर्गामूळे संपूर्ण जग एका भयंकर संकटाला सामोरे जात असल्याचे चित्र दिसत आहे. कोरोनाचा समूह संसर्ग होवू नये म्हणून जगातील अनेक देशांसोबतच भारतात सुद्धा जवळपास दोन अडीच महिने लॉकडाउन ठेवण्यात आला. या लॉकडावूनमूळे संपूर्ण जगातील अर्थव्यवस्था धोक्यात आली. भारतात तर स्थलांतरीत मजूरांना या लॉकडावूनमूळे अत्यंत हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या.अजूनही भारतात पाचव्या लॉकडावूनची अंमलबजावणी सुरूच आहे. परंतू कोरोनाने संक्रमित

होणाऱ्या रूग्णांची संख्याही झपाट्याने वाढत आहे. आज दि. २ जून २०२० ला जागतिक आरोग्य संघटनेच्या वेबसाईट नुसार संपूर्ण जगात कोरोनाने संक्रमित झालेले एकूण ६१ लाख ४० हजार ९३४ रूग्ण असून आत्तापर्यंत ३ लाख ७३ हजार ५४८ लोकांचा कोरोनामूळे मृत्यू झालेला आहे.[6] तर जागतिक आरोग्य संघटनेच्या ताज्या अपडेटनुसार भारतात आज एकूण १ लाख ९० हजार ५३५ कोरोनाचे ॲक्टीव्ह रूग्ण असून भारतात आत्तापर्यंत या रोगाने एकूण ५ हजार ३९४ लोकांचा मृत्य झालेला आहे.[7] यावरून असे निदर्शनास येते की, कोविड १९ हा संसर्गजन्य आजार संपूर्ण मानवजातीसाठी एक भयानक संकट आहे. या संकटापासून वाचायचे असेल तर आपल्याला अतिशय काळजी घेणे आवश्यक आहे.

**कोरोना व्हायरसपासून घ्यावयाची काळजी**:– कोरोना हा संसर्गजन्य आजार असून तो एका बाधीत व्यक्तीपासून अनेक व्यक्तींना होवू शकतो. यासाठी आपण पुढीलप्रमाणे काळजी घेतली पाहीजे. **स्वच्छ हात धुवा**:– पाणी आणि साबणाने ४० सेकंद हात धुवा. जर तुम्ही अल्कोहोल असणारे हॅंड वॉश वापरत असाल तर २० सेकंद पुरेसे आहेत. जर तुमचा हात अस्वच्छ असेल किंवा मातीमुळे खराब झाला असेल तर साबण आणि पाण्याचाच वापर करा. **हातरुमाल किंवा टिश्यू पेपरचा वापर करा**:– खोकतांना किंवा शिंकताना नाकावर आणि तोंडावर रुमाल ठेवा. रुमाल नसेल तर टिश्यू पेपरचा वापर करा. अन्यथा हाताच्या कोपराने तोंड झाका. टिश्यू पेपरचा वापर केल्यावर तो तात्काळ बंद कचरापेटीत फेकून द्या. **तोंड, नाक चेहरा, डोळे यांना स्पर्श करू नका**:– कोरोना वायरस लोकांच्या थुंकीतून एखाद्या पृष्ठभागावर पडू शकतो. नकळत आपला हात त्या पृष्ठभागाला लागू शकतो. त्यामुळे तोंड, नाक चेहरा, डोळे यांना स्पर्श करू नका. **कमीत कमी तीन फुटाचे अंतर**:– समोरच्या व्यक्ती सोबत बोलत असतांना त्याच्यापासून कमीत कमी तीन फुटाचे अंतर ठेवा. **आंबट चवीच्या फळांचा आहारात समावेश**:– कोरोना व्हायरसच्या विरोधात लढा द्यायचा असेल तर आपली रोगप्रतिकारक क्षमता चांगली असणं अत्यंत गरजेचं आहे. यासाठी आंबट चवीच्या फळांचा आहारात समावेश करणे गरजेचे आहे. यामध्ये विटामिन सी चे प्रमाण जास्त असते.

कोरोना विषाणूचा प्रसार खोकला किंवा शिंकेतून बाहेर पडणाऱ्या तुषारांमधून किंवा असे तुषार पडलेल्या जागी स्पर्श केलेला हात नाका–तोंडाला लागल्यानं होत असल्याचं आतापर्यंतच्या संशोधनातून दिसून आलं आहे. तसेच गर्दीच्या ठिकाणी अशा संसर्गाचा धोका जास्त असल्याचं सुद्धा तज्ज्ञांनी वारंवार सांगितलं आहे. कोरोनाच्या संक्रमणापासून वाचण्यासाठी मास्क वापरणे आवश्यक केले आहे. तथापी मास्क वापरल्यामुळे खरंच कोरोना रोखता येता का, याबाबत जागतिक आरोग्य संघटना अजूनही खात्रीशीरपणे सांगू शकत नसल्याचं म्हणतंय. पण तोवर गर्दीच्या ठिकाणी जाणार असाल तर तो नक्कीच वापरा. सध्या सगळीकडे मास्क अनिवार्य केला आहे. मास्क न वापरणाऱ्या लोकांना अनेक ठिकाणी दंड भरावा लागत असल्याच्याही बातम्या आपण वाचल्या असतील. पण लोकांनी मास्क वापरणं खरंच इतकं आवश्यक आहे का? नुकतंच जर्मनीने जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीदरम्यान आणि सार्वजनिक वाहतुकीदरम्यान मास्कचा वापर अनिवार्य केला आहे. कोरोनाच्या संसर्गापासून वाचण्यासाठी मास्क आवश्यक केला आहे. तथापी आज प्रत्येकच जण मास्क घालून फिरतांना दिसतो आहे. जागतिक आरोग्य संघटनेनुसार फक्त दोन प्रकारच्या लोकांनी मास्क वापरायला हवेत – १. जे आजारी आहेत आणि ज्यांच्यात कोरोनाची लक्षणं दिसत आहेत. २. जे कोरोनाग्रस्तांची सेवा करत आहेत किंवा काळजी घेत आहेत. मेडिकल मास्क हे फक्त आरोग्य कर्मचाऱ्यांसाठी राखीव ठेवावेत, असंही जागतिक आरोग्य संघटनेने म्हटले आहे. इतर सामान्य जनतेने मास्क घालायलाच हवेत, असं नाही कारण – १. मास्क घालताना किंवा काढताना ते इतर व्यक्तींच्या खोकल्याने किंवा शिंकण्याने दूषित होऊ शकतात. २. नियमितपणे हात धुणं आणि सोशल डिस्टन्सिंग पाळणं अधिक परिणामकारक आहे. ३. मास्क आपण सुरक्षित असल्याचा आभास, एक खोटी भावना निर्माण करू शकतात. त्यामुळेच कोरोना संसर्गाचा धोका टाळण्यासाठी खोकलणाऱ्या किंवा शिंकणाऱ्या व्यक्तींपासून किमान १ मीटर अंतरावर उभं राहण्याची शिफारस जागतिक आरोग्य संघटनेनं केली आहे. जे आजारी आहेत आणि ज्यांना संसर्गाची लक्षणं आहेत, त्यांनी चेहऱ्यांवर मास्क बांधावेत, असं जागतिक आरोग्य संघटनेनं सांगितलं आहे. भारतातही कोरोना व्हायरस संसर्गाचे हॉटस्पॉट बनलेल्या मोठ्या शहरांमध्ये सार्वजनिक ठिकाणी वावरताना मास्क घाला, अशी आग्रही सूचना केली आहे. या सुचनांची अंमलबजावणी आपण काटेकोरपणे केली तरच या महामारीपासून आपण स्वत:ला व इतरांनाही सुरक्षित ठेवू शकतो. यादृष्टीने आपण प्रयत्नरत असायला हरकत नाही.

लॉकडाऊनमुळे कोरोनाच्या संसर्गाचा वेग तर मंदावलाय, पण कोरोना व्हायरसच्या विळख्यातून अजूनही आपली मुक्ती झालेली नाही, कारण कोरोना व्हायरसवर खात्रीशीर इलाज अजूनही सापडलेला नाही. प्रत्येकजण हाच एक प्रश्न विचारतो, की या कोरोनावर लस कधी तयार होणार? आणि ती हातात कधी येणार? जगभरात जवळपास ८० वेगवेगळे गट कोरोनाच्या लशीवर संशोधन करत आहेत. लस महत्त्वाची आहे कारण हा कोरोना व्हायरस अत्यंत वेगाने पसरतो आहे आणि जगभरात लाखो लोकांना आतापर्यंत हा रोग झाला आहे. लाखोंचा मृत्यूसुद्धा झाला आहे. त्यामुळे जर ही लस मिळाली तर लोकांच्या रोगप्रतिकार यंत्रणेला एखाद्या परकीय शक्तीविरोधात लढण्यास मदत मिळेल, जेणेकरून ते आजारी पडणार नाही. त्यामुळे लॉकडाऊन उठवण्याचा निर्णय घेता येईल आणि सोशल डिस्टन्सिंगचे नियम शिथील करता येतील. पण तरीही आपण स्वत:ची आणि इतरांची काळजी घेणे आवश्यक आहे.

संदर्भ:–

1. https://economictimes.indiatimes.com/articleshow/74648830
2. https://www.worldometers.info/co June 01, 2020, 12:23
3. https://www.pharmaceutical-technology.com/28May2020.
4. https://www.bbc.com/marathi/india-51993719
5. https://www.bbc.com/marathi/india-51993719/31May2020
6. https://www.who.int/emergencies/diseases2 June 2020.
7. https://www.who.int/emergencies/diseases) 2 June 2020.
8. Ibid.

# अहेरी शहरातील महिलांची अन्नभेसळ विषयक जागरूकता : एक अध्ययन

**प्रा. मंगला बनसोड,** गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख, एस. बी. आर्ट्स अ‍ॅन्ड कॉमर्स कॉलेज, अहेरी. मो. ९४२३६६८५८७

**प्रस्तावना :-** अन्न, वस्त्र, निवारा या मानवाच्या मुलभूत गरजा आहेत. यातील अन्न हा घटक चांगल्या आरोग्यावर प्रामुख्याने प्रभाव टाकतो. म्हणुनच चांगल्या आरोग्यावर यशदायी जिवन निर्भर असते. त्याकरीता आहार पोषण त्यांचा मुलभुत पाया ठरतो. परंतु अलिकडच्या काळात गतिमान जिवन सर्वच लोक अनुभवास लागते. याचे कारण विज्ञान आणि तंत्रज्ञानाने प्राप्त झालेल्या प्रगतीचा तो प्रभाव आहे. अशा या प्रभावाच्या अनुषंगाने चांगल्या बरोबरच वाईट बाबीचे संक्रमण न कळत झालेले दिसते. म्हणुन खाद्य पदार्थात भेसळ करणे चुकीच्या ब्रॅन्ड खाली एखादी वस्तु खपविणे या बाबी खाद्य पदार्थाची खरेदी करतांना फसविण्या जाण्याची भिती ही ग्राहकांच्या मनात निर्माण झाली आहे. याशिवाय नविन तंत्रानी पदार्थाचे संरक्षण करावयास लागले. उद्देश दिर्घकाळ खाद्य पदार्थ टिकविणे हा आहे. परंतु जे रासायनिके आहेत. त्या नकळत आरोग्यावर परिणाम होतो. पाणी ही प्राथमिक गरज सुद्धा आपण निर्भयपणे पिऊन तहान भगवु शकत नाही. गृहिणीला कुटूंबाचे व्यवस्थापन करीत असतांना आहारावर लक्ष पुरवावे लागते. कुटूंबातील सदस्यांच्या आहार विषयक गरजा चांगल्या रिनीने पूर्ण व्हाव्यात असे वाटणे स्वाभावीकच आहे. परंतु आजच्या काळात उपभोक्ता ग्राहक – गृहिणीला अनेक खाद्य पदार्थातील अन्न भेसळीच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे. याकरीता शासनाने अन्न प्रशासना अंतर्गत अन्नभेसळ प्रतिबंधक कायदे केलेले आहेत. तरी सुद्धा १०० टक्के हि समस्या अजुन पर्यंत सुटलेली नाही

अन्नभेसळ या शब्दांत अन्न + भेसळ असे दोन शब्द आढळतात. यापैकी अन्न कशाला म्हणता येईल हे पुढिल व्याखेतुन स्पष्ट होते. 'Food means any article used as Food or drink for human ansumption other thean drugs & water include.'

अन्न या संज्ञेत पुढील पदार्थाचा समावेश होतो – १. खाद्य पदार्थ खाण्यासाठी तयार केलेले, वापरलेले पदार्थ २. सुगंध आणणारे, स्वाद आणणारे किंवा मसाल्याचे पदार्थ. ३. पदार्थाचे स्वरूप, गुणवत्ता आणि गुणधर्म लक्षात घेऊन केंद्र सरकार आपल्या राजपत्रात अधिसुचना प्रसिद्ध करून अधिनियमानुसार अन्न म्हणुन जाहिर करते असे खाद्य पदार्थ.

अधिनियमानुसार पाणी वगळले तरी सर्फ, सोडा, लेमन, ऑरेंज इ. वायुमिश्रीत सौम्य पेय अन्नात गणली जातात. सोडा, बाय कार्व व बेकिंग पावडर इतयादीचा समावेश अन्नात होतो.

व्याख्या :– १. 'Food adulteration can be defined as the international adulteration or substitution of abstraction of substance which adversely affect the nature substance and quality of food.

२) दुय्यम प्रतिचे किंवा मानवास अपायकारक पदार्थ जाणीवपुर्वक मिसळलेले किंवा पदार्थांतीत पोषक घटक अल्प प्रमाणात किंवा पूर्णपणे काढुन घेणे म्हणजे अन्नभेसळ होय.

१९५८ च्या अन्नभेसळ प्रतिबंधक कायद्यानुसार आणि १९७१ मध्ये त्यात केलेल्या दुरूस्ती प्रमाणे पुढिल परिस्थितीत अन्नात भेसळ आहे असे मानले जाते. १. विक्रेत्याकडुन विकत घेतलेला पदार्थ अपेक्षित स्वरूपात किंवा प्रमाणात नसणे, म्हणजेच निम्न दर्जाचा असणे. २. खाद्य पदार्थात स्वस्त पदार्थ किंवा दुय्यम दर्जाचे पदार्थ थोडया प्रमाणात किंवा पुर्णपणे मिसळल्यामुळे खाद्यपदार्थाचे स्वरूप कमी दर्जाचे होणे. ३. एखाद्या पदार्थातुन त्यातील घटक द्रव्य अंशत: किंवा पूर्णपणे काढणे. उदा. दुधातुन मलाई काढणे. ४. खाद्य पदार्थाच्या स्वरूपात किंवा दर्जावर प्रतिकुल परिणाम होईल अशा पद्धतीने संस्कारीत केलेले असणे. ५. खाद्य पदार्थ अस्वच्छ वातावरणात तयार कलेला किंवा संग्रहित केलेला असल्यास तो दुषित झाल्यामुळे भेसळयुक्त होतो. ६. विक्रेत्याने नफा होण्याकरीता मानवी आरोग्यास धोका होईल असे सडके, घाणेरडे पदार्थ खाद्य पदार्थात मिसळणे. ७. रोगी प्राण्यापासुन मिळालेले पदार्थ किंवा मास. ८. विषारी पदार्थ असलेले खाद्य पदार्थ. ९. खाद्य पदार्थ ज्या डब्यात किंवा पेटीत संग्रहित केल्या जातो. ते उपायकारक द्रव्यापासुन बनविलेले असल्याने असे पदार्थ आरोग्यास बाधा आनतात. १०. खाद्य पदार्थात रंग प्रमाणापेक्षा जास्त वापरणे हानीकारक आहे.

सदर शोधनिबंधात अहेरी गावातील महिला अन्नभेसळी विषयी किती जागरूक आहेत हे पडताळण्यासाठी ''अहेरी गावातील महिलांची अन्नभेसळ विषयक जागरूकता एक अध्ययन या विषयाची निवड केलेली आहे.''

**संशोधनांची उद्दिष्टे:–** १. अहेरी गावातील महिलांची अन्न भेसळ विषयीची जागरूकता तपासणे. २. ग्राहक संरक्षण कायद्याचा वापर करतात की नाही ते तपासणे. ३. अन्न भेसळ ओळखण्यासाठी मार्गदर्शन करणे.

**संशोधनाची गृहितके:–** १. अहेरी तालुक्यातील महिला अन्नभेसळीविषयी जागरूक आहेत. २. अन्न भेसळ विषयक कायद्याची माहिती आहे. ३. अन्न भेसळ ओळखण्याच्या पद्धती विषयी ज्ञात आहे.

**विषयाचे महत्त्व** :– अन्न पदार्थात भेसळ करणे म्हणजे जनतेच्या जीवाशी खेळणे होय. बरेचशे रोग, काही आजार किंवा काही वेळेस मृत्यु सुद्धा भेसळयुक्त पदार्थामुळे होवू शकतो. शुद्ध व निर्मळ अन्न पदार्थ जनतेस मिळाले तर राष्ट्राचे आरोग्य सुधारून रोगराईस आळा बसण्यास व त्याविषयी टक्कर देणे शक्य होईल. जनतेला भेडसावण्याऱ्या अन्नभेसळी सारख्या समाज द्रोही कृत्यास आळा घालण्यासाठी व त्याचा विमोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने अन्नभेसळ प्रतिबंधक कायदयाची अंमलबजावणी काटेकोरपणे अमलात आणली असली तरी सुद्धा या समस्येवर पुर्णपणे बंदि बसला नाही. कुटूंबाचा केंद्रबिंदु गृहिणी व तिच्याशी निगडीत हा विषय आहे. त्यामुळे या विषयाचे महत्त्व अनन्य साधारण आहे.

अहेरी गावातील गृहिणींची अन्नभेसळ विषयी जागरूकता, कायदे, अन्नभेसळ ओळखण्याच्या पद्धती, त्यापासुन मनुष्यास होणारे अपाय, या विषयी गृहिणी मध्ये किती जागरूकता आहे हे पडताळुन पाहण्याचा संशोधकाने प्रस्तुत संशोधनात प्रयत्न केलेला आहे.

**अभ्यास क्षेत्र:–** संशोधनाकरीता अहेरी नगरपंचायतची निवड केली असुन अहेरी शहराची लोकसंख्या २५ हजार आहे.

**नमुना निवड** :– प्रस्तुत संशोधनासाठी अहेरी गावातील महिलांची निवड करतांना स्तरीत यादृच्छिक नमुना पद्धतीने केलेली आहे. यात उच्च शिक्षीत, मध्यम शिक्षीत, अज्ञानी, महिलांचा समावेश केला.

**संशोधन प्रक्रिया** :– संशोधनाची उद्दिष्टे अभ्यासुन त्यानुसार संशोधन करण्याकरीता सर्वेक्षण पद्धतीचा उपयोग करण्यात आला.

प्रस्तुत अध्ययनाकरीता अन्नभेसळीवर आधारित प्रश्नावली तयार करण्यात आली आणि त्या प्रश्नावल्या उत्तरदात्यांकडुन भरून घेण्यात आल्या.

**अन्न भेसळ विषयक जागृकता दर्शक सारणी.**

| अ.क्र. | विवरण | वारंवारीता n=100 | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ५५ | ५५ |
| २ | नाही | ४५ | ४५ |
| **एकुण** | | १०० | १०० |

**अन्न भेसळ विषयक कायद्याचे ज्ञान दर्शक सारणी.**

| अ.क्र. | विवरण | वारंवारीता n=100 | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | ३० | ३० |
| २ | नाही | ७० | ७० |
| **एकुण** | | १०० | १०० |

**अन्न भेसळ ओळखण्याच्या पद्धतीचे ज्ञान दर्शक सारणी.**

| अ.क्र. | विवरण | वारंवारीता n=100 | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|
| १ | होय | २० | २० |
| २ | नाही | ८० | ८० |
| **एकुण** | | १०० | १०० |

प्रस्तुत अध्ययनातून प्राप्त झालेल्या प्रतिक्रीयेच्या विश्लेषणावरून खालील निष्कर्ष प्राप्त होतात. तक्त्याच्या विश्लेषनाअंती असे लक्षात येते की, जास्तीत जास्त ५५ टक्के महिला अन्न भेसळीविषयक जागरूक आहे ३० टक्के महिलांना अन्न भेसळीविषयक कायद्याचे थोडे फार ज्ञान आहे. तर २० टक्के महिलांना अन्न भेसळ ओळखण्याच्या थोडयाफार पद्धती माहित आहेत. अन्न भेसळ आढळल्यास १५ टक्के महिला दुकानदारास माल परत करतात. परंतु ग्राहक संरक्षण मंचाकडे तक्रार नोंदवित नाही. ३० टक्के महिला पदवीधर आहेत त्या पॅकेट वरिल Expiry Date, Weight, Standerd Measure, leble, Nutritional facts. ISI माक्र, टेड माक्र बघुन खरेदी करतात. ५० टक्के महिला माल खरेदी केल्यानंतर बील घेतात.

**निष्कर्ष :—** प्रस्तुत संशोधनातुन पुढिल निष्कर्ष निघाले. १. अन्नभेसळी विषयी महिला कमी प्रमाणात जागरूक आहेत. २. अन्न भेसळ विषयक कायद्याची माहिती फारच कमी आहे. ३. अन्न भेसळ ओळखण्याच्या पद्धती माहित नाही.

**शिफारशी :—** प्रस्तुत अध्ययनाच्या संदर्भात, अन्नभेसळ थांबविण्यासाठी काही प्रमुख शिफारसी पुढीलप्रमाणे करता येतील.

१. अहेरी शहर हे आदिवासी असल्यामुळे साक्षरचेचे प्रमाण कमी आहे. व त्यामुळे अन्न भेसळ विषयी महिलांमध्ये जागरूकता निर्माण करण्याकरीता प्रबोधन व जाणीव जागृती करणे आवश्यक वाटते.

२. तक्रार निवारण केंद्र स्थापन करून त्यात पदाधिकाऱ्याची नेमणुक करून अमलबजावणी करणे.

३. रोटरी क्लब, लायन्स क्लब व महिला विकास मंडळ यांनी पुढाकार घेऊन जनतेस या विषयावर सर्वसाधारण माहिती निरनिराळया प्रात्याक्षिकाच्या द्वारे देऊ शकतील व या विषयी अभ्यासपुर्ण तयार केलेली भिंतीपत्रक तयार करून गावातील प्रमुख ठिकाणी लावणे.

४. शिक्षण संस्थांनी आपल्या शाळेत निरनिराळया प्रात्यक्षिका द्वारे सुक्ष्म जिवाणु विषयक प्राथमिक माहिती व त्यापासुन अन्न पदार्थास कसा संसर्ग पोहचतो या बाबतचे ज्ञान विद्यार्थ्यास देणे आवश्यक आहे.

५. सामाजातील निरनिराळया स्थरातील व्यक्ति व संस्था यांनी याबाबत पुढाकार घेतल्यास अन्नभेसळ समस्या कमी होण्यास मदत होईल.

६. कायद्याची कठोर प्रभावी अंमलबजावणी करून दोषीवर फौजदारी गुन्हा दाखल करणे.

७. श्राव्य माध्यमांवर रेडीओ वर अन्न भेसळ विषयावर चर्चा घडवुन आणणे.

८. दृकश्राव्य साधने टि.व्ही. च्या माध्यमातुन प्रात्यक्षीके चर्चा घडवुन आणने.

९. ग्राहक संरक्षण चळवळ उभारूण त्याची अमलबजावणी करणे.

१०. फळे पिकविण्यासाठी रासायनिक पदार्थाचा वापर टाळणे आणि जैविक कृती तंत्राचा आग्रह धरणे.

**संदर्भ ग्रंथ:—**


१. फरकाडे त्रिवेणी, गोंगे सुलभा 'पोषण आणि आहारशास्त्र' पिंपळापूरे प्रकाशन नागपूर.
२. कोळेले मिना 'पोषण आणि आहारशास्त्र' पिंपळापूरे प्रकाशन नागपूर.
३. खडके सुरेश 'पोषण आणि आहारशास्त्र' हिमालय पब्लिकेशन हाऊस नागपूर.
४. Kothari C.R. 'Research Methodology New age' International Publisher New Delhi.
५. Shrilaxmi B 'Dietetics' New age International Publisher New Delhi.
६. Gupta Shusma 'Text Book of Food and Nutration Child care and Psyehology' Kalyani Publisher New Delhi.
७. साने ब. ची 'अन्न भेसळ व आपण' महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ नागपूर.
८. https://www.google.com.

# कोरोनाची सद्यस्थिती, समस्या व आव्हाने

**डॉ. रमेश आर. सोमकुंवर**, कार्यकारी प्राचार्य, कॉलेज ऑफ सोशल वर्क, कामठी

आज सपूर्ण जगाला कोरोना या संसर्गजन्य रोगाने ग्रासले आहे. आपल्या देशातही दिवसेंदिवस कोरोनाग्रस्त रूग्णांची संख्या भरमसाठ वाढली आहे. या रोगाचा प्रसार रोखण्यासाठी प्रशासनाकडून लॉकडाऊन जाहीर झालेले आहे. कारोनाच्या पार्श्वभूमिवर प्रतिबधांत्मक उपाययोजना म्हणून २२ मार्चपासून देशभरात लॉकडाऊन करण्यात आले. संचारबंदी लागू करण्यात आली. नागरिकांना घरीच राहण्याचे आदेशही देण्यात आले. सुरक्षिततेच्या दृष्टीने जिवणावश्यक वस्तुव्यतिरिक्त इतर सर्व प्रतिष्ठाने बंद करण्यात आली. लॉकडाऊन–१ आणि २ मध्ये ही सर्व प्रतिष्ठाने बंद होती. लॉकडाऊन –३ मध्ये अंशत: यात शिथिलता देण्यात आली. परंतु मोठया प्रमाणात सुट देण्यात आली आहे. परंतु अटी शर्तीच्या अधिन राहून सर्वांना व्यवसाय करावयाचा होता. लॉकडाऊन कालावधी हा जवळपास दोन महिण्यांचा झाला. या दरम्यान, शहरातील सर्वच मॉलसुद्धा बंद होते. देशभरात लॉकडाऊनच्या चौथ्या टप्याला सुरूवात झाली आहे. १९ मे ला लॉकडाऊन ४ च्याबाबत नियम थोडेफार बदलण्यात आले. कोरोना रूग्णांची संख्या पाहता मुबई परिसरातील सर्व महापालिका, पुणे महापालिका, सोलापूर, औरंगाबाद, मालेगाव, नाशिक, धुळे, जळगाव, अकोला आणि अमरावती, नागपूर रेड झोन मध्ये आहेत. तर राज्यातील उर्वरित भाग हा नॉन रेड झोन मध्ये करण्यात आले.

कोरोणाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी गेल्या दोन महिण्यांपासून देशात लॉकडाऊन घेण्यात आला. मात्र संक्रमितांच्या आकडयात सतत लक्षणिय वाढ होतांना दिसत आहे. मंगळवारी १९ मे २०२० रोजी देशातील कोरोनाबाधित संख्या एक लाखाच्याही पुढे गेलेली होती. एक लाखाचा आकडा पार करणारा भारत देश ११वा देश बनवला होता. देशात ३ हजाराहून अधिक जणांना कोरोनामुळे आपले प्राण गमवावे लागलेत. तर जवळपास ३६ हजाराहून अधिक लोकांनी कोरोनावर मात केली आहे. वल्डोमीटरच्या आकडेवारीनुसार जगात आतापर्यंत ४९ लाख ८ हजार २०० जणांना कोरोनाचा संसर्ग झाला आहे. आतापर्यंत तीन लाख २० हजार जणांचा कोरोनाने बळी घेतला. तर १९लाख १७ हजार जणांनी कोरोनावर मात केली. आहे. कोरोनाबाधितांच्या आकडयावर नजर टाकली असता सर्वाधिक रूग्णसंख्येच्या बाबतीत अमेरिका अजूनही आघाडीवर आहे. अमेरिकेत आतापर्यंत १५ लाख ५० हजार २९४ रूग्ण आढळले तर ९१ हजार ९८१ जणांचा मृत्यू झाला आहे. दुसऱ्या क्रमांकावर स्पेन असून तेथे २,९९,९४१ रूग्ण आणि २,८३७ लोकांचा मृत्यु झाला आहे. दरम्यान भारतातील कोरोणाच्या रूग्णांच्या संख्येत वाढ होत असली, तरी कोरोना संक्रमणाचा वेग कमी करण्यात प्रशासनाला हळूहळू यश येत आहे.

सध्याच्या घडीला कोविड–१९ ची लस सर्वांसाठी महत्त्वाची आहे. जगात जवळपास १०० संशोधन गट किोरोनाला रोखणारी लस शोधून काढण्यात संशोधन करित आहेत संशोधन ते क्लिनिकल चाचण्या अशा वेगवेगळया टप्पयांवर हे लस प्रकल्प आहेत सर्व चाचण्या व्यवस्थित पार पडल्या तर वर्षाअखेर ही लस बाजारात येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. कोरोना व्हायरसला रोखण्यासाठी विकसित करण्यात आली. अमेरिकेतील ही पहिली चाचणी करण्यात आली आहे. या चाचणीतून समाधानकारक निष्कर्ष समोरही आले आहेत. ज्यांना ही लस टोचण्यात आली ज्यांच्या शरीरात कुठलेही दुष्परिणाम दिसलेले नाहीत. ही दिलासादायक बातमी तसेच कोरोना व्हायरस विरोधात रोगप्रतिकारक शक्तीदेखील वाढली असे लस विकसित करणाऱ्या मोडर्ना कंपनीने १८ मे २०२० ला जाहीर केले.

| कोरोना : सद्य:स्थिती | | | |
|---|---|---|---|
| | एकूण बाधित | बरे झालेले रूग्ण | मृत्यू |
| महाराष्ट्र | ४१,६४२ | ११,७२६ | १,५५४ |
| भारत | १,१८,४४७ | ४८,५३४ | ३,५८३ |
| विश्व | ५२,४१,७८४ | २१,१४,४५८ | ३,३५,८४६ |
| स्त्रोत:– दैनिक वृत्तपत्र तरूण भारत दि. २३ मे २०२० | | | |

कोरोना रूग्णांची सद्यस्थिती पाहता आज जगातील १५ देशांची एकत्रित लोकसंख्या ही भारताइतकी असून तिथे ३६ लाख ४५ हजार कोरोना रूग्ण आहेत. जागतिक महासत्ता असलेला अमेरिका हा देश यादीत पहिल्या क्रमांकावर आहे. भारताने मात्र वेळीच उपाययोजना करून कोरोनचाा प्रसार मर्यादित करण्यात यशही मिळवले आहे. लॉकडाऊनमध्ये अर्थव्यवहारावरील निर्बंध आणून आरोग्य क्षेत्रातील पायाभूत सुविधांची पूर्तता देशातच करण्यात आली आहे. रूग्णसंख्येच्या बाबतीत विचार केला असता असे लक्षात येते की, दहा देशांच्या यादीत असून भारतात मृत्यूदर सर्वात कमी आहे. स्पेनमध्ये २७.७ टक्के रूग्णांचा मृत्यू आतापर्यंत झालेला आहे. एका लाखामागे ५९ जणांचा मृत्यू झाला. भारतात हे प्रमाण एक लाख रूग्णांमागे ०.२ टक्के आहे. बाकी देशांची तुलना करता असे लक्षात येते की, अमेरिकेत दर लाखामागे ४५२, तर स्पेनमध्ये ४९६ जणांना कोरोना होता. इटलीमध्ये ३७४, ब्रिटनमध्ये ३७१, जर्मनीमध्ये २११, फ्रान्समध्ये २१०, रशियात २०८, तुर्कीमध्ये १८३, इराणमध्ये १५०, ब्राझीलमध्ये ११५ लोक संक्रमित आहेत. जगात हीच सरासरी ६२ आहे. तर भारतात एक लाख लोकांमागे ७.९ जणांना कोरोनाची लागण झाल्याचे निष्पन्न झाले आहे. सांगण्याच तात्पर्य हेच आहे की, इतर देशातील कोरोना लागण झालेल्या रूग्णांपेक्षा भारतात हे प्रमाण कमी आहे.

कोरना पॉझिटिव्हि रूग्णंच्या संख्येत वाढ जसजसी व्हायला लागली, तसे संसर्गाची सर्व दालने बंद करून सर्वत्र १४४ लावण्यात आहे. संसर्ग झालेल्या रूग्णाचा शोध घेणे, त्याला वेगळे करणे व त्याच्यावर उपचार करतांना जर तो पॉझिटिव्हि निद्याला, तर त्याच्यावर लक्ष ठेवणे हाच एकमेव मार्ग रोगाच्या फैलावावर प्रतिबंध हा कोरोना नवीन स्वरूपात आल्याने जगभर त्याचा एकीकडे अभ्यास चालू आहे. तर दुसरीकडे त्याच्यावर लक्ष ठेवून शोधण्याचे प्रयत्नही होत आहे. रोगजंतू शरिरात घुसला ही रोग होण्यास साधारण २ ते ७ दिवस लागतात. सुरूवातीची लक्षणे सर्दी–पडसे, अशक्तपणा, ताप वगैरे अशीच असतात. जास्तीत जास्त हा कालावधी १४ दिवसांपर्यंत असतो. १४ दिवसांनंतर जर रोगाची लक्षणे दिसली की, मग त्याच्या नाकातून येणाऱ्या पाण्याचा व घसाचा स्वब तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविला जातो. अचानक उद्‌भवलेल्या या स्थितीने व्हायरॉलाजी लॅबवर किती दबाव असेल, याची कल्पना नकेलेलीच बरी. ९० ते ५५ टक्के रूग्ण ८ ते १० दिवसांत बरे होतात. कामाला लागू शकतात. पण ते रोगवाहक असतात. त्यांच्या

थुंकीत दोन आठवडे व इतर माध्यमातून दोन महीन्यांपर्यंत हे व्हायरस बाहेर पडतात व ते रोग पसरवू शकतात. एक कोरोनाचा रूग्ण जास्तीत जास्त ४० जणांना बाधित करू शकतो. भारतासारख्या अतिगर्दीच्या देशात तर ही संख्या खूप मोठी असू शकते वारंवार साबणाने हात धुण्याचे संदेश यासाठीच देण्यात येत आहेत. साधारण पाच टक्के पेंशटना जिवाचा धोका असतो. आतापर्यंत आपण कोरोनाला जास्त फैलावू न देण्यात यशस्वी झालो आहे. कोरोनाला एकमेकांच्या सहवासातून होतो म्हणून आपण जर कमी वेळा एकमेकांच्या जवळ गेलो आणि हे सुमारे दोन आठवडे केले तर रोग पसरणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी भारतीय पुरातत्व विभागाने आपल्या अखत्यारित येणारी देशातील सर्व पर्यटनस्थळे बंद केली आहेत. तसेच मलेशिया, अफगानीस्थान, फिलिनिन्स तसेच इतर देशांमधून येणाऱ्या पर्यटकांवर तत्काळ बंदी घालण्यात आली. जागतिक ते स्थानिक स्तरापर्यंत दहशत निर्माण केलेल्या कोराकनाला अटकाव करण्यासाठी सरकारने कडक पावलेउचलत जीवनावश्यक वस्तूची दुकाने सोडून बाकी म्हणजे शाळा–कॉलेज, हॉटेल्स, पानठेले, दारू दुकानांसह अन्य प्रतिष्ठाने बंद ठेवण्याचे आदेश दिले. सध्या संपूर्ण जग कोरोना संकटातून जात आहे. सर्व गोष्टी ठप्प झाल्या आहेत. कोरोनाने विवाह सोहळे अडचणीत आले कारोनाच्या प्रादुर्भावामुळे गर्दी होणारे विवाह सोहळे ही रद्द करण्यात किंवा पुढे ढकलण्याचे आवाहन केले गेले. तसेच अंतिम संस्कारासाठी सुरूवातीला २० लोकांच्याच जमावाला मान्यता दिली गेली. अशाही परिस्थितीत नागरिकांनी कारोनाच्या प्रादुर्भावामुळे होणारी गर्दी टाळण्यासाठी दिलले योगदान ही दिलासादायक बातमी आहे.

जिवांचा धोका पत्करून काम करणाऱ्या या सर्वांच कौतुक करायला हवे ते कमीच आहे. कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता या क्षेत्रात काम करणाऱ्या डॉक्टरांचे, परिचारकांचे, सफाई कामगार व पोलिस यंत्रणंचे अजून एकही जण भीतीने काम सोडून गेल्याचे उदाहरण समोर आले नाही. खरच त्यांच्या कुटंबियांच्या धैर्याला सलाम करायला हवेत. माणूस अंथरूणाला खिळला, एखादा आजार जडला की रक्ताचे नातेही सैल होते. आपली माणसे दुरावतात, अशा वेळी रक्ताचे कुठलेही नाते नसतांना आणि कोणत्याही नात्याचे संबध नसतांना रूग्णालयात आपले म्हणून साथ देते, औषध देते मानसिक आधारही देते. काही सांगावेसे वाटले तर ऐकणारीही तीच असते. जगभरातील कोरोणाचा वाढता प्रादुर्भाव पाहता रोज कोणता विषाणू आपण घरी घेऊन जातो याची आम्हाला माहिती नसते. अपुऱ्या सुरक्षितेच्या साधनांचा अभावातही आपला जीव धोक्यात घालून या परिचालकांनी आपले कर्तव्य पार पाडले आहे.

कोरानाच्या या युद्धात जसा डॉक्टर रूग्णांशी सेवेतून लढतो त्याच धर्तीवर हा खाकी वर्दीतील पोलीसही लढत आहे. ऊन, पाऊस, वादळ असो किंवा एखादा सण खाकी वर्दीतील पोलीस नेहमीच बंदोबस्तासाठी तत्पर असतात. जणूकाही बंदोबस्त पोलिसांच्या पाचवीला पुजलेला आहे. मात्र कोरोना विषाणूशी पोलीसांचा काडीचाही संबधं नसतांना मात्र देशात लॉकडाऊन झाले आणि बंदोबस्तासाठी पोलिसांना ऑर्डर दिला गेला. एक दोन दिवस नाही तर चक्क अजूनपर्यंत चालु असलेला बंदोबस्त म्हणजे पोलीसांच्या आयुष्यातील ही यातनांची यात्राच आहे. बंदोबस्तादरम्यान राज्यातील अनेक पोलिसांना कोरोनाशी लढतांना प्राणाची आहुती द्यावी लागली. कधी कोण कोरोना बाधित असेल हे खाकी वर्दीतील पोलीस माहीत नाही. मात्र रस्त्यावर हातात काठी घेऊन नाकाबंदी करणे, येणाऱ्या जाणाऱ्या प्रत्येकाला थांबविणे, कुठे जाता, कशासाठी, जाता असे संवाद साधत संचारबंदीचे उल्लंधन करणाऱ्या नागरिकांना वारंवार घरून निघू नका संचारबंदी आहे असे तेच तेच सांगणे नाकीनऊ आणणारे ठरत आहे.

सध्या कोराना धोका पाहता, संचारबंदी आणि लॉकडाऊन वाढण्याची गरज निर्माण झाली एकमेकांपासून सुरक्षित अंतर ठेवण्याची वेळ वाहतूक कर्मचारी मात्र शासनासाठी महसूल गोळा करण्यासाठी घडपड करित आहे. कारवाई करण्यासाठी वाहतूक पोलिस अनेक वाहनचालकांच्या संपर्कात येत असल्यामुळे कोरोना बाधित होण्याचा धोका वाढवला असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. वाहतुक शाखेने कर्मचारी सकाळपासून ते सायंकाळपर्यत रस्त्यावर तैनात करण्यात आले आहे. त्यांना विनाकारण रस्त्यावर फिरणाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले. मात्र वाहणचालकावर कारवाई करतांना एकमेकांचा संपर्क येतो, दंड वसूल करणे किवा पावती देण्यास उर्वरित पैसे परत करतेवेळी सोशल डिस्टन्सिंग मर्यादा ओलांडल्या जात आहे. त्यामुळे कोरोनाचा संसर्ग होण्याची शक्यता जास्त आहे. गेले काही दिवसांपासून पोलिस कर्मचारी कोरोना योद्धा म्हणून रस्त्यावर तैनात आहेत. मात्र आता शासनाचा महसूल गोळा करून आर्थिक मजबुती देण्यासाठी वाहतूक पोलिस स्वत:चा जीव धोक्यात घालत आहे. रस्त्यावर तैनात वाहतुक पोलीसांना कारवाईसाठी सक्ती करणे किंवा चालान कारवाई करण्यास भाग पडत असल्यामुळे मोठी अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे या पोलिस कर्मचाऱ्यांच्या समस्या जाणून दखल घेण्याची गरज आहे.

चिननिर्मित कोरोना विषाणूचे संकट पाहता पहिल्या दिवसापासून पोलीस यंत्रणा कार्यरत आहे. नागपूरचे तापमान तर ४४ डिग्री सेल्सीअसच्या वर पर्यंत पाहोचले आहे. पुढेही तापमान वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही. या अवस्थेत पोलिस व्यवस्था कार्यरत आहे. त्यांचेही आरोग्य सुदृढ राहणे आवश्यक आहे. नागपूरच्या पार्वतीनगर येथील २२ वर्षीय युवक कोरोनामुळे दगावल्यानंतर काही पोलीसांची चाचणी करण्यात आली होती. त्यात एकही पोलीस बाधित आढळला नाही. काही दिवसांपासून अहोरात्र रस्त्यावर कर्तव्यावर असलेले नागपूर पोलिस कोरोनामुक्त होते. परंतु काही दिवसांपासून शहरातील काही पोलीसांना कोरोनाची बाधा झाली असल्याचा अहवाल पशुवैद्यक प्रयोगशाळेतून आल्यानंतर पोलिस प्रशासन हादरले. या पोलिसांना तत्काळ उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्यांच्या संपर्कातील पोलिसांना विलगीकरणात ठेवण्यात आले आहे. कर्तव्य सांभाळणाऱ्या पोलिसांना बाधा झाल्यामुळे त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींनाही विलगीकरणाचा वनवासही आला आहे. कोरानाचा संसर्ग रोखण्यासाठी लागू केलेल्या लॉकडाऊनमुळे जालन्यात अडकलेले मध्य प्रदेशातील हे २० कामगार गुरूवारी सायंकाळी तेथून औरंगाबाद मार्गे भुसावळकडे पायीच निघलेले असतांना अपघात झाला. हा अपघात एवढा भीषण होता की, पोलिसांना कामगारांच्या हाडामासाचे तुकडे अक्षरश: कपडयात गोळा करावे लागले. कोणता अवयव कोणत्या व्यक्तीचा आहे हे ओळखणेसुद्धा कठीण होते.

कोरोनाच्या महामारीने जगाच्या हालचाली बंद झाल्या. जगातील सर्वच देशांच्या अर्थव्यवस्थेला यामुळे धक्का बसला आहे. भारतालाही या महामारीने प्रचंड आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. शासनाला मिळणाऱ्या महसुलाचा हा एकच स्त्रोत म्हणून सर्वच राज्यातील जवळपास सर्वच सरकारांनी दारूची दुकाने

खुली करण्याचा निर्णय नाईलाजाने घेतला गेला. दारूची दुकाने खुली करण्याच्या निर्णयाचे मद्यपींनी जे अभूतपूर्व स्वागत केले आहे. मद्यपीनी कोरानाची भीती बिलकूल नाही हे केलेल्या गर्दीवरून, रांगावरून दिसून आले. या गर्दीत स्त्रियांच्याचीही गर्दी होती हे विशेष. सरकारने १४ मे गुरूवारला दारूची दुकाने उघळीकरताच दारूप्रेमींनी खुप गर्दी केली. सामाजिक दूरत्वाला नजुमानता दुकानासमोर जणू जत्रा भरल्याचे दिसून आले. शासनाने दिलेल्या निर्देशांचे पालन व्हावे म्हणून पोलिस तैनात करण्यात आले होते. पण दारूशौकिन त्यालाही जुमानत नसल्याचे दिसून आले. दुकानांसमोर होणारी अफाट गर्दी व शिस्तीचा भंग यामुळे खरच दारू दुकाने आणखी सुरू ठेवायची का? असा प्रश्न निर्माण झाला. पहाटेपासून दुकानाच्या दुतर्फा एक कि.मी.च्या रांगा लागल्या होत्या रखरखत्या उन्हातही दुकानांन समोरची गर्दी कमी होत नव्हती. या दारू दुकानासमोर सुरक्षेच्या दृष्टीने सॅनीटायझर व सामाजीक दुरत्व राखण्यासाठी कुठल्याही सुविधा नव्हत्या. गर्दीमुळे दुकांनासमोर गोंघळ उडत होता. दुकांनासमोर पोलिस तैनात होते. पण त्यांनाही कुणी जुमानत नव्हते. गर्दीमुळे वाहतुकीला सुद्धा अडसर निर्माण झाल्याचे चित्र पहावयास मिळाले.

सद्यपरिस्थितीत कोरोनाचे संक्रमण पाहता आरोग्यविषयक नियम दुकानदारांनी पाळले पाहिजे होते. अन्यथा ही दारूची दुकाने उघडणे धोकादायक ठरू शकते. गर्दी आटोक्यात आणतांना पोलीसांची दमछाक झाल्याचे चित्र दिसून आले. झालेल्या गर्दीमुळे कोणालाही दुरत्व पाळण्याचे भानही नव्हते. दारू घेऊन बाहेर आलेल्यांच्या चेहऱ्यावर एखादी लढाई जिंकल्याचे भाव मात्र पहायला मिळाले. कोरोनामुळे १८ मार्च पासून जिल्हात दारूबंदी करण्यात आली होती. तेव्हापासून दारूचे व्यसन असलेल्यांमध्ये शासणाच्या निर्णयाबाबत नाराजीचा सूर होता. त्यातच अवैघपणे दारू विक्रिचे प्रमाण वाढल्याने शासनाचा महसूलही बुडत असल्याचे पाहता पुन्हा एकदा त्यावर विचार करण्यात आला. पण यात पोलीस यंत्रणेवर सामाजिक सुरक्षेचा होणारा ताण किती होईल याचापण विचार करणे आवश्यक होते. शासनाला मिळणाऱ्या महसुलाचा हा एकच स्त्रोत म्हणून हा विषय सर्वात शेवटी यायला होता. पण सर्वच राज्यातील जवळपास सर्वच सरकारांनी दारूची दुकाने खुली करण्याची घाई केली गेली.

कोरोना पार्श्वभुमिवर इतरांच्या आरोग्याची काळजी घेणाऱ्या आरोग्य कर्मचारी, पोलीस प्रशासन यांचे कामसुद्धा गौरवास्पद आहे. या सर्वांनी आवश्यकतेनुसार कोरोनानाशी सामना केला आहे. लॉकडाऊनमध्ये अख्खे शहर स्वच्छ ठेवण्यात अहोरात्र मेहनत घेणाऱ्या हजारो सफाई कामगारांचे हात सदैव तत्पर होते. मात्र त्यांच्या कामाची फारशी कुठे दखल घेतली जात नाही हे मात्र वास्तव आहे. शहराची स्वच्छता करणारे हे सफाई कर्मचारी कधीच कुणाकडून सत्कार, गौरवाची अपेक्षाही करत नाहीत. शहराची सफाई करणाऱ्या कामगारांचा यापुर्वी कधीच सत्कार झाला नाही. मात्र देशात लॉकडाऊन असतांना नित्य नियमाने शहरातील विविध भागात साठलेला कचरा साफ करणाऱ्या सफाई कामगारांचे सत्कार सोहळे आयोजीत केले गेले. शहरातील सफाई कामगारांना मिठाई वाटून तसेच शॉल देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. लोंकांनी त्यांच्या गळयात पैशांच्या माळा तर कुठे त्यांच्यावर फुलांचा वर्षावही करण्यात आला. कोराना युद्धात त्यांनी दिलेले योगदान लक्षात घेता सफाई कामगारांच्या हाताचा सत्कार केल्याने सफाई कामगार अक्षरश: भारावून गेलेत. सत्कारानंतर त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता. त्यामुळेच आपण आणि आपले शहर हे आरोग्याच्या दुष्टीने स्वच्छ आणि सुरक्षित होतो.

कोरोनाच्या संकटाविरूद्ध जगभर वैद्यकीय, पोलीस, प्रशासन आणि सामाजिक स्वयंसेवी संस्था अहोरात्र लढत आहे. मुख्यमत्री, आरोग्यमंत्री, पोलीस यंत्रना, आरोग्य विभागातील सेवक यांनी जो जिव लावून कारोना युद्धात काम केले त्याला तोड नाही त्याबद्दल लोकांच्या अंत:करणात कायमची कृतज्ञता राहील. तसेच राज्यात कोरोना विषाणूचा प्रसार वाढत आहे. याचा मुकाबला करण्यासाठी शासन सर्वतोपरी प्रयत्न करत आहे. त्यासाठी नागरिक, व्यापारी, उद्योजक व इतर व्यावसायिक ही या संकटाबरोबर लढण्यासाठी सज्ज होऊन आपापले योगदान देत आहेत.

जगभर थैमान घालणाऱ्या कोरोनामुळे सर्वच व्यवसाय ठप्प होऊ लागले आहेत. कोरानामुळे देशातील आर्थिक व्यवसायांची परिस्थिती बिकट झाली आहे. कोरोनाचा प्रसार थांबविण्यासाठी लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे आर्थिक संकटाने आपले डोके वर काढले आहे. त्यामुळे लोकांचा जीव व अर्थव्यवस्था अशा दोन्ही गोष्टीवर चिंता वाढली आहे. याचा इतर व्यावसायाबरोबरच हॉटेल व्यवसायाला देखील याचा मोठा फटका बसला आहे. अनेक मोठया ठिकाणचे हॉटेल्स ओस पडली आहेत. काहींनी अॅडव्हांन्स केलेले बुकिंग रद्द केली आहेत. हॉटेल व्यवसायातील घट लक्षात घेता कोरोनाचे संकट लवकर टळले नाही तर हॉटेल व्यवसायाला आणखी फटका बसणार आहे. एवढेच नाही तर ज्या हॉटेल व्यवसायावर अवलंबून असणारे अन्य व्यवसायीक देखील अडचणीत आले आहेत. जवळपास हॉटेल व्यवसायावर २० लाखांपेक्षा जास्त लोक अवलंबून असल्याने ते देखील बेरोजगार झाले आहेत. हॉटेल व्यवसायाची अशीच अवस्था राहिली तर येत्या काही दिवसात हॉटेल बंद करावे लागणार आहे. मुबई व इतरही ठिकाणची बहुतांश हॉटेल ही स्वत:च्या मालकीची नसून त्यातील काही भाडयाची देखिल आहेत. आता या व्यवसायाची कोरोनामुळे वाट लागली असून हॉटेलचे भाडे आणि मेन्टेनंसचा त्यांना भुदंड सहन करावा लागत आहे.

कोरानाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे प्रत्येकच क्षेत्रावर त्याने आद्यात केला आहे. रोजंदारीवर काम करणारे मजूर, घरकाम करणाऱ्या बाया, शेती करणारे, शेतामध्ये काम करणारे मजूर, फेरीवाले, इतर दुकानदार या सर्वांच्यावर सकंटाचे आभाळ कोसळले आहे. सोबतच बरोजगारीचे प्रमाणही वाढले आहे. शिक्षणविभागावरही कोरोणाचा प्रभाव पडला आहे. विद्यार्थ्यांवरही परिक्षांचे ताण वाढले आहे. कोरानाच्या प्रभावामुळे सध्या ई–लर्नींग प्रमाण वाढलेले दिसून येत आहे. यात ज्यांच्याकडे मोबाईल, इंटरनेट व त्यासंबधित अत्याधुनिक तंत्रज्ञानाची साधणे उपलब्ध नसणाऱ्या सर्वसामान्य विद्यार्थ्यांमध्ये न्युनगंडाची भावना निर्माण झाल्याचे दिसत आहे. हे संकट आणखी किती दिवस राहणार काहीच सांगता येत नाही. त्यामुळे कोरोनात जगण्याची सवय लावणे आश्यक आहे त्यासाठी आपणास आपल्या आरोग्याकडे शिेष लक्ष देऊन आपली रोगप्रतिकारक शक्ती कशी वाढविता येईल याकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे. हा सर्वताण दूर करण्यासाठी सर्वांनी सकारात्मक दृष्टीकोण ठेवून स्वत:च्या मनावर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी सर्वांनी रोज मेडिटेशन व योगासनाचा आधार घेणे हिच काळाची गरज आहे. कारण कारोना हा इतक्या सहजासहजी स्वत:हून जाणारा पाहूना नाही तर त्याला सर्वांमिळून पळवून लावायचे आहे. त्यासाठी खालील खबरदारी घेणे आवश्यक आहे.

**लॅाकडाऊन नंतर येणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपाय :–** १. लॅाकडाऊनच्या हाळात अनेकांच्या नोकऱ्या जाऊ शकतात. किंवा पेमेंट कमी होऊ शकतो. २. कोरोनामुळे अनेकांचे बिझनेस अडचणीत येऊ शकतात किंवा आपली प्रॉफिट कमी होऊ शकते. ३. एक जॉब गेल्यानंतर दुसरा जॉब मिळणे कठीण होऊ शकते. ४. यात शासणची कोणतीही चूक असणार नाही. ५. कोरोनामुळे घडणाऱ्या जागतिक घडामोडिंचा तो दुष्परिणाम असणार आहे. ६. आपले लिव्हिंग स्टॅंडर्ड डाऊन होऊ शकते. ७. कोरोणाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे एखादेवेळेस आपल्या जेवणाचे सुद्धा वांदे होऊ शकतात.

**यासाठी आपण कोणते उपाय करायला हवेत–** १. कोणत्याही परिस्थितीला सर्वांनी संयमाने तोंड द्यायचे आहे. २. कोणतेही काम करण्याची आपणास लाज बाळगायची नाही. ३. फोरव्हिलर व टूव्हिलरचा वापर कमी करून सायकल व पायी चालणे यावर भर द्यावा लागेल. ४. पुन्हा आपणास गरिबीत राहण्याचा प्रसंग उद्भवू शकतो. ५. घरचे समारंभ अगदी साधेपणाने व घरच्या घरी करावे लागतील. यासोबतच इरही प्रसंगाचा सामना करावा लागणार आहे.

आजपर्यत कुणीही एकमेंकांचे तोंड बंद करण्याची हिमत केली नाही पण एका विषाणूमुळे हे चित्र आपणास पहावयास मिळाले आहे. या काळात प्रत्येकाने एकजूट कायम ठेवली तर आपला देश नक्कीच कोरोनाच्या संकटावर मात करून असा आशादायी विचार करता येईल. केंद्र व राज्यसरकार तातडीने यापासून नागरिकांचा बचाव व्हावा व कोरोना विषाणूचा मोठया प्रमाणात पसरणार नाही यासाठी सर्व निर्णय घेत आहे. सरकारच्या या सर्व प्रयत्नांत आपण त्यांचे कर्मचारी आणि नागरिक म्हणून सहकार्य करणे आवश्यक आहे.


संदर्भ : –

१. दैनिक वृत्तपत्र पुण्यनगरी, २० मार्च २०२०

२. दैनिक वृत्तपत्र लोकमत, १२ व २१ मे २०२०

३. दैनिक वृत्तपत्र सकाळ, १० व १७ मे २०२०

४. दैनिक वृत्तपत्र लोकशाही वार्ता, २० मे २०२०

५. दैनिक वृत्तपत्र तरूण भारत, २३ मे २०२०


# कोरोनाचे संकट, स्थलांरीत मजूरांपुढील आव्हाने व सरकारचे धोरण

**डॉ. सविता भाऊराव चिवंडे**, सहाय्यक प्राध्यापक, कॉलेज ऑफ सोशल वर्क, कामठी

कोरोना संकट हा जागतिक चर्चेचा आणि तेवढाच चिंतेचा विषय आहे. जगभरातील ठिकठिकाणी कारोना व्हायरसच्या संसर्गामुळे एकच दहशत माजली आहे. जानेवारीच्या मध्यापासून कोरोना हे नाव कानावर पडू लागले आहे. कोरोना हा एक भयंकर व्हायरस असून त्याने मनुष्यजातीवर आक्रमण केले आहे. चीनच्या 'वुहान' मध्ये सर्वप्रथम त्याचा रोगी आढळला आहे. वुहान याच भागात चीनची मोठी व सुसज्ज अशी राष्ट्रीय व्हायरॉलॉजीची प्रयोगशाळा मजबूत तटबंदीच्या सुरक्षितेत व तेवढयाच गुप्तपणे कार्यरत आहे. जगात महाशक्तीशाली राष्ट्रांनी एकमेकांवर कुरघोडी करण्यासाठी जी अतिविध्वंसक शस्त्रे बनविली आहेत तशीच घातक जैविक अस्त्रेही बनविल्याची भीती व्यक्त केली जात आहे कोरोनाची लागण जसजसी पसरू लागली तसतसे चीनमध्ये हाहाकार माजला. सर्वप्रकारच्या उपाययोजना आखूनही साथ आटोक्यात आणण्याचा चीनचा प्रयत्न असतांनाच इतरही देश त्याच्या कवेत येऊ लागले होते. जणू सर्व पृथ्वीच कोरानाने व्यापली व प्रचंड मनुष्यहानी होईल या भितीने डब्ल्यू.एच.ओ.ने याली 'महामारी' चा दर्जा देऊन टाकला. याच पार्श्वभूमिवर अनेक राष्ट्रांनी जसे चीन, हॉगकॉग, इटली, कोरीया, युरोपियन राष्ट्र व अमेरिकेने सर्वत्र आणीबाणी जाहिर केली.

चीनमध्ये उगम पावून संपूर्ण जगात पसरलेल्या या महामारीने आज संपूर्ण जगाला वेठीस धरले आहे. खरे तर मुळ कोरोना व्हायरस हा किटाणू तसा नवीन नाही. अनेक प्रकारच्या व्हायरसेसपैकी श्वसन संस्थेवर आक्रमण क्षमता ठेवणाऱ्यांपैकी एक आहे. सर्दी–पडशापासून ते फुफ्फुसाची पूर्ण चाळणी करण्याची क्षमता ठेवतो आणि हा व्हायरस मानवाच्या शरीराबाहेर वाढत नाही. तो माणसापासून माणसाला असा पसरवतो. आजही इतर रोगांमुळे मृत्युमृखी पडणाऱ्यांच्या तुलनेत कमीच आहे आणि ती वाढण्याची शक्यताही नाही. परंतु या रोगाची दहशत त्याच्या संसर्गाचा वेग आणि या रोगावर अजूनही खात्रीशीर इलाज उपलब्ध न झाल्याने वाढली आहे. सध्यातरी या रोगाचा प्रसार आणि प्रभाव रोखण्यासाठी संपूर्ण जगभर लॅाकडाऊन लागू करण्यास विलंब झाल्यामुळे तिकडे अर्थातच रूग्णांची आणि मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या अधिक आहे. त्या तुलनेत भारतात अजूनही परिस्थिती ही नियंत्रणात आहे, असे म्हणता येईल. पण सातत्याने वाढत चाललेल्या कोरोणाच्या कहरामुळे शहरवासीयांमध्ये दहशतीचे वातावरण पसरत चालले आहे. पूर्वी बाधित रूग्ण हे काही मोचक्याच परिसरातून आढळून येत होते. मात्र आता नवनवीन परिसरातून रूग्णाची संख्या वाढत चालली आहे. देशव्यापी लॅाकडाऊन असतांना देखील कोरोना संसर्गाचा आकडा वाढत असल्याचे दिसून येत आहे. कारोणाच्या पार्श्वभूमीवर जाहीर करण्यात आलेला देशातील लॅाकडाऊन ३१ मे पर्यंत वाढविण्यात आला आहे. व चौथ्या टप्याला सुरूवात झाली आहे.

कोरोनाचा उगम प्रथम चिनमधील एका शहरात झाल्यानंतर संपूर्ण शहर चिनने लॅाकडाऊन केले. पण या शहरात कोरोनाने किती प्राण घेतले याची आकडेवारा अजूनही जगासमोर आली नाही. त्यानंतर हा विषाणू चिनमधील अनेक शहरामध्ये अनेक भागात पसरला. इतकेच नाही तर इटली, फ्रान्स, अमेरिका, जर्मनी व युरोप खंडातील अनेक देशात थैमान घातले आणि त्यानंतर भारतात प्रवेश केला. आज संपूर्ण जगात असा एकही देश नाही कि तेथे कोरोना नाही. संपूर्ण जगाला त्याने वेढा घेतला आहे. हे म्हणने चुकीचे ठरणार नाही. ज्यावेळेच कोरोनाला सुरूवात झाली त्यावेळेस अनेक लोकांना व वैद्यकीय क्षेत्रातील काही तज्ञांनी असे अनुमान काढले की कोरोना भारतात जास्त काळ टिकणार नाही. कारण भारताचे तापमाण उष्ण असल्यामुळे कोरोना आला तसा निघून जाईल. परंतु दिवसेदिवस कोरोनाचा प्रसार वाढतच आहे. इतर देशांच्या तुलनेने भारतात कोरोना वाढीचे प्रमाण कमी आहे. पण असेच रूग्ण वाढत राहीले तर कठीण संमस्यांना सामोरे जावे लागेल. कोरोणाचा प्रसार वाढू नये म्हणून सरकारने लॅाकडाऊन केले. जस जसे कोरोनाचे प्रमाण वाढले तसतसे लॅाकडाऊन वाढविण्यात आले. सरकारने लॅाकडाऊन हाच एकमेव इलाज असल्याचे मानून पहिल्यानंतर दुसरी, दुसरीनंतर

तिसरी व तिसरी नंतर चौथी अशी लॉकडाऊनची साखळी सुरू झाली.

कोरोणाच्या प्रकोपाबरोबर स्थलांतरीत मजूरांच्या विपन्नावस्थेचा विषय चर्चेत आहे. दिल्लीप्रमाणे सर्व महानगरात आणि आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईत स्थलांतरीत मजूरांची संख्या लाखोच्या घरात आहे. स्थलांतरीत मजूर हे शहरातील अर्थव्यवस्थेचा, उद्योग—व्यवसायांचा ओझा आपल्या खाद्यावर वाहत होते. शहरातील शहरपण कष्टाने बहरत होते. तोवर सार ठिक होते. हे मजूर गाव सोडून जिथे कामाला आले तेथे ते राहत होते.कुठल्या गलिच्छ वातावरणात व अर्धपोटी राहत होते. त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्यविषयक व शिक्षणाच्या काय सुविधा होत्या याच शासणाला काहीही देण—घेण नव्हत. अशा या देशातील एकूण कामगारांपैकी ९६ टक्के असंघटीत मजुरांसाठी कामगार कायदे नाहीत. सामाजिक सुरक्षा नाही याबाबत कसलीही दखल घेतली जात नव्हती त्यामुळे कोरोनाच्या लॉकडाऊन मध्ये त्यांच्या मालकांना त्यांची गरज नसल्याचे लक्षात येताच ते रस्त्यावर फेकले गेले. या परिस्थितीत त्यांना घरी परतण्याची कुठलीही संधी मिळाली नाही. शासणाने केवळ ३—४ तासांचा अवधी देऊन देश बंद करून टाकला. आणि हे सारे मजूर आहे तेथेत अडकून पडलेत. त्यांनी पहिला २१ दिवसांचा लॉकडाऊन तग धरून काढला परंतु पुन्हा १४ दिवसांचा लॉकडाऊन सुरू झाल्यावर मात्र त्यांचा संयम संपला. भुकेची कोंडी झाली अन्न, निवारा देऊ म्हणणाऱ्या शासणाकडे ठोस नियोजन नाही. त्यांची स्वत:ची भाकरीसाठीची तडफड व गावाकडील राहिलेल्या कुटुंबीयांचे काय? या काळजीने हैराण झालेले मजूर घराच्या ओढीने चालायला लागला.

मुंबईसारख्या दमट शहरात, कडक उन्हाच्या दिवसात, कामधंदा न करता कुठल्या तरी गैरसोयीच्या ठिकाणी नुसतेच पडुन राहणे हे तुरूंगवासाच्या शिक्षेहून वेगळे नाही. झालेली व्यवस्था गोड मानून आणि सरकारच्या शब्दावर विश्वास ठेवून इथले कष्टकरी दिवस ढकलत राहिले. परंतु लॉकडाऊन उठण्याचे नाव दिसेना आणि सरकारकडून कोरडया दिलासेपलीकडे काही मिळेना म्हटल्यावर लोकांचा धिर सुटू लागला. दीड महिन्यानंतरही सरकारचा ठोस निर्णय होत नसल्याचे पाहून त्यांचा संयम सुटला आणि लोक हिंमत करून पोरांहीत संसाराचे ओझ डोक्यावर घेऊन पायीच गावाकडे निघाले. या मजूरांची दैना व जीवघेणा प्रवास सुरू झाला. स्थलांतरीत मजूरांच्या देखभालीची व उदरनिर्वाहाची व्यवस्था स्वयंसेवी संस्थांवर सोपवून सरकारणे आपले हात झटकले. दिल्लीतील मजुरांच्या पाठवणीनंतर लॉकडाऊनचे नियम कडक करण्यात आले. पोलिसराज सुरू झाले. कुठे सरकारणे, कुठे स्वयंसेवी संस्थांनी मजुरांच्या जेवनाची व्यवस्था केली. परंतु ही समस्याच एवढी विक्राळ आहे की कोणतीही यंत्रणा त्यासाठी पुरी पडणारी नव्हती. लॉकडाऊन नंतरही कोरोना प्रकोप वाढत गेला. पाणी पुरीची गाडी चालविणारा किंवा चणे—फुटाणे विकणारा साठवून बाजूला ठेवलेल्या पैशांवर पोटाची खळगी किती दिवस भरू शकणार. ते तरी बिच्चारे काय करणार. कोरोनाच्या आधी भूकेने प्राण जाण्याचे भीषण वास्तव त्यांना डोळयापुढे दिसत होते. आज सैरभर निघालेला मजूर रस्त्यावर दिसतील. त्याग हा मजूरांनीच करावयाचा आहे. अंदाजे एक कोटी मजूर अद्यापही रस्त्यावर आहेत. पोटापाण्यासाठी स्थलांतरीत झालेले मजूर कामाला राहतात. गेल्या काही दिवसांपासून घरात राशन नसतांना नैराश्याच्या गर्तेत अडकलेल्या एका स्थलांतरित कामगारानं राहत्या भाडयाच्या घरात गळपास लावून आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. जेव्हापासून कोरोना महामारी सुरू झाली तेव्हापासून या कुटुंबाना कोणतंही काम मिळालं नाही. कोरोणामुळे अवध्या दिड महिण्यात सर्वस्व गमावणाऱ्या परप्रांतिय मजुरांनी मोठया शहरातून काढता पाय घेण्यास सुरूवात केली. कधी पायी, सायकल, मोटारसायकल, तर कधी दुधाच्या टॅकरमधून जीवघेणा प्रवास करून आपले गाव गाठण्याचा प्रयत्न करीत होते. हे आत्मघातकी आहे. हा धाडसी प्रवास स्वत:सोबतच आपल्या कुटुबियांचा जीव धोक्यात आणणारा आहे. गेल्या काही दिवसात पोलिसांच्या परवानगीविना मजूरांना त्याच्या राज्यात घेऊन जाणाऱ्या अशा कित्येक गाडया पकडण्यात आल्या मात्र आपल्या गावी जाण्यासाठी आतूर झालेल्या परप्रांतीय मजुरांना रोखता येणे सरकारला जड जात आहे. परप्रातीय मजूरांचे लोढे दिवसा—रात्री महामार्गावरून त्यांच्या गावाकडे निघाले. निघाल्यानंतरचे दृष्य दररोज पहावयास मिळत आहे. आपल्या गावाकडे अनधिकृत मार्गाने पायी निघालेल्या या लोंढयांना रोखणार तरी कसे असा प्रश्न निर्माण झाला होता.

काही तरूण, वृद्ध, गरोदर बाया, मुलं आपलं घराच्या ओढेणं पायी निघाले, प्रवासात खाण्या—पिण्याचे साहित्य आणि पैसे संपले समस्या वाढतच चालल्या होत्या प्रवास सपंल्या सपंत नव्हता. ४० अंशापेक्षा जास्त ऊन आणि तापलेल्या रस्त्यावर त्यांच्या खाद्यावर ओझे मजूर आणि गरजूंची स्थिती दर्शवीत आहे. जे मजूर वर्षानुवर्ष शहरे, राज्यांमध्ये आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी आले होते. कामधंदा नसल्याने पैसे नव्हते स्वत:ला व कुटुंबियांना खाऊ घालण्याचा प्रश्न निर्माण झाला होता त्या हजारो लोकांना कोरोनामुळे घरी परतावे लागले. हैद्राबाद ते बालाघाट अशा पायी प्रवासाला कामगारांचे कुटुंब निघाले मात्र चार वर्षाच्यालहानग्या मुलाला प्रवासाचा शीण आाणि तापते ऊन असह्य झाल्यामुळे रस्त्यातच तो कासावीस झाला. आईवडीलांनी रस्त्यावरून जाणाऱ्यांना मदत मागीतली मात्र आसवे पुसायला जवळ ना नातेवाईक ना कुणी हितचिंतक अखेर अश्रूंना बांध घालून त्यांनी नदीकाठवरच खड्डा केला. यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा तालुक्यातील पिपलखुंटी ते पाटण बोरी या दरम्यानची ही घटना. हजार—दोन हजार किलोमिटर लांब असलेल्या घराकडे उपाशी, पायी निघाले आहेत. देशात ज्यागतीने कोरोनामुळे मृत्युचा आकडा वाढतो आहे. त्याच गतीने मजूर रस्त्यावर चिरडले जात आहे. कित्येक वाहणाने मजूर चिरडले जात आहे. असा एकही दिवस गेला नाही. लॉकडाऊन देशभरातील सुमारे ४०० मजूर चिरडले गेलेत. अनेकांच्या अंगात त्राण नाही आणि पोटभर अन्नाचा कण नाही. भरउन्हात अनेक मजूरांनी घरी पोहोचण्या आधीच अंतिम श्वास घेतला आहे. दुधा अभावी लहान मुलांना प्राण त्याग करावा लागला आहे. शेकडो किलोमीटर पायी जाणारे मजूर आपल्या आजोबाला ३५० कि.मी डोक्यावर वाहून आणणारा नातू, वृद्ध, आजारी आई—वडीलांसाठी काही मजूर श्रावणबाळ झाले, सुरतहुन २२५ कि.मी अंतर चालून येऊन जळगाव येथे बाळतींन होणारी महीला, पायाला पिशवी बांधून चालणारी बालके त्यांचे हाल पहावत नव्हते. कित्येक मजूर वाटेत मृत्यमुखी पडलेत.परंतु यामागची वेदना समजायला ७ मे ची पहाट उजाडावी लागली. प्रवासाची शाश्वती नाही व मालक पगार देणार नाही म्हणून वैफल्यातून जालण्यापासून ४० कि.मी चालून औरंगाबादजवळ सटाणा शिवारात विसाव्यासाठी रेल्वे मार्गाचा आधार घेणाऱ्या रूळावर १६ मजूरांना माल गाडीने चिरडले. क्षणार्धात त्यांच्या खांडोळयाच केल्या. रेल्वेखाली चिरडल्याने बळी गेल्यावर

जादा गाडया सोडण्याची घोषण होऊ लागली शिवाय रेल्वे दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या मजूरांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहाय्यता निधितून प्रत्येकी ५ लाख रूपये देण्याची घोषणाही मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली.

झारखंड तसेच उत्तर प्रदेश मध्ये जाणाऱ्या १३ परप्रांतीय मजूरांना मुंबईतून भिवडीला घेऊन जाणाऱ्या ऐका टेम्पोला दिनांक १३ मे ला सायंकाळी ठाण्याच्या सकॅडगरी उड्डान पुलावरून उतरल्यावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने टेम्पो पलटी झाला. यात आठ मजूर व चालकाचा अपघात झाला. दि. १९ मे २०२० ला सोलापूर वरून नागपूर येथे स्थलांतरीत मजुरांना घेऊन जाणारी बस टिप्परला आदळल्याने झालेल्या अपघतात चार मजूर ठार झालेत. या मृतकांमध्ये सोलापूर येथील बस चालक, छत्तीसगडच्या दोन महिला. झारखंड येथिल एकाचा समावेश होता. यवतमाळ जिल्हयातील आर्णी तालुक्यातील कोळवण येथेही १९ मे ला ३ ते ४ च्या दरम्यान अपघात झाला. बसमध्ये दोन चालक ३० प्रवासी असे एकूण ३२ जण प्रवास करित होते. यात १९ जण झारखंडचे, छात्तीसगडचे ८ आणि मध्यप्रदेशचे ३ मजूरांचा समावेश होता. इकडे प्रवासाची सुट मिळाल्या नंतर हजारो मजूर शेकडो कि.मी पायपीट करत घरी परतत आहे ज्यांना रेल्वेत प्रवेश मिळाला. त्यांनतरही तिकिटीचे पैसे स्वत:ला मोंजावे लागले. विरोधी सत्ताधारी पैसे कोण देणार यावर भांडण राजनिती करत होते. देशभरात पायी जाणाऱ्या कित्येक मजूरांनी वाटेतच प्राण सोडले आहेत तर काहींनी आत्महत्या केली. तरीही उत्तर प्रदेश, ओडीसा, पं.बंगाल आपल्या राज्यातील जे महाराष्ट्रात मजूरी करतात त्यांना घ्यायला नकार दिला. केंद्र सरकार २/३ रेल्वे सोडायला परवानगी देत होते.

देशभरात पहिला लॉकडाऊन जाहीर झाला. तेव्हा मुंबईत कोरोणाचे अवघे शंभर रूग्ण होते. त्यावेळी राज्याच्या विविध भागात जे लोक मुंबई–पुण्यात अडकले आहेत आणि त्यांना गावाकडे जायचे आहे. त्यांना पाठविणे सोयीचे वाटले नाही. मात्र त्यावेळी ते सरसकट हातावर हात बांधून बसले. पंचेचाळीस दिवसांच्या टाळेबंदीनंतर मुबईतील कोरोनाग्रस्तांचा आकडा अकरा हजारांच्या पुढे गेला. तरी मुबईतील अडकलेल्या राज्यातील हजारो नागरीकांचे काय करायचे याबाबत सरकारचा निर्णय झालेला नव्हता. म्हणून मजूर मिळेल त्या मार्गाने गावाकडे धावत सुटले. कधी पोलिसांच्या नजरा चुकवून तर कधी आडमार्गाने जसं जमेल तसं व त्या मार्गाने हे स्थलांतरीत मजूर पायपीट करीत गावाला जायला निघाले. केंद्र सरकारने व राज्य सरकारने मोठे मोठे दावे केले. या देशातील लॉकडाऊन दरम्यान कोणीही उपाशी राहणार नाही, पण वस्तुस्थिती ही आहे की लोकांना उपाशी राहावं लागतं आहे. आत्महत्या करावी लागत आहे. हे नव्या भारतांच विदारक चित्र सध्यातरी अवतीभवती बघायला मिळत आहे.

काही ठिकाणी लॉकडाऊनच्या काळात लाखो मजुर आपल्या गावला न जाता जेथे प्रशाषणाने घेरले तेथेच बसून आहेत. त्यांना रोजगार नाही. घरी जाता येत नाही. जवळ पैसा नाही. होता नव्हता पैसा खर्च झाला. समाजसेवी संस्था व सरकारकडून दररोज मिळणाऱ्या अन्नावर कसा बसा जिवन जगत आहे. पण असेच सुरू राहीले तर अनेकांचे जिवन जगणे कठीण होईल. मोठमोठया महानगरातील कामगार सध्या बेरोजगार झाले आहे. अमेरिका, दुबई तसेच आखाती देशांमधून अनेक लोक मायदेशी परत आलेले तरूण अजूनही बेरोजगार झाले आहेत .सध्यातरी भविष्याचा वेध घेता येत नाही. ग्रामीण शहरी उद्योग ओस पडले. लॉकडाऊन उठल्यानंतर कोणीही उघोगपती अथवा मालक एकदम आपले उद्योग एकाएकी सुरू करणार नाहीत येणारा काळ कसा असेल व काळाच्या गाभाऱ्यात काय असेल याची स्पष्ट भविष्यवाणी करणे कठीण आहे.

लॉकडाऊन मुळे या कामगारांपुढे चारितार्थाचे मोठे संकट उभे ठाकले होते. लॉकडाऊन नंतर काय परिस्थिती असेल? हे काळच ठरवेल, पण सध्या या मजूरांची स्थिती आभाळ कोसळल्यागत झाली आहे. सर्वकाही ठप्प असल्याने त्यांचीही रोजी–रोटी पूर्णपणे बंद झाली आहे. त्यांना कोरोनाने नव्हे तर उपासमारीच्या चितेने ग्रासले आहे. त्याना पाहीजे ती मदत करण्याचे सरकार सांगत आहे. पण दोनवेळचे अन्न मिळाल्याने त्यांच्या भग्न मनांना दिलासा मिळणार नाही गावांकडे असलेल्या त्याच्या कुटुंबापर्यंत सरकारचा मदतीचा हात थोडाच पोहोचणार आहे. परप्रांतीय मजूर आपल्या राज्यात गेल्यावर सहजासहजी परतण्याची हिंमत करणार नाही महाराष्ट्रामध्ये प्रामुख्याने छत्तीसगड, मध्यप्रदेश येथील मजूर शेतीच्या व रस्त्याच्या बांधकामाकरिता ग्रामीण भागात, तर बिहार व इतर प्रदेशातील मोठया शहरात छोटे व्यवसाय व मजूरीकरिता येतात.

सन २०१८ मध्ये देशातील श्रमिकांच्या सर्वक्षणाचा जो अहवाल प्रसिद्ध झाला होता त्यानुसार जरा ही आकडेवारी पाहीले असता असे लक्षात येते की, देशात एकुण ४६ कोटी ५० लाख श्रमिक होते. त्यापैकी ५२ टक्के स्वयंरोजगार करणारे व २५ टक्के पोटासाठी भटकंती करणारे मजूर होते. आणखी १३ टक्के श्रमीक असंघटीत क्षेत्रात काम करतात. कायमस्वरूपी रोजगार असलेले केवळ १० टक्के आहेत त्यामुळे लॉकडाऊन मुळे बहुतांश श्रमिक वर्गास तीव्र झळ पोहोचणे ओघ्राने आलेच. सन २०१७ मधील बिहरीमधील एका सर्वेक्षणानुसार त्या राज्यातील सुमारे ५० लाख लोक मुबई दिल्ली, अहमदाबाद, सूरत, कोलकत्ता व पंजाबच्या अनेक शहरांमध्ये जाऊन मोलमजूरी करतात उत्तरप्रदेशमधूनही लाखो लोक पोटापाण्यासाठी त्या राज्यात गेलेले आहेत व्यक्तिश: मजूरी कमी असली तरी देशाच्या अर्थव्यवस्थेत या कामगारांचा वाटा खूप मोठा आहे हे मान्य करावेच लागेल.

देशव्यापी लॉकडाऊन लागू करतांना या स्थलांतरित व पाठीवर बि–हाड असलेल्या मजूरांचा अजिबात विचार केला गेला नाही. संपूर्ण देशातील व्यवहार पूर्णपणे ठप्प केल्यावर या कामगारांवर काय संकट कोसळले? याचा आधी विचार करण्याचे काम वरीष्ठ अधिकाऱ्याचे होते. परंतु त्यांनी त्याचा विचार केला नाही. त्याचाच परिणाम म्हणून दिल्लीहून उत्तर प्रदेश, बिहारकडे शेकडो किलोमिटर चालत हजारोमजुरांचे तांडे निघाल्याचे विदारक चित्र पाहणे देशाच्या नशिबी आले.

फाळणीनंतर पहिल्यांदा एवढया मोठया प्रमाणात लोक स्थलांतरीत झाले आहेत. मा. निर्मला सितारामन यांनी स्थलांतरीत मजूरांना रेशनकार्ड नसले तरी दोन महिण्याचे धान्य, मनरेगाच्या कामावर मजूरी व राहण्यासाठी त्यांना जिवंत ठेवावे लागेल. त्यांची तत्काल गरज करावयाची आहे हि बाब दुर्लक्षित करण्यात आली. गेल्या ६० दिवसांपासून मजूर घरी जाण्यासाठी टाहो फोडत आहे. हा आक्रोश सरकारच्या कानावर पडत नाही आहे. टाळेबंदीच्या प्रारंभीक काळात लाखो लोकांना अन्नाचे, अत्यावश्यक वस्तुंचे वाटप केले असे सांगत त्या मजूरांचे फोटो समाजमाध्यमांवर टाकणारे समाजसेवक हे आता रस्त्यावर मजुरांची सेवा करतांना सेवा करतांना दिसत नाहीत. गावाकडे निघालेल्या मजूरांची सेवा करतांना दिसत नाहीत. गावाकडे निघालेल्या मजूरांसाठी रस्त्याच्या कडेला प्याऊ उभारण्याची, त्यांना अन्न देण्याची आणि त्यांना त्यांच्या गावांपर्यंत

पोहोचविण्यासाठी यंत्रणा सरकार उपलब्ध करू शकले नाही. इथे 'हयुमन डेव्हलपमेंट इंडेक्स' कुणीही लक्षात घेतला नाही. भारतात हा 'इंडेक्स' कुणीही लक्षात घेतला नाही. भारतात हा इंडेक्स नेहमी दाबलेला आहे हे क्रूरपणाचेच दर्शन होत गेले.

लॉकडाऊनमुळे परदेशात अडकलेल्या भारतीयांना मायदेशी आणण्यासाठी भारत सरकारणे 'वंदे मातरम' हे अभियान हाती घेतले. या अभियानातून विमानाने मुंबईत आणल्या जाणाऱ्या परदेशातील या नागरिकांना भारतात आणले जात आहे. काही भारतीय आले देखिल. लॉकडाऊन घोषित व्हायच्या आधी देखील भारतीयांना विदेशातून आणण्याची सोय करण्यात आली होती. सरकारने तशी व्यवस्था केली होती. मात्र लॉकडाऊनच्या काळात देशांतर्गत अडकून पडलेल्या स्थलांतरीत मजूरांना त्यांच्या गावी पोहोचवून देण्यासाठी सरकारला तशी व्यवस्था करता आली नाही. सरकारने तत्परतेने स्थलांतरीत मजूरांना त्याच्या मुळ गावी पोहचण्याची व्यवस्था केली. ती देखील नियोजन शून्य तितकीच तोकडी व विवेकशून्य होते. मात्र 'वंदे भारत' या अभियानातून जहाज आणि विमानातून या नागरिकांना भारतात आणले. इंग्लंड, अमेरिका, मलेशिया, सिंगापूर, बांगला देश आणि फिलिपिन्स येथून हे नागरिक येणार होते. त्यांच्यासाठी हॉटेलातं या खोल्या बुक केल्या. विदेशातून येणारे श्रीमंत आहेत. त्यांची विशेष व्यवस्था सरकार करू शकते. मात्र देशाचा कणा असलेल्या मजूरांची व्यवस्था मात्र सरकार करू शकत नाही हे मात्र दुर्दैव्य.

देशातील बॅकांना लुटून विदेशात पळालेल्या हजारो कोटी रूपये माफ करण्याचे औदार्य सरकार दाखवते मात्र ज्यांच्या बोटावरील शाईने हे सरकार सत्तेत आले त्यांच्याबाबत जराही कणव नसावी हे मात्र दुदैव आहे. गंल्या वर्षी लोकसभेच्या निवडणूका झाल्या, तेव्हा आज जे रस्त्यावर आहेत त्या सर्वांनाच कुटुंबासहीत मतदानासाठी त्यांच्या राज्यात नेण्यात आले. तेव्हा रेल्वे बसच्या खर्चाची चिंता नव्हती. मतदानाचा अधिकार बजावून लोकशाही मजबूत करू या! असे ज्ञान या श्रमिकांपुढे पाजळले. तुमच्याबद्दल आमच्या मनात किती आदर आहे याचे यथोचित नाटकही झाले. या लोकांची खाण्याची उत्तम व्यवस्थाही केली. खिशातून एक रूपयाही खर्च न होता त्यांना गावी जाता आले. परत निघतांना घरातील लोकांना दोन–चार हजार रूपये देण्याचे कर्तत्वही त्यानी बजावले. आताही लोक तेच आहेत मात्र चित्र वेगळे! आता निवडणूका नाहीत त्यामुळे लोकशाही बळकटीचे स्वप्न दाखविण्याची गरज नाही. या मजूरांची अपेक्षा खुप नाही. त्यांना त्यांच्या घरी सुखरूप पोहोचायचे आहे. परंतु हे मजूर सरकारसाठी दुय्यम आहेत.

देशातील लधु, सुक्ष्म आणि मध्यम उद्योगांची काय स्थिती आहे. हे नव्याने सांगण्याची गरज नाही. २०१६ पासून दरवर्षी २० हजार कंपण्या दिवाळखोरीत निघत आहे. टाळेबंदीमुळे आता देशातील ९० टक्के उद्योग बंद आहेत. देशाची अर्थव्यवस्था रूळावर आणायची असेल तर तर उद्योग सुरू करण्याशिवाय पर्याय नाही. सरकारचे नवे पॅकेज यासाठी संजीवनी ठरण्याची शक्यता आहे. परंतु हे तेव्हाच साध्य होऊ शकते जेव्हा श्रमिक कामावर येतील. ज्या मजूरांना सरकारणे वाऱ्यावर सोडले ते सरकारच्या हांकेला ओ देतील अशी सद्य: स्थिती नाही. दुसरीकडे उद्योगांपुढे मजुरांचा प्रश्न निर्माण झाला आहे. देशाची अर्थव्यवस्था खऱ्या अर्थाने श्रमिकांच्या खांद्यावर आहे. परंतु त्याची कधीही नोद होत नाही. उलट उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, राजस्थान, गुजरात, पंजाब, महाराष्ट्र आदि राज्यात श्रमिकांच्या कायद्यात बदल केलेत. काही राज्यात श्रमिकांना १२ तास काम करावे लागेल व वेतन मात्र ८ तासाचे दिले जाईल देशातील ७० टक्के मजूर हे दुकान व आस्थापना कायद्यांतर्गत काम करतात. त्यांचे कामाचे तास वाढवून १८ तास केलेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मसुदा तयार करतांना श्रमिकांच्या कामाचे तास कमी करत ८तासांवर आणले. परंतु मजुरी कमी कमी होणार नाही याची काळजी घेतली. इथे उलट झाले उत्तर प्रदेशात श्रम कायद्यातील ३८ पैकी ३५ तरतुदी तीन वर्षासाठी निलंबित करून श्रमिकांना लाचारीचे जिवन जगण्यास भाग पडले. त्यांना केव्हाही कामावरून कमी केले जाईल व दाद देणारा कायद्या सोबत नसेल. १९१९ मध्ये आंतरराष्ट्रीय श्रमिक संघटनेची स्थापना झाली. भारतही या संघटनेचा संस्थापक सदस्य आहे. श्रमिकांना न्याय देण्याचे, त्यांचे जीवन उंचावण्याचे काम संघटनेने केले आहे. कायद्यातील बदल हे सगळेच संपले.

कोरोना संकट संपल्यावर पुन्हा पोटासाठी शहराकडे किती मजूर परततील हयाची शक्यता वर्तविता येत नाही. लॉकडाऊन नंतर पहिल्यापेक्षा जास्त शोषण करणारी गुलामीच असणार आहे. हे नक्की. यामुळे शासणाने या असंघटीत मजुरांसाठी निश्चिीत असे लोककल्याणकारी धोरण व कायदे तयार केले नाहीत. तर संघर्ष अटळ आहे. शासन या मानसिकतेत नाही. हेही उघड असल्याने मजुरांच्या हक्काची लढाई उभी राहणार राहणार.

एक दिवस नक्की असा येईल ज्या दिवशी कोरोनाचा एकही नवीन रूग्ण नसेल. या सगळया परिस्थितीत पॉझिटिव्ह थिंक्रिंग हीच आपल्यासाठी इम्युनिटी बुस्टरचे काम करणार आहे. शिवाय घरच्यांची सुरक्षितता ही जपायची आहे. या सगळयामध्ये आपल्याला कोरोनाला हरवायचे आहे. माणुसकीला नाही. हे प्रत्येकाने लक्षात ठेवायला हवे. परंतु सध्याच्या जीवनशैलीत परिवर्तन जाणवत आहे. कोरोनामुळे लोकांना आता एकमेकांपासून अंतर राखण्याची सवय लागत आहे. आणि हिच सवय जर दैनदिन आयुष्याचा भाग बनली तर अनेक आघात सहज टाळतील.शेवटी असेच सागांवेसे वाटते अंधार करून मावळणारा सुर्य पुन्हा नवीन दिवस घेऊन उगवतो, तसेच कोरोना वायरसचे हे संकट सुद्धा दूर होईल.

**संदर्भ: –**


१. दैनिक वृत्तपत्र पुण्यनगरी, २० मार्च २०२०.
२. दैनिक वृत्तपत्र सकाळ, २३ मार्च २०२०.
३. दैनिक वृत्तपत्र लोकमत, ९,१२ मे २०२०.
४. दैनिक वृत्तपत्र लोकमत, १४, १६ मे २०२०.
५. दैनिक वृत्तपत्र सकाळ, १० मे २०२०.
६. दैनिक वृत्तपत्र युवाछत्रपती, १४ मे २०२०.
७. दैनिक वृत्तपत्र लोकशाही वार्ता, १४ मे २०२०

# कोरोना व सामाजिक समस्या एक अध्ययन

**डॉ. नागसेन नामदेव मेश्राम**, सहयोगी प्राध्यापक व भूगोल विभाग प्रमुख, एस. बी. कॉलेज, अहेरी. मो. ९४२२८३२७१६

**सारांश:** जागतीक महामारी कोरोना या विषाणुमुळे संपूर्ण जगाला वेठीस धरले आहे. संपूर्ण जग या महामारीपुढे हतबल झालेला आहे. चिनच्या वुहान शहरातुन त्यांच्या जैविक प्रयोग शाळेतुन बाहेर कसा आला...? तो निर्माण करण्यामागचा चिनचा उद्देश काय...? तो बाहेर पडल्यावर निर्माण झालेली भिषण परिस्थिती लाखो लोकयांमुळे बाधीत झाले आहेत. संपूर्ण जग आधुनिक ज्ञान – विज्ञान, तंत्रज्ञान, माहिती तंत्राज्ञानाच्या युगात वावरत असतांना यातुन सावरण्यासाठी वैद्यकिय क्षेत्रात सतत संशोधन सुरू आहे. प्रत्येक देश आपापल्या पद्धतीने प्रयत्नशिल असुन प्राचिन काळापासुन अद्यावत असलेली उपचार पद्धतीपासुन यांची सुरूवात करावी लागत आहे. आयुर्वेद युनानी, होमोयोपॅथी, चरक संहिता, चिंनची उपचार पद्धती अमेरिकेची उपचार पद्धती, सर्वच पद्धतीवर प्रश्न चिन्हे निर्माण झाली आहे. या महामारी पुर्वी जगात अनेक नैसर्गिक संकटे आली आहेत. प्लेग, देवी, कॉलरा, मलेरिया, डायरिया, न्युमोनिआ, कॅन्सर, एड्स, अबोला, सारी आणि आता कोरोना (कोवीड–१९). दुष्काळ, भुकंप ज्वालामुखी, चक्रवातीय वादळे, सुनामी, पहिले महायुद्ध, दुसरे महायुद्ध, अमेरिकेकडुन जपानवर झालेला बॉम्ब हल्ला, इराक – इराण युद्ध, अमेरिका व इराक देशातील अंतर्गत युद्ध अमेरिकेवर ओसामा बिन लादेन यानी केलेला विमान हल्ला, भारतावर सुरू असलेले आत्मघाती हल्ले, मुंबईवर झालेला हल्ला, आतंकवाद, दहशत्वाद, नक्षलवाद, आखाती देशात सुरू असलेले छुपे हल्ले, उत्तर कोरिया, दक्षिण कोरिया , चिन भारत, भारत पाकिस्तान, यांच्यातील युद्धामुळे देशाबरोबर जगाची आर्थिक व्यवस्था खिळखीळी होत असते त्याचा दुरगामी परिणाम हा सामान्य जनतेवर होत असतो. लोकांना अन्न, वस्त्र, निवारा, सामाजिक सुरक्षा, शिक्षण, आरोग्य व सुखमय जिवन जगण्यासाठी सुरक्षीत ठिकाणाची गरज असते त्यामूळे लोक एका ठिकाणाहुन दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करीत असतात यामध्ये असंघटीत क्षेत्रातील लोकांचे पर्यायाने मजुराचे फार हाल होतात. त्यातुन अनेक सामाजिक प्रश्न निर्माण होतात कोव्हीड १९ च्या नंतर जगात टाळेबंदी (लॉकडाऊन) मुळे अशा समस्या निर्माण झाल्या आहेत.

**बिज संज्ञा** Keyworlds**: -** टाळेबंदी, सामाजिक समस्या, स्थलांतर, असंघटित मजुर कोव्हीड १९.

**प्रस्तावना**:– कोरोना जागतिक महामारीचा उद्रेक सर्व जगभर दिसुन येत आहे. यामध्ये जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिका देशाबरोबरच, स्पेन, फ्रान्स, जर्मनी, ग्रेट ब्रिटन व युरोपीय देश तसेच आशियाई देश चिन, भारत, पाकिस्थान, अफगाणीस्थान, खाडीचे देश असे जागातील २९३ देश या महामारीमुळे बाधीत झाले आहे. जागतील आकडेवारीनुसार ९ कोटी जनता प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे या महामारीमुळे बाधीत झाली असून जवळपास २,५०,००० पेक्षा जास्त मृत्यु झाले आहेत. चिन पासुन सुरू झालेली ही महामारी अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, इटली, स्पेन, रशिया, ब्राझील, तुर्कस्थान, इराण, भारत, चिन, बेल्जीयम, नेदरलॅन्ड, स्वित्झलॅड या आघाडीच्या देशामध्ये या रोगाने थैमान घातले आहे. त्यावर उपाय योजना म्हणुन मुखपट्टी बांधा, वेळचे वेळी साबनाने हाथ धुने, सामाजिक अंतर ठेवणे, परस्पराबरोबर दस्तादोलन न करणे, दुरूनच बोलने, तसेच गर्दीच्या ठिकाणी न जाने, जास्त गर्दी न करणे हे साधारण उपाय असेल व तरी रूग्णाला सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही बाबीकडे लक्ष द्यावे लागते. या रोगाची सामान्य लक्षणे ही सर्दीच्या लक्षणासारखीच असतात असे सांगितले जाते परंतु ज्यांना सुरूवातीची काही लक्षणे असतील तर त्यांना या रोगाची लक्षण त्वरीत होते यामध्ये उच्चरक्तदाब, श्वशनाचे आजार, मधुमेह असे सामान्य आजार असल्यास त्यांना जास्त धोका असतो असे सांगितले जाते परंतु यावर अजुन पर्यंत कुठलीही लस उपलब्ध नाही असेही सांगितले जाते तरी सामान्य लक्षणे आढळल्यास त्यांना पर्यायी औषधे देऊन रूग्ण बरे होत आहेत. यासाठी विविध उपाय योजना करणे सुरू आहेत. प्रत्येक देशात आरोग्य विभागाशी संबंधीत डॉक्टर, परिचारिका, औषधी संशोधन संस्था, औषधी निर्माती कंपन्या, रासायनिक, जैविक संशोधन सुरू असुन अजुन पर्यंत ठोस असे औषधी किंवा लस तयार झाली नाही. जागतीक आरोग्य संघटनेने दि. १४ मे च्या रात्री असे जाहिरच केले की कोरोना कधीही नष्ठ होणार नाही याचा अर्थ असा की तो प्रत्येकाच्या शरिराच्या भाग असुन आपणाला त्यांच्या सोबतच राहुन जीवन जगावयाचे आहे.

**संशोधन पद्धती**:– प्रस्तुत शोध निबंधासाठी दुय्यम स्त्रोताचा वापर करण्यात आला. तसेच दैनिक वर्तमानपत्राचा सुद्धा आधार घेण्यात आला आहे.

**गृहितकृत्ये**:– १. कोवीड १९ मुळे सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. २. टाळेबंदीमुळे स्थलांतराचा प्रश्न ऐश्नीवर आलेला आहे. ३. टाळेबंदीमुळे अनेक रोजगार बंद झाले आहेत.

**संधोधनाचा उद्देश**:– १. कोरोना ही जागतीक महामारी आहे ते तपासुन पाहणे. २. कोरोनामुळे देशाअंतर्गत कलह निर्माण झाला आहे ते अभ्यासणे. ३. कोरोनामुळे सर्व जग थांबले आहे ते अभ्यासणे.

उपरोक्त उद्देश व निर्धारित केलेली गृहितकृते तपासुन पाहण्यासाठी या जागतीक महामारीचे दिर्घ कालीन परिणाम लक्ष्यात घेतल्यास असे दिसून आले आहे की कोरोना या विषाणुची सुरूवात डिसेंबर २०१९ पासुन झाली आहे. ३० जानेवारी २०२० रोजी भारतात पहिला कोरोना रूग्ण आढळुन आला. विदेशातुन आलेल्या भारतीय प्रवाशी कोच्ची येथे आला त्याला कोरोना झालेला होता अशी बातमी संपूर्ण देश भर विविध वाहिन्याद्वारे सांगण्यात आले. त्यांनतर मात्र देशात एकच खळबळ उडाली नाही तर देशात कोणत्याही पूर्व तयारी करण्यात आली नव्हती. चिनमध्ये निर्माण झालेली परिस्थिती विचारात घेता प्रत्येक भारतीयांना या विषयी काहीही माहिती नव्हती चिनच्या पाणेपाठ अमेरिका, इटली, फ्रान्स, जर्मनी, बेल्जीयम, स्वित्सलॅड, या देशामध्ये या विषाणुचा प्रसार जास्त प्रमाणात दिसु लागला. त्यावर विविध स्थरातुन जी जी माहिती उपलब्ध होती त्या माहितीच्या आधारे सर्वच क्षेत्रातील तज्ञ मंडळी कामाला लागलेली दिसुन आली. त्यासाठी सर्वप्रथम प्रवाशी विमानावर बंदी घालणे क्रम प्राप्त होते परंतु भारतात १५ मार्च पर्यंत लाखोच्या संख्येने प्रवास करून करून देशात प्रवेश केला. विमानतळावर योग्य ती खबरदारी न घेतल्यामुळे प्रवाशाची आरोग्य तपासणी करणे गरजेचे होते परंतु तसे न होता हळुहळु रूग्ण संख्येमध्ये वाढ होऊ लागली. या आजाराची जी सामान्य लक्षणे म्हणजे साधे सर्दी पडशाचे आजार किंवा निमोनीऑ सारखे आजार

वाटत असेल तर श्वासनलीकेतुन या या रोगाचा प्रादुभार्द्यव शरिरात होतो बरोबर शरिरामध्ये असलेले इतर प्रतिजैविक घटक या विषाणुबरोबर संघर्ष करीत व शारिरीक क्षमता जसी जसी कमी कमी होऊ लागली तसी तशी रूग्णाची संख्या ही वाढायला सुरूवात झाली. याचाच परिणाम असा झाला की रूग्णाच्या वाढीबरोबर टाळेबंदीला सुरूवात झाली. ज्या रूग्णाची चाचणी ही सकारात्मक (Positive) आली होती अशांना १४ दिवसासाठी विलगीकरणात ठेऊन त्यांच्यावर उपचार करण्यात येत होते. १४ दिवसाचा कालावधी म्हणजे रूग्णाला कोरोनाची लागण झाली तर रूग्णाच्या शरिरात कोरोना विषाणु वाढीचा कालावधी हा ७ दिवसाच्या व कामी होणाच्या कालावधी ७ दिवसाचा यामध्ये पंधराव्या दिवशी रूग्णाची चाचणी नकारात्क (Negative) आली म्हणजे त्यातुन तो बरा झाला असे गृहित धरून रूग्णाला सुटी देणे या कालावधीत प्रत्येक ७ तासानी रूग्णाच्या शरिराच्या तापमानाची नोंद घेणे त्यांना औषधोपचार करणे योग्य तो आहार देणे. तसेच इतरांबरोबर विशिष्ट अंतर ठेऊन विलगीकरणातील अथवा दवाखान्यात राहणे. दवाखाण्यामध्ये किंवा विलगीकरण कक्षा मध्ये जे रूग्ण असतात त्यांना पुरेशा प्रमाणात औषधी, आहार दिला जातो. किंवा नाही हे फक्त तेथील परिचारीकेला माहित असते. रूग्णालयात रूग्ण असने व कोरोनामधील रूग्णालयातील रूग्ण यामध्ये मोठया प्रमाणात तफावत दिसुन येते ही तफावत म्हणजे कोरोनो रूग्णालयात रूग्णासोबत कुणीही नातेवाईक राहात नाही त्यामुळे जे वयस्कर रूग्ण असतात त्यांना मानसिक व भावनिक आधाराची गरज असते ती गरज भागविण्यासाठी घरचे किंवा नातेवाईक, मित्र, मैत्रिनी याची आवश्यकता असते परंतु कोरोनो रूग्णालयात ही व्यवस्था फार कमी दिसुन येते त्यामुळे मानसिक व भावनिक स्वास्थ ढासळुन वयस्कर रूग्णाच्या मृत्यु होतो ही प्रमुख सामाजिक समस्या रूग्णालयात किंवा कोव्हीड १९ या रोगामध्ये प्रामुख्याने दिसुन आली आहे. दुरदर्शन किंवा विविध वाहिण्या वर जे दाखविले जाते त्यात किती तत्थ असते याबाबत शंका निर्माण होते रूग्ण बरे झाल्यावर त्याचे स्वागत करणे किंवा डॉक्टर, नर्स यांना प्रोत्साहन देण्यासाठी फुलांचा वर्षाव करणे तसेच इतरही व्यक्ति जे प्रत्यक्ष पणे या जागतिक महामारीत काम करित आहेत त्यांना प्रोत्साहन देणे हे जरी खरे असले तरी त्यात अतिशयोक्ति फार जास्त दिसुन येते.

कोव्हीड १९ जागतिक महामारीवर प्रत्येक देशाने उपाय योजना केल्या आहेत. आयुर्वेदामध्ये तुलसी, हळदी, सुंठ, आले, कारेमिरे, यांना विशेष महत्त्व असुन त्यामुळे काही प्रमाणात यावर आळा बसु शकतो असा अंदाज लावण्यात आला होता तो पण उपयोगी पडला किंवा नाही कारण रूग्ण जेव्हा दवाखान्यात नेला जातो त्यावर फक्त सरकारने सुचविलेला औषधोपचार करावा लागतो. भारतीय आयुर्वेदिक संस्था, नवी दिल्ली यांनी ॲलोपॅथी शिवाय इतर कोणत्याही पॅथीचा स्विकार केला नाही. जयपुर येथील डॉक्टरच्या मता नुसार सुरवातीला जो पर्याय दिला होता त्याचाही फायदा झाला नाही. एड्स वर चालणाऱ्या औषधाचा सुद्धा विचार झाला, सध्या प्रत्येक देशात उपलब्ध डॉक्टर त्यांचे योग्य ते मार्गदर्शन रूग्णाचे वय, रूग्णाला सुरूवातीचे इतर आजार यांचा सर्वांगिन विचार करून औषधोपचार सुरू आहे. परंतु अजुनपर्यंत यावर ठोस उपाय योजना दिसुन येत नाही.

कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी जागतीक पातळीपासुन स्थानीक गाव पातळीवर योग्य ते उपाय सुचविण्यात आले त्यामुळे टाळेबंदी Lockdown याकडे लक्ष दिल्यास असे दिसुन येते की, भारतात २२ मार्च ला जनता कर्फ्युची घोषना करण्यात आली तेव्हा संपूर्ण देशात त्याचे स्वागत करण्यात आले. घरातच राहुन सर्व काम करा, विनाकारण रस्त्यावर फिरू नका, गर्दी करू नका अशा उपाय योजना सुचविण्यात आल्या तेव्हा देशत करोनाचे रूग्ण फारच कमी होते. केरळ राज्यातुन मुंबई, पुणे, कर्नाटक, तेलंगना, गुजरात, नवी दिल्ली, राजस्थान या राज्यात फक्त १ अंकी रूग्ण संख्या होती. हळुहळु त्यांच्या संपर्कात जे आले त्यांना विलगीकरण कक्षात नेऊन त्यांची तपासनी केल्यानंतर जो अहवाल आला त्यामध्ये करोनाची लागन झाल्याचे सिद्ध होत होते. गर्दीच्या ठिकाणी एकत्रित आल्यामुळे या रोगाचा प्रसार झाला. त्यामुळे देशात टाळेबंदीचा निर्णय घेण्यात आला. डिसेंबर २०१९, जानेवारी २०२०, फेब्रुवारी २०२०, मार्च २०२० या तिन महिण्याच्या कालावधीत सरकारने याकडे पुर्णपणे डोळेझाक केली असेच म्हणवे लागेल. मध्यप्रदेश सरकारचे पतन होऊन नविन भारतीय जनता पक्षाचे सरकार आले. परंतु मुख्य ज्या समस्या निर्माण होणार होत्या त्या दुर्लक्षीत झाल्या. त्याच्या परिणाम हा ठाळेबंदीवर आला व पर्यायाने सरकारला टाळेबंदी करावी लागली २४ मार्चला भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दुरचित्रवाणी, वाहिण्यावरून टाळेबंदी ची घोषणा केली तेव्हा देशातील रूग्ण संख्या ५३६ होती. ही टाळेबंदी १४ एप्रिल पर्यंत म्हणजे २१ दिवसाची होती. दरम्यानच्या काळात नवी दिल्ली येथील तबलीकी मरकज चे जे अनुयायी होते ते सर्व देशभर फिरत राहिले. त्याच्या परिणाम हा रूग्ण वाढीवर झाला त्यावर बरेच राजकिय, सामाजिक, धार्मिक वादविवाद झाले. याच काळात मराठी नवीन वर्ष, श्रिराम नवमी, हनुमान जयंती, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती इत्यादी महत्त्वाचे सण उत्सव सार्वजनिकरित्या साजरे झाले नाही. तेव्हा शासनाकडुन उद्योग क्षेत्र, असंघटीत कामगार, इतर कामगार जे देशाच्या विविध राज्यातुन मुंबई, दिल्ली, अहमदाबाद, सुरत, भिवंडी, पुणे, नागपूर, नाशिक, कोल्हापूर व मुख्य औद्योगिक वसाहतीमध्ये कामाला होते. त्यांना तात्पुरता आधार म्हणुन विविध सामाजिक संस्था तसेच स्वयंसेवी संस्था व्यापारी, खासदार, आमदार व प्रमुख राजकीय पुढाऱ्याच्या सहाय्याने त्यांची खाण्यापिन्याची, राहण्याची व्यवस्था करण्यात आली तेव्हा कोरोनाचा जास्त प्रसार झाला नव्हता. परंतु हळुहळु मात्र रूग्णसंख्येमध्ये वाढ होताना दिसुन आले. आरोग्य यंत्रणेवर तान निर्माण झाला होता. पोलीस विभागावर टाळेबंदीच्या काळात कुणीही कुठेही कामाशिवाय बाहेर जानार नाही म्हणुन स्थानीक प्रशासन, तहसिलदार, जिल्हाधिकारी यांचेकडे संपूर्ण अधिकार सोपविण्यात आले. शाळाबंद, महाविद्यालय बंद, खाजगी शिकवीबंद, बाजारपेठ बंद, व्यापार बंद, वाहतुक बंद, रेल्वे बंद, मोटार बंद, या सर्व वाहतुकीच्या साधनावर बंदी असल्यामुळे तसेच शिबीरात जे मजुर राहात होते ते चार – पाच दिवसात त्यांनी वेगवेगळे अनुभव येऊ लागले. अन्नधान्य संपले, पैसे संपले, पगार नाही, मजुरी नाही, म्हणुन अशा वेळी प्रत्येकाला आपापले हक्काचे घर असलेले गाव, शहर आठवू लागल्यामुळे मिळेल त्या साधनांनी घर गाठण्याचा एक प्रयत्न झाला हजारो किमीचा पायी प्रवास करून मजुर आपल्या घरी पोहचु लागले परंतु २१ दिवसानंतरही रूग्ण संख्या कमी होत नाही हे लक्ष्यात आल्यावर १४ एप्रिल पासुन दुसऱ्या टाळेबंदीला सुरूवात झाली तेव्हा रूग्ण संख्या १०८१५ इतकी झाली. दुसऱ्या टाळेबंदीचा परिणाम पहिल्या पेक्षा भयानक झाला तेव्हा भारताचे पंतप्रधान म्हणतात तुम्ही संयम ठेवा करोनाच्या साथीचा आपण पराभव करू. पहिल्या टाळेबंदीच्या वेळी ज्या ठिकाणी असंघटीत क्षेत्रात काम करणारे मजुर होते त्यांच्या साठी

घरापर्यंत जाण्यासाठी. योग्य ती पावले उचचली असती तर त्या ठिकाणी सुरक्षीत राहिले असते. याच काळात नारंगी, तांबडी, व हिरवी, रेड, ऑरेन्ज व ग्रिन झोन तयार करण्यात आले. रेड झोन म्हणजे सर्वाधिक रूग्ण, ऑरेन्ज मध्ये १ पेक्षा जास्त तर ग्रिन झोन मध्ये एकही रूग्ण नाही. अशा प्रकारे विभागणी करून देशातील सामाजिक व आर्थिक परिस्थिती ही दिवसेंदिवस बिकट होतांना दिसुन आली तेव्हा टाळेबंदितुन काहीना सुट देऊन हळुहळु सर्व व्यवहार सुरू करावे असा विचार पुढे आला. त्यामुळे काही भागातील बाजारपेठ, दुकाने सुरू करण्याात आली. यातही दारूच्या दुकाना संदर्भात बराच राजकिय वादविवाद होऊन काही ठिकाणी ती सुरू करण्यात आली.

स्थलांतरीत मजुरांच्या सर्वात मोठा प्रश्न देशासमोर उभा राहिला त्यामुळे श्रमीक रेल्वे सुरू करण्यात आली. विदेशात जे भारतीय अडकले होते त्यांना विमान सेवा द्वारे देशात आणण्यात आले. महाराष्ट्रातील परिवहन व्यवस्थेने राज्यांच्या सिमेपर्यंत मजुरांना सोडण्यात आले. ज्यांना कुठलेही साधन मिळाले नाही ते पायी चालत चालय हजारो कि.मी. चोरीच्या रस्त्याने आले. मुख्य रस्त्याने गेल्यास पोलीस विभागाकडुन चौकशी, कधीकधी पोलीसाचा अतिरेकी व्यवहार त्यामुळे चोरीच्या मार्गाने येतांना रेल्वे च्या अपघातात १६ मजुराचा मृत्यु झाला. ट्रॅक्टर, टेम्पो, मालमोटारी दुधाचे टॅकर, भाजीपालीच्या मोटारी, एम्बुलॅन्स इतयादीचा वापर या मजुरांनी केला त्यांचे एकमेव कारण म्हणजे त्यांना सुरक्षीत निवारा म्हणजे आपले गांव व घर हेच होते त्यामुळे अगदी लहान मुले, मुली, पती पत्नी, म्हातारे, सर्वच क्षेत्रातील हे मजुर आपापल्या घरी पोहचण्याचा प्रयत्न करीत होते.

टाळेबंदीच्या काळात सामाजिक समस्या बऱ्याच निर्माण झाल्या त्यामध्ये घरगुती कौटूंबिक हिंसाचार वाढु लागला. यामध्ये वयस्क, तरूण – तरूणी, पती–पत्नी, यांच्यात वाद विवाद होऊ लागले. बाहेर फिरता येत नाही. घरात राहुन कोणतेही काम नाही फक्त दैनंदिन गरजा भगविणे खाणे, पुस्तके वाचणे, दुरदर्शन वरिल बातम्या ऐकने, चित्रपट पाहणे खुप झाले तर त्यांच्या घरात विद्यार्थी आहेत त्यांना ऑनलाईन चे काम असणे त्यातही नेटवक्र बरोबर असेल तर भ्रमणध्वनी चालतो नाहीतर फक्त दुरदर्शन व इतर कोणतेही काम नाही. वयस्कर विविध आजाराने जे ग्रस्त आहेत त्यांना कुठेही आरोग्य यंत्रणा मदत करीत नाही फक्त आणि फक्त कोरोना या एका शब्दाभोवती संपूर्ण जग फिरत असल्याचे चित्र आज पाहायला येत आहे. १४ एप्रिल ते ३ मे ते १७ मे पर्यंत देशाचा संख्या ८०,००० च्या वर इतकी झाली आहे. हे वास्तव आपण स्विकारावे यात शंका नाही. कोरोनाच्या तिसऱ्या (लॉकडाउन) टाळेबंदिचा परिणाम लघुउद्योग, गृह उद्योग, कुटीर उद्योग, बांधकाम

**जगातील प्रमुख देशातील कोरोनाची रूग्ण संख्या व मृत्युची संख्या**

| देश | कोरोना बाधीत | मृत्युची संख्या |
|---|---|---|
| अमेरिका | १४३३३२९ | ८५३३३ |
| स्पेन | २७२६४६ | २७३२१ |
| रशिया | २५२२४५ | २३०५ |
| ब्रिटन | २३३१५१ | ३३६१४ |
| इटली | २२२१०४ | ३११०६ |
| ब्राझील | १९२०८१ | १३२७६ |
| फ्रान्स | १७८०६० | २७०७४ |
| जर्मनी | १७४०९८ | ७८६१ |
| तुर्कस्थान | १७४११४ | ३९२५ |
| इराण | ११४५३३ | ६८५४ |
| चीन | ८२९२९ | ४६३३ |
| भारत | ७९३३३ | २५६४ |
| कॅनडा | ७२२७८ | ५३०२ |
| बेल्जीअम | ५४२८८ | ८९०३ |
| सौदि अरेबिया | ४६८६९ | २८३ |
| नेदरलॅन्ड | ४३४८१ | ५५९० |
| पाकिस्तान | ३५७८८ | ७७० |
| स्वित्झलॅन्ड | ३०४५३ | १८७० |
| बांग्लादेश | १८८६३ | २८३ |
| इस्राईल | १६५६७ | २६४ |
| जपान | १६०४९ | ६७८ |
| ऑस्ट्रेलिया | ६९८९ | ९८ |
| अफगाणीस्थान | ५६३९ | १३६ |
| मालदिप | ९५५ | ४ |
| श्रीलंका | ९१६ | ९ |
| नेपाल | २४६ | ० |
| मॅनमार | १८१ | ६ |
| भुतान | १९ | ० |
| इतर देश | ७३९४११ | २९९४ |

वरिल आकडेवारी ही जागतीक कोरोनाची आकडेवारी असुन सर्वाधिक रूग्ण संख्या ही अमेरिकेची असुन मृत्युचे प्रमाण सुद्धा जास्त आहे. त्या खालोखाल स्पेन, ब्रिटन, इटली, फ्रान्स, स्पेन, जर्मनी, इरान, कॅनडा, बेल्जीयम या देशात या विषणुचा प्रभाव जास्त असुन भारता शेजारील नेपाल व भुतान येथे मृत्युचे प्रमाण शून्य टक्के आहे. (स्त्रोत WHO Mannual Dt. 14.05.2020)

क्षेत्र, ग्रामीण रोजगार, यांच्यावर प्रभाव झाला आहे. कोरोनाचा टाळेबंदिचा कार्यकाळ हा ग्रामीण भागातील तसेच शहरी भागातील लग्नाचा कार्यकाळ असतो यासाठी कापड व्यवसायिक, कॅटरिंग व्यवसाय, मंडप व डेकोरेशन तसेच स्थानीक परिवहन, टॅम्पो, ऑटोरिक्सा, चारचाकी वाहने ड्रायव्हर यांचे सहकारी हॉटेल व्यवसायीक, पानटपरी, स्थानीक मद्याची दुकाने केसकर्तनालय, ब्युटी पार्लर स्थानीक नाव्ही, शिंपी, कुंभार, कासार व ज्यावर संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्था अवलंबुन आहे शेतमजुर, शेतकरी , संकटात सापडलेला आहे. नविन उद्योग स्थापन करण्यासाठी लागणारा मजुर पुरवठा स्वस्थ मजुर, तात्रिंक मजुर मिळणे दुरापास्त होणार आहे. याचा परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणार आहे. म्हणुनच भारताचे पंतप्रधान यानी एकुण सकल उत्पादनाच्या १०% रक्कम खर्च करण्यासाठी २० लाख कोटी रूपये देण्याचे आश्वासन दिले. आहे. कोरोनाच्या संकटातुन देशाला वाचविण्यासाठी जे जे प्रयत्न सुरू आहेत त्यांना यश प्राप्त होईल अशी आशा करावी.

**निष्कर्षः–** १. वरिल सर्व विवेचनावरून हे सिद्ध होते की, कोव्हीड १९ मुळे सामाजिक समस्या निर्माण झाल्या आहेत. २. टाळेबंदिमुळे स्थलांतरीत मजुरांचा प्रश्न ऐरनीवर आला असुन २०० पेक्षा जास्त मजुरांचा मृत्यु झाला आहे. ३. टाळेबंदीमुळे अनेक रोजगार बंद झाल्यामुळे त्याचा प्रभाव स्थानीक मजुरावर झालेला आहे.

**संदर्भ :–**

१. आगलावे डॉ. प्रदिप ''सामाजिक संशोधन पद्धतीशास्त्र'' साईनाथ प्रकाशन, नागपूर.
२. घारपुरे डॉ. विठ्ठल ''भारताचा भूगोल'' पिंपळापुरे पब्लीकेशन, नागपूर.
३. विविध वृत्तपत्रे, लोकमत, लोकसत्ता, पुण्यनगरी, नवभारत, दैनिक देशोन्नती.
4- Letten S. stavrianos A Global History All yen and Bacan inc. Bostan.

# ग्राहक चळवळ : आधुनिक युगाची गरज

**डॉ. राहुल भगत**, समाजशास्त्र विभाग प्रमुख, एस. एन. मोर महाविद्यालय, तुमसर जि. भंडारा. मो. ९८३४९८८३३७

**प्रस्तावना**:— आधुनिक अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू ग्राहक आहे. उत्पादन, वितरण सर्व व्यवस्था चोख असेल परंतू ग्राहक नसेल तर उद्योग व बाजारपेठा ठप्प पडतील आणि आर्थिक विकासाची गती मंदावेल. म्हणून आधुनिक युगात बाजारपेठांमधील अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे ग्राहक होय. विपणणाचे सगळे संकेत, संकल्पना, अनुमान हे ग्राहकांवर आणि त्याच्या आवडीनिवडीवर अवलंबून असतात. पूर्वीच्या काळी हस्तउद्योगांनी व्यवसाय चालत असत. लोकांच्या गरजांच्या प्रमाणात वस्तूंचे उत्पादन होत असे. ग्राहकांना वस्तूंची प्रत्वारी व मालाबद्दलची माहिती असायची. उत्पादक आणि ग्राहक यांचा थेट संपर्क येत असे. त्यामूळे फसवणूक होत नसे. औद्योगीकरणामूळे मोठया प्रमाणावर उत्पादन वाढले, यंत्राच्या सहायाने उत्पादन होवू लागले. त्यामुळे ग्राहकांची फसवणूक होण्याचे प्रमाणही वाढले. उत्पादकांचा बाजारपेठेतील कारभार मनमानी सुरू झाला. परंतू त्याचबरोबर एकाच वस्तूंचे उत्पादन करणारे अनेक उत्पादक निर्माण झालेत. त्यामुळे प्रचंड स्पर्धा निर्माण झाली. या जीवघेण्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी उत्पादकांचे ग्राहकांकडे दुर्लक्ष होवून फक्त नफा कमावण्याकडे अधिक कल असलेला दिसतो. जास्तीत जास्त नफा कमावण्यासाठी वस्तूंच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष करू लागले त्यामूळे ग्राहकांची फसवणूक होवू लागली. कष्टाने कमावलेल्या पैशाने वस्तू खरेदी करतांना ग्राहकांची पिळवणूक होवू लागली. त्यामुळे ग्राहकहितांचा प्रश्न ऐरणींवर आला आहे.

**ग्राहकांचे हितसंरक्षण**:— वस्तूंचे भरमसाठ उत्पादन, वारेमाप भाववाढ, भेसळ, वजनमापातील फसवणूक, टेलिफोन बॅंका, विमा, रेल्वे, एस. टी. यासारंख्या सेवांचा दर्जा, ग्राहकांच्या ठेवी बुडवणाऱ्या कंपन्या इत्यादी ग्राहकांवरील अन्यायाचे विविध स्वरूप आहेत. वस्तूंचा दर्जा किंवा गुण आश्वासनांप्रमाणे नसणे, वस्तू सदोष निघणे, उपयोगिता नसणे, नकली उत्पादन टंचाई निर्माण करणे इत्यादी मार्गाने ग्राहकांचे शोषण केले जाते. भांडवलदार, उत्पादक, विक्रेते यांच्याकडून ग्राहक वस्तू विकत घेतात तेंव्हा त्यांना फसवणूकीची कल्पना नसते. परंतू काही दिवसानंतर लक्षात येते की आपली फसवणूक झाली आहे

आधुनिककाळात उत्पादनकर्ता आणि ग्राहक यांच्यात थेट संपर्क येत नाही. उत्पादन आकर्षक वेष्टनात गुंडाळून व आकर्षक जाहिराती करून ग्राहकांच्या माथी मारले जाते. परंतू ग्राहकांना आपण फसविले गेलो आहे अशी तक्रार करण्यासाठी मात्र अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. तसेच भ्रष्टाचार, काळाबाजार या समस्यां ग्राहकहित संरक्षणाच्या समस्येशी निगडीत आहेत. त्यामुळे ग्राहकहित समस्या अत्यंत महत्त्वाची समस्या आहे. आजच्या घडीला तिच्याकडे दुर्लक्ष करता येत नाही. ग्राहकहितांची समस्या एक मोठी समस्या आहे. ग्राहक कोणत्या एका समाजातील, वर्गातील नसतो तर तो संपूर्ण समाजातील असतो. प्रत्येकच व्यक्ती ग्राहक आहे. ग्राहकांचे शोषण व फसवणूक प्रत्येकच देशात होत असते. म्हणून १९६२ मध्ये अमेरीकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष मा. केनडी यांनी अमेरीकरन कॉंग्रेसला उद्देशून केलेल्या भाषणात ग्राहकांच्या चार मूलभूत हक्कांचा उल्लेख केला होता. संयुक्त राष्ट्राने देखिल ग्राहक हिताला मान्यता प्रदान केली आहे. १९८५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने ग्राहकहित संरक्षणाची मार्गदर्शक तत्वे प्रसिद्ध केलीत. त्यानंतर 'जागतिक ग्राहक संघटना' स्थापन करण्यात आली. (डॉ. प्रदीप आगलावे, २००९—२१९)

**ग्राहक चळवळींची आवश्यकता**:— आधुनिककाळात वस्तू आणि सेवा यांची मागणी प्रचंड वाढली आहे. त्यानुसार मालाचे उत्पादन सुद्धा मोठया प्रमाणात वाढले आहे. त्यासाठी कारखान्यामध्ये एकाच प्रकारची अनेक उत्पादने वेगवेगळया उत्पादकांकडून केली जात आहेत. स्वस्त आणि अधिक माल उत्पादन करण्याच्या हव्यासापायी भांडवलदार घातक आणि अयोग्य वस्तूंचा वापर करून उत्पादन वाढवित आहेत. आपलाच माल ग्राहकांनी घेतला पाहिजे म्हणून आकर्षक स्वरूपात आणि आकर्षक जाहिराती करून माल विकायला बाजारपेठेत ठेवला जातो. भांडवलदार, उत्पादक, वितरक, दुकानदार अशा विविध लोकांच्या हातातून गेल्यानंतर माल ग्राहकांच्या हातात पडतो. त्यामूळे मालाबद्दल तक्रार असेल तर ती कोणाकडे करायची असा प्रश्न उपस्थित होतो. त्यामूळे एकटा ग्राहक या सर्वांशी लढू शकत नाही. परंतू ग्राहक हा एक व्यक्ती नाही. संपूर्ण समाजच ग्राहक आहे. त्यामूळे त्यांची एकजूट संघटना असेल तर त्यांच्यावर होणारा अन्याय, उदा. फसवणूक होणे, माल खराब निघणे, पैसे पूर्ण देवूनही सेवा योग्य न मिळणे. अशा तक्रारींना वाचा फोडता येईल, ग्राहकांवर होणाऱ्या अन्यायाची दाद मागता येईल.

**ग्राहक चळवळ**:— इतर देशाच्या तुलनेत भारतात ग्राहक जनजागृतीची मोहीम खूप उशीरा सुरू झाली आहे. अमेरीकेत १९६० ते १९७० या काळात ग्राहक संरक्षणाच्या संदर्भात अतिशय गांभीर्याने विचार करण्यात आला. अमेरीकेत १९७५ मध्ये 'कन्झुमर गुड्स प्राईसिंग अॅक्ट' पास करण्यात आला. त्याच दरम्यान इग्लंड मध्ये देखील 'वस्तूंच्या किंमत विषयक कायदा' मंजूर करण्यात आला. अमेरीकेत १९७६ मध्ये 'रिसेल प्राईसेस अॅक्ट', १९७७ मध्ये 'प्राईस कमिशन अॅन्ड अनफेअर कॉन्टॅक्ट टर्म अॅक्ट' आणि 'कंटोल ऑफ फुड प्रिमायसेस अॅक्ट' हे कायदे पास झालेत. त्यानंतर १९७८ मध्ये ग्राहक सुरक्षा कायदा पास झाला. ऑस्ट्रेलियामध्ये १९५५ मध्ये 'टेड मार्कस् अॅक्ट' आणि १९७४ मध्ये 'टेड प्रॅक्टीसेस अॅक्ट' पारित करण्यात आला. जपानमध्ये 'कन्झुमर कौंसिल ऑफ जपान' ही संघटना अत्यंत मजबूत असून किंमत निर्धारणाचे किंवा ग्राहकांना न्याय मिळवून देण्याचे संपूर्ण कार्य करण्यास ही एकटी संघटनाच अत्यंत समर्थ आहे. स्विडनमध्ये १९४७ मध्ये मार्गारीन तेलाच्या उद्योगाचे सरकारने राष्ट्रीयीकरण करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी तेथील ग्राहक चळवळीनेच उत्पादनाचे कार्य स्वत:च्या हाती घेतले. त्यामूळे सर्व उत्पादकांना आपल्या तेलाचे भाव कमी करावे लागले.

भारतांमध्ये ग्राहकांचे हित संरक्षण करण्यासाठी विविध प्रयत्न करण्यात आलेत. १९६६ मध्ये मुंबई येथे नउ महिलांनी महागाई, अन्नधान्यातील भेसळ, इत्यांदीपासून ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी 'कंन्झुमर गायडन्स सोसायटी ऑफ इंडीया' ही संस्था स्थापन केली. त्यामुळे आधुनिक भारतात ग्राहक चळवळींची सुरूवात झाली. त्यानंतर १९७५ मध्ये 'मुंबई ग्राहक पंचायत', १९७८ मध्ये अहमदाबाद मध्ये 'कन्झुमर एज्युकेशन अॅण्ड रिसर्च सेंटर', दिल्ली येथे 'व्हाईस आणि कॉमन कॉज', इत्यादी संस्था स्पान झाल्यात. त्यामुळे भारतात ग्राहक चळवळ वेगाने सुरू झाली.

शासन, लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि स्वंयसेवी संघटना यांच्या उदासीनतेमूळे काळाबाजार, भ्रष्टाचार, साठेबाजी, भेसळ,

जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा या घटना आपल्या देशात रोजच घडत असतात. सामान्य ग्राहकांची फसवणूक करणे, शोषण होवू नये म्हणून त्यांच्यात जागरूकता निर्माण करणे आणि त्याकरिता ग्राहक चळवळीला अधिक सशक्त करणे आवश्यक आहे. ग्राहक चळवळ अधिक प्रभावी झाली तरच विक्रेते व कारखानदार यांच्या मनमानी कारभाराला वचक बसेल.

**ग्राहक चळवळींचे परिणाम**:— भारतामध्ये १९७५ नंतर ग्राहक चळवळीचे महत्त्व लोकांना जाणवू लागले आणि त्यांनी ग्राहक चळवळींची मोहीम अधिक मजबूत करण्याचे प्रयत्न सुरू केले त्याचे परिणाम पुढीलप्रमाणे दिसू लागले.

१. **जनसामान्यांमध्ये जागृती झाली**:— जनसामान्य ग्राहक हा त्याला फसवले जाते आहे या गोष्टींपासून अनभिज्ञ होता. आणि जर फसवणूक झाली तरी दाद कुठे मागायची हे त्याला समजत नव्हते. त्यामुळे ग्राहक चळवळींची नितांत गरज होती. आजच्या घडीला ग्राहक चळवळींमूळे ग्राहक हा जागृत झालेला आहे. आपल्या अधिकारांप्रती सजग झाला आहे. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा तो आज जाब विचारू लागला आहे. २. **फसवणूक झाल्याचे ज्ञान**:— ग्राहकांना आपली सुद्धा फसवणूक होत असते हे ज्ञानच मुळात नव्हते. व्यापारी, उत्पादक, विक्रेते, दलाल, आपली हातोहात फसवणूक करतात. आपल्याला लुबाडतात हे लक्षात आले आणि ग्राहकाला त्याचे ज्ञान झाले. त्यामूळे तो आता कोणत्याच उत्पादनांवर डोळे झाकून विश्वास करीत नाही. प्रथम खातरजमा करून घेतो आणि नंतर वस्तू किंवा सेवा खरेदी करतो. ३. **भेसळ किंवा मिलावट ओळखणे**:— जीवनावश्यक वस्तूंमध्ये भेसळ केली जाते हेच अनेक ग्राहकांना माहित नव्हते. उदा. मिरची पावडर मध्ये लाल रंगाचा भूसा मिसळविणे, मिरे म्हणून पपईच्या बिया विकणे, तेल, तूप यांच्यात वनस्पतीजन्य व प्राणीजन्य पदार्थाची भेसळ करणे. यासारख्या भेसळीची माहिती किंवा ज्ञान ग्राहकांना नव्हते. परंतू आता ही भेसळ ओळखण्याची पात्रता ग्राहकांमध्ये आलेली आहे. ४. **अनुचित व्यवहारांवर निर्बंध**:— ग्राहक आता माल किंवा सेवा विकत घेतांना फारच जागरूक झालेला आहे. तो किंमत व मालाची प्रत आणि मुदतबाहय तारीख इ. सर्व बघून माल विकत घेतो. त्यामुळे व्यापारी, दुकानदार, उत्पादक, दलाल हे आता त्यांच्याशी अनुचित व्यवहार करू शकत नाही. ग्राहकांच्या जागृत चळवळींमूळे या लोकांच्या अनिष्ट व्यवहारावर निर्बंध आलेले आहेत. ५. **ग्राहकहित संरक्षण कायदा**:— भारतात १९८६ मध्ये ग्राहकहित संरक्षण कायदा मंजूर केला आहे. या कायद्यात काही त्रृटी राहिल्या होत्या त्यांना दुरूस्त करून २००२ मध्ये परत सुधारीत कायदा लागू करण्यात आला आहे. ग्राहक चळवळीचा सरकारवर दबाव असल्यामुळे सरकारने ग्राहकहित संरक्षण कायदा केला तरी त्याची अंमलबजावणी नीट झाली नाही. ग्राहक चळवळीने सर्वोच्च न्यायालयात खटला दाखल केला त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने या कायद्याच्या अंमलबजावणीचे आदेश सरकारला दिले. यावरून हे स्पष्ट होते की, ग्राहकहित संरक्षण कायदा हा ग्राहक चळवळीच्या प्रभावामुळे निर्माण झाला आहे. ६. **उत्पादक, व्यापारी व विक्रेत्यावर दबाव**:— ग्राहक चळवळ ही राष्ट्रव्यापी चळवळ आहे. या चळवळीचा उत्पादक, व्यापारी, विक्रेते आणि इतर सेवा प्रदान करणाऱ्या संस्थावर प्रभाव आहे. ग्राहकांची फसवणूक झाली तर ग्राहक चळवळीचे नेते आपल्याविरूद्ध आंदोलन करतील अशी भिती उत्पादक, व्यापारी व विक्रेत्यांना वाटते त्यामुळे ग्राहकांची फसवणूक केल्यास आपला व्यवसाय बंद होईल, आपल्याला शिक्षा होईल अशी भीती त्यांना वाटते. ७. **ग्राहक मंचाची स्थापना**:— ग्राहकांवरील अन्याय दूर करण्यासाठी सर्वत्र ग्राहक मंचाची स्थापना करण्यात आली. ग्राहक अनेक लहान—सहान तक्रारी या मंचाद्वारे स्वत:च सोडवू लागले आहेत. ग्राहकमंचामूळे व्यापारी, दुकानदार, उत्पादक इ. लोकांवर वचक बसला आहे.

**ग्राहकहित संरक्षण कायदा १९८६**:— ग्राहकांची फसवणूक झाली तर नुकसान सहन करण्यापलीकडे तो काहीच करू शकत नव्हता. कारण दाद मागण्यासाठी त्याला उत्पादक, व्यापारी, विक्रेता या सर्वांसोबत लढावे लागे. परंतू यांच्या मोठया शक्तीपुढे ग्राहकांची शक्ती कमी पडत असे. वजनमाप, वस्तूंचा दर्जा, वस्तूंची शुद्धता इत्यादीबाबतचे कायदे असुनही ते कुचकामी होते. त्यामुळे ग्राहक पंचायतीने ग्राहकांसाठीच्या स्वतंत्र कायद्याची आवश्यकता मांडली आणि १९७८ ला ग्राहक पंचायत द्वारे ग्राहक हित संरक्षण कायदा, ग्राहक मंत्रालय, ग्राहक न्यायालय, राज्यातील ग्राहक चळवळीमूळें जागृत झाले. या सर्वांचा परिणाम केंद्र सरकार वर होवून केंद्र सरकारने स्वत: एक मसुदा तयार केला. त्यावर चर्चा करण्यासाठी २० आणि २१ जानेवारी १९८६ ला देशातील ग्राहक संघटनांच्या कार्यकर्त्यांना आमंत्रित केले. ग्राहक संघटनांनी केलेल्या सुचनांचा स्विकार करून २४ डिसेंबर १९८६ रोजी 'ग्राहक हित संरक्षण कायदा १९८६' केंद्र सरकारने मंजूर केला. परंतू त्याची अंमलबजावणी करण्यात आली नाही. म्हणून दिल्लीच्या 'कॉमन कॉज' या संघटनेने सर्वोच्च न्यायालयात अर्ज करून या कायद्याच्या अंमलबजावणीची मागणी केली. त्यामूळे सर्वोच्च न्यायालयाने केंद्र शासनाला आणि सर्व राज्य शासनांना या कायद्याच्या अंमलबजावणीचे आदेश दिले. या आदेशांनुसार ३१ डिसेंबर १९८९ पर्यंत प्रत्येक जिल्हयात 'ग्राहक तक्रार निवारण फोरम' आणि राज्यासाठी 'ग्राहक तक्रार निवारण आयोग' स्थापन करण्याचे सांगीतले. (डॉ. प्रदीप आगलावे, २००९—२२२)

**केंद्रिय ग्राहक संरक्षण परिषद**:— ग्राहक संरक्षण कायद्यातील दुसऱ्या प्रकरणानूसार केंद्रीय स्तरावर 'केंद्रिय ग्राहक संरक्षण परिषद' स्थापन करण्यात आली. केंद्र शासनाच्या ग्राहक व्यवहार खात्याचा प्रभारी मंत्री केंद्रिय ग्राहक संरक्षण परिषदेचा अध्यक्ष असतो. या परिषदेची स्थापना तिन वर्षाच्या कालावधीकरीता असते. या परिषदेने वर्षातून कमीत कमी एकदा तरी सभा घेणे बंधनकारक आहे. ग्राहकांच्या अधिकारांचे प्रवर्तन करणे आणि त्यांचे संरक्षण करणे हे केंद्रिय ग्राहक संरक्षण परिषदेच्या कार्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. केंद्रिय परिषदेला पुढील अधिकार देण्यात आले आहेत. १. जीवीत आणि मालमत्ता यांना धोकादायक असलेल्या वस्तूंची विक्रि करण्यात येवू नये या संरक्षणाचा अधिकार. २. अनुचित व्यापार प्रथांपासून ग्राहकांच्या हितांचे संरक्षण करण्यासाठी वस्तूंची गुणवत्ता, क्षमता, दर्जा, शुद्धता, प्रमाण, किंमत, वजन, इत्यादींची माहिती देण्याचा अधिकार. ३. विविध माल प्राप्त करण्याबाबत खात्री करण्याचा अधिकार. ४. ग्राहक मंचासमोर आपली बाजू मांडण्याचा आणि ग्राहकांच्या हितांची योग्य दखल घेतली जाईल असे आश्वासन मिळण्याचा अधिकार. ५. ग्राहकांच्या पिळवणूकीला आळा घालण्याचा अधिकार. ६. ग्राहक शिक्षणाचा अधिकार.

**राज्य ग्राहक संरक्षण परिषद**:— राज्य सरकार अधिसुचनेद्वारे राज्य ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करते. या परिषदेचा अध्यक्ष हा राज्य शासनाचा ग्राहक व्यवहारांचा प्रभारी मंत्री असतो. सदस्यसंख्या दहापेक्षा जास्त नसते. परिषदेच्या वर्षातून कमीत कमी दोन सभा होणे आवश्यक आहे. ग्राहकांच्या अनु. ६, खंड (अ) ते

(क) मध्ये नमूद केलेल्या अधिकारांचे राज्याअतर्गत प्रवर्तन करणे आणि संरक्षण करणे हे प्रत्येक राज्य परिषदेचे उद्दिष्ट आहे.

**जिल्हा ग्राहक संरक्षण परिषद**:— राज्य सरकार प्रत्येक जिल्हयासाठी अधिसुचनेद्वारे जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेची स्थापना करते. या परिषदेचा अध्यक्ष जिल्हाधिकारी असतो आणि इतर शासकीय आणि अशासकीय व्यक्ती सदस्य असतात. या परिषदेची आवश्यकतेनुसार अध्यक्ष सभा घेवू शकतात. परंतू किमान वर्षातून दोन सभा घेणे आवश्यक आहे. राज्य परिषदेप्रमाणे ग्राहकांच्या अधिकारांचे संरक्षण करण्याचे जिल्हा ग्राहक परिषदेचे उद्दिष्ट आहे.

**ग्राहक तक्रार निवारण यंत्रणेची रचना**:— जिल्हा स्तरावरील ग्राहक तक्रार निवारण आयोग स्थापन करण्याच्या तरतूदीनूसार जिल्हा स्तरावरील न्यायमंचाचे अध्यक्ष जिल्हा न्यायाधीश दर्जाची व्यक्ती असावी. राज्य आयोगावर उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती अध्यक्ष असावा. त्यांच्यासोबत दोन सदस्य असतात. त्यापैकी एक सदस्य महिला असावी. या सदस्यांची पात्रता कोणती असावी हे कायद्याद्वारे निश्चित करण्यात आले आहे. राष्ट्रीय स्तरावरील आयोगावर देखील अध्यक्ष म्हणून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश, एक महिला सदस्य आणि इतर तिन सदस्य असतात. जिल्हा आणि राज्य आयोगांच्या सदस्यांसाठी असणाऱ्या अटी याच राष्ट्रीय स्तरावरील आयोगाच्या सदस्यांसाठी लागू होतात.

**ग्राहकांचे अधिकार**:— १९८६ च्या ग्राहक हित संरक्षण कायद्याने ग्राहकांना पुढील अधिकार प्राप्त झालेत.

१ **सुरक्षिततेचा अधिकार**:— जिवंत आणि संपत्तीला धोकादायक ठरतील अशा वस्तूंच्या आणि सेवांच्या विपणनाविरूद्ध सुरक्षितता प्राप्त करण्याचा अधिकार प्रत्येक ग्राहकाला आहे. २ **माहिती प्राप्त करण्याचा अधिकार**:— अनेकदा व्यापारी वस्तूंची विक्री करतांना अनुचित प्रथांचा अवलंब करतात. मालाचा दर्जा, परिणाम, शुद्धता, क्षमता, किंमत याबाबत ग्राहकाला पूर्ण माहिती नसेल तर त्याची फसवणूक होण्याची शक्यता अधिक असते. अशी फसवणूक होवू नये म्हणून वस्तूंच्या संदर्भात विक्रेत्यांकडून संपूर्ण माहिती मिळविण्याचा अधिकार ग्राहकाला आहे. ३. **निवड करण्याचा अधिकार**:— बाजारपेठेत अनेक वस्तूंचे अनेक प्रकार उपलब्ध असतात त्यामधून आपल्या गरजेनुसार आणि आवडीनुसार पसंत पडलेली वस्तू ग्राहकांना खरेदी करता आली पाहिजे. म्हणजेच उत्पादकांनी संगनमत करून विशिष्ट वस्तूंना विकत घेण्यासाठी ग्राहकांना भाग पाडू नये. ४. **मत मांडण्याचा आणि तक्रारींचा अधिकार**:— ग्राहकांच्या कल्याणार्थ आणि त्यांच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या विविध संघटना आणि प्राधिकारणींसमोर आपली मते मांडण्याचा आणि तक्रार करण्याचा अधिकार ग्राहकांना आहे. ५. **हानीची भरपाई करून घेण्याचा अधिकार**:— प्रतिबंधीत, अनुचित व्यापार—व्यवहार आणि फसवणूकीमुळे ग्राहकांना हानी झाल्यास त्याची भरपाई करून घेण्याचा ग्राहकांना अधिकार आहे. ६. **ग्राहक शिक्षण अधिकार**:— ग्राहक म्हणून आपल्याला मिळणारे संरक्षण, त्या संबंधीचे फायदे व इतर सर्व प्रकारची माहिती मिळविण्याचा व त्या विषयात कौशल्य संपादन करण्याचा ग्राहकाला अधिकार आहे. ७. **आरोग्यदायी वातावरणाचा अधिकार**:— वस्तूंचे उत्पादन आणि विक्री व्यवहारात हवा, पाणी, ध्वनी, इत्यांदीचे प्रदूषण होणार नाही या संबंधी उत्पादकांशी पूरेशी काळजी घेतली म्हणजेच त्यांनी पर्यावरण सरंक्षणाकडे योग्यप्रकारे लक्ष दिले पाहिजे. यासोबतच ग्राहकांनी तक्रार कुठे करावी याबाबत सुद्धा ग्राहकहित कायद्यात तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद दिवाणी कायद्याच्या अनुच्छेद २० नूसार करण्यात आली आहे. त्यानूसार अनेक प्रतिपक्ष असल्यास त्यापैकी एक किंवा एकच प्रतिपक्ष असेल तर तो ज्या जिल्हयात व्यापार करीत असेल त्या जिल्हा न्यायमंचाकडे तक्रार दाखल करता येते. तसेच ज्या ठिकाणी तक्रार उद्‌भवली असेल त्या गावाच्या किंवा शहराच्या जिल्हा न्यायमंचाकडे तक्रार दाखल करता येते. व्यापारी कंपनी किंवा व्यापाराचे मुख्य कार्यालय ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणच्या जिल्हा न्यायमंचाकडे तक्रार चालवावी अशी देखील या अधिनियमात तरतूद करण्यात आली आहे. अशा तरतूदीमूळे ग्राहकाला सामान्यपणे आपल्याच जिल्हयाच्या न्यायमंचाकडे तक्रार करता येईल असे गृहित धरले आहे.

**ग्राहकहित संरक्षण (सुधारणा अधिनियम—२००२)**:— ग्राहकहित संरक्षण कायदा २४ डिसेंबर १९८६ ला पारित झाल्यानंतर या कायद्याची अंमलबजावणी करतांना या कायद्यातील काही त्रुटी लक्षात आल्यात म्हणून या कायद्यात काही सुधारणा करून हा कायदा अधिक प्रभावी आणि ग्राहकहितांचे संरक्षण करण्यास अधिक सक्षम करण्यात आला. १९८६ च्या ग्राहकहित संरक्षण कायद्यामधील काही त्रुटी मध्ये बदल करून ग्राहकहित संरक्षण (सुधारणा अधिनियम—२००२) अंमलात आणन्यात आला.

अशाप्रकारे ग्राहकांच्या संरक्षणाबाबत अत्यंत महत्त्वाच्या सुधारणा २००२ च्या ग्राहकहित संरक्षण सुधारणा अधिनियमात करण्यात आल्या आहेत. या कायद्यामुळे ग्राहकाला व्यापारी, विक्रेते व उत्पादक यांच्याकडून होणाऱ्या फसवणूकीपासून स्वत:चे संरक्षण करणे सोपे झाले आहे. मात्र या कायद्याचा फायदा सर्वस्वी ग्राहकांनाच करून घ्यायचा आहे. ग्राहक जागृत असेल तरच याचा फायदा आहे. आपल्यावर होत असलेल्या अन्यायाची तक्रार लगेच ग्राहकाने जिल्हा तक्रार निवारण मंचाकडे केली पाहिजे. तरच व्यापारी, उद्योजक, उत्पादनकर्ते व विक्रेते यांना या कायद्याचा धाक वाटेल. जर आपण ग्राहकांना फसविले तर नुकसान भरपाई तर द्यावीच लागते आणि आपली व मालाची बदनामी सुद्धा होते, अशी भीती वाटली तरच या कायद्याचे फलित मिळाले असे समजावे. म्हणून ग्राहक जागृत होणे आणि या कायद्याची कठोर अंमलबजावणी होणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

**संदर्भ ग्रंथ**:—


१. प्रदीप आगलावे, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००३.

२. राम आहुजा, सामाजिक समस्याएँ, रावत पब्लीकेशन, दिल्ली, १९९८.

३. अभया शेलकर, ग्राहक संरक्षण अधिनीयम १९८६ व ग्राहक संरक्षण नियम, नाशिक लॉ हाउस, औरंगाबाद, २००३.

४. अ. भा. ग्राहक पंचायत पुणे, ग्राहक तिर्थ, अ.भा. ग्राहक पंचायत, पुणे, जाने. २००६.

५. न्या. बाळकृष्ण इराडी, ॲड. दादासाहेब बेंद्रे, ग्राहक संरक्षण: सामाजिक न्यायाचा असामान्य कायदा आणि दिवाणी न्यायालये, अ.भा. ग्राहक पंचायत, पुणे.

६. सी. एम. ढोपरे, सर्वांसाठी ग्राहक संरक्षण कायदा १९८६, गीस्मिन प्रकाशन, मुंबई, २००३.

७. दिलीप फडके, ग्राहक संरक्षणाचा त्रिशूल, ग्राहक कल्याण उच्चाधिकार समिती, महाराष्ट्र शासन, मुंबई.

८. किशोर लुल्ला, वसंत आपटे, माझे अधिकार, ग्राहक पंचायत, सांगली, ऑक्टो. २००३.

# कौटुंबिक हिंसाचारापासून महिलेचे संरक्षण

**ओमप्रकाश मधुकर सहारे,** संशोधक विद्यार्थी, गोंडवाना विद्यापिठ, गडचिरोली. मो. न. ८३२९२९१६८६

भारतीय समाजात महिलांवर होणारे अत्याचार अजुनही संपलेले नहीत त्यात दिवसेंदिवस भर पडलेली दिसुन येते. या अत्याचारात मग ते शारीरिक, मानसिक, शाब्दिक, कौटुबिक, भेदभाव आदीच्या माध्यमातून महिलावर अत्याचार हे होतच आहे. महिलांवर होणाऱ्या अत्याचारापैकी कौटुबिक अत्याचार ही एक प्रमुख सामाजिक समस्या निर्माण झाली आहे.

कौटुबिक हिंसा ही प्रामुख्याने महिला आणि १८ वर्षाखालील बालकाचा संदर्भात होत असल्याचे आढळुन येते, भारतात ६० टक्के महिलांना घरगुती छळाला सामोरे जावे लागते दर १ मिनीटाला महिले विरूद्ध गुन्हा झालेला असतो दर ६ मिनिटाला एक महिला आत्महत्या करत असते. दर २९ मिनिटाला एक हुंडाबळी घटना घडत असतें.

जेव्हा एकाच कुटुंबात राहणाऱ्या व नातेवाईक असलेल्या सदस्यावर त्याचे कुटुंबातील लोक अन्याय, करतात व बरेचदा अत्याचार ग्रस्त महिला ही आपल्या वर चे अत्याचार सहन करत असते. याच कारण तीला समाजात आपल्या कुटुंबाची प्रतिष्ठा धुळीत मिळेले म्हणुन निमुटपणे ती सहन करते व या पार्श्वभूमीवर कौटुबिक अत्याचार प्रमाण हळूहळू वाढत जाउन शेवटी टोकाला पोहचते. थोडक्यात कौटुबिक हिंसाचार हा महिलांच्या विरूद्धची हिंसा होय व कौटुबिक हिंसेच्या संदर्भात महत्त्वाची बाब म्हणजे हिंसेतील पिडीत व्यक्ती ही हिंसा करणाऱ्या व्यक्तीची नातेवाईक असते.

आता हि स्थिती निर्माण झाल्यामुळे कौटुंबिक हिंसा ही एक मोठी समस्या बनली आहे म्हणुन कौटुबिक हिंसेला प्रतिबंध करण्यासाठी केंन्द्र सकारने कौटुंबिक हिंसेपासून महिला संरक्षण कायदा २००५ आणि कौंटुबिक हिंसा पासुन महिला संरक्षण नियम २००६ ला लागु केली आहे. या कायद्याची परिभाषा पुढील प्रमाणे आहे.

या कायद्यानुसार आरोपी व्यक्तीचं कोणतेही कार्य काही कारणे किंवा आचरणाचा समावेश कौटुबिक हिसेंमध्ये होईल जर तो:–

क) पिडीत व्यक्तीचा स्वास्थ, सुरक्षा, जीवन, अंगाची वा त्याची मानसिक वा शारिरिक लाभाची अपहानी करतो किंवा त्यास कोणतीही हानी पोहचवितो किंवा त्यास संकटात टाकतो किंवा त्याची अशी करण्याची प्रवृत्ती आहे आणि ज्याच्या अंतर्गत शारीरिक दुरूपयोग, लैगिंक दुरूपयोग, मोखीक आणि भावनत्मक दुरूपयोग आणि आर्थिक दुरूपयोग केला जातो. किंवा

ख) कोणत्याही स्वरूपातील हुंडा किंवा अन्य संपत्ती किंवा मुल्यवान वस्तुची कोणत्याही कायद्याच्या विरूद्ध मागणीच्या पूर्तीकरिता त्यास किंवा त्याच्याशी संबंधीत कोणत्या व्यक्तीला त्रास देण्याच्या दृष्टिने पिडीत व्यक्ती व्यक्तीने उत्पीडन केले जाते किंवा त्यास हानी पोहचविली जाते किंवा संकट निर्माण केले जाते.

ग) भाग (क) किंवा (ख) मध्ये वर्णीत कोणत्या आचरणाद्वारे पीडीत व्यक्ती किंवा त्याच्याशी संबंधीत कोणत्या व्यक्तीवर धमकीचा प्रभाव ठेवीत असेल किंवा

घ) पिडीत व्यक्तीला हानी पोहचवितो किंवा उत्पीडन होईल असे करतो मग ते शरिरीक असो किवा मानसिक असो.

अशा प्रकारे कौटुबिक हिसेंची व्यापक अशी परिभाषा प्रस्तुत कायद्याद्वारे केलेली आहे. कुटुंबातील नातेवाईक असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या स्वास्थ, सुरक्षा जीवन किंवा मानसिक आणि शारीरिक हानी केली असेल किंवा त्यास संकटात टाकले जाते. इतकेच नव्हे तर आर्थिक लाभासाठी त्या व्यक्तीशी संबंधीत व्यक्तीला त्रास देण्यासाठी पिडीत व्यक्तीचे उत्पीडीत केले जाते किंवा धमकी देवून त्याला मानसिक दहशती खाली ठेवल्या जाते त्यास कौटुबिक हिंसा असे म्हणतात. हा कायदा २६ नोव्हेंबर २००६ पासुन लागु करण्यात आलेले आहे.

**कौटुबिक हिंसेचे स्वरूप:–** महिला संरक्षण कायद्याने कौटुबिक हिसेंचे स्वरूप स्पष्ट केले आहे ते पुढील प्रमाणे:–

१) शारीरिक दुरूपयोग :– शारीरिक दुरूपयोग म्हणजे आरोपी व्यक्तीचे असे कोणतेही कार्य व आचरण होय कि, ज्यामुळे पिडीत व्यक्तिला शारीरिक त्रास, नुकसान किंवा त्याच्या जीवनास आरोग्याचा धोका निर्माण होतो तसेच त्याच्या स्वास्थ किंवा विकासाचा –हास होतो पिडीत व्यक्तीवर हमला केला जातो किंवा त्याला मारहाण केली जाते.

२) लैगिंक दुरूपयोग :– लैगिंक दुरूपयोग म्हणजे लैगिंक स्वरूपाचे असे कोणतेही आचरण कि जे स्त्रीत्वाचा दुरूपयोग, अपमान आणि तिरस्कार करते तिच्यावर आक्रमण केले जाते.

३) मैखिक आणि भावनात्मक दुरूपयोग :– मौखिक आणि भावनात्मक दुरूपयोग मध्ये अपमान, उपहास, तिरस्कार, यांचा समावेश होतो यात विशेष रूपात मुले वा मुलगा न होण्याचा संबंधात अपमान किंवा उपहास होय. तसेच कोणत्या अशा व्यक्तीला शारीरिक पीडा करण्याच्या तसेच धमक्या देणे याचा देखील समावेश मौखिक आणि भावनात्मक दुरूपयोगामध्ये होतो.

४) आर्थिक दुरूपयोग :– अशा सर्व वा कोणत्या आर्थिक वा वित्तीय संसाधने, ज्यांनी पीडीत व्यक्ती हक्कदार आहे त्या आर्थिक गोष्टी पासुन पिडीत व्यक्तीला वंचित ठेवणे किंवा त्याच्या उपयोग करू न देणे म्हणजे आर्थिक दुरूपयोग होय.

अशाप्रकारे कौटुबिक हिंसेचे स्वरूप आहे

**कौटुबिक हिंसेचे वर्गीकरण:–** भारतात आपल्याला कौटुबिक हिंसेचे विविध प्रकार पाहावयास मिळतात त्याच आधारे त्याचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येते. जसे १. पत्नीला मारहाण करणे. २. पत्नीला वाईट वागणूक देणे. ३. वधुला जाळणे. ४. विधवा स्त्रियांवर अत्याचार करणे. ५. लैंगिक दुर्व्यवहार करणे. ६. पत्नीचा मानसिक छळ करणे. ७. वृद्ध महिलांशी दुर्व्यवहार करणे. ८. पत्नीला घराबाहेर हाकलुन देणे. ९. कुटुबांतील नातेवाईक असलेल्या स्त्री वर बलात्कार करणे, इत्यादी.

**कायद्या अंतर्गत महिलांचे संरक्षण**:– १) कौटुबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षण अधिनियम २००६ या कायद्याअंतर्गत कुटुंबात राहुन पीडीत महिला हिंसे विरूद्ध तक्रार दाखल करू शकते. २) इतर कोर्टात दावा चालु असला, तरी या कायद्याअतंर्गत केस दाखल करता येते. ३) या कायद्याअंतर्गत संरक्षण अधिकारी आणि घोषित केलेल्या सेवादायी संस्था याची भुमिका निश्चित करण्यात आली आहे. ४) पिडीत महिलां कुटुंबात राहून तिला कायद्याने संरक्षण दिले जाते तिला कुठल्याही प्रकारची इजा करता येत नाही. ५) हिंसाचाराची तक्रार पीडीत व्यक्ती प्रत्यक्ष जावून तक्रार नोंदवू शकते साध्या कागदावर तक्रार लिहून देवून पत्राद्वारे फोन किंवा ई–मेल पाठवून तक्रार नोंदवून मदत मागता येते. ६) कोणत्याही एखाद्या स्त्रीचा छळ होत असल्याचे आपल्या

निदर्शनास आल्यास तातडीने जवळच्या संरक्षण अधिकाऱ्याकडे महिला तक्रार करू शकते.

**उपाययोजना:–** कौटुंबिक हिंसा कमी करण्यासाठी काही निश्चित असे उपाय करता येतात. काही महत्त्वाचे उपाय पुढीलप्रमाणे आहेत. – १.पीडीत महिलांनी हिसेला विरोध करावा. २. कौटुबिक हिंसा ही घरातच घडत असते इतर लोंकाना त्या हिंसेची माहिती नसते म्हणुन ज्या महिलांवर हिंसा होते तिने त्याला विरोध केला पाहिजे. विरोध केला नाही तर अत्याचाराला पायबंद घलता येणार नाही. ३. संबंधीत पोलीस स्टेशन मध्ये तक्रार नोंदवावी. बऱ्याचदा घरघुती हिंसेच्या तक्रारी पोलीस स्टेशन मध्ये नोंद होत नाही याचे कारण नातेवाईक आपल्याला काय म्हणतील? घराण्याची बेईज्जत होईल वगैरे कारणे दुर ठेवुन नोंदणी करणे. ४. कुटुबातिल इतर नातेवाईकांना घरगुती हिंसेबद्दल माहिती असल्यास त्यांनी मध्यस्थी करून हिंसा थांबविण्याचा प्रयत्न केल्यास घरघुती हिंसेचे प्रमाण कमी होईल. ५. प्रभावी व कठोर कायद्यांची निर्मीती करून त्याची अंमलबजावणी करावी. घरघुती हिंसा किंवा महीला अत्याचार थांबवण्यासाठी कायद्यात बदल, सुधारणा आणि त्वरीत कार्यवाही झाल्यास घरगुती हिंसेवर नियंत्रण घालता येऊ शकते. ६. कौटुंबिक हिंसाचाराविरूद्ध देशपातळीवर जनजागृती करावी. भारतीय संविधानाने महिला संरक्षणासाठी अनेक कायदे तयार केले आहते व ते प्रभावीपणे कार्यरत आहेत. या कायद्याविषयींची जनजागृती टिव्ही, वृतपत्रे, सोशल मिडीया, महाविद्यालयीन विद्यार्थी, स्त्री संघटनां यांच्या माध्यमातून केल्यास कौटुंबिक हिंसेचे प्रमाण कमी होईल.

**सारांश:–** भारत सरकारने कौटुबिक हिंसेबाबत कायदा केला असला तरी बहुसंख्य लोकांना त्याबद्दल काहीही माहिती नाही. ग्रामीण भागात तर या बद्दल जाणिवच नाही. तर बऱ्याच पिडीत महीला हया आपल्यावरील होणारा अत्याचार लपवून ठेवतात कारण त्यांच्यामते समाजात घराण्याची बेअब्रु होते त्यामुळे अशा वागणूकीतून अत्याचार वाढतो. कौटुबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायद्याची योग्य प्रभाविपणे अमलबजावणी होणे गरजेचे आहे. तसेच कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायद्याविषयीची जनजागृती मोठया प्रमाणात झाल्यास कौटुबिक अत्याचारास पायबंद घालता येऊ शकतो.

संदर्भ ग्रंथ सूची:–

१. जोशी नारायण विजय, कायदे: स्त्रिया व मुलांचे, मुकुंद प्रकाशन, ठाणे, २००२.
२. आगलावे प्रदिप, समाजशास्त्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे, २००१.
३. आगलावे प्रदिप, भारतीय समाज: प्रश्न आणि समस्या, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००१.
४. मेश्राम सुरेश, समाजकार्यसाठी समाजशास्त्र, यश प्रकाशन, नागपुर, २००५.
५. फुले जोतीराव, सार्वजनीक सत्यधर्म, फुले समग्र वाड:मय, मुबंई, १९९१.
६. कुलकर्णी पी. के., प्रारंभिक समाजशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपुर, २०००.

ISSN 2278-3199

Published By

DEPARTMENT OF SOCIOLOGY

**SETH NARSINGDAS MOR ARTS, COMMERCE &**
**SMT. GODAVARI DEVI SARAF SCIENCE COLLEGE**

TUMSAR, DIST. BHANDARA - 441912.
Email-principalsnmorcollege@rediffmail.com / rjbhagat1968@yahoo.co.in
Website - www.snmorcollege.org.in Journal Website: www.journalsnmcsip.org.in
Phone No. - 07183-233300 / 07183-233301 Mobile - 09422113067 / 09420359657